# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९/०४/२०१२

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/४/२०१२ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक १९/४/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती आशा जीवन इदनानी हया पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीमती आशा जीवन इदनानी —— महापौर

२. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३८ | श्रीम. पंचशीला नाना पवार |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३९ | श्रीम. खान इसरद सऊद |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ४० | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४२ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ११ | श्री. जाफरअली चौधरी | ४६ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | डॉ. महेश गजानन गावडे | ४९ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १५ | श्रीम. अनिता संतोष तरे | ५० | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १६ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५१ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १७ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५२ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ५३ | श्रीम. पिंकी मुरलीधर उदासी |
| १९ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ५४ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५५ | श्रीम. दिप्ती नवीन दुधानी |
| २१ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५६ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५७ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २३ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५८ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीम. भागीबाई हारीसींग लबाना | ५९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ६० | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २७ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ६२ | श्री. विजय चाहु पाटील |
| २८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ६३ | श्रीम. माया हरेश चावला |
| २९ | श्री. गणपत गोविंद एडके | ६४ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३० | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ६५ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६६ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३२ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ६७ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३३ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६८ | श्री. सन्मुख ग्यानचंद मनवानी |
| ३४ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६९ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३५ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ७० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचदांनी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ७१ | श्री. बी.बी. मोर |
| ३७ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | | |

**तर**

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ३. श्री. सुरेश (पप्पू) बूधरमल कालानी, ४. श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता, ५. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, ६. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ७. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ८. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, ९. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १०. श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, ११. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, १२. श्रीम. अपेक्षा विकास पाटील, हे सभेस अनुपस्थित होते.

श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१ श्री. विजयकुमार म्हसाळ, उप–आयुक्त, मुख्यालय
२ श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३ श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
५. श्रीमती संगिता धायगुडे, उप–आयुक्त, आरोग्य
७. डॉ. विजया कंठे, कर निधारक व सकंलक
८. श्री. एम.जी. गिरगावंकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि
१०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११ श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२.श्री. अजित गोवारी, प्र. प्रभाग अधिकारी
१३.श्री. मनिष हिवरे, प्रभाग अधिकारी
१४.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१५.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सर्व प्रथम वंदे मातरम् म्हणून **दुपारी २.०५ वाजता** सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री.राजु जग्यासी:–** मा. महापौरजी, निवडणूकी नतंरची आज आपली पाहिली महासभा आहे, मगंळवार दिनांक १७/०४/२०१२ रोजी, महानगरपालिकेच्या बेजबाबदारपणामुळे जे कामहाज चालते ते संपुर्ण शहराला माहित आहे, सभागृहातील सर्व सदस्यांनाही माहित आहे. पवई परिसरामध्ये एक दुर्घटना घडली होती जेथे एका मजुर महिलेचे निधन झाले होते, त्याच्यासाठी आपण आणखी काही करु शकत नाही परंतु संपुर्ण सभागृहाला विनंती आहे की, ज्या मजुर महिलेचे निधन झाले आहे तिला आपण या सभागृहात श्रध्दांजली वाहावी. माझी सर्वांना विनंती आहे की त्या गरीब महिलेला कमीत कमी आपण श्रध्दांजली दयावी.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–**आपल्या सर्वानुमते पुढीलप्रमाणे शोक प्रस्ताव पारीत करण्यात येत आहे.



---

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्याशी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

**शोक प्रस्ताव**

मंगळवार दिनांक १७/४/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता उल्हासनगर कॅम्प नं. ३ येथिल रिलायन्स इंडस्ट्रिअल इस्टेट व ॲचल पॅलेस समोरील अनाधिकृत बांधकामाचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत श्रीमती

चांदीबाई मेढावत (२३) ही मजूर महिला जागीच मरण पावली तर अन्य ६ जण गंभीर जखमी झाले. जखमींमध्ये १) श्रीमती सोनाबाई शिवा चौहान (२४), २) श्रीमती सोनीबाई हनुमंत राठोड (२५), ३) श्री. गोविंद सुध्या चौहान (४०), ४) श्रीमती क्रिस्ताबाई रामा चौहान (२८), ५) श्री. सुरेश दशरथ विश्वकर्मा (१२), ६) श्रीमती अंबीबाई चौहान (२५) यांचा समावेश आहे. त्यांना उल्हासनगर येथिल मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यांत आले होते.

वर उल्लेखिलेल्या मृत कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३ अ** **दिनांक:–१९/४/२०१२**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती चांदीबाई मेढावत यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** उल्हासनगर महानगरपालिकेस जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याबाबतचे शासनाचे शुध्दीपत्रक विचारात घेणे बाबत.

---

**सदस्य श्री. मनोज सयानी:–** मा. महापौरजी, या गोष्टीवर मी प्रकाशझोत टाकु इच्छितो की, अत्यंत्य तातडीच्या सभेची ही जी नोटीस देण्यात आलेली आहे, ही नोटीस काल सांयकाळी साडे सहा वाजता महापालिकेमध्ये मला मिळालेली आहे. आणि आज दुपारी २.०० सभा बोलावली आहे कायदा व नियमानुसार २४ तासाची नोटीस देणे आवश्यक आहे असे मला वाटते. परंतु या सभेची नोटीस काल सायंकाळी साडे सहा वाजता मिळाली असल्याने व आज दुपारी २.०० वाजता सभा असल्याने २४ तास पुर्ण होत नसल्याने काय ही सभा कायदेशीर आहे?

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–** सन्मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, आम्हांस या सभेची नोटीस काल दुपारी १.०० वाजता मिळाली आहे. कुणाला साडे सहा वाजता मिळाली असेल तर त्याबाबत काय म्हणायचे ते सांगा.

**सदस्य श्री. मनोज सयानी:–** याचाच अर्थ महापालिकेचा तो विभाग आपल्या कामामध्ये अयशस्वी आहे, आणि हे प्रशासनाचे अपयश आहे. कुणाला दुपारी १.०० वाजता तर कुणाला सायंकाळी ६.०० वाजता नोटिस मिळते.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–** महानगरपालिकेमध्ये जर कुणी सदस्य मिळत नसेल, कुणी इकडे तिकडे फिरत असेल तर त्यास कोण काय करेल? आपण शिक्षण मंडळाच्या निवडणुकीमध्ये जावुन बसाल आणि नंतर सहा वाजता येथे याल तर कोण काय करु शकते?

**सदस्य श्री. मनोज सयानी:–** मा. सचिवजी, आपणाशी काल माझे दुरध्वनीवरुन बोलणे झाले होते. त्यानुसार आपणाकडुन अशी माहिती मिळाली की साडे चार वाजेनंतर आपणाकडे नोटीस पोहचेल. काल शिक्षण मंडळाची निवडणूक होती, मी तेथे उपस्थित होतो तेथे विरोध प्रकट करुन दहा मिनिटातच मी येथे आलो व साडे सहा वाजता आपल्या शिपायाने मला नोटीस दिली आहे. आणि त्याची मी जी पोच दिली आहे त्याठिकाणी स्वाक्षरीच्या खाली तारीख व वेळही लिहिलेली आहे, त्यावेळेस मी विरोधी पक्ष नेत्याच्या कार्यालयात बसलो होतो त्याचाही माझेकडे पुरावा आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** मा. महापौरजी, ही एक तांत्रिक बाब आहे, सभा सुचना कोणाला लवकर मिळाली, कोणाला नाही मिळाली हा महत्वाचा मुदद्‌ा नाही, मुंबई प्रातिंक महापालिका अधिनियमानुसार ही महासभा चालु आहे, मा. महापौर महोदया आपणांस माझी विनंती आहे की सभागृहाची शिस्त सन्मा. सदस्यांनी राखली पाहिजे. सभागृहाची मर्यादा आणि लोकीक कायम ठेवला पाहिजे. मी सभागृह नेता म्हणुन आपणांस विनंती करतो की, आपण सन्मा. सदस्यांना सांगावे की, सभा सूचनेवरील विषयावर आपण आपले विचार मांडावेत. आपण आपले विचार मांडण्यासाठी येथे आलो आहोत. वैयक्तीक भांडणासाठी आपण येथे आलेलो नाही, फक्त विरोध करायचा म्हणुन विरोध करु नका. सभेची नोटीस सायंकाळी चार वाजता मिळाली असेल, सहा वाजता मिळाली असेल, सभा असल्याची माहिती तर मिळाली ना? त्याविषया सदंर्भात आपले जे काही विचार असतील ते मांडा. आपणास जी सभा सूचना मिळते त्यावर विचार करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी वेळ मिळाला आहे. ही तातडीची महासभा आहे, तातडीची महासभा का लावली आहे? ठिक आहे, यापुढे आपणास विनंती आहे की....

**यावेळी सन्मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा व श्री. मनोज सयानी हे बोलण्यासाठी उभे राहिले.**

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>** सन्मा. महापौरजी, मध्येच बोलण्यासाठी उभे असलेल्या सदस्यांना बसण्यास सांगा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** मी अगोदरच आपणांस सांगितले की, सभेची शिस्त पाळण्यास सदस्यांना सांगा. एकेकालाच बोलण्यास सांगा.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**एकेकांनी बोला. प्रथम विरोधी पक्षांच्या सदस्याना बोलु दया.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>** धन्यवाद मा. महापौरजी, आपण विरोधी पक्षीयांना बोलण्याची संधी दिली. मी आमचे सहकारी श्री. बोडारे साहेबांना सागु इच्छितो की, काल सायंकाळी ६.०० वाजता मला ही सभा सूचना दिली आहे तिच्यावर विरोधी पक्ष म्हणुन आम्ही आजपर्यंत विचार करु शकतो काय? शहरातील व्यापाऱ्यांचे मत जाणुन घेवु शकतो काय? व्यापाऱ्यांचे मत जाणुन घेण्यासाठी आम्हांस पुरेसा वेळ मिळालेला नाही. आपणांस वेळ मिळाला असेल, आपणाकडे असे काही मुदद्‌े असतील तर ते सभागृहापुढे मांडा. या प्रस्तावावर अभ्यास करण्यासाठी आम्हाला पुरेसा वेळ मिळालेला नाही आणि सभा सूचना मिळुन २४ तास झालेले नाहीत. यास्तव राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्यावतीने आमची मागणी आहे की, ही सभा स्थगित केली जावी व उद्या ठेवली जावी. सर्वांच्या सहमतीने राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी ही सभा स्थगित करु इच्छित आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** महापौर महोदया, माझी विनंती आहे की, कुण्याही सदस्यांने बोलण्यास सुरुवात करण्यापुर्वी आपणाकडुन अनुमती घेतली पाहिजे. आपण अनुमती दिली त्यानुसार मी बोलत आहे. सर्व सदस्यांना विनंती करतो की, मी अगोदरच सांगितले की, आपण येथे भांडण करण्यासाठी आलेलो नाहीत. प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असेल, हत्ती एक आहे परंतु तो पाहणारे वेगवेगळे आधंळे वेगवेगळा अदांज बाधंतात. परंतु आपण तर आधंळे नाहीत. हे शहर आपले आहे. या शहरावर आपले प्रेम आहे. प्रत्येकाचे आहे, फक्त मलाच आहे इतरांना नाही असा विचार करणे चुकीचे आहे. या शहरावर सर्वांचेच प्रेम आहे, व या शहरासाठी जे काही चांगले आहे त्याबाबत आपण सर्व जण आपापले विचार येथे ठेवु या, ते विचार ठेवण्याची रीत चागंली असली पाहिजे, जेणेकरुन सभागृहात शिस्त राहील, सभागृहाची मर्यादा राहील. आपण लोकांचे प्रतिनिधीत्व करतो यासाठी आपणास बोलण्यास परवानगी दिल्यानंतर आपण चर्चा करु, हेच मला सांगायचे होते.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**आजच्या सभेचा जो विषय आहे त्यावर आपण बोलुया.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>** मा. महापौरजी, मी सचिवांना विचारले होते ही, ही सभा कायदेशीर आहे का? त्याचे मला अद्याप उत्तर मिळाले नाही.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>** मा. महापौरजी, जसे सभागृह नेता, माझे बंधु श्री. बोडारे साहेबानी सांगितले की, सभागृहाच्या मर्यादेचे पालन केले पहिजे. आम्ही त्यांच्या या म्हणण्याचा आदर करतो. व श्री. बोडारे साहेबांना माहित आहे की श्री. मनोज सयानी यांनी जो मुदद्‌ा उपस्थित केला आहे, नियमानुसार ही जी महासभा व्हायला पाहिजे ती होत आहे की नाही. आम्ही आपणाकडुन केवळ जाणुन घेवु इच्छित आहोत, येथे आयुक्त साहेबही बसले आहेत, आपण महापौर येथे उपस्थित आहात, सचिव साहेब आहेत, आपण सांगा की, ही जी सभा सूचना काढली आहे तिच्यावर २४ तासापूर्वी मी सही केली आहे, एवढेच सांगितले तरी विषय येथे समाप्त होईल. आपण सांगा ना सभागृहाला, आयुक्त साहेबांनी सांगावे आम्ही २४ तासापूर्वी त्यावर सही केली आहे. आपण त्या

मुदद्यावर स्पष्टीकरण का देत नाहीत? जर आम्ही याबाबतची माहिती जाणुन घेवु इच्छित आहोत तर आपण खरी खरी माहिती दया, की ही जी सभा सूचना आहे तिच्यावर आम्ही २४ तासापूर्वी सही केली आहे. आयुक्त साहेब मी आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की ही सभा नियमानुसार चालु आहे? तेवढे सांगितले की विषय येथे समाप्त होतो.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**आम्ही आपले विचार ऐकुन घेतले, आम्ही कायद्यानुसार ही सभा बोलावली आहे व ती चालविली जाईल.

**<u>उपमहापौर:—</u>** मा. महापौर महोदया यांनी सांगितले आहे की, या सभेचे आयोजन जे केले आहे ते नियमानुसारच केले आहे, २४ तासापूर्वीच सभा सूचना निघाली आहे व ती पोच करताना काही ठिकाणी लवकर व काही ठिकाणी उशीरा पोच झाली आहे. यासाठी महापौर महोदया यांनी असे सुध्दा निवेदन केले आहे की, या विषयावर विरोधी पक्षाच्या वतीने जर प्रथम आपण बोलू इच्छित असाल तर एकेक करुन चर्चा करु शकता.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>** मा. महापौर महोदया.......

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>** श्री. प्रदिपजी आपण विरोधी पक्षात आले आहात का? आले असाल तर आपले स्वागतच आहे. मा. महापौरांनी सांगितले की, सर्वात प्रथम विरोधी पक्षीय बोलतील. सन्मा. महापौरजी, खुप खुप धन्यवाद आपणास. मला असे वाटते की प्रथम आमचे बंधु श्री. मनोज सयानी यांनी बोलावे त्यानंतर मी बोलेन.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>** धन्यवाद श्री. राजु जग्यासी व श्री. राजेश वधारिया यांना, मा. महापौर महोदया तातडीच्या विशेष महासभेचे येथे आयोजन करण्यात आलेले आहे. या अगोदर उल्हासनगर महानगरपालिका व्यापाऱ्याकडुन जकात कर वसुल करत होती. त्यानंतर काही दिवसापूर्वी शासनाकडुन असा निर्णय आला की, जकात कर बंद करुन स्थानिक संस्था कर लावला जावा. व काही दिवस स्थानिक संस्था कर आकारणीचा कारभार काही दिवस चालला. महानगरपालिकेचे सक्षम अधिकारी, कर्मचारी व जेवढे काही कर्मचारी आहेत त्यांच्यासाठी स्थानिक संस्था कर हा पहिला अनुभव होता. तरीदेखील त्यानी या महापालिकेत १५ ते १८ दिवस हा कारभार चालविला. त्यानंतर शासनाचा निर्णय बदलला व एक आदेश आला की, उल्हासनगर महानगरपालिकेत जकातीऐवजी स्थानिक संस्था कर लागु केला आहे. तो १ एप्रिल ऐवजी १ जुलै पासून चालु केला जावा, असा प्रकारच्या निर्णयाची एक प्रत नोटीस बरोबर आम्हालाही मिळाली आहे. नगरविकास विभागाकडुन हा जो फॅक्स आलेला आहे तो महापालिकेत सांयकाळी ७.०० वाजेनंतर पोहोचतो., रात्री १२.०० वाजल्यापासून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांवर जकात कर लागु होतो. कुणाला कोणती नोटीस न देता, कुणाला विश्वासात न घेता, ना एखादया वर्तमान पत्रामध्ये, ना इलेक्ट्रानिक मिडीयामध्ये या बाबतची माहिती दिली जात. आमच्या उल्हासनगर मधील जे व्यापारी मेहनत करतात उल्हासनगर शहराची त्यानी आपल्या कष्टाने विकास केला आहे ते रात्री झोपताना असा विचार करतात की, आपल्या शहरात स्थानिक संस्था कर लागु आहे व सकाळी उठताच त्याना माहित पडते की, जकात कर लागु झाला आहे. काय हा विषय अतिआवश्यक व एवढा तातडीचा होता? जो आठ वाजताचा आदेश रात्री १२.०० वाजता महानगरपालिका लागु करते. प्रत्यक्षात उल्हासनगर मध्ये एवढया काही ज्वलंत समस्या आहेत, कचऱ्याची समस्या, पाण्याची समस्या, अर्धवट तुटलेल्या इमारती, धोकादायक इमारतीची समस्या, मागील साडे पाच वर्षामध्ये उल्हासनगर मध्ये धोकादायक इमारती कोसळुन जवळ जवळ दहा लोकांचा मृत्यु झाला आहे, काय हे मुदद्े आवश्यक नाहीत. येथे रात्री आठ वाजता आलेला आदेश रात्री बारा वाजता लागु केला जातो. व दुसरे असे की, सभेची नोटीस जी मला सायंकाळी सहा वाजता मिळाली आहे तीच नोटीस सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकास दुपारी एक वाजता मिळाली आहे. दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता खाजगीकरण करण्याची नोटीस निघते, काय हा शहराचा तातडीचा विषय होता? ज्यामध्ये एवढी तत्परता दाखविण्यात आली?

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**आम्ही आपले विचार एकले, कृपया आपण बसुन घ्या.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>** ध्यन्यवाद.

**<u>सदस्या श्रीम. मिनाताई सोनेजी:—</u>** मा. महापौरजी, आपण आणलेल्या प्रस्तावाचे कॉग्रेस पक्षाच्या वतीने आम्ही समर्थन करतो. एवढेच नाहीतर शहरविकासाचे जेवढे काही मुदद्े येतील त्यांचे आम्ही समर्थन करु, कारण की कालची जकातीची वसुली आहे ती सतरा लाख आहे. प्रत्यक्षात ती बेचाळीस ते त्रेचाळीस लाख ऐवढी झाली पाहिजे होती. तर आम्ही मान्य करतो की शहराच्या विकासासाठी आर्थिक सक्षमता होणे गरजेचे आहे. मागील आठवडयात जी काही लेखणी बंद आंदोलने झाली, संप झाले व ॲन्थोनीची जी समस्या उद्‌भवली त्यामुळे

शहरात बऱ्याचशा समस्या निर्माण झाल्या. यास्तव आमच्या पक्षाने असे ठरविले आहे की, या मुद्द्यावंर आपण सत्ताधारी पक्षाला समर्थन दयावे, धन्यवाद.

<u>उपमहापौरः–</u> मा. महापौर महोदयांच्या आदेशाने मी बोलत आहे, माझेनतंर श्री. राजु जग्यासीजी आपण बोला. जसे श्री. मनोज लासी यांनी सांगितले की जकात कर घाई घाईने लागु करण्यात आला. त्याबाबत सभागृहास मी अवगत करतो की, शासनाचे जे शुध्दीपत्रक आले आहे, त्यानुसार या शहरात जकात बंद झालेली नाही. महाराष्ट्र शासनाकडुन ३१ मार्च २०१२ ला एक पत्र आले, ज्यामध्ये जसे लिहिले होते की १ एप्रिल पासून उल्हासनगर महापालिका क्षेत्रात जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागु केला जावा. आणि १७ एप्रिल ला जे पत्र आले आहे, त्यामध्ये त्यानी आपली चुक झाल्याचे मान्य केले आहे. व एक शुध्दीपत्रक काढले आहे. की आम्ही अचानक आपणांस ३१ मार्च २०१२ ला जे पत्र लिहिले होते की आपण १ एप्रिल २०१२ पासून जकात कर बंद करुन स्थानिक संस्था कर लागु करावा ते पत्र लिहिण्यात आमची चुक झाली आहे व हा स्थानिक संस्था कर आपण १ जुलै २०१२ पासून लागु करा. असे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाकडुन आपणाकडे आलेले आहे. त्याची प्रत सर्व सदस्यांना दिली आहे, महाराष्ट्र शासनाने जी चुक केली आहे त्याचे परिणाम उल्हासनगर महानगरपालिकेने भोगावे, १७ दिवसापर्यंत आपली वसुली ठप्प झाली, जसे हे पत्र आमच्या आयुक्त साहेबांना मिळाले त्यानी त्वरीत जेवढे काही कर्मचारी उपलब्ध होते त्याना जकात नाक्यावर पाठवुन जकात वसुली सुरु केली. कारण की, जकात कर बंद तर झाला नव्हता. जकात कर चालुच होता, त्यामुळे त्यानी एक मिनिटाचा उशीर न करता, जेवढे काही कर्मचारी उपलब्ध होते त्या सर्वांना जकात नाक्यावर पाठवुन (जकात कर जो पहिला लागु होता. नविन आम्ही लावलेला नाही,) जकात कराची वसुली सुरु केली, यामध्ये आयुक्तांनी घेतलेला निर्णय त्यांची प्रशंसा करण्यालायक आहे, व त्यानीच मा. महापौरांच्या आदेशानुसार २४ तासाची नोटीस काढली. कारण की १ जुलै पासून स्थानिक संस्था कर लागु करायचा आहे असा शासनाचा निर्णय आहे. त्यासाठी दुकानांची नोदणी, स्थानिक संस्था कराविषयीचे काम हे सर्व करण्यासाठी आपले कर्मचारी तेथे पाहिजेत व आता उरलेला जो दोन महिने तेरा दिवसाचा कालावधी आहे या कालावधीत जकात वसुली करण्यासाठी आपल्याकडे कर्मचारी उपलब्ध नसतील व एक दिवसातच आपण पाहिले की, चाळीस लाख चार हजार सातशे एक्केचाळीस एवढी आहे. त्या ऐवजी फक्त सोळा, सतरा लाख एवढीच वसुली होत आहे. जर आपल्याकडे उत्पन्न असेल तर आपण या शहरामध्ये विकास कामे करु शकु. आपण पाहिले असेल काही दिवसापूर्वी लेखणी बंद आंदोलन केले होते, कर्मचाऱ्याचे वेतन देण्यात आलेले नाही. बरीचशी कामे येथे थांबली आहेत. यासाठी येणाऱ्या १ जुलै नतंर जो स्थानिक संस्था कर लागु होणार आहे, त्यासाठी नोंदणी करायची आहे आणखी काही कामे करायची आहेत, व्यापाऱ्याबरोबर बैठका घ्यायच्या आहेत, या सर्व गोष्टी लक्षात घेता, मा. महापौर महोदयानी येथे एक प्रस्ताव ठेवला आहे, ज्यावर सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे की जकात वसुलीचे काम महानगरपालिकेने स्वत: करायचे की यापूर्वीचा जो ठेकेदार आहे त्यास किंवा दुसऱ्या कुण्या कंपनीस जकात वसुलीचा ठेका दयायचा याबाबत निर्णय घ्यायचा आहे. यासाठी सदस्यांनी फक्त या विषयावरच बोलावे. जकात अचानक चालु झाली वगैरे न बोलता फक्त याच विषयावर बोलावे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानीः–</u> मा. उपमहापौरजी, आपल्या या मुद्द्यावर मी बोलु इच्छितो.

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

<u>सदस्य श्री. मनोज सयानीः–</u> आमचा आवाज का दाबला जात आहे? उपमहापौरांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर मी बोलु इच्छित असताना आमचा आवाज का दाबला जात आहे, बोलण्यापासून आम्हाला का रोखले जात आहे.

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारीः–</u>एक सदस्य ऐकच वेळ बोलेल, ऐकाच वेळी बोलण्यासाठी उभ्या असलेल्या सर्व सदस्यांनी कृपया बसुन घ्यावे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानीः–</u> विरोधी पक्षाचा आवाज का दाबला जात आहे? एवढी घाई का आहे?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारीः–</u>आपले विचार आम्ही ऐकले आहेत, आम्हांस कोणतीही घाई नाही. कृपया करुन आपण बसुन घ्या. आपणास अगोदरच बोलण्याची संधी देण्यात आलेली आहे. ज्याविषयाबाबत आपण सभागृहात आलो आहोत त्याविषयावरच चर्चा होईल.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>** मी त्या विषयावरच बोलत आहे, आमचा आवाज का दाबला जात आहे? हा विषय पारित करण्यामध्ये काय घाई आहे?

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>** मा. महापौरजी, माझी आपणास विंनती आहे, आमचा जो सदस्य बोलत आहे, त्याचे आपण ऐकुन तर घ्या ना? पाहिजे तर त्यानंतर मला बोलु दिले जावे, त्याबदद्ल माझी काही हरकत नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>** मा. महापौरजी, त्यांना बसण्यास सांगा.

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:–</u>** मा. महापौरजी, एकच सदस्य बोलत आहे बाकीचे सदस्य गुपचुप बसुन राहतील काय? प्रत्येक मुदद्यावर बोलण्यासाठी ते उभे राहतात.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>** २५ तास सभा चालवा, २५ तास...

**<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:–</u>** जो सदस्य मा. महापौरांचा आदेश मानत नाही त्यास निलंबित करा.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>** महापौर महोदया, सभेचे कामकाज शांतपणे चालु ठेवले तर प्रत्येक सदस्य आपले जे विचार मांडत आहे ते ऐकण्यास मजा वाटेल. आपण येथे शहरातील एका ज्वलंत मुदद्यावर चर्चा करण्यासाठी बसलो आहोत. लढाई झगडा करण्यासाठी बसलेलो नाहीत. मी माझे मित्र श्री. मनोज सयानी यांना सांगु इच्छितो की, जकात वसुली घाई घाईने सुरु केलेली नाही, सतरा दिवसांपर्यंत राज्यशासनाने जी चुक केली, एखादी नवीन प्रणाली लागु करायची असेल तर त्या अगोदर त्याबाबत सूचना दयावी लागते परंतु स्थानिक संस्था कराबाबतीत आपणास ३१ मार्च पर्यंत काहीही माहित नव्हते. जकात वसुली बाबत महानगरपालिका निविदा मागवत होती आणि काय होईल याविषयी काही अदांज लागत नव्हता. अचानक ३१ तारखेला शासनाकडुन पत्र येते की स्थानिक संस्था कर लागु करण्यात आला आहे. सतरा दिवसापर्यंत जकात कर बंद करण्यात आला. महापालिका कर्मचाऱ्यांना पगार देता न येण्यासारखी महापालिकेची स्थिती डामाडौल झाली. महापौर महोदया आम्ही काही सदस्य मंत्रालयात गेलो होतो. राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वित्त मंत्रालयात गेलो त्याना हात जोडुन सांगितले की, अनुदान दया, आमच्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे, आमच्या कडे कर्मचाऱ्यांना पगार देण्यास पैसे नाहीत तर शहराची सफाई कशी होईल? लोकांना पिण्याचे पाणी कसे मिळेल? परंतु त्यांनी काहीही लक्ष दिले नाही, मी मुख्यमत्री महोदय यांना धन्यवाद देतो त्यांच्या मनात आले की याना काहीतरी मदत केली पाहिजे आणि त्यामुळेच कदाचित त्यांनी आदेश दिला, सतरा दिवस गेले तर गेले, दोन महिने बारा दिवसापर्यंत आपण जर जकातीची काही वसुली करु शकलो तर, या महापालिकेची आर्थिक स्थिती मजबुत करु शकु, त्यामध्ये सर्वांचेच भले आहे, त्यामध्ये काही घाईगडबडीचे काम नाही, आणि सर्वात मजेदार गोष्ट अशी आहे की, शासनाने 'शुध्दीपत्रक' असे लिहिले आहे, याचाच अर्थ त्यांच्याच हातुन काहीतरी त्रुटी राहिली होती, तिचे त्यांनी शुध्दीकरण केले आहे, शुध्दीकरणाबदद्ल मी मुख्यमंत्री महोदय याचे आभार मानतो व या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. धन्यवाद.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>** मा. महापौरजी मी आपल्या अनुमतीविना मी बोलु इच्छितो, आमचे बंधु श्री. प्रदिप रामचंदानी हे आमच्या राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वरिष्ठ नेत्याबदद्ल वेगळयाच पध्दतीने जे बोलले त्याबदद्ल त्याना सभागृहात माफी मागावी लागेल. ते कोणत्या पध्दतीने बोलले? आमच्या वरिष्ठ नेत्याबदद्ल अश्या प्रकारे बोलले जाते?

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

**<u>सदस्य श्री. राजु (जीवन) इदनानी:–</u>** काही फरक पडणार नाही, इथे काही टीव्ही चालु नाही आहे, बसुन घ्या.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>** भष्ट्राचारी बसुन घ्या. मा. महापौरजी त्याना पण बसण्यास सांगा.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>** मा. महापौरजी, ते बिनापरवानगीने बोलत आहेत, जो पर्यंत श्री. प्रदिप रामचंदानी माफी मागत नाही तोपर्यंत सभेचे कामकाज चालु देणार नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>** मा. महापौरजी, त्यांनी कोणते चुकीचे काम केले आहे? ते काय चुकीचे बोलले आहेत ते सांगा.

**यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी श्री. राजु जग्यासी, श्री. पृथ्वी वलेचा, श्री. गणपत एडके, श्री. नरेंद्र कुमार ठाकुर, श्री. मनोज सयानी, श्री. सतराम जेसवानी, श्रीम. शुभांगी बेहनवाल, श्रीम. मिनु दासानी, श्रीम. इसरत खान, श्रीम. भागीबाई लबाना इत्यादी सदस्य व्यासपीठाच्या समोरील मोकळया जागेत जमा होवुन जोरजोरात घोषणा देत होते.**

**सदस्य श्री. राजु (जीवन) इदनानीः—** हे शहराचा विकास करु शकत नाहीत, हे शहराला धोका देवू इच्छित आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—** दादागिरी चालणार नाही. विरोधी पक्षांची दादागिरी चालणार नाही.

**सदस्य श्री. बी.बी. मोरेः—** सन्मा. महापौरजी, विरोधी पक्षीयांना कोणत्याही विषयावर विरोधच करायचा आहे, प्रत्येक मुद्द्यावर विरोध करा. परंतु चांगल्या प्रकारे करा. यामुद्द्यावर विरोध करण्यासाठी काही नाही.

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**आपल्या मुख्यमंत्री महोदयानी आपणास सहकार्य केले आहे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरेः—** विरोधी पक्षांना आमची एक विनंती आहे, श्री. मनोज लासी यांना आमची विनंती आहे की, आपण बसुन घ्या.

**उपमहापौरः—** मेहरबानी करुन सर्व सदस्यांनी बसुन घ्यावे, या मुद्द्याबाबत मी खुलासा करत आहे. श्री. मनोज सयानीजी कृपया आपण बसुन घ्या. मी खुलासा करतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—** श्री. प्रदिप रामचंदानी यांनी कश्याबद्दलची माफी मागितली पाहिजे? या लोकांनी सभागृहाचा अपमान केला आहे यानीच माफी मागितली पाहिजे.

**उपमहापौरः—** उभे असलेल्या सर्व सदस्यांनी कृपया बसुन घ्यावे. श्री. मनोजजी जोपर्यंत आपण बसत नाहीत तोपर्यंत खुलासा ............

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** कोणत्या मुद्द्याबद्द्ल माफी मागु.

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**कृपया सर्व सदस्यांनी आपापल्या जागेवर बसुन घ्यावे.

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

**उपमहापौरः—** कृपया सर्व सदस्यांनी आपापल्या जागेवर बसुन घ्यावे.

**सदस्या डॉ. निना नाथानीः—** मा. महापौर, मी विषय वाचुन दाखविते.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानीः—** मी असे काय बोललो आहे ते तर सांगा?

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—** मा. महापौरजी, नौटंकीचे काम चालु आहे, आपण आपले कामकाज चालु ठेवा.

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**श्रीमती निना नाथानी बोलत आहेत, कृपया आपण ऐकुन घ्या.

**सदस्या डॉ. निना नाथानीः—** उल्हासनगर महानगरपालिका......

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः—**श्रीमती निना नाथानी बोलत आहेत, श्रीमती निना नाथानीजी आपले बोलणे चालु ठेवा.

**सदस्या डॉ. निना नाथानी:—** उल्हासनगर महानगरपालिकेस जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याबाबतचे शासनाचे शुध्दीपत्रक विचारात घेणे बाबत.

दिनांक ३१/३/२०१२ रोजी शासन अधिसूचना क्र. सीसंक २०११/प्र.क्र.१३९/नवि—३४, दिनांक १/४/२०१२ पासून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू करण्यात आल्याचे अधिसूचना प्रसिध्द झाली असल्याने उमपा क्षेत्रात त्यानुसार स्थानिक संस्था करासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**उपमहापौर:—** सर्व सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता राखावी, डॉ निना नाथानी या विषय वाचुन दाखवित आहेत.

**सदस्या डॉ. श्रीमती निना नाथानी:—**तथापि शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. सीसंक २०११/प्र.क्र. १३९/नवि—३४, दिनांक १७/४/२०१२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १/७/२०१२ पासून स्थानिक संस्था कर लागू करणेबाबत आदेश प्राप्त झाले आहेत. यामुळे दिनांक ३०/६/२०१२ पर्यंत जकात वसुली चालु ठेवणे क्रमप्राप्त आहे.

**यावेळी काही सदस्य ऐकाच वेळी जोरजोरात बोलत होते, त्याच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजुन येत नव्हते.**

**उपमहापौर:—** श्रीमती नाथानी महोदया, कृपया दोन मिनिट थांबा. मी स्पष्टीकरण करतो त्यानंतर आपण बोला. श्री. प्रदिप रामचंदानी जे काही बोलले आहेत, त्यात कुणाचे मन दुखविण्याचा त्यांचा उदद्देश नव्हता. त्यांचे म्हणणे होते की मा. महापौर महोदया, सभागृह नेता व सभागृहाचे काही सदस्य वित्तमंत्री मा. नामदार श्री. अजित पवार यांच्याकडे गेले होते, येथे त्यानी ना कुण्या नेत्याचे नाव घेतले आहे, परंतु त्याचा उदद्देश हा होता की, आम्ही आदरणीय श्री. अजित पवार यांच्याकडे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी अनुदानाची मागणी केली होती, त्यांनी आम्हांस अनुदान दिले नाही. व मुख्यमंत्री महोदय यांनी सांगितले की, आम्ही आपणांस अनुदान तर देवु शकत नाहीत, कारण की, महाराष्ट्र शासन अगोदरच अडीच लाखपेक्षा जास्त करोड रुपयांनी कर्जात बुडाले आहे. त्यासाठी एक शुध्दीपत्रक काढुन आपणांस पाठविले. आपले मन दुखविण्याचा श्री. प्रदिप रामचंदानी याचा कोणताही उदेद्श नव्हता. परंतु त्यानी एका पक्षाचे नाव घेवुन जे काही सांगितले कारण की कोणताही वित्तमंत्री कोणत्याही एका पक्षाचा नसतो तो पुर्ण महाराष्ट्राचा असतो. यासाठी व्यासपीठासमोरील मोकळया जागेत उभे असलेल्या सर्व सदस्यांनी कृपया बसुन घ्यावे व डॉ. निना नाथानी आपण आपले भाषण सुरु ठेवा.

**सदस्या डॉ. निना नाथानी:—** मी ठरावाचा भाग वाचुन दाखविते.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—** मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, आपण जो खुलासा केला त्याबदद्ल आपणांस धन्यवाद देतो. आपण म्हणालात कोणताही वित्तमंत्री कोणत्याही एका पक्षाचा नसतो.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—** स्पष्टीकरणाबदद्ल धन्यवाद.

**सदस्या डॉ. निना नाथानी:—** शासन परिपत्रक क्र. जकात—२०११/प्र.क्रं.११/नवि—३४, दिनांक १९/४/२०११ नुसार जकात वसुली अभिकर्ता नेमणेसाठी निविदा प्रसिध्दी व निविदा स्विकृतीच्या दिनांकामध्ये कमीत कमी एक महिन्याचा अवधी देणे आवश्यक आहे.

संचालक, मोनार्च इं.प्रा.लि. यांनी दिनांक १७/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांनी देखिल २०१२—१३ संपूर्ण वित्तीय वर्षासाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणून नियुक्ती

होणेकामी निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. तसेच नव्याने अभिकर्ता नेमतेवेळी त्यांना देखिल त्यांची किमान देकार रक्कम सादर करणेसाठी संधी मिळणेकामी कळविले आहे.

तथापि संचालक, कोनार्क इं.प्रा.लि. यांनीही दिनांक १८/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांना १० वर्षापेक्षा जास्त जकात वसुलीचा उल्हासनगर व इतर महानगरपालिकेत अनुभव आहे व त्यांनी देखिल २०१२–१३ संपूर्ण वित्तीय वर्षासाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणून नियुक्ती होणेकामी निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. तसेच नव्याने अभिकर्ता नेमतेवेळी त्यांना देखिल त्यांची किमान देकार रक्कम सादर करणेसाठी संधी मिळणेकामी कळविले आहे. कोणार्क इं.लि. यांनी एकूण १५ दिवसांची रक्कम आगाउ म्हणून देण्यास संमती दर्शविली आहे.

मागिल महिन्यात वर्ष २०१२–१३ करिता जकात अभिकर्त्याचे नेमणूकीसाठी निश्चित करण्यात आलेली किमान देकार रक्कमेचा तपिशिल पुढीलप्रमाणे आहे. :–

| | |
|---|---|
| अ) शासन निर्णय क्रमांक जकात–२०११/प्र.क्र.११/नवि–३४, दिनांक १९ एप्रिल, २०११ नुसार मागील जकात वसुली रकमेत १५: नैसर्गिक वाढ विचारात घेता येणारी देकार रक्कम | १४६,१७,३०,५००/– |
| प्रति दिवस येणारी रक्कम : | ४०,०४,७४१/– |

दिनांक १/७/२०१२ पासून शहरात स्थानिक संस्था कर प्रणाली लागू होणार असल्याने दरम्यानच्या कालावधीत महापालिका कर्मचा–यांना सदर कर प्रणालीबाबत प्रशिक्षण देणे तसेच नोंदणीसाठी पूर्वतयारी करणे आवश्यक आहे.

नव्याने जकात वसुली अभिकर्ता नेमणेसाठी दिनांक १९/४/२०११ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी/शर्ती महानगरपालिका व जकात वसुली अभिकर्ता यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे व त्यानुषंगाने वरील वस्तुस्थितीचा विचार करता मनपाने दिनांक १८/४/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या आदेशान्वये जकात वसुली महानगरपालिका कर्मचारी यांचेमार्फत पुढे चालू ठेवावी अथवा जकात अभिकर्ता नेमावा याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी विषय मा. महासभेचे पटलावर प्रस्तावित करणे योग्य वाटते.

ही महासभा कामाचा परिमाण व स्वरूप लक्षात घेता कार्यादेशाच्या दिनांकापासून ३० जून, २०१२ पर्यंत किंवा स्थानिक संस्था कर लागू होईपर्यंत या दोन्हीपैकी जे नंतर होईल तोपर्यंत निविदा न काढता मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, या अनुभवी संस्थेस मुदत वाढ देऊन जकात अभिकर्ता नेमणूक करीत आहे. व त्यासाठी आयुक्तास जकात अभिकर्ता बरोबर करार करण्यास प्राधिकृत करीत आहे.

कारण

१. जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी मुदतवाढ फक्त ३० जून, २०१२ पर्यंत देण्यात आली आहे. शासन परिपत्रक दिनांक १९ एप्रिल, २०११ मधिल पध्दत अवलंबिल्यास किमान ३० दिवसांसाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करावी लागेल तसेच इतर प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणखी १० ते १५ दिवस लागेल. यामुळे महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीत गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. उल्हासनगर महानगरपालिकेत जकात वसुलीचे खाजगीकरण सन १९९७ पासून करण्यात आले असून त्या विभागातील कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्त किंवा अन्य कारणास्तव महापालिकेच्या सेवेत नाही. उपलब्ध मनुष्यबळ हा अपुरा आहे.

३. जकात वसूलीसाठी अभिकर्ते नेमल्यास आस्थापनावरील खर्च, प्रिंटीग स्टेशनरी व इतर साहित्यवरील खर्च, ड्राईव्हर डिझेल व इत्यादी देखभाल दुरूस्ती खर्चाची मोठया प्रमाणावर बचत होईल.

४. मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, यांनी १५ दिवसांकरिता अपेक्षित रक्कम रू ६,००,७१,११५/– आगाऊ म्हणून देण्यास संमति दर्शविली आहे. जेणेकरून महापालिकेस कर्मचा–यांना देय असलेली पगार व इतर बांधिल कार्य व कर्तव्य पार पाडण्यास मदत होईल.

५. मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, यांनी जकात अभिकर्ता म्हणून नियुक्तीच्या कालावधीत पुढीलप्रमाणे रक्कम भरणा करण्यास संमति दर्शविली आहे.

देय रक्कम

| | | |
|---|---|---|
| अ) ज्या दराने सध्याची निविदा मान्य करण्यात आली आहे ती रक्कम | : | १२७,१०,७०,०००/– |
| ब) शासन निर्णय क्रमांक जकात–२०११/प्र.क्र.११/नवि–३४, दिनांक १९ एप्रिल, २०११ नुसार १५: नैसर्गिक वाढ | : | १९,०६,६०,५००/– |
| एकूण | : | १४६,१७,३०,५००/– |
| प्रति दिन जकात भरणा रक्कम | : | ४०,०४,७४१/– |

सुरक्षा अनामत रक्कम १० टक्के (बॅक गॅरंटीच्या स्वरूपात)

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी. धन्यवाद...

**उप–महापौर:–**सचिव साहेब, हा विषय पारीत केला जावा.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–**मा. महापौर महोदया, आपली अनुमती असेल तर याविषयावर मी बोलु इच्छितो. व्यापा–यांच्यावतीने मी बोलु इच्छितो. व जर आपण व्यापा–यांचा आवाज दाबत असाल तर मी खाली बसण्यास तयार आहे.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, याविषयावर बरीच चर्चा झाली आहे.

**उप–महापौर:–**सचिव साहेब, मा. महापौर महोदयांचा आदेश आहे की, याविषयावर मतदान घेतले जावे.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–**मा. महापौरजी, उप–महापौरजी, जरा ऐकुन घ्या. मी महाराष्ट्र शासनाला धन्यवाद देतो. कित्येक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर त्यांनी जकात माफ केली आहे. व्यापा–यांचा आवाज ऐकला आहे. व्यापा–यांची दाद ऐकली आहे. पैसे सुध्दा महापालिकेला अति आवश्यक आहेत. महानगरपालिका चालविण्यासाठी जकात सुध्दा फार जरुरीची आहे. स्थानिक संस्था कर आवश्यक आहे. पण त्यासाठी आवश्यक आहे, व्यापा–यांचा आवाज दाबला जावु नये. मी एक व्यापारी सुध्दा आहे. त्याचबरोबर नगरसेवक सुध्दा आहे. व्यापा–यांतून निवडून आलो आहे. माझे बोलणे आपणांस ऐकुन घ्यायचे आहे. कृपया जर ऐकुन घेत असाल तर ठिक आहे नाहीतर मी बसुन घेतो. आपण परवानगी दिली तर बोलेन नाही तर बोलणार नाही. महापौर महोदया, सांगा मी बोलु शकतो काय? नाही, नाही, विना परवानगीने मी बोलणार नाही. आपण परवानगी दिलीत तर मी बोलेन.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–**आपण तर बोललात, आणखी काय बोलणार? कृपया आपण बसुन घ्या.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–**आपण परवानगी दयाल तरच मी बोलेन नाहीतर बसुन घेईन.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :–**महापौरजी, कृपया या विषयावर मतदान घ्या.

**सदस्य श्री. मनोज सयानी:–**विरोधी पक्षीयांचा आवाज दाबु नये. विरोधी पक्षीयांना बोलु दिले जावे.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**मी आता बसुन घेतो, आपण बोलण्यास परवानगी दिलीत तरीही आणि नाही दिली तरीही. माझे जे म्हणणे होते ते मी आपणासमोर मांडले आहे, धन्यवाद।

**<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u>**सचिव साहेब, कृपया मतदान घेतले जावे.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>**मा. महापौरजी, कोणत्या गोष्टीची घाई आहे? बोलु सुध्दा दिले जात नाही. आपण शहराची काय सुधारणा करणार? फक्त मोठ मोठी भाषणे देता. आम्ही शहराच्या भल्याचा विचार करतो. असा विचार करतो, तसा विचार करतो. व आपण विरोधी पक्षांना बोलु सुध्दा देत नाहीत.

**यावेळी श्री. मनोज सयानी व इतर काही सदस्य शेम, शेम अशा घोषणा देत होते.**

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>**आम्हांस बोलु तर दया.

यावेळी श्री. राजु जग्यासी, श्री. धनंजय बोडारे व इतर काही सदस्य एकाच वेळी जोर जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>**फक्त मोठ मोठया गोष्टी करायच्या?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** आपण हंगामा करु इच्छिता. जर चर्चा सकारात्मकदृष्टीने होत असेल तर ठिक आहे. परंतु आपण हंगामा करु इच्छिता.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**विरोधी पक्षीयांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करु नका.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>**मा. महापौरजी, आपण हे चुकीचे करत आहात.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. महापौरांनी मतदान घेण्यास सांगितले आहे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**विरोधी पक्षीयांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>**विरोधी पक्षीयांचे ऐकुन घेण्याची ताकद ठेवा.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**शेम, शेम, शेम, शेम.......................................... विरोधी पक्षांचा आवाज दाबला जात आहे. हे सभागृह भ्रष्टाचारांचे सभागृह आहे. विरोधी पक्षांचा आवाज दाबला जात आहे. जनतेशी धोका, व्यापा—यांशी धोका...............

**यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या १) श्री. राजु जग्यासी, २) श्री. पृथ्वी वलेचा, ३) श्री. गणपत एडके, ४) श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, ५) श्री. मनोज सयानी, ६) श्री. सतरामदास जेसवानी, ७) श्रीमती शुभांगी बेहनवाल, ८) श्रीमती मिनु दासानी, ९) श्रीमती इसरत खान, १०) श्रीमती भागीबाई लबाना इत्यादी राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या सदस्यांनी सभात्याग केला.**

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**नऊसो चुव्हे खाकर, बिल्ली हज चली जा रही है।

**<u>महापालिका सचिव :—</u>**त्यांनी सभात्याग केला असल्याने मुद्दा येथेच संपला ना? त्यांनी सभात्याग केल्याने मतदान होणार नाही ना. पास?

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>**पास, सर्वसंमतीने...........

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>**मा. महापौरजी, मागील सभेत आपण भाषण केले होते की आपण विरोधी पक्षीय आम्हांस सहकार्य करा. त्यानुसार आज कॉग्रेस पक्षाने हे सिध्द केले आहे की, शहर हितासाठी, शहराच्या भल्यासाठी आज आपली जी आर्थिक स्थिती आहे, ती लक्षात घेता, शहर हितासाठी कॉग्रेस पक्ष आपल्या बरोबर आहे. याविषयाबाबत आम्ही आपले पुर्णपणे समर्थन करतो.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**चला, सुरुवात तर चांगली झाली.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानीः—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, मी धन्यवाद देवु इच्छितो कॉंग्रेस पक्षाला. शहर विकासामध्ये त्यांनाही सहभागी करुन घेवु. त्यांना बरोबर घेवु व त्यांचे सहकार्य आमच्यासाठी विशेष आहे. आम्ही यासाठी त्यांचे आभार व्यक्त करतो. धन्यवाद।.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजीः—</u>**या प्रस्तावास अनुमोदन आहे. आम्ही मा. महापौर महोदयांना समर्थन दिले आहे. धन्यवाद।.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपणा सर्वांना धन्यवाद। २४ तासात एक तातडीची सभा बोलविण्याचे कारण ही तसेच होते. आजची जरुरत होती. आज उल्हासनगरमध्ये १ तारखेपासुन जकात बंद झाल्यामुळे ना जकात कर वसुली चालु आहे, ना स्थानिक संस्था कर वसुली चालु आहे, ब—याचशा महानगरपालिकांमध्ये स्थानिक संस्था कर लागु केला आहे. परंतु आपल्या येथसे ही यंत्रणा चालु नाही कारण फारच तातडीने शासनाकडुन आपणांस आदेश आला आहे. दिनांक ३१ मार्चला सायंकाळी ७ वाजता फॅक्स येतो आणि रात्री १२ वाजेपासुन जकात वसुली बंद करुन स्थानिक संस्था कर लागु करायचा, एवढया अल्पावधीत कार्यवाही करण्यासाठी कोणतीही यंत्रणा सक्षम नाही, मग ती यंत्रणा शासन स्तरावरची असो, किंवा राष्ट्रीय स्तरावरची असो, ४ तासामध्ये नविन कार्यप्रणाली राबविण्याएवढी कोणतीही प्रशासकीय यंत्रणा सक्षम नाही. नविन कार्यप्रणाली राबविण्यासाठी एक कार्यपध्दती अवलंबायची असते. नविन कार्यप्रणाली राबविण्यासाठी कर्मचा—यांना प्रशिक्षण देणे, व आपणाकडील हे सर्व शिष्टमंडळ जेव्हा मा. मुख्यमंत्री महोदयांकडे गेले होते तेव्हा त्यांच्या निदर्शनास आणुन दिले होते की, येथे असे असे आहे. बाकी शहरांची परिस्थिती वेगळी आहे, उल्हासनगर शहराची परिस्थिती वेगळी आहे. भौगोलिकदृष्टया व सामाजिकदृष्टया वेगळी आहे. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की, आम्हांस अनुदान दया. परंतु शासन अनुदान देण्यास समर्थ नाही. तेव्हा त्यांनी स्वतःहुन सांगितले की, आम्ही जकात वसुलीस मुदतवाढ देतो. त्याबद्दल मी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. व धन्यवाद मानतो.

**यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी बाके वाजवुन त्यास प्रतिसाद दिला.**

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>**आज उल्हासनगरची परिस्थिती काय आहे? सुरुवातीला शासनाने चुकीचा निर्णय घेतला होता. लोकांवर विपरीत परिणाम होणार आहे असा कोणताही निर्णय घेतला जावु शकत नव्हता. परंतु असा निर्णय त्यांनी २१ मार्च २०१२ रोजी घेतला होता. परंतु त्यावर शुध्दीपत्रक काढुन ३० जुनपर्यंत जकात वसुलीची मुदत वाढवुन दिली आहे. जेणेकरुन स्थानिक संस्था कर आकारणीबाबतीत महापालिकेची यंत्रणा सक्षम व्हावी व महापालिकेच्या कर्मचा—यांना स्थानिक संस्था कर वसुलीबाबत प्रशिक्षण दिले पाहिजे. आज उल्हासनगर महापालिकेची स्थिती अशी आहे की, आपल्या कर्मचा—यांना पगार दिला जात नाही. अॅन्थोनी ठेकेदाराने काम करणे जवळ जवळ बंद केले आहे. शहरभर कचराच कचरा आहे. पाणी पुरवठा विभागाच्या ठेकेदाराने, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ठेकेदाराने काम करणे बिल्कुल बंद केले आहे. त्यांना वाटते की, आपणांस पेमेंट मिळेल की नाही? महानगरपालिकेत बाहेरुन आलेले कर्मचारी परत जाण्याच्या मार्गावर आहेत, त्यांना वाटते की, येथे पगार मिळेल की नाही? अशा परिस्थीतीतुन उल्हासनगर महानगरपालिका जात आहे. अशा वेळी विरोधी पक्षीयांनी व इतर सर्वांनी मिळुन उल्हासनगर शहरासाठी चांगले काय आहे याचा विचार केला पाहिजे, त्याऐवजी तांत्रिक मुद्दे शोधुन यांच्या चुका कशा शोधुन काढता येतील हे पाहणे चुकीचे आहे मग त्या शासनाच्या असोत की प्रशासनाच्या. शहरहिताच्या दृष्टीने आम्ही काही पावले टाकत असु तर त्यांनी आमच्याबरोबर येणे जरुरीचे आहे. परंतु विरोधासाठी विरोध व सभात्याग करुन ते बाहेर गेले. याचाच अर्थ काही चांगले करणे हा यांचा उद्देश नाही. फक्त गोंधळ निर्माण करणे हा यांचा उद्देश आहे. हे सभागृह गोंधळ घालण्यासाठी नाही. या शहरासाठी चांगले काय आहे, त्याचा विचार करण्यासाठी आहे. व ज्या पध्दतीने या सतरा, अठरा दिवस महानगरपालिका आर्थिक स्थितीतुन जात होती, आम्ही आयुक्तांकडे जात होतो की हे काम करायचे आहे ते म्हणत नाही करु शकत, अॅन्थोनी ठेकेदार जेसीबी लावत नाहीत यासाठी एखादा खाजगी ठेकेदार लावा. परंतु तो ठेकेदार सुध्दा पेमेंट मागत होता. आणि पेमेंट देण्यासाठी प्रशासनाकडे पैसा नाही. ही वस्तुस्थिती आहे. सगळया गोष्टींचे नाटक केले जाते परंतु पैश्याचे नाटक केले जावु शकत नाही. यासाठी जेव्हा शुध्दीपत्रक आले तेव्हा आम्ही जकात वसुलीचे काम महापालिकेच्या कर्मचा—यांकडे दिले. १९९७ मध्ये जकात वसुलीचा महानगरपालिकेतील कर्मचा—यांचा जो अनुभव होता, तोच अनुभव मागील २४ तासात आला. ठेकेदार दिवसाला ४० लाख रुपये देतो. किंवा उदया आपणाकडे ४० लाख रुपये जकातीपोटी येणार आहेत. त्याठिकाणी आपल्या कर्मचा—यांनी पुर्ण २४ तासात १६ लाख रुपये वसुली केली...... १२ तासात १६ ते १७ लाख रुपये वसुली केली. असेच जर दोन महिने राहिले तर महानगरपालिकेतील कर्मचा—यांचा पगार तर निघेल परंतु बाकी सर्व खर्च बंद करावा लागेल. तो एक एक दिवस आपणासाठी मुश्कीलीचा दिवस होता. अशा परिस्थितीत

आपण २४ तासात हा ठराव आणला. त्याची आपण त्वरीत अंमलबजावणी आपण कराल. महानगरपालिकेला श्वास घेण्याची सवलत आपण दयाल. एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि आपणांस धन्यवाद देतो. हा ठराव सभागृहाने सर्व संमतीने पारीत केला आहे, त्यासाठी मी सर्वांचे धन्यवाद मानतो, खास करुन कॉग्रेस पक्षाचे, जे सर्व नगरसेवक आहेत, ते कुणाच्या भडकविण्यामध्ये आले नाहीत. सत्ताधा–यांनी तर पक्का निर्णय घेतला की शहर विकासासाठी आपणांस जे काही करावे लागेल ते करु. यामध्ये कायदयाच्या काही मर्यादा येत असतील तर त्यासाठी शासनास आम्ही समजावु की हे आम्ही शहराच्या हितासाठी केले आहे. तर सर्वांना धन्यवाद. व खास करुन आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की, जी कामे थांबली आहेत ती लवकरात लवकर चालु करा. या प्रस्तावाला सर्वांनी समर्थन तर दिले आहे, प्रस्ताव पारीत झाला आहे, त्याबद्दल सर्वांना धन्यवाद।

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>**सदर विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

## विषय :– उल्हासनगर महानगरपालिकेस जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्याबाबतचे शासनाचे शुध्दीपत्रक विचारात घेणे बाबत.

### प्रस्तावना :–

दिनांक ३१/३/२०१२ रोजी शासन अधिसूचना क्र. सीसंक २०११/प्र.क्र.१३९/नवि–३४, दिनांक १/४/२०१२ पासून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू करण्यात आल्याचे अधिसूचना प्रसिध्द झाली असल्याने उमपा क्षेत्रात त्यानुसार स्थानिक संस्था करासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

तथापि शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. सीसंक २०११/प्र.क्र.१३९/नवि–३४, दिनांक १७/४/२०१२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १/७/२०१२ पासून स्थानिक संस्था कर लागू करणेबाबत आदेश प्राप्त झाले आहेत. यामुळे दिनांक ३०/६/२०१२ पर्यंत जकात वसुली चालु ठेवणे क्रमप्राप्त आहे.

शासन परिपत्रक क्र. जकात–२०११/प्र.क्रं.११/नवि–३४, दिनांक १९/४/२०११ नुसार जकात वसुली अभिकर्ता नेमणेसाठी निविदा प्रसिध्दी व निविदा स्विकृतीच्या दिनांकामध्ये कमीत कमी एक महिन्याचा अवधी देणे आवश्यक आहे.

संचालक, मोनार्च इं.प्रा.लि. यांनी दिनांक १७/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांनी देखिल २०१२–१३ संपूर्ण वित्तीय वर्षासाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणून नियुक्ती होणेकामी निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. तसेच नव्याने अभिकर्ता नेमतेवेळी त्यांना देखिल त्यांची किमान देकार रक्कम सादर करणेसाठी संधी मिळणेकामी कळविले आहे.

तथापि संचालक, कोनार्क इं.प्रा.लि. यांनीही दिनांक १८/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांना १० वर्षापेक्षा जास्त जकात वसुलीचा उल्हासनगर व इतर महानगरपालिकेत अनुभव आहे व त्यांनी देखिल २०१२–१३ संपूर्ण वित्तीय वर्षासाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणून नियुक्ती होणेकामी निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. तसेच नव्याने अभिकर्ता नेमतेवेळी त्यांना देखिल त्यांची किमान देकार रक्कम सादर करणेसाठी संधी मिळणेकामी कळविले आहे. कोणार्क इं.लि. यांनी एकूण १५ दिवसांची रक्कम आगाउ म्हणून देण्यास संमती दर्शविली आहे.

मागिल महिन्यात वर्ष २०१२–१३ करिता जकात अभिकर्त्याचे नेमणूकीसाठी निश्‍चित करण्यात आलेली किमान देकार रक्कमेचा तपिशिल पुढीलप्रमाणे आहे. :–

| | |
|---|---|
| अ) शासन निर्णय क्रमांक जकात–२०११/प्र.क्र.११/नवि–३४, दिनांक १९ एप्रिल, २०११ नुसार मागील जकात वसुली | १४६,१७,३०,५००/– |

रकमेत १५: नैसर्गिक वाढ  विचारात घेता येणारी देकार रक्कम

प्रति दिवस येणारी रक्कम : ४०,०४,७४१/—

दिनांक १/७/२०१२ पासून शहरात स्थानिक संस्था कर प्रणाली लागू होणार असल्याने दरम्यानच्या कालावधीत महापालिका कर्मचा—यांना सदर कर प्रणालीबाबत प्रशिक्षण देणे तसेच नोंदणीसाठी पूर्वतयारी करणे आवश्यक आहे.

नव्याने जकात वसुली अभिकर्ता नेमणेसाठी दिनांक १९/४/२०११ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी/शर्ती महानगरपालिका व जकात वसुली अभिकर्ता यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे व त्यानुषंगाने वरील वस्तुस्थितीचा विचार करता मनपाने दिनांक १८/४/२०१२ रोजी प्राप्त झालेल्या आदेशान्वये जकात वसुली महानगरपालिका कर्मचारी यांचेमार्फत पुढे चालू ठेवावी अथवा जकात अभिकर्ता नेमावा याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी विषय मा. महासभेचे पटलावर प्रस्तावित करणे योग्य वाटते.

**महासभा ठराव क्र. ४** **दिनांक १९/४/२०१२**

सुचकाचे नाव : डॉ. निना नाथानी

अनुमोदकाचे नाव : श्रीमती मिनाताई सोनेजी

ही महासभा कामाचा परिमाण व स्वरूप लक्षात घेता कार्यादेशाच्या दिनांकापासून ३० जून, २०१२ पर्यंत किंवा स्थानिक संस्था कर लागू होईपर्यंत या दोन्हीपैकी जे नंतर होईल तोपर्यंत निविदा न काढता मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, या अनुभवी संस्थेस मुदत वाढ देऊन जकात अभिकर्ता नेमणूक करीत आहे. व त्यासाठी आयुक्तास जकात अभिकर्ता बरोबर करार करण्यास प्राधिकृत करीत आहे.

कारण

१. जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी मुदतवाढ फक्त ३० जून, २०१२ पर्यंत देण्यात आली आहे. शासन परिपत्रक दिनांक १९ एप्रिल, २०११ मधिल पध्दत अवलंबिल्यास किमान ३० दिवसांसाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करावी लागेल तसेच इतर प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणखी १० ते १५ दिवस लागेल. यामुळे महापालिकेच्या वित्तीय परिस्थितीत गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. उल्हासनगर महानगरपालिकेत जकात वसुलीचे खाजगीकरण सन १९९७ पासून करण्यात आले असून त्या विभागातील कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्त किंवा अन्य कारणास्तव महापालिकेच्या सेवेत नाही. उपलब्ध मनुष्यबळ हा अपुरा आहे.

३. जकात वसूलीसाठी अभिकर्ते नेमल्यास आस्थापनावरील खर्च, प्रिंटीग स्टेशनरी व इतर साहित्यवरील खर्च, ड्राईव्हर डिझेल व इत्यादी देखभाल दुरूस्ती खर्चाची मोठया प्रमाणावर  बचत होईल.

४. मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, यांनी १५ दिवसांकरिता अपेक्षित रक्कम रू ६,००,७१,११५/— आगाऊ म्हणून देण्यास संमति दर्शविली आहे. जेणेकरून महापालिकेस कर्मचा—यांना देय असलेली पगार व इतर बांधिल कार्य व कर्तव्य पार पाडण्यास मदत होईल.

५. मेसर्स कोनार्क इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, यांनी जकात अभिकर्ता म्हणून नियुक्तीच्या कालावधीत पुढीलप्रमाणे रक्कम भरणा करण्यास संमति दर्शविली आहे.

देय रक्कम

अ) ज्या दराने सध्याची निविदा
मान्य करण्यात आली आहे ती रक्कम : १२७,१०,७०,०००/—

ब) शासन निर्णय क्रमांक जकात–२०११/प्र.क्र.११/नवि–३४, : १९,०६,६०,५००/–

दिनांक १९ एप्रिल, २०११ नुसार १५: नैसर्गिक वाढ

एकूण : १४६,१७,३०,५००/–

प्रति दिन जकात भरणा रक्कम : ४०,०४,७४१/–

सुरक्षा अनामत रक्कम १० टक्के (बॅक गॅरंटीच्या स्वरूपात)

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी त्वरीत करण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**बहुमताने**

महापौर/पीठासीन अधिकारी

महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.०१ वाजता महापौर श्रीमती आशा जीवन इदनानी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–९/७/२०१२

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ९/७/२०१२ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि–२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ९/७/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप–महापौर, श्री. जमनादास पुरस्वानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ३ | श्री. राजु रामसिंग कंडारे | ४० | श्रीम. पंचशीला नाना पवार |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४१ | श्रीम. खान इसरद सऊद |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ४२ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४३ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४४ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४५ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४६ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४७ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्री. जाफरअली चौधरी | ४८ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४९ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १३ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ५० | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १४ | डॉ. महेश गजानन गावडे | ५१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १५ | श्रीम. अनिता संतोष तरे | ५२ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १६ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५४ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १८ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ५५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १९ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ५६ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| २० | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २१ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५८ | श्रीम. पिंकी मुरलीधर उदासी |
| २२ | श्रीम. भागीबाई हारीसींग लबाना | ५९ | श्रीम. दिप्ती नवीन दुधानी |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ६० | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६१ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २५ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ६२ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २६ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ६३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ६४ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २८ | श्री. गणपत गोविंद एडके | ६५ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २९ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ६६ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३० | श्री. भगवान शंकर भालेराव | ६७ | श्रीम. माया हरेश चावला |
| ३१ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३२ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३३ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ७० | श्रीम. अपेक्षा विकास पाटील |
| ३४ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ७१ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३५ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ७२ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३६ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ७३ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| ३७ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ७४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ७५ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

१. मा. महापौर श्रीमती आशा जीवन इदनानी व

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे, ३. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ४. श्रीम. मिनू राजकुमार दासानी, ५. श्री सुरेश पप्पू बूधरमल कालानी, ६. श्रीम. कांचन अमर लुंड, ७. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, ८. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. बालाजी खतगावकर, आयुक्त
२. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
४. श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार
५. श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. हरेश इदनानी, उप–मुख्य लेखा अधिकारी
८. श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
९. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विद्युत
१०. श्री. एम.जी गिरगावकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता, साबांवि
१२. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१३. श्री. योगेश गोडसे, सहा. आयुक्त
१४. श्री. दिपक चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१६. श्री. रमेश काजळे, उप कर निर्धारक व संकलक
१७. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१८. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

दुपारी ३.२८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २०१२–१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०११–१२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे**

---

**महापालिका सचिव:–**मा. पीठासीन अधिका–यांच्या अनुमतीने मा. स्थायी समिती सभापती श्री. रमेश चव्हाण यांना व्यासपीठावर आमंत्रित केले जात आहे.

यावेळी श्री. रमेश चव्हाण हे स्थायी समिती सभापती म्हणुन व्यासपीठावर आसनस्थ झाले.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:–**सन्माननिय श्री. आयुक्त साहेब, आज अर्थसंकल्पाच्याबाबतीत आपण जी सभा ठेवली आहे, त्याबाबतीत मला तरी असे वाटते की, आपल्या महापालिकेच्या ज्या महापौर आहेत त्याच आज सभेस

उपस्थित नाहीत. मला असे म्हणायचे आहे की, महापौर जेव्हा उपस्थित असतील तेव्हाच अर्थसंकल्पीय सभा ठेवावयास पाहिजे होती. महापौर नसतांना अर्थसंकल्पीय सभा ठेवणे उचित नाही असे मला म्हणायचे आहे. याबाबतीत आयुक्त साहेब, तुम्ही काय म्हणता? सचिव साहेब, नविन आयुक्त साहेबांची ही पहिलीच सभा आहे याबाबतीत आम्हांला त्यांच्याकडुन ऐकुन घ्यायचे आहे.

**आयुक्त, श्री. बालाजी खतगांवकर:—**सन्माननिय महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मी सभागृहाला अवगत करु इच्छितो, सभागृहाचे कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या विविध तरतुदी व सभागृहाच्या कामकाजाचे नियम या अंतर्गत करण्यात येते. त्याची आपणांस कल्पना आहे. एखादया सभेत जर अपरिहार्य कारणास्तव महापौर उपस्थित नसतील तर उप—महापौर पीठासीन अधिकारी स्थानी आसनस्थ होवुन कामकाज करत आहेत.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—**एक मिनिट, तुम्ही बोलत आहेत ते ठिक आहे, महापौर नसतील तर उप—महापौर सभेचे कामकाज चालवतील, उप—महापौर नसतील तर कुणीतरी बसुन सभेचे कामकाज चालवायचे आहे. हे एखादी सर्वसाधारण सभा असती तर आम्ही मान्य केले असते. परंतु ही अर्थसंकल्पाची सभा आहे, आणि नेमक्या हयाच सभेत महापौर नाहीत.

यावेळी सदस्या श्रीमती वनिता बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—**श्री. मोरेजी कृपया आपण बसुन घ्या. आयुक्त साहेबांनी आपल्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. अगोदरच अर्थसंकल्पास खुपच उशिर झालेला आहे. शहर विकासाची कामे ठप्प झाली आहेत. कृपया आपण बसुन घ्यावे, मा. स्थायी समिती सभापतीजी आपण अर्थसंकल्प मांडा.

यावेळी सदस्य श्री. मनोज लासी हे सभागृहातुन बाहेर गेले.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. रमेश चव्हाण, स्थायी समिती सभापती:—** सन्माननिय महापौर महोदया, उप महापौर श्री. जमनू पुरस्वानीजी, मा. आयुक्त, माझे सहकारी जनप्रतिनिधी व अधिकारी गण, आपणा सर्वांचे, महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय विशेष महासभेत हार्दिक स्वागत.

**नु**कत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणूकीत एकूण ४५ महिला सदस्य निवडून आलेल्या असून ही संख्या ५० टक्के पेक्षा जास्त आहे.ही बाब उल्हासनगर शहरासाठी गौरवास्पद आहे. निवडून आलेल्या महिला व पुरूष सदस्यांपैकी काही सदस्या पहिल्यांदा निवडून आलेल्या आहेत. या सर्व सन्माननिय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या प्रभागातील जनतेच्या अपेक्षा व इच्छा केवळ अंदाजपत्रकाच्या माध्यमातून पूर्ण करू शकाल. तरी अंदाजपत्रकाचा गांभीर्याने अभ्यास केल्यास उचित राहील.

**म**हापालिका निवडणूक २०१२ आचारसंहिता लागू झाल्यामुळे महापालिका कोणत्याही धोरणात्मक निर्णय घेवू न शकल्याने आर्थिक वर्ष सन २०१२—१३ चे अंदाजपत्रक दि.२९/५/१२ रोजीच्या स्थायी समिती सभेत मंजूर करण्यात आले. याच दरम्यान पदवीधर मतदार संघाची निवडणूक जाहिर झाल्यामुळे अंदाजपत्रकासाठी बराच उशिर झालेला आहे त्यामूळे ही प्रक्रीया लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक आहे.

**व**र्ष २०१२—१३ साठी स्थायी समितीचे सन्माननिय सदस्यांनी तयार केलेले अंदाजपत्रक मी आपणासमोर सादर करीत आहे.

**उ**ल्हासनगर महानगरपालिकेने जे.एन्.एन्.यु.आर.एम्. योजनेअंतर्गत हाती घेतलेली रू.२०० कोटींची पाणी पुरवठा व ६ कोटी रूपयांची ई गर्व्हनस योजना हे दोन्ही प्रकल्प या आर्थिक वर्षात पुर्ण करावयाचे आहेत. कर्मचा—यांना ६ व्या वेतन आयोगापोटी थकबाकीची रक्कम अदा करावयाची आहे. थकीत कर्जाची परतफेड, तसेच ठेकेदारांची व पुरवठादारांची देयके अदा करण्यासाठी मा. आयुक्त यांनी कर व दर वाढ करणेस सूचित केल्यामुळे आम्ही दरवाढीचा कठोर निर्णय घेतला आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कराचे नाव | प्रचलित दर | स्थायी समितीने मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | २६ | २८ |
| २. | मलप्रवाह सुविधा लाभ कर | २ | ३ |
| ३. | पाणी पुरवठा लाभ कर | ४ | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मलप्रवाह कर | ६ | ७ |
| ५. | पथ कर | ७ | ८ |
| ६. | अग्निशमन कर | ० | २ |

पाणीपट्टी दर

| अ. क्र. | नाव | प्रचलित दर | स्थायी समितीने मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | आर सी सी व टिअर गर्डर बांधकाम | रू. १५० प्रतिमहा | रू. ३०० प्रतिमहा |
| २. | पत्राचे छत व विट बांधकाम | रू. ७५ प्रतिमहा | रू. १५० प्रतिमहा |
| ३. | लफाटा किंवा पत्राचे किंवा मातीचे बांधकाम | रू. ६० प्रतिमहा | रू. १२० प्रतिमहा |
| ४. | मिटरप्रमाणे निवासी वापर | रू. १२ प्रति हजार लिटर | रू. १४ प्रति हजार लिटर |
| ५. | मिटरप्रमाणे वाणिज्य वापर | रू. २६ प्रति हजार लिटर | रू. ३९ प्रति हजार लिटर |
| ६. | मिटरप्रमाणे औद्योगिक वापर | रू. २६ प्रति हजार लिटर | रू. ३९ प्रति हजार लिटर |
| ७. | मिटरप्रमाणे सार्वजनिक/धर्मादाय संस्थासाठी | रू. १५ प्रति हजार लिटर | रू. २२ प्रति हजार लिटर |

याशिवाय नागरी सुविधा केंद्रामार्फत देण्यात येणा–या काही सुविधांच्या दरामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. तसेच जकात सुरू राहिल्यास शहरात आयात होणा–या एकूण १० वस्तूंवर आकारणी करुन जकात दरात वाढ करण्यात आली आहे.

नुकत्याच पार पाडलेल्या निवडणुकीमध्ये शासनाने प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभाग क्षेत्रात वाढ केली असल्याने त्यांच्या प्रभागक्षेत्रावर जास्तीत जास्त लक्ष देण्यासाठी पदाधिका–यांच्या मानधन व इतर भत्त्यातही वाढ करण्यात आलेली आहे.

विविध कर व दरात केलेल्या वाढीमुळे उत्पन्नात वाढ होणार असून निर्धारित केलेल्या उद्दिष्टांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- शहरातील व्यापा–यांचे हित लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. २५ दि. १९/५/२०१२ अन्वये स्थानिक संस्था कर न लागू करण्याचा ठराव पारीत केलेला होता , परंतू सद्यस्थितीत शासनाच्या धोरणाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत जकातीऐवजी स्थानिक संस्था कर लागू करण्यात आलेला आहे.नव्याने नियुक्त झालेले आयुक्त श्री. बालाजी खतगावकर साहेब यांनी स्थानिक संस्था कर जास्तीत जास्त वसूल करण्याचा निश्चय केला असून त्यासाठी प्रशासनाच्या वतीने जोरदार प्रयत्नही करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने स्थानिक संस्था करापोटी रू.१५५ कोटींचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे.

- उत्पन्नाचा दुसरा मुख्य स्त्रोत मालमत्ता कर आहे. महानगरपालिकेचे शहरातील मिळकतधारकांकडे वसूलीपोटी रू. २०० कोटीपेक्षा जास्त रक्कम थकीत आहे. ही बाब लक्षात घेता, महानगरपालिकेने ठराव करून सामान्य करात १०: सूट देण्याचा प्रस्ताव पारीत केलेला आहे. यामुळे कर वसूली मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळेल व महापालिकेच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊन त्याद्वारे रू. ८० कोटी उत्पन्न प्राप्त होण्याची आशा आहे.

- तसेच पाणीपट्टी वसूलीपोटी रू.५८ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे. महासभेने पारित केलेला प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी प्रशासनास पाठपुरावा करण्यास लवकरात लवकर मंजूरी प्राप्त करण्यासाठी मा. महापौर मार्फत सुचना देण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेने पारित केलेल्या मालमत्ता करात १०: सूट देण्याचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता. परंतू मंत्रालयात लागलेल्या आगिमध्ये प्रस्ताव जळून गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेनुसार सदर प्रस्ताव नव्याने शासनाकडे पाठविला असेल अशी अपेक्षा आहे.

- शहरातील बांधकामासाठी आकारण्यात येणारे विकास शुल्क व तत्ससंबंधि इतर परवान्या– पोटी अंदाजे १६ कोटी रूपयाचे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

➢ **जे.** एन्. एन्. यु. आर. एम्. योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजना व ई गर्व्हनस प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान व एम्. एम्. आर. डी. ए. कर्ज या सर्व बाबींपोटी एकूण कर्ज ८९ कोटी अपेक्षित आहे.

अशा प्रकारे उत्पन्नाचे सर्व स्त्रोतापासून एकूण ४५५ कोटी प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे.

➢ **प्रा**प्त पैशाचे योग्य नियोजन करण्यासाठी पगार, भत्ते, प्रशासकीय खर्च, शहर रोशणाई, पाणी खरेदी, सार्वजनिक स्वच्छता, रस्त्यांची दुरूस्ती, सार्वजनिक बांधकाम, प्रभाग समिती क्षेत्रात मुलभूत सुविधा, बालकांचे शिक्षण, महिला व बालकल्याण, अंध अपंग पुर्नवसन असे राष्ट्रीय कार्यक्रम या सर्व महसुली स्वरूपांच्या कामासाठी रू. १९५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

➢ **भां**डवली स्वरूपांच्या कामांमध्ये नविन रस्ते, नविन उद्याने, अग्निशमन सेवा बळकटीकरण, संगणकीकरण, विद्युतीकरण, पाणी पुरवठा, जल व मल नि:सारण, शाळा बांधकाम, खेळाची मैदाने इत्यादी अशा कामांना या अर्थ संकल्पात न्याय देण्यासाठी एकूण २२५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

➢ **आ**पणा सर्वांना जाणीव आहे की, जे. एन्. एन्. यु. आर. एम्. अंर्तगत पाणी पुरवठा, ई– गर्व्हनस व गरीबांसाठी घरकुल योजना ही कामे सुरू आहेत. पाणी पुरवठा योजनेत एकूण ११ जलकुंभापैकी ४ जलकुंभ १०० टक्के पुर्ण झालेले आहेत व उर्वरीत ७ जलकुंभाचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. २७० किलो मिटर पाईपलाईन पैकी एकूण १८० किलो मिटर पाईपलाईनचे काम पुर्ण झालेले आहे व उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. या वितरण व्यवस्थेतून अंदाजे १० हजार लोकांना नळ जोडणी देण्यात आलेली आहे. चालू आर्थिक वर्षात ही योजना पूर्ण करण्याचा मानस असून यापुढे शहरात पाणी टंचाई जाणवणार नाही याची मला खात्री आहे.

➢ **ई** गर्व्हनस प्रकल्पाचे काम ब–याच प्रमाणात पुर्ण झाले असून उर्वरीत काम पुर्ण करण्यासाठी मा. आयुक्त सक्षम अधिका–याची लवकरात लवकर नियुक्ती करून ते पुर्ण करण्याची आशा आहे.

➢ याचप्रमाणे गरीबांसाठी घरकुल योजनेसाठी शासनाकडून अनुदान प्राप्त झाले असून सदर योजनेत काही अडचणी उपस्थित झाल्या आहेत त्या दुर करण्यासाठी मा. आयुक्त सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत व त्या दुर करण्यासाठी आम्हीही सर्वजण एकजूटीने सहकार्य करु असे आश्वासन देत आहे.

➢ **जे.** एन्. एन्. यु. आर. एम्. योजना प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ११४ कोटीची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. तसेच पाणी पुरवठा व्यवस्थेच्या देखभाल व दुरूस्ती, बुस्टरर्स चालविणे, पाणी पुरवठा, इमारतीची देखभाल, डप्क्ब कडून पाणी खरेदी इ. या सर्व बाबींसाठी रू. ५१ कोटी रूपयांची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

➢ **उ**ल्हासनगर शहराची रचना एकूण चार विभागात झालेली असून त्यामधील काही रस्त्यांची स्थिती सुधारलेली आहे. या सर्व भागातील अंदाजे २० नविन रस्त्यांचे डांबरीकरण व कॉक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. ही सर्व कामे पुर्णत्वाकडे नेण्यासाठी या अंदाजपत्रकात २५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच रस्त्यांची डागडुंजी (च्वज ीवसमे) करणेसाठी ३ कोटी रुपयांची स्वतंत्र तरतूद ही करण्यात आली आहे.

➢ शहराच्या सौदर्यात भर पडणेकरिता उदयाने सुशोभित करणे व झाडे यांची देखभाल व दुरुस्तीसाठी ३.४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

➢ **अ**ग्निशमन यंत्रणा सुसज्ज ठेवण्यासाठी एकूण २.५० कोटी रूपयांचे प्रकल्पापोटी ८५ लक्ष शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले आहे. त्यामध्ये १ फायर स्टेशन व ४ आधुनिक अग्निशमन वाहनांचा समावेश आहे. हा प्रकल्प या आर्थिक वर्षात पुर्ण करून अग्निशमन यंत्रणा बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय महापालिकेच्या इमारतीत अग्निशमन यंत्रणा अदयावत करणेसाठी २५ लक्ष रूपयांची स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली आहे.

- **श**हरवासियांकडून कर स्वरूपात प्राप्त होणा–या प्रत्येक रुपयास न्याय मिळणे आवश्यक आहे. हे उद्दिष्ट निरंतर राखण्याचा प्रयत्न करण्यात येतो श्री. मुकेश आयलानी यांच्या अध्यक्षतेखाली विद्युत विभागामार्फत. शहर रोशनाईसाठी उभारण्यात आलेले अंदाजे १४००० दिवाबत्ती, महापालिका उद्याने, कारंजे, महापालिका मुख्यालय, प्रभाग क्षेत्र कार्यालय, अन्य महापालिका इमारत या सर्व जागेत विद्युत व्यवस्थेसाठी वर्षभरात फक्त २ ते २.५० कोटी खर्च करण्यात येतो. आर्थिक वर्ष २०१२–१३ मध्येही विदयुत रोशनाईपोटी फक्त २.६४ कोटी रूपयांची तरतूदीस सहमती दिलेली आहे. मुलभूत सेवा सुविधा पुरविण्यात येणा–या इतर विभागानी श्री. आयलानी यांच्या आदर्श पध्दतीचा अवलंब केल्यास तो जन हिताचा ठरेल.

- **सा**र्वजनिक बांधकाम व पाणी पुरवठा विभागांमार्फत पुरविण्यात येणा–या मुलभूत सेवांचा दर्जा राखून ठेवणेसाठी त्यामधील समाविष्ट तांत्रिक बाबी व गुणवत्ता, बाहेरील संस्थेकडून तपासणी करणेसाठी २५ लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. महत्वाच्या सर्व प्राकलनाची तपासणीसाठी सक्षम संस्थेची नेमणूक लवकरात लवकर करण्यासाठी प्रशासनास सूचना देण्यात येत आहेत.

- **म**हापालिकेस पार पाडाव्या लागलेल्या बांधिल व ऐच्छिक कार्य व कर्तव्यांची संख्या फार मोठी आहे, ते हळूहळू पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यापैकी सर्वात महत्वाचे आहे ते आणिबाणिच्या परिस्थितीत लोकांना राहण्याची सोय. आर्थिक वर्ष २०१२–१३ मध्ये हे कर्तव्य पार पाडणेसाठी ६० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. पावसाळा सुरू झाला असून सार्वजनिक बांधकाम विभागाने शहराच्या प्रत्येक भागात आणिबाणी केंद्र लवकरात लवकर स्थापन करावे.

**अ**शा प्रकारे महापालिकेचे कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी एकूण ४५५ कोटी रूपयांची तरतूद आर्थिक वर्ष २०१२–१३ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली असून लेखा शिर्ष निहाय तरतूद दर्शविणारे अंदाजपत्रक आपणास उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**मा.** महापौर सौ. आशा इदनानी, उप महापौर श्री. जमनू पुरस्वानी, मा. आयुक्त, इतर पदाधिकारी व अधिकारी या सर्वाच्या सहकार्याने मी वित्तीय वर्ष २०१२–१३ चा आर्थिक लेखा जोखा आपल्यासमोर उभा करू शकलो , त्यासाठी मी सर्वांचे आभार व्यक्त करतो.

**मुंबई** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०० नुसार महापालिकेचे सर्व सदस्य सदर प्रस्ताव एक मताने पारीत करतील अशी मी आशा करतो. धन्यवाद !

जय हिंद !

जय महाराष्ट्र !!

यावेळी सदस्य श्री. मनोज लासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

यावेळी सदस्या डॉ. निना नाथानी, श्रीमती ज्योती कालानी, श्रीमती कमला क्रिशनानी व श्री. गोदु क्रिशनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**मा. महापौर महोदय, आयुक्त साहेब, आताच आपल्या स्थायी समिती सभापतींनी अर्थसंकल्पाबाबतीत बरेच काही सांगितले. आपत्कालीन कामांसाठी जो निधी असतो त्याविषयी त्यांनी काही सांगितलेले नाही. महापालिकेच्या हद्दीमधील महानगरपालिकेची भिंत पडते, किंवा आणखी काही होते त्यावेळेस आपण अर्थसंकल्पाची वाट पाहणार, अर्थसंकल्पीय तरतुदीची वाट बघणार, याचे मला उत्तर पाहिजे. आपत्कालीन स्थितीतील एखादया कामासाठी तुम्ही अर्थसंकल्पीय तरतुदीची वाट बघत बसणार काय? उदया समजा महानगरपालिकेची भिंत पडते, किंवा महानगरपालिकेत एखादी काही घटना घडते त्यावेळेस अर्थसंकल्पीय तरतुदीची वाट बघत बसणार?

**सदस्य श्री. राजेश वानखेडे:–**साहेब, माझ्या प्रभागात स्मशानभुमीची भिंत पडलेली आहे.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–** सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी अर्थसंकल्पाविषयीचे आपापले विचार येथे मांडावे. व संबंधीत अधिका–यांनी त्याची नोंद घ्यावी. सर्व सदस्यांच्या चर्चेनंतर संबंधित विभागाचे अधिकारी व्यासपीठावर येवुन त्याची उत्तरे देतील.

यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**माझ्या प्रभागात दिड महिन्याअगोदर एका घरावर भिंत पडली आहे, ती भिंत जी आहे ती महापालिकेची आहे. त्या भिंतीसाठी मी सहा महिन्यापुर्वी दोन पत्रे दिली आहेत. व यांना त्याची सूचना दिली आहे की ही भिंत पडणार आहे. त्यामुळे काहीही हानी होवू शकते, जिवित हानीही होवु शकते. किंवा या भिंतीच्या खाली एक घर आहे, त्या घरातील माणसे मरु शकतात. त्यानंतरही अधिका–यांनी याबाबतीत काही कार्यवाही केली नाही. ती भिंत कोसळल्यानंतर त्या घरातील लोक दिड महिन्यापासुन घराच्या बाहेर राहत आहेत. आपत्कालीन स्वरुपाचे हे काम दिड महिन्यापासुन होत नाही.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सर्व सदस्यांना निवेदन आहे की, त्यांनी अर्थसंकल्पाविषयी आपले मत मांडावे संबंधीत अधिकारी त्या प्रश्नांची नोंद घेतील.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**नाही, नाही, नोंद करायची नाही. जी भिंत पडली आहे ती महानगरपालिकेची आहे, ती बांधुन देण्याचे काम कोणाचे आहे.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**त्याबाबत केलेली तरतुद आपणांस अर्थसंकल्पात दिसुन येईल.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**अर्थसंकल्प सोडा तुम्ही मी तातडीच्या कामाचे बोलत आहे. तातडीने करावयाच्या कामाच्या वेळेस तुम्ही अर्थसंकल्पीय तरतुद पाहत बसणार काय?

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. सुरेश जाधव, सदस्या श्रीमती जया साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**श्री. अंकुश म्हस्केजी आपण बसुन घ्या, याबाबतची तरतुद अर्थसंकल्पात आहे. संबंधीत अधिकारी आपणांस सांगतील.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**अर्थसंकल्पात तरतुद आहे तर दिड महिन्यापासुन ते काम का होत नाही?

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**मा. महापौरजी, श्री. अंकुश म्हस्के सांगत आहेत, त्याप्रमाणे तातडीच्या कामांवर लक्ष दिले पाहिजे. या प्रकारचा एक विषय माझ्याही नजरेत आहे. पॅनल क्र. १५ मध्ये एक असा रस्ता आहे, ज्या रस्त्यांमुळे मागील १२ दिवसात ८ लोकांना फॅक्चर झाले आहे. या रस्त्यासाठी अगोदर १० लाखाचा निधी मंजुर केलेला आहे. त्यानुसार आयुक्तांना याबाबतीत सांगितले तर ते म्हणतात की, निधी उपलब्ध नाही. श्री. अंकुश म्हस्के यांनी जी समस्या मांडलेली आहे, त्याबाबतीत आपण उत्तर दया.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**आपण बसुन घ्याल तेव्हाच तर अधिकारी उत्तर देवु शकतील. आपण बोलण्यास उभे असतांना अधिकारी उत्तर कसे देतील? ते सांगा. यासाठी आपण बसुन घ्या, आपणांस अधिकारी उत्तर देतील. प्रत्येक सदस्यास असे सुचीत केले जाते की, अर्थसंकल्पाविषयी आपले जे काही प्रश्न आहेत, आपली मते आहेत ती आपण मांडा ते संबंधीत अधिकारी नोंदवुन घेतील. व व्यासपीठावर येवुन आपल्या नावानीशी उत्तरे देतील.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**मा. महापौर महोदय, आम्हांलाही समजते की, अर्थसंकल्पीय सभा आहे, परंतु हा तातडीचा विषय आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी :–**अर्थसंकल्प कशासाठी तयार केला जातो? लोकांच्या सुविधेसाठीच ना?

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**महानगरपालिकेची भिंत ज्या घरावर पडली आहे, त्या घरातील लोक या शहराचे नागरीक आहेत. सुदैवाने त्यावेळी ते वाचले, हे मी गेल्या पाच महिन्यापासुन सार्वजनिक बांधकाम विभागास व

आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणुन दिले आहे. दोन वेळा मी पत्रही दिले आहे. त्यानंतरही याकडे कुणी लक्ष दिले नाही. ती भिंत घरावर पडल्यामुळे त्या घरातील लोक बाहेर उघडयावर राहत आहेत. यापेक्षा तुमचा अर्थसंकल्प अतिशय तातडीचा आहे काय?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**श्री. अंकुश म्हस्केजी, तुम्ही व्यक्त केलेली भावना सभागृहाच्या लक्षात आलेली आहे. फक्त तुम्ही हया अर्थसंकल्पाविषयी बोलत आहात की मागच्या?

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. सुरेश जाधव, श्री. सतरामदास जेसवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**भिंतीचे तातडीचे काम आहे, भिंत पडली त्याकडे यांनी बिल्कुल लक्ष दिलेले नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**त्यासाठी तुम्ही असे सांगा की या अर्थसंकल्पामध्ये याकामी तुम्ही तरतुद करा. आपण आपला प्रस्ताव मांडा. स्थायी समितीने जो अर्थसंकल्प मंजुर केलेला आहे त्यामध्ये काय बदल करायचा आहे यासाठी हा अर्थसंकल्प मंजुरीस्तव महासभेपुढे आलेला आहे. अर्थसंकल्पावर चर्चा करण्याच्या अगोदरच याकामी तरतुद केली नाही आहे असे तुम्ही म्हणता, तुम्ही सांगा की यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली पाहिजे. आणि याबाबतचे आपले म्हणणे नाकारले तर पुढचा प्रश्न आला.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**माझा प्रश्न काय आहे, जी भिंत घरावर पडली आहे, ती महानगरपालिकेची भिंत आहे. त्यामुळे दिड महिन्यापासुन ते लोक घराबाहेर उघडयावर राहत आहेत. तातडीचे काम आहे, दिड महिना होवुनही त्यांना हे बघायला वेळ नाही. आपात्कालीन कामाचे काय आहे?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आयुक्त साहेब, हे मागच्या वर्षाचे काम होते. तुमची अडचण सुध्दा आमच्या लक्षात आहे की, शासनाने अनावश्यक अशी आचारसंहिता मध्येच लागु केली. त्यामुळे अगोदर महापालिका निवडणूकीमुळे अर्थसंकल्प लांबणीवर पडला होता. आणि त्यानंतर आता कोकण पदवीधर मतदार संघातील विधानपरिषदेची निवडणूक असतांना तिचा महापालिकेशी काहीही संबंध नसतांना, शासनाच्या मनात आले आणि दिली आचारसंहिता लावुन. तो निर्णय आयोगाचा आहे, पण आचारसंहितेमुळे अर्थसंकल्प पुढे ढकलला गेला.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**माझे म्हणणे काय आहे, आज जर येथे भिंत पडली तर अर्थसंकल्पाची वाट बघत बसणार आहात काय?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**हा विषय सुध्दा महत्वाचा आहे. या अर्थसंकल्पात तशी तरतुद असावी असे श्री. अंकुश म्हस्के यांचे म्हणणे आहे. तातडीच्या कामासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीची वाट बघत बसु नये. श्री. राजेश वानखेडे यांच्या विभागामध्ये स्मशानाची भिंत पडल्यानंतर तेथे जिवित हानी झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आपत्कालीन व्यवस्था आपली असली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे.

**<u>आयुक्त, श्री. बालाजी खतगांवकर:—</u>**मा. महापौर महोदय, स्थायी समिती सभापतींनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे, आणि त्यामधील त्यांच्या निवेदनातील शेवटच्या टप्प्यातील जर आपण नोंद घेतली असेल तर, आपत्कालीन कामासाठी ६० लाखाची तरतुद या वर्षासाठी ठेवलेली आहे. त्यामध्ये आपण आपल्या कामाचा समावेश करु शकतात.

**<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—</u>**नाही, नाही माझ्या म्हणण्याचा उद्देश काय आहे आपल्याकडे आपत्तकालीन परिस्थितीसाठी अर्थसंकल्पीय तरतुद असते ना मग आतापर्यंत का वाट बघत होते? तातडीच्या कामाचे प्राकलन तयार करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद लागते काय? मग अर्थसंकल्पामध्ये आपत्कालीन परिस्थितीसाठी आपण जी तरतुद ठेवतो ती कशासाठी? मागच्या वर्षाचा आपत्तकालीन निधी कुठे खर्च केला? की कोणत्या नगरसेवकाने त्याच्या प्रभागात एखादया कामासाठी वळविला आहे का?

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**सन्माननिय महापौरजी, माझे असे म्हणणे आहे की, या मुद्दयास येथेच पुर्ण विराम दिला पाहिजे, श्री. अंकुश म्हस्के यांना जो काही त्रास आहे, त्यासंदर्भात आपण संबंधीत अधिका—यास बोलावुन इथल्या इथेच आदेश दया व त्यांना सांगा की उदयापासुनच काम चालु करा.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**दिड महिन्यापासुन ती भिंत पडलेली आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**श्री. अंकुशजी आपण समजु शकता की येथे काम कशाप्रकारे चालते ते. अधिक खोलात मी जाावु इच्छित नाही. आयुक्त साहेब आपण अधिका—यास बोलावुन आदेश दया व उदयापासुनच तेथिल काम सुरु करा.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—**आता ते काम चालु करतील, हा मुद्दा वेगळा आहे. परंतु दिड महिन्यापासुन ते लोक त्रास सहन करत आहेत. त्याचे काय, त्यास जबाबदार कोण? आज आपल्या महानगरपालिकेची भिंत पडली आहे.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**ही अर्थसंकल्पीय सभा आहे.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**ही अर्थसंकल्पीय सभा आहे बरोबर आहे परंतु माझा जो प्रश्न आहे त्याचे काय? तो सुध्दा तातडीचा आहे.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**या विषयाबाबत आपण ४ वाजेच्या सभेत बोला. ही अर्थसंकल्पीय सभा आहे, या सभेत अर्थसंकल्पविना दुस—या कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**अर्थसंकल्पाचा विषय निघाला आहे म्हणुन सांगत आहे. जी भिंत पडली आहे ती महानगरपालिकेची भिंत आहे, त्यास जबाबदार कोण?

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**कृपया आपण याबाबतीत ४ वाजेच्या सभेत बोला. आता आपण बसुन घ्या.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**४ वाजेच्या सभेत का बोलु?

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**ही अर्थसंकल्पीय सभा आहे या सभेत दुस—या विषयावर चर्चा होत नाही.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:—**हे तातडीचे काम आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**याबाबत कुणाला तरी जबाबदारी घेण्यास सांगा ना? आपण अधिका—यांना आदेश दया, उदयापासुन काम सुरु करा. त्यामुळे हा मुद्दा येथे संपृष्टात येईल.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**आयुक्त साहेबांनी सांगितले आहे, अधिका—यांनी नोंद घेतली आहे. या अर्थसंकल्पामध्ये ६० लाखाची तरतुद आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, श्री. अंकुश म्हस्के सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक आहेत,त्यांचे तर समाधान करा.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष हे दोन्ही आम्हांस समान आहेत.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—**मा. महापौरजी, संबंधीत अधिका—यांना व्यासपीठावर बोलवा. अधिकारी केव्हा उत्तरे देतील?

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**महापौरजी, आपण रागावु नका. आमच्या नवजवान श्री. रमेश चव्हाण यांनी पहिल्यांदाच महासभेत अर्थसंकल्प सादर केला आहे. आम्ही त्यांना धन्यवाद देतो. त्यांना जरा समजु दया, आपणही जरा समजुन घ्या. लोकप्रतिनिधी आपणांस काय सांगत आहेत, ते काय विनंती करत आहेत ते कृपया

आपण मेहरबानी करुन समजुन घ्या. आपण नगरसेवकांवर रागावु नका. मागील महिन्यापासुन पावसाळा सुरु झाला आहे. आपले जे प्रशासन आहे ते नगरसेवकांना तातडीच्या कामांमध्ये मदत पुरवु शकले नाही. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नगरसेवकांनी कोणत्या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा तो क्रमांक सुध्दा प्रशासन पुरवु शकले नाही. प्रत्येक वर्षी आपण ज्या डाय–या देता त्या डाय–या कोठे आहेत? आज आपण आमचे महापौर आहात, आपण आमचे बारकाईने ऐकुन घ्या. आमचे काय म्हणणे आहे, पावसाळयामध्ये त्रासाचे होवु नये म्हणुन श्री. अंकुश म्हस्के यांनी आपणाकडे जी विनंती केली आहे, ती ऐकुन घ्या. आमच्या श्री. बोडारे साहेबांनी आमच्यासमोर जी विनंती केली आहे, तिच्याबाबतीत विचार करा. आज महापालिका प्रशासन झोपलेले आहे. करोडो रुपये खर्च केल्यानंतर काम होत नाही. आता आपण हा जो अर्थसंकल्प मंजुर करत आहात ना, त्यानुसार करोडो रुपये खर्च करा. त्यातुनही काम होणार नाही. यासाठी आम्ही आपणासमोर ग–हाणी मांडत आहोत. जी कामे समाविष्ट करायची राहुन गेली आहेत, जी जरुरी कामे आहेत, मागील वर्षी बॅरेक नं. २१२३ च्या मागे जी भिंत पडली होती ती आजपर्यंत बांधली नाही. ही तातडीची कामे कधीपर्यंत रोखुन धरली जातील. तर कृपया तातडीच्या कामासाठी काहीतरी निधी ठेवला जावा. बाकी कुणावर रागावु नका.

यावेळी सदस्य श्री.अंकुश म्हस्के हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत येवुन व्यासपीठावर बसलेल्या आयुक्तांच्या दिशेने हातवारे करुन काही बोलत होते.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**आयुक्त साहेब, मी तुमच्याकडे या कामासाठी किती वेळा आलो आहे? दोन वेळा आलो आहे ना?

**आयुक्त, श्री. बालाजी खतगांवकर:–**सन्माननिय नगरसेवक जरा सभागृहाचे पावित्र्य राखुन बोला. लोकशाहीमध्ये ही पध्दत नाही. जरा ऐकुन घ्या, तुम्ही तुमच्या जागेवर उभे राहुन बोला ना? बोला ना? तुम्ही हात करुन जे बोलताय ना.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**अर्थसंकल्पीय सभेत अर्थसंकल्पाशिवाय दुस–या कोणत्याही विषयावर बोलु नये. आपले जे काही प्रस्ताव असतील ते ४ वाजताच्या सर्वसाधारण सभेत ठेवा. आता या सभेत कोणत्याही सदस्यास फक्त अर्थसंकल्पावर बोलायचे आहे. अर्थसंकल्पा व्यतिरिक्त कोणतीही चर्चा विचारात घेतली जाणार नाही.

**सदस्य श्री. राजेश कंडारे :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, अर्थसंकल्पाविषयी मी बालु इच्छितो प्रभाग क्र. १ मधील गुलशन नगर येथिल जो नाला आहे, त्यामध्ये आजुबाजुच्या ४ पॅनलमधील पाणीयेते. त्याचे निष्कासन नगरपालिकेच्यावतीने आता करण्यात आले आहे. त्या नाल्यासाठी निधी मंजुर करुन त्या नाल्याची सुधारणा करायची आहे. या गोष्टीकडे आपण लक्ष दया.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:–**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, एक मिनिट, सर्व सदस्यांना माझी विनंती आहे, व विरोधी पक्षीयांना सुध्दा विनंती आहे, अर्थसंकल्पामध्ये जी काही कमतरता आहे, त्याबाबतीत आपण फक्त सूचना दया की हे का केले नाही? आपल्या सूचनांचे ते जरुर पालन करतील, अधिका–यांना सांगतील. परंतु अर्थसंकल्पाच्या सभेत दुस–या कोणत्याही विषयावर चर्चा होत नसतांना हे झाले, ते झाले असे अर्थसंकल्पीय सभेत बोलता कामा नये. मी सर्व सन्माननिय सदस्यांना विनंती करतो, आपले तातडीचे काम असेल आता तातडीचे काम असेल. परंतु आज अर्थसंकल्पीय सभेमध्ये अर्थसंकल्पावर चर्चा होवु दया.

**सदस्य श्री. अंकुश म्हस्के:–**श्री. मोरे साहेब, तातडीच्या कामाबाबतच बोलत आहे मी. त्या घरावर भिंत पडली आहे, सुदैवाने लोक वाचले आहेत. तुमच्या प्रभागात असे काय झाले असते तर तुम्हांला काय वाटले असते?

**सदस्य श्री.बी.बी.मोरे:–**ते तुम्ही त्यांना सांगा. ते नोंद घेतील, व अधिका–यांना सांगतील. अर्थसंकल्पाच्या सभेमध्ये तुम्ही इतर काही विषय काढणार म्हणजे अर्थसंकल्पाची सभा होवु देणार नाहीत? हे बरोबर नाही.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सर्व संबंधीत अधिका–यांना निर्देश देतो की, सन्माननिय सदस्य ज्या काही सूचना करत आहेत, कृपया त्यांची नोंद घ्या. व सर्व सदस्यांची चर्चा पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक सदस्याने विचारलेल्या प्रश्नासंदर्भात त्यांच्या नावाचा उल्लेख करुन सभागृहात त्या संदर्भात माहिती दया. जसे आमचे सदस्य श्री. कंडारे यांनी सांगितले त्या मुद्दयाची नोंद घ्यावी तसेच जे कोणी सदस्य, जे काही बोलु इच्छित आहेत, त्याची संबंधीत अधिका–यांनी नोंद घेवुन नंतर येथे येवुन उत्तर दयावे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, आणि आयुक्त साहेब, आम्ही अतिशय खुष आहोत की उल्हासनगरच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच आयुक्तांनी एक पुस्तिका प्रस्तृत केली आहे, त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करते. साहेब, वस्तुस्थितीदर्शक अर्थसंकल्प मांडणे हे अतिशय मुश्किलीचे असते याची आम्हांलाही कल्पना आहे. अर्थसंकल्पास माझा तसा काही विरोध नाही. परंतु जे तीन चार मुद्दे आहेत ते कृपया नोंदवुन घेतले जावेत. करांमध्ये आपण जी वाढ केली आहे, त्याबाबत आम्ही विरोध करत आहोत कारण की, तातडीची कामे होत नाहीत. आपण शहरवाशियांना मुलभुत सेवा देवु शकत नाहीत. व अचानकपणे आपण त्यांच्यावर कर वाढवत आहोत. जर आपणांस महसुल वाढवायचा असेल तर आपणास जी बांधकामे नियमाधिन करायची आहेत, त्या मुद्दयाकडे वळा. आपण दुरुस्ती परवानगी देण्याबाबत विचार करु शकता ज्यामुळे आपणांस चांगल्या प्रकारचा महसुल प्राप्त होवु शकेल. दुसरी गोष्ट ही आहे की, आयुक्त साहेब आपणांस सांगु इच्छिते की, आमचा या गोष्टीस विरोध नाही की समाज मंदिर किंवा प्रवेशद्वार तयार होता कामा नये परंतु त्या अगोदर मी एक सांगु इच्छिते की, जी प्रवेशद्वारे तयार केली जातात त्याखालील जे रस्ते आहेत त्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. त्या रस्त्यांचे भलेही आपण कॉंक्रिटीकरण करु नका. परंतु कमीत कमी डांबरीकरण होणे अत्यंत जरुरीचे आहे. कॅम्प नं. ४ येथिल वाहतुकीचा सर्वात मोठा जो मुद्दा आहे, तो आपण सोडवु शकता. त्या रस्त्यास समांतर असलेला रस्ता मानेरा गावापासुन पवई चौकापर्यंतचा जो मुख्य रस्ता आहे, त्याचे चांगल्याप्रकारे नुतनीकरण करावे. बाकी विकास कामांमध्ये आपणांस सी सी पॅसेज तयार करावे लागतील. जे मुख्य रस्ते आहेत त्यांचे आपण डांबरीकरण करावे. त्यामुळे एक तृतियांश अर्थसंकल्पीय निधीतुन ही कामे होवु शकतील. व त्यातुन उल्हासनगरमधील बहुतांश रस्त्यांची कामे आपण करु शकु. यासाठी आपण कृपया वैयक्तीकपणे पाहणी करावी. आता आमच्या सिंधी समाजाचा चालियासाहेब हा फार मोठा सण येत आहे, चालिया साहेब मंदिराकडे येणारे जे रस्ते आहेत त्यांची स्थिती अतिशय दयनिय आहे. नेताजी चौकापासुन मच्छी मार्केटचा जो रस्ता आहे तो अजुन तयार झाला नाही, जर त्यात क्रॉक्रिटीकरणास अडचण येत असेल तर त्यास टार रस्त्यामध्ये रुपांतरीत करा, म्हणजे त्यात अर्थसंकल्पीय तरतुद फार कमी लागेल. तसेच नागरीकांना त्रास होणार नाही. महिला सदस्या होण्याच्या नात्याने मी सांगते, रिक्षातुन जी कोणी गरोदर महिला प्रवास करते तिला या दयनीय रस्त्याच्या स्थितीने खुप त्रास होत आहे. लॅपटॉपसाठी जो निधी ठेवला आहे, त्यास माझा वैयक्तीक विरोध आहे. मागील वेळेस निवडून आलेले जे नगरसेपक आहेत त्यांच्याकडे अगोदरपासुनच लॅपटॉप आहेत, त्यासाठी माझे एक निवेदन असेल की त्यांनी त्याच लॅपटॉपचा वापर करावा व आयुक्त साहेब कदाचित आपणांस माहित नसेल, तीन वर्षापुर्वी आम्हांस जेव्हा लॅपटॉप देण्यात आले होते, त्याबाबत आपण प्रशासनास विचारु शकता की किती नगरसेवकांनी आजपर्यंत ई—मेल सेवा सुविधा उपलब्ध करुन घेतली आहे. कारण की लॅपटॉप देण्याचा उद्देश हा होता की आपणांस पेपरवर्क कमी करायचे आहे. आपला कागदांवरील जो खर्च आहे तो कमी करायचा आहे. परंतु येथे पेपरवरील खर्च कमी तर झाला नाही, उलट लॅपटॉपवरील खर्च लागु झाला. व पेपरचा सुध्दा. माझ्या अंदाजानुसार पाच कोटीपर्यंतचा हा खर्च आहे. ते पत्र देवुन मी आपणांस सांगु शकते. मागील तीन वर्षामध्ये आपणांस याबाबत नुकसान झाले आहे. या पाच कोटीमधुन आपण व्हीटीसी ग्राउंड येथे मीनी स्पोर्ट कॉम्पलेक्सचे काम हाती घेवु शकता. व तातडीच्या कामासाठी किंवा आपत्कालीन कामासाठी निधी बाबत आता जी चर्चा झाली आयुक्त साहेब, आपण आता सांगितले की आपत्कालीन कामासाठी ६० लाखाचा निधी आपण ठेवत आहात त्याबाबत मी विनंती करेल की, याबाबतीत जर आपणांस खरच कामे करायची असतील तर जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांना हा निधी उपलब्ध करुन दिला जावा. आपणांस माहित असेल की दोन दिवसापुर्वी माझ्या बाजुच्या पॅनलमध्ये एक स्मशानभुमीची भिंत पडली आहे, तसेच आपल्या पाणी पुरवठयाची जी वितरण व्यवस्था आहे, ती खुपच चांगली आहे आणि आपले अधिकारी सुध्दा चांगले आहेत, परंतु कुठे एखादया ठिकाणी वाल्व खराब झाला तर तेथिल वाल्व बदली करावा लागतो, परंतु त्यासाठी आपणाकडे निधी उपलब्ध नसतो, यासाठी आपण जो आपत्कालीन निधी ठेवला आहे तो प्रभाग समित्यांकडे वळवा.

**सदस्या श्रीमती पचंशीला पवार:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त आणि मा. सचिव साहेब व सभागृहातील सर्व सन्मा. नगरसेवक आणि नगरसेविका, आज आपण ज्या २०१२—२०१३ च्या अदांजपत्रकावर चर्चा करत आहोत तर रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या आमच्याही काही सुचना आहेत, त्या सूचना आपण लक्षात घेणार अशी आम्हांला खात्री आहे, म्हणून मी आपणासमोर काही सूचना करु इच्छिते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी अर्थसंकल्पामध्ये १ कोटी रुपयाची तरतुद करण्यात यावी. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत, त्यांचे उल्हासनगर मध्ये सुदंरसे भवन बनवावे अशी आमची रिपब्लीकन पार्टीच्या वतीने मागणी आहे, आणि मला वाटते की आपण यावर लक्ष दयाल. दुसरी सूचना आहे की, गलिच्छ वस्ती निमुर्लन समिती मध्ये निधी वाढविण्यात यावा. याचबरोबर दुर्बल घटक विकास कामासाठी सुध्दा निधी वाढविण्यात यावा. कारण पुर्ण उल्हासनगरमध्ये ४८ झोपडपट्ट्या या घोषित आणि इतर अघोषित अशा मिळुन १०० झोपडपट्ट्या आहेत तर आमची अशी विनंती आहे आपणांस आर्थिक दुर्बल घटक वस्तीत आणि गलिच्छ वस्तीसाठी आपण विकास निधी जास्त ठेवला पाहिजे, कारण गलिच्छ वस्ती व दुर्बल घटक वस्त्यामध्ये याची अत्यंत आवश्यकता आहे, आणि शासनाच्या धोरणानुसार सुध्दा ५ टक्के निधी या कामासाठी ठेवायचा आहे,

म्हणुन आपणांस विनंती आहे की गलिच्छ वस्तीसाठी हा निधी वाढविण्यात यावा. दुसरे असे की, शहरातील मोठया नाल्यांचा विकास करण्यासाठी निधीची तरतुद करण्यात यावी आपणांस माहितच असेल की उल्हासनगर मध्ये प्रत्येक वर्षी नाल्यांमध्ये पाणी भरते व झोपडपट्ट्यामध्ये नाल्यांचे पाणी भरल्यामुळे गरिबांचे ससांर उधवस्त होतात म्हणून आपणांस विनंती आहे की नाल्यांचा विकास होण्यासाठी सुध्दा आपण पुरेसा निधी ठेवावा, तिसरा मुदद्ा आहे पाण्याचे प्रचलित दर वाढवु नये, मा. महापौर व आयुक्त साहेब, आपणांस माहितच असेल की, उल्हासनगरमध्ये पाण्याची टंचाई खुप प्रमाणात आहे, आपण अजुनही प्रत्येक ठिकाणी व्यवस्थीतरित्या पाणी देवु शकत नाहीत. कारण आपली वितरण व्यवस्था व्यवस्थीत नाही. म्हणुन मला असे वाटते की, व्यवसायीक नळजोडण्या सोडुन इतरांना, कमीत कमी झोपडपट्ट्यांना तरी पाण्याचे दर वाढविण्यात येवु नये. अशी आमची रिपब्लीकन पार्टीच्या वतीने विनंती आहे. आभारी आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—</u>** मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, आमचे आयुक्त मी आत्ताच पत्र तुमच्याकडे दिलेले आहे. आमच्या कडील जिजामाता उद्यानाच्या देखभाल व दुरुस्ती करता गेल्या दोन वर्षापासून अर्थसंकल्पामध्ये एक रुपयाची ही तरतुद ठेवण्यात आलेली नाही. त्या तरतुदी करीता लेखा अधिकारी यांना पत्र दिले आहे. ते काय काम करतात ते मला माहित नाही. त्याना पत्र देवुनही या अर्थसंकल्पामध्ये त्यानी त्याची तरतुद केलेली नाही. ते पत्र आपल्या अवलोकनार्थ ठेवलेले आहे. लेखा अधिकाऱ्यांनी या कामासाठी का तरतुद केली नाही, याची मला कल्पना नाही, कृपया त्यानी खुलासा करावा, की ही तरतुद त्यांनी का केली नाही. आम्ही मागणी केली आहे त्याप्रमाणे प्रशासनाने पत्र ही दिले आहे, ते पत्र मी आपणांस समोर दिले आहे. तरी मुख्य लेखा अधिकारी यांनी व्यासपिठावर येवुन खुलासा करावा.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानीः—</u>** मा. महापौरजी, स्थायी समितीचे सभापती, श्री. रमेश चव्हाणजी, मा. आयुक्त साहेब आणि उपआयुक्त दर्जाचे सर्व अधिकारी, आज अर्थसंकल्पीय अदांजपत्रक सादर होत असताना अतिशय आनंद होत होता कारण की एक उत्साही व नवजवान स्थायी समिती सभापती अर्थसंकल्प सादर करत आहे. कारण की आमच्या श्री. राहुल गांधीचे तरुणावर नेहमीच लक्ष केंद्रीत असते. परंतु अतिशय दुःखाने सागांवे लागत आहे की, हा जो अर्थसंकल्प आहे यामध्ये जे आकडे दर्शविले आहेत ते इकडुन तिकडुन फिरवाफिरव करुन दाखविले आहेत. शहर विकासासाठी जे चागंले चागंले प्रकल्प होते, ते सर्व आपण सोडुन दिले आहेत, गरिबांच्या बाबतीत जो विचार केला पाहिजे होता तो केला नाही, गरिबांवर, दलितांवर अन्याय केला जात आहे व पाणीपट्टी व वाढीव करांच्या रुपाने आपण गरिबांवर ओझे टाकत आहात. मी स्थायी समितीमध्ये सुध्दा माझा एक प्रस्ताव दिला होता की, आपणास जर कर वाढवायचे आहेत तर बिल्डर लॉबीवर आपण कर वाढवु शकता, त्यावेळी अर्थसंकल्प मंजुर करण्यात आला. आज आपण बहुमताच्या जोरावर अर्थसंकल्प मंजुर करु शकाल. परंतु आयुक्त साहेब आपण नवीन आहात, मी आपल्या निर्दशनास आणुन देवु इच्छिते की, कॅम्प नंबर ५ येथे महापालिकेच्या सफाई कामगारांचे जे क्वॉटर्स आहेत. या क्वॉटर्समध्ये राहण्याऱ्या गरिब सफाई कामगारांच्या पगारातुन घरभाडे वसुल करत आहात. परंतु त्यांच्या क्वॉटर्सची स्थिती अतंत्य दयनीय आहे. मी आपणास सरळ एक प्रश्न विचारत आहे की, जर आपली महानगरपालिका त्या कामगारांकडुन घरभाडे वसुल करत आहे, तर आपले ते कर्मचारी कोणत्या दयनीय स्थितीत तेथे राहत आहेत त्याची जरा आपण पहाणी करावी. केद्रंसरकार व राज्यसरकारकडुन या कामी निधी आलेला असतानांही आपले हे सरकार व आपण नाकाम असल्याचे सिध्द झाले आहे. मी आपणांस विचारु इच्छिते की, सभासूचना झाली, अर्थसंकल्प झाला, निविदा निघाली, परंतु निविदा मंजुर झाल्यानंतर काम करुन घेण्याची जबाबदारी आपण कोणत्या अधिकाऱ्यांवर टाकता याची आपणांस माहिती आहे का? त्या निविदेचा कालावधी कधीपासून सुरु होतो आणि कधी संपतो हे आपणांस माहित आहे का? कधी आपण संबंधीत अधिकाऱ्यास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे का? कर्मचाऱ्यांवर आपले नियंत्रण असायला पाहिजे ते नाही. अर्थसंकल्पात तरतुद केल्यानंतर व निविदा निघाल्यानंतरही काम होईल याची काही खात्री नाही. ना कामाची खात्री आहे, ना कामाच्या विश्वसनीयतेची खात्री आहे. आज मी हे आपल्या निदर्शनास आणुन दिलेले आहे मागील आयुक्तांना मी चार वेळेला भेटली आहे. उल्हासनगर मध्ये अमुक एका ठिकाणी इमारत कोसळत आहे असे दुरदर्शनवरील विविध वाहिन्यावर वृत्त येत आहे. कधी कधी टिव्ही ९ वर कधी स्टार प्लस वर अशा सर्व वृत्तवाहिन्यावर वृत्त येत आहे की, उल्हसनगरमध्ये अमुक एका ठिकाणी इमारत कोसळली, इमारत सिल केली गेली, आणि त्यांनतर एवढी नुकसान भरपाई देण्यात आली. अहो ते लोक तर आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे गरिब सफाई कामगार आहेत, एका इमारतीचे बाधंकाम सुरु करण्याची आपण हिमंत दाखवत नाही. तेथील इमारत बाधंकामसाठी केंद्रसरकारकडुन, राज्यसरकारकडुन आलेला निधी परत जाण्याच्या मार्गावर आहे त्यास कोण जबाबदार आहे? आपण हे जे मोठमोठे दावे करत आहात, परंतु हे मला सांगा केंद्रसरकारचा व राज्यसरकारचा जो निधी परत गेला त्यास जबाबदार कोण आहे? मा. महापौरजी प्रथम याचे उत्तर दया? तर कोणता अर्थसंकल्प आपण मंजुर करता आहात? हा अर्थसंकल्प पुर्णपणे बोगस आहे. आपणांस जर अर्थसंकल्प मंजुर करायचा आहे तर आपण असाच मंजुर करा ना, आकडयाची जुळवाजुळव करुन, निधी उपलब्ध असतानाही आपण काम करुन घेवु शकत नाही त्यास जबाबदार कोण? तर मग आपण कोणत्या कामासाठी येथे बसलो

आहोत. कोणत्याप्रकारचा अर्थसंकल्प आपणांस मंजुर करायचा आहे. सकाळी बाहेर जावुन सध्याकाळी यायचे व म्हणायचे चला चला आपणांस अर्थसंकल्प मंजुर करायचा आहे. लोक टाळया वाजवतील, ही पध्दत बदला आता. अर्थसंकल्प बहुमताने पारित होणे ही वेगळी गोष्ट आहे. आपले शहराबाबत सुध्दा काही कर्तव्य आहे, आपण या शहराचे नागरीक आहोत, चांगले नागरिक आहोत, आम्ही चौदा चौदा हजार मतांनी निवडुन येवुन येथे बसलो आहोत. आयुक्त साहेब आपण माझे बोलणे काळजीपुर्वक ऐकत आहेत असे मला वाटत आहे. मी बरोबर बोलत आहे ना? आपण जर माझे बोलणे काळजीपुर्वक ऐकत आहात तर माझे या मुद्द्याबाबत आपण माईकवर बोललात तर मला खुपच आनंद होईल. व हे असे एकच प्रकरण नाही अशी क्रित्येक प्रकरणे आहेत ती तुम्ही तपासुन पहा. बारा रस्त्यांचे प्रकरण पहा, सार्वजनिक बाधंकामाचे कोणतेही प्रकरण पहा, ती अर्धवट पडुन आहेत. शहरातील रस्त्यांची स्थिती पहा, पाण्याची स्थिती पहा, कचऱ्याची समस्या पहा, तर या समस्यांवर अंकुश का लावत नाहीत. जर आपण अंकुश लावत नसाल तर खुर्च्या सोडा, आपण या खुर्च्यावर बसता तेथुन गरिब मुलांबाबत, कर्मचाऱ्यांबाबत सर्वसामान्य जनतेबाबत विचार करा. हा अर्थसंकल्प पुर्णपणे बोगस आहे असे मी समजते.

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:–</u>** मा. महापौरजी, आज स्थायी समिती, सभापती श्री. रमेश चव्हाण यांना या कार्यकालावधी मधील पहिला अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली होती. त्यातुन या महानगरपालिकेला ते एक नवी दिशा देवु शकले असते. परंतु हा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर आमची निराशा झाली व आश्र्चय वाटले की, त्यांनी अर्थसंकल्पात भरीव असे काहीच कामकाज दर्शविलेले नाही. किंवा त्यांना करु दिले नाही. मागील पाच वर्षाच्या अभिलेख्यांवर नजर टाकली तर असे दिसुन येते की २००.७–०८ मध्ये जकातीचे उत्पन्न ८४ कोटी रुपये होते, २००८–०९ मध्ये ९४ कोटी, २००९–१० मध्ये १०४ कोटी, २०१०–११ मध्ये ११४ कोटी, आणि २०११–१२ मध्ये १२६ कोटीचे उत्पन्न आपणांस मिळाले आहे. घरपट्टीतुन २००७–०८ मध्ये ३३ कोटी, २००८–०९ मध्ये ३४ कोटी, २००९–१० मध्ये ३६ कोटी, २०१०–११ मध्ये ५४ कोटी, आणि २०११–१२ मध्ये ५३ कोटीचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. ५ वर्षात जकातीपोटी एकुण ६२२ कोटी आणि घरपट्टीतुन एकुण २१० कोटी रुपये मिळाले आहेत. व हे दोन्ही कर मिळुन ८३३ कोटी होतात. ८३३ कोटी ५ वर्षात उत्पन्न प्राप्त झाले आहे, या उत्पन्नातुन कोणताही मोठा प्रकल्प राबविण्यात आलेला नाही, जेएनएनयुआरएम चे पैसे येवुन पडले आहेत ते काम अजुन अद्याप सुरु झाले नाही, अशी परिस्थिती आहे की कदाचित ते पैसे परत जातील, या पुढील आपली जी रणरिती दिसुन येत आहे, ती अशी की साडे आठ टक्के घरपट्टी वाढविणे किंवा पाण्याचे बील डब्बल करणे, यातुन काहीही निष्पण होणार नाही. जसे या पूर्वी हा निधी फुकट गेला आहे, ज्यातुन या शहरास काहीही मिळालेले नाही, हे पैसे सुध्दा कदाचित व्यर्थ जातील, या पेक्षा हे अधिक चांगले असते की, आपण एक वस्तुदर्शक अर्थसकंल्प तयार केला असता, प्रत्यक्षात आपणांस किती उत्पन्न प्राप्त होणार आहे, त्यानुसार तेवढाच खर्च आपण प्रस्तावित केला असता, आयुक्त साहेबांनी जे काही प्रयत्न केले त्याना मी दाद देतो, त्यानी वस्तुस्थिती सन्मा. सदस्यांच्या निर्दशनास आणुन देण्याचा एक प्रयत्न केला आहे की आजच्या तारखेला ठेकेदार व पुरवठादाराचे २०९ कोटीची देयके आपणांस दयायची आहेत. कर्ज तर अलग आहेत, एमआयडीसीची थकबाकी अलग आहे, आणखी काही थकबाकी आहे त्या वेगळया आहेत, त्या संदर्भात कोणत्या प्रकारे व्यवहार केला जाईल त्यांची अर्थसंकल्पात कोणतही तरतुद नाही, आपण हे कर्ज कसे फेडणार? २०९ कोटीचे कर्ज कसे फेडणार? एमआयडीसीचे पैसे दयायचे बाकी आहेत, पाण्याची थकबाकी आहे, जेएनएनयुआरएम कडुन कर्ज घेतलेले आहे, ३० रस्ते तयार करण्यासाठी एमएमआरडीए कडुन कर्ज घेतले आहे ते कर्ज आपण कसे फेडणार? यांबाबत या अर्थसंकल्पामध्ये कोणताही ठोस प्रस्ताव नाही. त्यांबरोबर खर्च कमी करण्यासाठी आपण कोणतीही योजना तयार केलेली नाही. खर्च तेच आहेत आणि ते वाढत राहतील, त्यांचबरोबर उत्पन्न वाढविण्यासाठी नवीन कोणताही मार्ग आपण शोधलेला नाही, पे आणि पार्क एक छोटासा प्रयत्न करता येवु शकला असता, आपल्या शहरातील सर्व रस्ते पार्किंगने भरले आहेत तेथे आपण पे आणि पार्क करु शकता, आणखी काही ठिकाणी पे आणि पार्क करु शकता, उल्हासनगर स्टेशन पूर्व आणि पश्चिम भाग, विठ्ठलवाडी पूर्व आणि पश्चिम भाग, त्यांचबरोबर शहाड स्टेशन येथे पे आणि पार्क करु शकला असतात, शहाड स्टेशन येथे बेकायदेशीररित्या पार्किंगची सुविधा चालविली जात आहे. तेथील स्थानिक लोक पैसे गोळा करत आहेत. परंतु या विषयी महानगरपालिकेचा एक प्रकल्प तयार होवु शकला असता. ज्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले असते, किंवा आपल्या महानगरपालिकेचे कायम स्वरुपाचे उत्पन्न वाढले असते असा एखादा प्रकल्प देता आला असता. परंतु असा कोणताही प्रस्ताव आपणाकडुन आलेला नाही. दुसरे असे की राजीव आवास योजनेमध्ये एक प्रस्ताव आहे त्याबाबत असे दिसुन येते की, आपणाकडे पैसे नाहीत, त्यामुळे पीपीपी योजनेअंतर्गत आपणांस एखादा प्रकल्प हाती घेता आला असता, पीपीपी मॉडेलला भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने मान्यता दिली आहे, त्यांच्या नियमांना अतिंम मान्यता दिली आहे. त्यांची मार्गदर्शक तत्वे अतिंम केली आहेत. काही पीपीपी प्रकल्प

हाती घेता येऊ शकले असते, नेहरु चौक येथे पे आणि पार्क पीपीपी मॉडेल नुसार तयार करता येऊ शकले असते. किंवा अन्य असे काही प्रकल्प हाती घेऊ शकलो असतो ज्यातुन नागरिकांना काही सुविधा देवु शकलो असतो व महापालिकेला काही उत्पन्न मिळु शकले असते, असे पीपीपी मॉडेल राजीव आवास योजनेमध्ये सुध्दा आणु शकलो असतो, जेएनएनयुआरएम, बीएसयुपी योजनेमध्ये आपण खर्च करत आहोत, त्यासाठी आपणांस पीपीपी मॉडेल मध्ये खर्च करावा लागणार नाही, त्याचीही तरतुद करावयास पाहिजे होती जी आपल्या अर्थसंकल्पामध्ये तरतुद करण्यात आलेली नाही, उत्पन्न वाढविण्याचा दुसराही एक मार्ग होता, रस्ता तयार करण्यामध्ये इतर महापालिकांमध्ये टिडीआर दिला जातो, आपण रस्ता तयार करा त्याबदल्यात आंम्ही आपणांस अमुक एवढा टिडीआर देवु, त्यामधुनही आपले काही रस्ते सिमेंट क्रॉक्रिटचे होवु शकले असते. परंतु या अर्थसंकल्पामध्ये असे काही प्रस्ताव आपण दिले नाहीत. अनाधिकृत बाधंकामे नियमाधीन करण्याचे काम जवळजवळ ठप्प झाले आहे. याकामातुन आपणांस बरेचसे उत्पन्न होवु शकले असते, व जनतेमध्ये जी एक भिती निर्माण झाली आहे की आपले अनाधिकृत बांधकाम तुटेल, आपले घर, दुकान तुटेल, यासाठी अनाधिकृत बाधंकामे नियमाधीन करण्याचे काम पुन्हा सुरु केले पाहिजे. दुसऱ्या प्रकारचा एक टिडीआर आहे, जे आरक्षित भुखंड आहे त्यांची ज्यांच्याकडे सनद आहे किंवा मालकी हक्क आहे, त्यांच्याकडुन तो भुखंड घेवुन त्यांना टिडिआर दिला जावा, यामुळे आपले जे आरक्षित भुखंड आहेत ते आपणांस मिळु शकले असते याचीही या अर्थसंकल्पात तरतुद केलेली नाही, मुंबई महानगरपालिकेने एक नवा नियम केला आहे, त्यानुसार ०.३३ टक्के एफएसआय बिल्डरला अधिमुल्यांवर दिला जात आहे, यासाठी मा. आयुक्तांना मी विनंती करतो की, असे काही प्रस्ताव आणा त्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे काही उत्पन्न मिळु शकेल, दुसरे असे की ठेकेदारांची २०९ कोटीची बिले थकीत असल्याचे दर्शविले आहे, आपण आम्हांला जी पुस्तिका दिली आहे त्यानुसार आम्ही ती बिले पाहिली आहे, काही काही बिलांच्या समोर हे काम कोणत्या निधीतुन केले आहे त्याचा उल्लेख नाही, हे काम कोणत्या निधीतुन करण्यासाठी कार्यादेश दिले आहेत? जर कोणताही निधी नसताना जर एखादा कामाचा कार्यादेश दिला असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे, आपण खर्च किती करायचा आहे ते निश्चित केले आहे, अर्थसंकल्पात एखादया लेखा शिर्षात निधीची कोणतीही तरतुद नसताना त्याकामासाठी कार्यादेश कसा काढण्यात आला याची चौकशी झाली पाहिजे, मी या अगोदच्या आयुक्तांना याबाबतीत क्रित्येक पत्र दिली आहेत, प्रत्येक बिल जर आपण पाहिले तर ते १० टक्के वाढवुनच येते, प्रत्यक्षात १० टक्कयाची ही वाढ अशा परिस्थितीला असते की जसे की काम वाढले म्हणुन, ते काम थांबले नाही पाहिजे, यासाठी १० टक्क्यांची तरतुद ठेवली जाते. परंतु प्रत्येक बिल मग ते सार्वजनिक बाधंकाम विभागाचे असो व पाणी पुरवठया विभागाचे असो ते १०टक्के वाढवुनच येते. आपण एखादया ४ लाखाच्या प्राकलनास मंजुरी देतो त्याचे जे बिल निघते ते ४ लाख ४० हजार रुपयांचे तर कोणतीही अर्थसंकल्पीय तरतुद नसताना आपला आणखी १० टक्के खर्च वाढतो. ज्याची अर्थसंकल्पामध्ये तरतुद नसते व आपण आणखी खर्च वाढवतो, माझी आपणा सर्वांना विंनती आहे की आपण शहरामध्ये सार्वजनिक साफसफाई योग्य प्रकारे करवुन घेवु शकत नाहीत, सर्वठिकाणी पुरेशा दाबाने पाणी देवु शकत नाहीत अशावेळी घरपट्टी वाढविण्याचा किंवा पाणी बिल वाढविण्याचा जो प्रस्ताव आला आहे तो मागे घ्यावा व वस्तुस्थितीदर्शक अर्थसंकल्प तयार करण्यात यावा.

**<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे:—</u>** सन्मा. महापौरजी, .........

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** कॉग्रेस पक्षाच्या गटनेत्या श्री. अंजली साळवे या पहिल्यांदाच बोलण्यास उभ्या राहिल्या आहेत त्यांना बोलु दिले जावे.

**<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे:—</u>** विरोधी पक्षाचे सदस्य तर सफाईदारपणे बोलले आहेत, आम्हांलाही बोलु दिले जावे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोंडे:—</u>** महिलांना बोलु दिले जावे.

**<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे:—</u>** महिलांना प्राधान्य दिले आहे, सन्मा. महापौरजी, स्थायी समितीचे सभापती व आयुक्त साहेब......

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>** श्री. मोरेजी, मी निवेदन करतो की, सभागृहामध्ये महिला जास्त आहेत त्यांना बोलु दया.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>** मा. महापौरजी, विरोधी पक्षांच्या सदस्यांना प्रथम बोलु दिले जावे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>** श्री. मोरेजी आपणासही बोलण्याची संधी मिळेल.

**<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>** मा. महापौरजी, मा. स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त साहेब, यावर्षी आपण सादर केलेला सन २०१२—१३ चा अर्थसंकल्प लक्षात घेता व आपल्या उल्हासनगर शहराची आर्थिक स्थिती व मुलभुत गरजा लक्षात घेता, माझी व कॉंग्रेस पक्षाची अशी भुमिका आहे की, शहरातील विकासाची कामे हाती घेताना, कराच्या माध्यमातुन जनसामान्यांवर जास्तीत जास्त बोजा लादण्यात न यावा तसेच या अर्थसंकल्पाचा पूर्ण निधी फक्त आणि फक्त मुलभुत गरजांसाठी वापरण्यात यावा अशी मी विनंती करते. मागील कालावधीत शुशोभिकरणाच्या नावाखाली प्रवेशव्दारे व कांरजे बसविण्याची जी कामे करण्यात आली ती करतांना रस्ते विकसित करण्यात आले नाहीत. त्याबदद्ल जनसामान्यामध्ये तीव्र नाराजी आहे. आपण यावर्षी ज्या ठराविक वार्डामध्ये प्रवेशव्दार, यात्रीनिवास व समाज मंदीरासाठी पावणे तीन कोटीचा निधी प्रस्तावित केलेला आहे तो निधी खेळाची मैदाने, उद्याने यांसाठी खर्च करावा कारण आपल्या पुढील पिढींच्या शारिरिक मानसिक विकासासाठी तो जास्त आवश्यक आहे, मुलांसाठी आपण काहीच करत नाही म्हणुन हा निधी मुलांसाठी वापरण्यात यावा. आमचे असे म्हणणे नाही की, प्रवेशव्दारे व समाजमंदीरे बनविण्यात येवु नयेत, तीही बनविण्यात यावीत पण सर्वप्रथम मुलभुत गरजा पुर्ण केल्यानंतर जेव्हा महापालिकेची आर्थिक स्थिती मुलभुत होईल तेव्हाच या गोष्टी करण्यात याव्यात.

**<u>सदस्य श्री. बी.बी.मोरे:—</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब व स्थायी समितीचे सभापती, आजच्या या अर्थसंकल्पीय सभेबदद्ल सभागृहात चर्चा चाललेली असताना, जे नवनिर्वाचित सदस्य झोपडपट्ट्यांमधुन निवडुन आलेले आहेत, त्या सदस्यांना आजच्या अर्थसंकल्पांच्या माध्यमातुन नाराज केलेले आहे. ते नाराज असे केलेले आहे की पाणी पट्टीमध्ये दुपटीने वाढ केली आहे. त्याचप्रमाणे घरपट्टीमध्ये देखील वाढ केली आहे. त्याबदद्ल आयुक्त साहेब आपण ऐकत असाल तर मी सांगतो, तर मला हे सांगायचे आहे की आज उल्हासनगर शहरामध्ये ज्यावेळेला जलवाहिन्या टाकण्यासाठी करोडो रुपये आपण केंन्द्रसरकारकडून आपण मागविले आणि त्यानंतर त्या जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. झोपडपट्ट्यामधून जलवाहिन्या टाकलेल्या नाहीत. त्यांना अजिबात पाणी मिळत नाही, एक हंडाभर पाणी घेण्यासाठी इकडेतिकडे जावे लागते, आणि त्याच्यामध्ये सुध्दा आपण डब्बलटिब्बल बिल केले आहे, हे बरोबर नाही, यांच्याकडे स्थायी समिती सभापती व महापौरांनी लक्ष दिले पाहिजे, १० बाय १० च्या झोपडयाला १५० ते ३०० रुपये तुम्ही घरपट्टी लावता हा कुठला नियम आहे? अहो ते लोक कसेतरी राहतात आणि त्याच्यांवर हया महापालिकेने ऐवढे कर लावावेत हे बरोबर नाही हे चुकीचे आहे ते सुधारण्यात यावे , आणि स्थायी समितीने जे पारित केलेले असेल ते मागे घ्यावे. त्याच्यामध्ये सुधारणा करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे नदीकिनारी बऱ्याचशा झोपडपट्ट्या आहेत आणि उल्हासनगर मध्ये जेव्हा पूर येतो तेव्हा पूरांचे पाणी झोपडयामध्ये शिरते. आता आमचे महापौर अल्पोहार खायला लागलेले आहेत, त्याना भुक लागलेली आहे, पण त्यांना सांगु इच्छितो कान आमच्याकडे ठेवा महापौर साहेब, तुम्ही कानाला मशीन लावली आहे कि नाही ते मला सांगता येत नाही, कानाला मशीन लावुन घ्या, आणि मग तुमचे कामकाज चालु ठेवा. तर महत्वाचा प्रश्न असा आहे की बऱ्याचश्या झोपडपट्ट्या नदी किनारी आहेत, त्यातील बरीचशी माणसे वाहुन जातात, त्याठिकाणी घर तर राहतच नाही, माणसे वाहून जातात तर घर कोठुन राहणार? तर अशांसाठी अर्थसंकल्पामध्ये तुम्ही काय तंरतुद केली आहे? काही झाले की त्यावेळेला आपण म्हणतो की सन्मा. सदस्यांनी एकेक महिन्याचे मानधन दयावे, हे कशासाठी? तेव्हा महापलिकेने किंवा स्थायी समितीच्या सभापतीनी हयाचा विचार केला पाहिजे होता की, नदी किनारी ज्या झोपडपट्ट्या आहेत आणि पावसाळयात नदीला येणाऱ्या पुरामुळे येथील जी माणसे वाहून जातात त्यांच्या कुटुबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी अर्थसंकल्पात काहीतरी तरतुद करायला हवी होती, ती केलेली नाही. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आमच्या आरपीआयच्या सन्मा. सदस्या श्रीमती पचंशिला पवार यांनी या ठिकाणी अतिशय चांगला मुदद्ा माडंलेला आहे तो असा की, उल्हासनगरमध्ये ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर'' भवन बनविण्यासाठी १ करोड रुपयाची तरतुद ठेवली पाहिजे, ती ठेवण्यात आलेली नाही, आपण वाटेल त्या ठिकाणी खर्च करत राहतो, पण ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची घटना लिहिली आणि त्यानुसार देशाचा कारभार चालत असताना या उल्हासनगर शहरामध्ये ऐवढे राजकारणी आहेत, ते पक्षाचे काम करतात, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबदद्ल कुणी असे म्हणत नाही की, खरोखरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन साठी अर्थसंकल्पामध्ये एक करोड रुपयांची तरतुद ठेवली असती तर काय वाईट झाले असते का? यास्तव स्थायी समितीच्या सभापतीना पुन्हा मी सांगु इच्छितो की अर्थसंकल्पामध्ये ही तरतुद ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करावेत. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की आपण जी घरपट्टी दुप्पट तिप्पट केली आहे त्याबदद्ल आमची सुचना आहे की आपण त्यावर विचार करावा, कारण गोरगरिंबाना काम धंदा मिळत नाही, ते कसातरी आपला गुजारा करुन राहतात, आणि त्यांच्यावर आपण कर वाढवितो आणि पाण्याचे बिल वाढवतो ते कमी करावे, आणि या सभागृहामध्ये मी सांगु इच्छितो की, आम्ही सत्तेत आहोत, त्यामुळे याठिकाणी

मी नाराजी व्यक्त करतो हा जो अर्थसंकल्प आहे तो पोकळ आहे, त्याच्याबाबतीत काही गोष्टी लक्षात घेवुन आमच्या सूचनांचे पालन करावे, व त्यांचा समावेश करावा, जयहिंद.

**सदस्य श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, सर्वांत प्रथम मी आपल्या नवीन आयुक्तांना धन्यवाद देवु इच्छितो की त्यांनी या पुस्तकाव्दारे सत्य परिस्थिती सभागृहापुढे ठेवली आहे. आयुक्त साहेबांना मागील पाच वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जी विकास काम झाली आहेत त्यांचा उल्लेख केला आहे, जी कामे बाकी आहेत त्यांचाही उल्लेख केला आहे, त्याचबरोबर आपण २०९ कोटी ५४ लाखाची ठेकेदारांना दयावयाची जी थकबाकी दाखविली आहे, त्याबदद्ल आपणांस धन्यवाद, समस्त विरोधी पक्षांच्यावतीने आपल्याला धन्यवाद. त्याचबरोबर मा. महापौरांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधु इच्छितो, त्याचबरोबर आमच्या स्थायी समितीचे सभापती यांनी आज अर्थसंकल्प सादर केलेला आहे, मागील पाच वर्षात या शहरामध्ये १२७ कोटीचे पेव्हर ब्लॉक बसविले आहेत ते कुणाच्याही कामास न येणारे पेव्हर ब्लॉक का बसविले आहेत तेच कळत नाही. आपण मला परवानगी दिली तर आपणांस एक फोटो दाखवु इच्छितो ज्या ठिकाणी २००९ मध्ये सीसी पॅसेज तयार करण्यात आला होता. २०१० मध्ये त्यावर चेकर टाईल्स लावण्यात अल्या. २०११ मध्ये त्यावर पेव्हर ब्लॉक लावण्यात आले. आज पुन्हा त्याठिकाणी सीसी पॅसेज तयार करण्यात आलेला आहे. या प्रकारच्या मनमानी कारभारामुळे त्याठिकाणचे एक घर तीन फुट खोल गेले आहे. व पावसाळयामध्ये त्या घरात पावसाचे पाणी येते. त्याघरातील महिला महापालिकेत येवुन सांगतात की, आमच्या घराचे छप्पर वर करायचे आहे, त्यांना घर दुरुस्ती परवानगी दिली जात नाही, जे पाप या महानगरपालिकेने केले आहे, ते त्याचे परिणाम त्या गरिबाला भोगावे लागत आहे. २२ कोटीची प्रवेशव्दारे उभारण्यात आली आहेत. १२७ कोटीचे पेव्हर ब्लॉक अशी न जाणे कितीतरी कामे की ज्यांची या शहरास काही आवश्यकता नव्हती ती केली आहेत, त्यामागे कारणे काय आहेत ती मी सांगु इच्छित नाही कारण ती सर्वांना माहित आहे. याचबरोबर हा जो अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे त्याबाबतीत प्रत्येकास अपेक्षा होती. २०१२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आलेल्या सदस्यांसाठी हा पहिला अर्थसंकल्प आहे. व या शहरवासियांनी मागील क्रित्येक वर्षापासून ज्या अडचणी सोसल्या, दुखः भोगले, ज्या अडचणी कचऱ्याविषयी, पाणी टंचाई विषयी, वाढती महागाई, रस्त्यावरील दिवाबत्ती, रस्ते यांविषयी ज्या काही अडचणी त्यांनी भोगल्या त्यातुन त्यांची सुटका होईल अशी या अर्थसंकल्पातुन त्यांची अपेक्षा होती. परंतु खेदाने सांगावे लागत आहे की असे काही दिसून आले नाही. सपुंर्ण अर्थसंकल्पाचे थोडक्यात वर्णन करायचे झाले तर, असे म्हणेन की ''मुगेरीलाल के हसीन सपने'' आपण उल्हासनगर वासियांना दाखविले आहेत. अगोदर २०० कोटीची तुट व आता आपण म्हणता की अर्थसंकल्प मंजुर करा. स्थानिक संस्था कराच्या रुपाने १५५ कोटीची वसुली करु असे आपण दर्शविले आहे. याबाबत मी आपणांस सांगु इच्छितो की येथे असा एकही अधिकारी आहे का किंवा महापालिकाच्या हजारो कर्मचाऱ्यांमध्ये एकतरी असा कर्मचारी आहे की जो म्हणेल की १५५ कोटीची स्थानिक संस्था करांची वसुली आम्ही करु असे दाव्यानिशी सांगु शकेल, मी दाव्यानिशी सांगु शकतो की बिल्कुल ऐवढी वसुली होवु शकणार नाही. चार दिवसांपूर्वीच आपले विरोधी पक्ष नेता श्री. राजु जग्यासी व मी सर्व जकात नाक्यांची पाहणी केली होती, तसेच मध्यवर्ती जकात नाक्याची पहाणी केली होती. त्या वेळी आमच्या निर्दशनास आलेली स्थिती आपणांस सांगितली तर आपण म्हणाल की १५५ कोटीच्या ऐवजी फक्त ५५ कोटी ऐवढी तरतुद ठेवली पाहिजे. ज्याठिकाणी जकात ठेकेदाराचे ११ कर्मचारी कार्यरत होते, त्याठिकाणी महापालिकेचे फक्त २ कर्मचारी कार्यरत होते. त्यामधील एक कर्मचारी ५५ वर्षापेक्षा जास्त वयाचा तर एक १८ वर्षापेक्षाही कमी वयाचा, तेथे ठेवण्यात आलेली झेरॉक्स मशीन फक्त दाखविण्यासाठी होती, ती बंद होती, त्याबाबत मी तेथील कर्मचाऱ्यास विचारले की ही झेरॉक्स मशीन कधीपासून बंद आहे? त्यांनी सांगितले की, जेव्हा पासून आली आहे तेव्हापासुन बंद आहे, ऐवढेच नव्हे तर त्यांच्याकडे पेपर्स नव्हते, जेणे करुन ट्रकमध्ये, हातगाडीवर आलेल्या सामानाच्या बिलांची झेरॉक्स करुन ठेवता येईल. ते हाताने लिहीत होते, मी त्यांना विचारले सकाळ पासून किती गाडया आल्या, तर त्यांनी सांगितले सकाळ पासून १० गाडया आल्या, मी त्यास सांगितले की, मी तुझ्याबरोबर आता बोलत असतांना १० गाडया निघुन गेल्या त्याचे काय? त्यावर त्यानी सांगितले की, साहेब आमच्याकडे कर्मचारी नाहीत. कोण धावत जाईल त्या गांडयाच्या मागे? आमच्याकडे ना कर्मचारी आहेत, ना मोटर सायकल आहे, ना आमची इतकी शक्ती आहे की आम्ही त्यांच्या मागे धावत जावु शकु. आम्हास सांगण्यात आले की, जर कुणी स्वतःहुन येथे येत असेल तर त्याच्याकडुन बिल घ्या आणि त्यावर स्टॅम्प मारुन दया. अशा प्रकारच्या उदासीनतेमुळे १५५ कोटीची वसुली होवु शकणार नाही. आपण म्हटले आहे की मालमत्ता करातुन ७० कोटीची वसुली करु, याविषयीचे मागील अभिलेख काय आहेत? अर्ध्यापेक्षाही कमी वसुली झालेली आहे. ऐवढी रक्कम कशी वसुल होवु शकेल आणि अर्थसंकल्पात दर्शवलेली वसुली कशी होईल. २०१४—१५ चा अर्थसंकल्प सादर करताना हा २०९ कोटीचा आकडा ४१८ होईल, ४०० कोटीचे कर्ज महापालिकेवर व शहरवासियांना व त्याची भरपाई उल्हासनगरवासियाकडुन करत आहात. आम्ही विरोधी पक्ष सदस्य गळयामध्ये हे जे बॅनर अडकवुन आलो आहोत, गळयात बॅनर अडकविण्याची आम्हांला काही हौस नाही. आपली स्मरणशक्ती ताजी करण्यासाठी आम्ही हे करत आहोत. आमच्या उल्हासनगर शहराची ही स्थिती आहे, कदाचित आपण ती झाकुन ठेवली असेल परंतु आम्ही ती झाकुन ठेवणार नाहीत. शहराची स्थिती काय आहे ती

प्रत्येक नागरीक रोज पहात आहे, त्यांनतर वर्तमान पत्रामध्ये जेव्हा ही बातमी जाईल की पाण्याचे बिल १५० वरुन ३०० करण्यात आले आहे, घरपट्टीमध्ये ८ टक्क्यांची वाढ, हे तर असे झाले की आपण जखम दिलीत त्यावर आपण केवळ मिठ चोळत नसुन तेजाब टाकत आहात, तेजाब टाकत आहात. उल्हासनगरवासिंयाना आपण आणखी खडड्यात टाकत आहात. मध्यंतरी एक बैठक आयोजित करण्यात आली होती, तेथे सांगण्यात आले होते की, आपणावर पाणी बिलाची फार मोठी थकबाकी आहे. त्यामुळे आपणांस पाण्याचे दर वाढवावे लागतील, याचाच अर्थ उल्हासनगरवासी अगोदरच पाणी बिलाच्या कर्जात बुडला आहे. त्यास आपण आणखी आता खडड्यात, कचऱ्यात, रोगराईत आणि दुर्गंधीत ढकलत आहात. यास्तव सभागृहास माझे पुन्हा एकदा निवेदन आहे की, महानगरपालिका आयुक्तांनी जो वस्तुस्थिती दर्शक अर्थसंकल्प एका पुस्तकाच्या माध्यमातुन सादर केला आहे त्याप्रमाणे अर्थसंकल्प तयार केला जावा व उल्हासनगर शहरवासियांवर करांचे अधीक ओझे लादु नये. याचबरोबर माझ्या आणखी दोन सूचना आहेत, जसे की गलीच्छ वस्त्या आहेत, बॅरेक्स आहेत किंवा आर्थिक दुर्बल वसाहती आहेत त्याच्यासाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतुद केली पाहिजे, उल्हासनगर हे व्यापारी शहर आहे, त्यानुसार व्यापाऱ्यांना खास करुन जसे की, मोठमोठे मार्केट आहेत, जसे की गजानन मार्केट आहे, जपानी बाजार आहे, कॅम्प नंबर ४ मधील मार्केट आहे, कॅम्प नंबर ५ मधील मार्केट आहे, गाऊन बाजार आहे, जीन्स मार्केट आहे, त्यासाठी सुध्दा निधी ठेवला जावा. आणि त्याचा विशेष करुन या मार्केट मध्ये वापर करण्यात यावा. या मार्केट मधुन आपणांस लाखो करोडोचे उत्पन्न मिळते. येथील व्यापारी आपणांस कराच्या रुपयाने करोडो रुपये देतात, अगोदर जकातीच्या रुपाने देत होते आता स्थानिक संस्था कराच्या रुपाने देतील तर त्यांच्यासाठी काही निधीची तरतुद असली पाहिजे, त्याचबरोबर आमचे नगरसेवक श्री. नरेंद्र ठाकुर यांनी एका पत्रान्वये आपणाकडे मागणी केली आहे की या अर्थसंकल्पात ''सिन्धु सभा'', ''सिन्धु भवन'' साठी अनुदानाची तरतुद असली पाहिजे, २५ लाख रुपयाची तरतुद सिन्धु सभेसाठी या अर्थसंकल्पात एका स्वतंत्र लेखाशिर्षात करण्यात आली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—** आणखी कुणाला बोलायचे असेल तर त्याने बोलावे, यानंतर विरोधी पक्ष नेता बोलतील व त्यांच्यानंतर सभागृह नेता बोलतील.

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—** मा. महापौरजी, मा. आयुक्त, मा. स्थायी समिती सभापती, मा. सर्व नगरसेवक, अर्थसंकल्पामध्ये पाण्याची दरवाढ आहे, परंतु पाण्याच्या ज्या टाक्या आहेत त्या किती सुरक्षित आहेत? प्रत्येक पाण्याच्या टाकीच्या ठिकाणी फेन्सींग आहे का? तेथे सुरक्षा कर्मचारी नेमलेला आहे का? याची कोणी माहिती देवु शकेल मला? दुसरी गोष्ट अर्थसंकल्पामध्ये इमारती देखभाल दुरुस्तीसाठी तरतुद ठेवलेली आहे, पण प्रत्येक पाण्याच्या टाक्यांच्या ठिकाणी चेंबर्स नाहीत, त्याच्यावरती झाकणे नाहीत, आपण नेहमी पाण्याच्या टाक्या स्वच्छ करतो, पाणी स्वच्छ केले जाते, परंतु त्या पाण्याच्या प्रत्येक टाकीला सुरक्षा कर्मचारी पुरविला नाही, मग आपण पाण्याची दरवाढ करतो जनतेला पाणी पाहिजे, आता आपण सांगतो कोर्णाक कंपनीला जलवाहिनी टाकण्याचा ठेका दिला आहे, ३० वर्ष पुरेशा दाबाने पाणी देईल, आणि आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे पाण्याचे स्वत:चे स्त्रोत राहील, हे सर्व मान्य आहे, परंतु नेताजी चौक येथे जी पाण्याची टाकी आहे, ती १९६८ ला बाधंण्यात आलेली आहे, तीच पाण्याची टाकी आपण परत बाधंणार का? म्हणजेच नविन पाण्याची टाकी जर बाधांयची झाली तर त्यासाठी अर्थसंकल्पात किती रकमेची तरतुद केली आहे, याचा काही विचार केला आहे का? आपण पाण्याची दरवाढ करत आहोत, हे सर्व करण्यासांठीच, पण ते किती आणि कसे करणार? याची सविस्तर माहिती नाही. दुसरी गोष्ट आपण जी घरपट्टी वाढवतोय, वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले परंतु वसुलीच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत का? माझ्या मते सन २०१० पर्यंत न वसुल झालेली घरपट्टी आणि २०१० नंतर वसुल होणारी घरपट्टी वसुल करणारी पथक नेमण्यात यावी. २०१० पर्यंत जी घरपट्टी वसुल झालेली नाही, त्याच्यासाठी एक विशेष पथक नेमावे जेणेकरुन आपणाकडे अधिकाधिक घरपट्टी वसुल होईल, जेणेकरुन गरिब जनतेवर वाढीव कर लावत आहे तो कमी होईल. ऐवढे बोलुन माझे दोन शब्द पुर्ण करते.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** मा. स्थायी समिती सभापती, मी जे पत्र आपणांस दिले आहे, त्याबाबत लेखा अधिकाऱ्यांचा खुलासा मिळाला असता तर बरे झाले असते. त्यांना काय अडचण आहे, फक्त बिल काढण्या मध्ये रस आहे का? दुसरे काम नाही का त्यांना, कृपया लेखा अधिकाऱ्यांनी याचा खुलासा करावा.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—** मा. महापौर महोदय, एका गोष्टीकडे मी आपले लक्षवेधु इच्छितो की, सद्या महागाई आहे हे बरोबर आहे, महानगरपालिकेचे खर्च वाढत चालले आहेत हेही बरोबर आहे, परंतु शहरामध्ये सुधारणा करणे अति आवश्यक आहे. जी कामे अर्धवट आहेत ती पुर्ण करणे जरुरीचे आहे. ज्या सुविधा लोंकाना मिळाल्या पाहिजेत परंतु त्या मिळत नाही, त्यांबाबत सुध्दा विचार केला पाहिजे, अर्थसंकल्प मंजुर केल्याशिवाय कोणतेही काम होणार नाही याची सर्व नगरसेवकांना माहिती आहे. परंतु लोकांनी आम्हाला निवडुन येथे पाठविले आहे. त्यासाठी शहरातील कामे कशी होतील, ज्यामुळे जनतेमुळे आर्थिक ओझे वाढणार नाही, यावर विचार

विनिमय करण्यासाठी आपणांस व आम्हांस येथे पाठविले आहे. त्यानुसार फक्त तीन बाबी बाबत मी आपणांस विनंती करेन. की जशी पाणीपटट्री आहे, ती कदाचित आपण १५० वरुन ३०० रुपये केली आहे, ती वाजवीपेक्षा जास्त आहे. एवढी पाणीपटट्री लोक भरु शकणार नाहीत. दुसरे असे की, कदाचित आपण पाणी टॅकरचे पैसे सुध्दा घेणार आहात. पाणी टॅकरचे लोक का मागणी करतात? जेव्हा त्यांच्या घरात नळाव्दारे पाणी पोहचत नाही, तेव्हाच त्यांना पाण्याचे टॅकर मागवावे लागतात, पाण्याचा टॅकर मिळविण्यासाठी किती अडचणीना सामोरे जावे लागते. पाणी टॅकर पुरविण्यासाठी जो एक व्यक्ती तेथे बसविण्यात आलेला आहे, त्यास बसण्यास सुध्दा जागा नाही, तो दुर्गधीत बसलेला असतो. यासाठी आपण माहिती तर घ्या. तेथे कोणी अधिकारी जातो का? घरपटट्री बाबत मागील सभेत सुध्दा सांगितले की, घरपटट्री वाढविण्याची काहीही आवश्यकता नाही. घरपटट्री वसुलीचे आपण जे ७० कोटीचे लक्ष ठेवले आहे त्याबाबतीत ७० कोटी नाही ८५ कोटी रुपये मिळु शकतील, परंतु तेवढी वसुली करण्यासाठी आपणांस कर्मचाऱ्याची निवड करावी लागेल. चांगली वसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना बाजुला केले आहे. १६३ कोटी उत्पन्न वाढविणारा कर्मचारी ज्यास आपण निलंबित करुन ठेवले आहे. अशा कर्मचाऱ्यास आपण बक्षीस दिले पाहिजे. जर प्रशासनाकडे पैशाची कमतरता आहे तर मी स्वतः चा ५०० रुपयाचा निधी आपणाकडे जमा करतो, तसा ५०० रुपयाचा धनादेश मी सोबत आणलेलाच आहे. एकुण १६३ लाखाचे उत्पन्न मिळवुन देणाऱ्या अधिकाऱ्यास हा ५०० रुपयाचा धनादेश देवुन त्याला प्रोत्साहन दया. आणि त्या माणसामध्ये ७० कोटी नाही तर ८५ कोटी रुपयाचे उत्पन्न मिळवुन देण्याची क्षमता आहे. ती सुध्दा नियमानुसार आपणांस माहित असेलच दर वर्षी किती नविन इमारती बाधंल्या जातात. त्या एकक इमारती कडुन आपणांस घरपटट्रीपोटी तीन–तीन, पाच–पाच लाख रुपये मिळु शकेल, टिअरगर्डरची कितीतरी बांधकामे झाली आहेत, कितीतरी दुकाने बाधंली गेली आहेत, मला वाटते शेकडो बाधंकाम आहेत त्याच्यांकडुन नियमानुसार कर वसुली करु शकतो, परंतु कर विभागात असे अधिकारी नाहीत. जे या लोकांकडुन वसुली करुन उत्पन्न वाढवु शकतील. मला तर असे वाटते की, कर वाढविण्याचा आपण हा जो प्रस्ताव दिलेला आहे, व आपण या अगोदर लोकांकडुन जसजसा कर घेत आहोत, कर घेतल्यानंतर त्यांच्याकडुन त्यांना ज्या सुविधा दिल्या पाहिजेत, त्या आपण देवु शकलो आहोत का? नाही देवु शकलो, का नाही देवु शकलो? कारण की आपले जे प्रशासन आहे ते त्याकडे बरोबर लक्ष देत नाही, प्रशासन लक्ष देत नसल्यामुळे कचऱ्याचे खत्ते पुर्णपणे भरले आहेत, दुर्गधीमुळे लोक नाकाला रुमाल लावुन बाजुने जातात, बाहेर गावावरुन जे लोक येतात ते आम्हांस शरमवतात, ते म्हणतात की आपल्या उल्हासनगर मध्ये पाय ठेवताच दुर्गंधी येवु लागते, असे का? ही महानगरपालिका आहे, ग्रामपचांयत नाही, येथे आयुक्त पाठविण्यात आलेले आहेत, येथे प्रत्येक विभागामध्ये उपआयुक्त असतांना येथे अशी समस्या का आहे? आपण पहा पाणी पुरवठा विभागामध्ये वॉल खोलण्यासाठी कर्मचारी नाही, पाण्याची जी गळती होत आहे ती थाबंविण्यासाठी कर्मचारी नाही. याबाबत पाणी पुरवठा या विभागात गेले तर तेथील कर्मचारी सांगतात की, यासाठी आपणांकडे पुरेसा कर्मचारी नाही, यास्तव या कर्मचाऱ्यासांठी अर्थसंकल्पात काय तरतुद केली आहे. ३०५ सफाई कामगारांची भरती होत नाही, आमच्या मधील क्रित्येक नगरसेवक पुन्हापुन्हा निवडुन आले आहेत, ते का निवडुन येतात? लोकांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करण्यासाठी जेव्हा आवाज उठवितो तेव्हाच तर आम्ही पुन्हापुन्हा निवडून येतो, ३०५ सफाई कामगारांची भरती करण्यासाठी दहा वर्षापूर्वी न्यायालयाने आदेश दिला आहे. याबाबत प्रत्येक महासभेत आम्ही आवाज उठवत असतो, पंरतु प्रशासन याकडे लक्ष देत नाही. याच प्रकारे बांधकाम विभाग आहे, बाधंकाम विभागामध्ये कनिष्ठ अभिंयते नाहीत, पाणी पुरवठा विभागामध्ये कनिष्ठ अभियंते नाहीत, मजुर नाहीत, माळी नाहीत, वॉचमेन नाही, शांळामध्ये वॉचमन ठेवण्यात आले होते, २०१० मध्ये वॉचमन ठेवण्यात आले होते, त्यांना वेळेवर पगार न देता आल्यामुळे कामावरुन काढुन टाकण्यात आले, हे जे गोरगरिब लोक आहेत ज्यांना दरमहा तीन ते चार हजार पगार मिळत होता, त्यांना दिड ते दोन वर्ष पगार मिळाला नाही, ते लोक काम कसे करु शकतील, शांळामध्ये आता वॉचमन नसल्यामुळे चोऱ्या होत आहेत, शाळांमध्ये लावण्यात आलेले पाण्याचे नळ सुध्दा लोक चोरी करुन नेत आहेत, हे कसे चालेल, चालणार नाही म्हणुन कृपया ही सत्यता आहे, तिच्या खोलात जा आणि माहिती घ्या, शहरात फिरा, उल्हासनगर ५ मध्ये किती रस्ते खराब आहेत, त्यातील एक खडड्ा आपण भरु शकत नाही, काही दिवसांनी चालीया साहेंबाचा मेळा चालु होणार आहे, दोन तीन वर्षापासून आम्ही वारंवार ओरड करत आहोत की रस्त्यांवरील खडडे् भरा तर म्हणतात की, ते काम मंजुर आहे मंजुर आहे, आता आयुक्त साहेबांना एक पत्र लिहिले आहे, जी काम २००५–०६ मध्ये मंजुर झाली आहेत, श्री. रामनाथ सोनावणे हे आयुक्त असतांना मंजुर केली होती, ती कामे अद्याप झाली नाहीत. त्याबाबत माजी महापौर श्रीमती विद्यताई निर्मळे यांनी सुध्दा पत्र दिले आहे. श्री. रमेश चव्हाण साहेब जे आता स्थायी समितीचे सभापती आहेत त्यांनी सुध्दा शिफारस पत्र दिले होते की २००५ मध्ये जर या रस्त्यांचे काम मंजुर झालेले आहे तर मग ते का होत नाही? असे का होत आहे. अर्थसंकल्पीय तरतुद उपब्लध असतांनाही काम का होत नाही. लेखा विभागामध्ये आपले जे अधिकारी बसले आहेत त्यांच्याकडे दहा दहा वेळा प्राकलने तयार करुन पाठवु नका, ते म्हणतात आमच्या कडे पैसे नाहीत, पैसे नाहीत. तर मग पैसे गेले कुठे, २००० मध्ये हे काम मंजुर झाले होते ते का झाले नाही, तर अशा बऱ्याचशा गोष्टी आहेत, ज्यांना मान्यता मिळाली आहे ती कामे होत नाहीत, माळी नसताना उद्याने कशी विकसित केली जातील? आपण नवनविन उद्याने तयार करता त्यांच्यासाठी माळी नाहीत? त्यांच्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही? कसे चालेल, कृपया सर्व गोष्टीवर लक्ष देवुन

येथील जनतेवर करांचे अधिक ओझे न लादता, अर्थसंकल्प मंजुर करा, मी अगोदरच सांगितले आहे की महागाई खुप वाढली आहे, आपणास शहरात काही विकास कामेही करायची आहेत. त्यासाठी आपणांस काहीना काही मार्ग काढायचा आहे. त्यातुन असा रस्ता काढायचा आहे की ज्यामुळे जनतेला त्रासाचे होवु नये. धन्यवाद.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—** मा. महापौरजी, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब व सचिव साहेब, आता आमच्या आपल्या एका सन्मा. सदस्यानी सांगितले की, स्थानिक संस्था करातुन १५५ कोटी रुपयाचे वसुलीचे जे लक्ष ठेवण्यात आले आहे प्रत्यक्षात आपण ५५ कोटी रुपये सुध्दा वसुल करु शकणार नाहीत, कारण त्याकामी कार्यक्षम अधिकारी आपणांकडे नाहीत, त्यांना मी असे सांगु इच्छितो की, आमच्याकडे कार्यक्षम अधिकारी आहेत, ते १५५ कोटी काय २५० कोटीची वसुली करुन आणतील. परंतु आपण लोकांनी हस्तक्षेप करता कामा नये. प्रशासन जिद्दीवर आले तर २५० कोटीपेक्षा एक नया पैसा सुध्दा कमी वसुल करणार नाही. २५१ कोटीची वसुली येईल. त्यासाठी आपण मध्ये येता कामा नये व असे सांगता कामा नये की, असे करु नका तसे करु नका. महासभेमध्ये असा आवाज उठवता कामा नये यानी अमुक एका व्यापाऱ्याला तंग केले, तमुक व्यापाऱ्याला तंग केले, यासाठी आपण प्रशासनाला पूर्णपणे मोकळीक सोडा, प्रशासन १५५ कोटी नाही तर २५१ कोटी वसुली आणेल. आता काही सदस्यांनी मागणी केली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, सिन्धु भवन याच्यासाठी २५,५० लाखाची तरतुद केली जावी, या २५—५० लाखात काहीही होणार नाही. माझा तर असा प्रस्ताव आहे की, पाणी व साफसफाईसाठीची तरतुद सोडुन जेवढी काही अर्थसंकल्पीय तरतुद आहे ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, छत्रपती शिवाजी महाराज भवन, व झुलेलाल उदयान, गौल मैदान मध्ये तीन उद्याने उभारण्यात यावीत व पूर्ण निधी त्यामध्ये लावण्यात यावा. जसे आमच्या भगिनी श्रीमती मायावती यांनी उत्तर प्रदेश मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान तयार केले, त्याप्रमाणे १००, १२५ कोटी खर्च करुन चांगले उद्यान तयार करा. या २५,५० लाखामध्ये काय होणार आहे, २५,५० लाखामध्ये काहीही होणार नाही, सर्व सदस्य एक वर्षासाठी आपल्या प्रभागातील कामे विसरुन जा, गल्लीनाली, साफसफाईकडे लक्ष दया, सीसी पॅसेज, पेव्हर ब्लॉक या कामाची आवश्यकता नाही, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी स्व:ताहुन सांगितले आहे की, अधिक कामे झाली आहेत त्यामुळे कामांची आवश्यकता नाही. यासाठी एक वर्षापर्यंत गप्प बसुन रहावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, छत्रपती शिवाजी महाराज भवन, व झुलेलाल गार्डन, गोल मैदान येथील जी जागा प्रजापती ब्रम्हकुमारीला दिली आहे, त्याठिकाणी १००,१२५ करोड रुपये खर्च करुन एक चांगलीशी वास्तू उभी करावी ती पाहण्यासाठी संपुर्ण हिंदुस्थानातुन लोक येतील व म्हणतील की उल्हासनगर महापालिकेतील सर्व नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील कामे सोडुन शहरातील हे महत्वपूर्ण काम केले आहे. २५,५० लाखातून काहीही होणार नाही. यासाठी माझे असे म्हणणे आहे की, जेवढी काही अर्थसंकल्पीय तरतुद आहे त्यातील पाणी, रस्त्यावरील दिवाबत्ती व साफसफाई या कामावरील तरतुद सोडुन उर्वरित सर्व तरतुद या कामांसाठी व उद्यानासाठी लावण्यात यावी. आमच्याकडे एवढे सक्षम अधिकारी आहेत की, जे स्थानिक संस्था कराच्या वसुलीसाठी जातील तेव्हा सर्व लोक भयभीत होतील, त्यावेळेस आपणच पुढे याल व आयुक्त साहेंबाना सांगाल की यांना सोडा, त्याना सोडा ही गोष्ट आपण आता विसरुन जा, यावर्षी स्थानिक संस्था करापोटी २५१ कोटीची वसुली येईल हे आपण लक्षात ठेवा. हे सुरवातीचे दोन महिने गेल्यानंतरही २५१ कोटीची वसुली होईल, यासाठी माझे असे म्हणणे आहे की, आपली जेवढी अर्थसंकल्पीय तरतुद आहे त्यातील पाणी, साफसफाई व दिवाबत्ती यासाठीची तदतुद सोडुन सर्वच्या सर्व तरतुद डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, छत्रपती शिवाजी महाराज भवन, व झुलेलाल उदयान यासाठी लावण्यात यावी.

**सदस्य श्री. मनोज सयानीः—** आमचे सन्मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज, यांनी जो प्रश्न येथे उपस्थित केला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—** आपण एक वेळा बोलला आहात, एकच सदस्यांने पुन्हा पुन्हा बोलले जात नाही.

यावेळी सदस्या श्रीमती भागीबाई लबाना, श्रीमती शुभांगी बहेनवाल, श्रीमती इसरद खान हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. सुरेश जाधवः—** एक सदस्य किती वेळा उभा राहुन बोलत राहील. एकच सदस्य दोन—दोन, चार—चार वेळा बोलत राहील तर इतर सदस्यांना बोलायचे नाही काय?

**सदस्य श्री. मनोज सयानीः—** मा. महापौरजी, जर आपले अधिकारी उल्हासनगर शहरवासियांकडुन अवैधपणे वसुली करु लागले तर, मग भले ती वसुली स्थानिक संस्था कराची असो किंवा कोणत्याही कराची असो, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी त्याचा विरोध करेल. मग भले काहीही करावे लागले तरी चालेल. आपण कायद्यानुसार वसुली करा.

यावेळी सदस्या श्रीमती शैलजा सोनताटे यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** मा. महापौरजी, एकाच सदस्यांस आपण चार चार वेळा बोलण्याची संधी देत आहात. हा काय प्रकार आहे काय?

**सदस्य श्री. मनोज सयानी:—** आपले अधिकारी फक्त बिलावर शिक्का मारुन पैसे वसुल करतात. लोकांची पिळवणुक केली जात आहे, डब्बल डब्बल पैसे घेत आहेत, याबाबत आम्ही आवाज उठवु.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—** मा. महापौरजी, एकाच सदस्यांस आपण चार चार वेळा बोलण्याची संधी देत आहात. हा काय प्रकार आहे काय?

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—** श्री. प्रदीप रामचंदानीजी आपण बोला.

यावेळी सदस्या श्रीमती भागीबाई लबाना, श्रीमती इसरद खान, श्रीमती शुभांगी बेहनवाल यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**सदस्य श्री. रामचंद पारवानी :—** मा. महापौरजी, स्थायी समिती सभापतीजी, आयुक्त साहेब आज दुपारी मा. महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता इत्यादी आम्ही जेव्हा आयुक्त साहेबांच्या कार्यालयात गेलो त्यावेळी आयुक्त साहेबांनी आम्हाला सांगितले, मागील वेळेस जेव्हा स्थानिक संस्था कर लागु झाला होता, त्या १७ दिवस  जकात किंवा स्थानिक संस्था कराच्या रुपाने कोणत्याही प्रकारची वसुली होत नव्हती. त्यावेळेस साडे चार हजार नोटीसा वाटप करण्यात आलेल्या आहेत व कमीत कमी सहा ते सात कोटी रुपये वसुल होतील, याबदद्ल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो ज्यानी ऐवढे मोठे काम केले आहे. धन्यवाद.

**सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:—** मा. महापौरजी, स्थायी समितीचे सभापती श्री. रमेश चव्हाणजी, मा. आयुक्तजी, व सचिवजी मी आपणांस धन्यवाद देतो की, आपण खुपच चांगला अर्थसंकल्प सादर केला आहे. ज्यामध्ये सर्व पक्षांच्या नगरसेवकांना समान नगरसेवक निधी आपण वाटप केला आहे. ही स्वागतायोग्य गोष्ट आहे, व आयुक्त साहेबांनी म्हटले आहे की १५५ कोटी रुपयांची स्थानिक संस्था करांच्या माध्यमातुन वसुली करु त्यांच्या देहबोलीवरुन हे स्पष्ट होते की १५५ कोटीची वसुली ते नक्कीच करतील कदाचित त्यापैक्षाही जास्त वसुली करतील. त्यांच्या या आत्मविश्वसाबदद्ल आम्ही त्यांच्यावर विश्वास व्यक्त करतो. व माझे बंधु श्री. मनोज सयानी यानी म्हटले आहे की, यावर्षी आपण मालमत्ता करांची ७४ कोटी रुपयांची वसुली अपेक्षित धरली आहे. त्यानुसार मी सांगु इच्छितो की, मागील वर्षी ५३ कोटी होते, २०११ मध्ये ५५ कोटी वसुली झाली होती, यावेळच्या आयुक्तांच्या कार्यप्रणालीवर मला पूर्ण विश्वास आहे, व ७४ कोटी म्हणजे ७४ कोटीच वसुल होतील त्यामध्ये कोणताही संशय नाही, कदाचित जास्तही वसुली होवु शकते. यावेळीस आम्ही नविन कायदा हा प्रस्तुत केला आहे. जे लोक थकीत मालमत्ता कराची रक्कम लवकरात लवकर भरतील त्यांना मालमत्ता करांमध्ये १० टक्के सुट दिली जाईल त्यामधुन सुध्दा जास्त पैसे येतील त्यामुळे ७४ कोटीची वसुली करणे फार मोठी गोष्ट नाही. व तिसरी गोष्ट अशी की राज्यसरकारचे धोरण आहे की, महानगरपालिकेने कोणताही प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर चालविला पाहिजे. पाण्याची परिस्थिती आजच्या स्थितीला अशी आहे की, आम्ही ७ रुपये दराने पाणी खरेदी करतो व ४ रुपयाने विकतो. आम्हाला असे वाटत नाही की लोकांवर कोणत्याही प्रकारे बिलाचे ओझे वाढावे परंतु येथे शासनाचे धोरण आहे व जे पाणी आपण घेतो ते शासनाकडुन घेतो, एमआयडीसीकडुन घेतो, महाग दराने पाणी खरेदी करुन स्वस्त दराने विकत असल्याने गेल्या १५ वर्षापासुन महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अशी झाली आहे की, २०९ कोटीची बिले येथे प्रलंबित आहेत. त्या दृष्टीकोनातुन पाणी बिल वाढविण्याचे जे पाऊल उचलले आहे ते प्रगतिशिल होईल. स्थायी समिती सभापती श्री. रमेश चव्हाण हे पहिलाच अर्थसंकल्प सादर करत आहेत व महापौर म्हणुन पाहिल्यादांच आपले उपमहापौर श्री. जमनादास पुरस्वानी बसले आहे त्यांचे मी अभिनंदन करतो व या अर्थसंकल्पाचे जोरदार समर्थन करतो. धन्यवाद.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—** मा. महापौरजी, मला बोलायचे आहे.

**उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—** श्री. सुभाष मनसुलकरजी आपण बोला.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—</u>** भारताच्या स्वातंत्र्य लढयासाठी प्राणाची आहुती दिलेले मा. शहीद दुनिचंद कालानी यांचा पुतळा व्हिनस चौकामध्ये आहे, दुनिचंद कालानी चौक म्हणुन त्याला ओळखले जाते. त्या चौकापासून लालचक्की चौकापर्यंत रस्त्यांची स्थिती अतिशय दयनिय अशी झाली आहे.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>** दुनिचंद कालानी चौक नाही, शहीद हेमु कालानी चौक आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—</u>** क्षमा करा, शहीद हेमु कालानी चौक आहे त्या चौकापासून लालचक्की चौकांपर्यत हा रस्ता अत्यंत खराब स्थितीत आहे, तेथे मच्छी मार्केट आहे, रस्त्यांवर मोठमोठे खडडे झाले आहेत, तेथे दवाखाना आहे, चंद्रकांत क्लिनिक आहे, लहान मुलांचा दवाखाना आहे, रस्त्यांवरुन घाण पाणी वाहुन जात असल्याने मुलांना त्रास होतो. मोठ मोठे खडडे असल्याने गाडया पल्टी होण्याचा धोका आहे. रस्त्यांने चालण्याऱ्या पादचाऱ्यांनाही त्रास होतो. तर स्थायी समिती सभापती व मा. महापौरांच्या मला असे निर्देशनास आणायचे आहे की, त्यांना अशी विनंती करायची आहे की, हेमु कालानी चौकापासून ते लालचक्की चौकापर्यंतच्या रस्त्याला प्रथम प्राधान्य दयावे, आरोग्याच्या दृष्टीने तो रस्ता सध्या धोकादायक आहे, येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना, वाहनांना त्रास होत आहे, तरी माझी ऐवढी विनंती आहे की हा रस्ता अग्रक्रमाने घेण्यात यावा.

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती मंदा सोनकांबळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>** मा. महापौरजी, उद्यान विकास निधीमध्ये सपना गार्डन, दशहरा मैदान, गोल मैदान, रोटरी गार्डन, नेताजी गार्डन आणि महानगरपालिका मुख्यालयासभोवतालचे गार्डन दर्शविले आहे त्यात नाना नानी गार्डन, या गार्डनचाही समावेश कराव असे माझे मत आहे कारण हे शहरातील एक मोठे गार्डन आहे त्याचा सुध्दा यामध्ये समावेश झाला पाहिजे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोंनेजी:—</u>** मा. आयुक्त साहेब, क्षमा करा, मी एक मुददा विसरले होते, कॅम्प नंबर ५ येथे कुठेही गणेश विर्सजन घाट अस्तित्वात नाही, त्यासाठी काही निधीची तरतुद करुन लवकरात लवकर गणेश घाटची निर्मिती चालु करावी. अबंरनाथची जी नदी आहे, तिच्यामध्ये केमिकलचे पाणी मिसळले जात असल्याने ते पाणी दुर्गंधीयुक्त होते, आणि तेथे गणेश मुर्तीचे विर्सजन करताना खुपच घाण वाटते यासाठी गणेशघाटाची व्यवस्था केली जावी.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>**मा. महापौरजी, बोलण्यासाठी बऱ्याच वेळेपासून प्रतिक्षा करत होतो. मा. महापौरांना मी धन्यवाद देवु इच्छितो, दोन तीन वेळा त्यांनी माझे नाव पुकारले की श्री. राजु जग्यासीजी बोला आपण बोला. मा. महापौरजी आपणांस माझी विनंती आहे, मा. आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापतीजी फारच कमी शब्दात बोलेन जसे मी आश्वासन दिले आहे. परंतु कृपया जेवढे बोलेन ते कृपया शांतपणे लक्षपुर्वक ऐकुन घ्यावे. सभागृहात बसलेल्या बऱ्याचशा सदस्यांनी नव्याने आलेल्या आपल्या आयुक्तांचे आभार प्रदर्शन केले आहे. असे आयुक्त ज्यानी आल्याबरोबरच आमच्या महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार केला व ना केवळ विचार केला त्यांची जी भावना होती ती आम्हां सदस्यां समक्ष ठेवली. त्यांची ही भुमिका कौतुकास्पद आहे, त्यांचे पुढील विचार काय आहेत हे यावरुन दिसुन येते, जो व्यक्ती आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती काय आहे याचा विचार करतो यावरुन मला असे वाटते की त्या संस्थेचे भविष्य उज्जवल आहे असे मला वाटते. याच बरोबर थोडे आणखी पुढे जाऊन आयुक्त साहेबांना मी निवेदन करतो की, आम्ही आपणाकडुन ही सुध्दा अपेक्षा करतो की, मागील क्रित्येक वर्षामध्ये, कुण्या आयुक्तांचे मी नाव घेवु इच्छित नाही, त्याच्या काळामध्ये या महानगरपालिकेमध्ये अनावश्यक खर्च झाले, जरुरत नसतानाही खर्च झाले, त्यांची कारणे काहीही असु शकतील, कधी नगरसेवकांचा दबाव, कधी आयुक्त, कधी उपआयुक्तांचा, कधी आणखी कुणाचा दबाव असेल काहीनां काही कारण असेल, त्यामुळे अशा प्रकारची कामे केली होती, परंतु आम्ही आपणाकडुन अशी अपेक्षा करतो, अर्थसंकल्प आपण मंजुर कराल, परंतु येणाऱ्या या वर्षामध्ये असा अनावश्यक खर्च करु नये भलेही तो अर्थसंकल्पामध्ये मंजुर झालेला खर्च असला तरीही आपण त्यास मंजुरी देवु नये. अर्थसंकल्प काय असतो तो आपणांस माहित आहे. थोडक्यात सांगु इच्छितो, अर्थसंकल्प हा असा शब्द आहे, समजा एखादा व्यक्ती जो आपले घर चालवितो, त्याचा महिनाभराचा पगार किंवा त्यांची जी कमाई असते त्या आधारावर आपल्या घराचा अर्थसंकल्प तयार करतो. माझ्याकडे या महिन्यामध्ये एवढी कमाई येणार आहे, त्या आधारावर एवढा एवढा खर्च करायचा आहे, त्यामध्ये मुलांच्या शिक्षणावरील खर्च, दुध बिलाचा खर्च, कामवाल्याचे किती पैसे दयायचे आहे ते व घर दुरुस्तीवर किती खर्च करायचा आहे याचा विचार करणारा अर्थसंकल्प असतो. त्या आधारावर तो माणुस आपला खर्च निश्चित करत असतो. गरीबांतला गरीब माणुस सुध्दा या प्रकारे आपल्या खर्चाची आखणी करत असतो, गरीब हा शब्द

या अर्थान बोलत आहे की, खुपच कमी शिकलेला आहे, तो व्यक्ती सुध्दा विचार करतो की माझ्या महिन्याचा ऐवढा पगार आहे, त्यामुळे मला माझ्या खर्चावर नियंत्रण ठेवायचे आहे, त्या पगावरच माझा घरखर्च चालवायचा आहे. अर्थसंकल्प त्यास म्हणतात.

आपण सर्वजण निवडुन आलो आहोत. आपण जनप्रतिनिधी आहोत, आपण या महापालिकेचे ट्रस्टी आहोत, आपल्या प्रभागातील लोकांनी आपल्यावंर विश्वास ठेवुन आपणांस येथे निवडुन पाठविले आहे, की आपण तेथे जा आणि या शहराचा कारभार कोणत्या प्रकारे चालला आहे त्यावर आपण देखरेख करा, व सन्मा. महापौरजी आज आपण महापौरांच्या आसनावर बसला आहात, कुणीही महापौर असो माझे असे म्हणणे आहे की आपण या ट्रस्टचे सभापती आहात, आपले कर्तव्य ठरते की, आपण जे काही काम करतो त्याबाबत आपले मन आपणांस साक्ष देते का? की मी जे काही करत आहे ते बरोबर आहे की चुकीचे आहे? जेव्हा मी आपणांस विचारेन की आपला अर्थसंकल्प बरोबर आहे? तेव्हा आपले उत्तर असेल ‘होय’ व माझे उत्तर ‘नाही’ असे असेल, स्वाभाविकच आहे, आपण सत्तापक्षात आहात आपण होय म्हणाल मी विरोधी पक्षात, मी नाही म्हणेल, परंतु मा. महापौरजी मी आपणांस म्हणेन की आपण आम्हां दोघांच्या बोलण्यामध्ये जावु नका. आज अर्थसकंल्पाचा दिवस आहे शहराबाबत चर्चा करायची आहे. आपणांस शहराच्या जनतेची आवाज ऐकायची आहे. व दाव्यानिशी सांगतो की, आपण आपल्या अंर्तआत्म्यास विचारले तर आजच्या परिस्थित आपण सर्वजण कर्तव्याचे पालन करण्यामध्ये पात्र ठरलो आहोत? त्यावेळेस जनतेचा आवाज असेल एकवेळा नाहीतर दहावेळा तो आवाज असेल नाही, नाही, नाही.... आपण माझ्या बोलण्यावर जावु नका, जनतेचा आवाज, ना का असेल त्यावर आपण विचार केला पाहिजे. महापौरजी मी थोडक्यातच बोलेल मी जास्त बोलणार नाही, आपल्या चेहऱ्याकडे पाहिले असता असे वाटते आपण त्रस्त झाला आहात, मी थोडेच बोलेन पण वस्तुस्थिती सांगु इच्छितो, काही गोष्टी आपल्या आयुक्तांसमोर मांडु इच्छितो, होवु शकते की इथल्या अधिकाऱ्यांनी अशा काही गोष्टी त्यांच्या निर्देशनास आणुन दिल्या नसतील, त्यामध्ये त्याचा काहीतरी रसही असु शकतो, परंतु आपले कर्तव्य ठरते की, त्या गोष्टी आपण त्यांच्या निर्देशनास आणुन दयाव्यात.

सुरुवात करतो सार्वजनिक बांधकाम विभागापासुन, आज सकाळी मी जेव्हा बसलो होतो, सार्वजनिक बाधंकाम विभागाबाबत विचार केला, तर मा. आयुक्त साहेब, जेव्हा आम्ही पाकिस्तानातुन येथे आलो होतो, तेव्हा आवारा नावाचा एक सिनेमा आला होता, सिंन्धी सिनेमा होता, त्यामध्ये एक गाणे होते, ‘‘खजु खुबा वाटते बत्ती ना लॅम्प रस्ते पे’’, याबाबत हिंदीत मी सांगु इच्छितो, संपुर्ण रस्त्यांवर खडड्च खडड् व कुठेच लाईट नाही. कदाचित याबाबत मी आमच्या श्री. मुकेश आयलानी साहेबाना धन्यवाद देईन, लाईट तर आपल्या शहरामध्ये आहे, जे आहे ते आहे, ते मान्य करु, जो अधिकारी काम करतो त्याची आम्ही प्रशंसा करु, त्यास धन्यवादही देवु, सार्वजनिक बाधंकाम विभाग, मा. महापौरांनी अगोदरच सांगितले आहे की, मी जे जे प्रश्न विचारत आहे. त्याच्यांशी संबंधीत विभागाचा अधिकारी ते प्रश्न नोंदवुन घेईल व त्याचे उत्तर देईल. आपल्या सार्वजनिक बाधंकाम विभागाचे अधिकारी येथे बसले असतील, चार पाच महिने मागील कालावधीत जावु जेव्हा आपले हे सन्मा. आयुक्त नव्हते, आपल्या शहराचे मा. आमदार श्री. कुमार आयलानीजी स्व:त उपोषणास बसले होते ते म्हणत होते की आपल्या शहरातील रस्ते तयार झाले पाहिजेत, आयुक्त साहेब आपणांस हे आश्चर्य वाटेल, उपोषणास बसल्यानंतर ठेकेदारास कार्यादेश मिळाला परंतु अद्यापपर्यंत ते रस्ते तयार झाले नाहीत. काय झाले? कार्यादेश मिळाले..... उपोषणाचा उददे्श होता परंतु कार्यादेश मिळाले रस्ते अद्याप तयार झाले नाहीत..... मी ते बोलु इच्छित नाही, आपण संपुर्ण शहर फिरा, आपण काय आम्ही जेव्हा फिरतो, दोन तीन दिवसांपूर्वी मी आमचे बंधु श्री. जमनु पुरस्वानी व श्री. बोडारे साहेब एकत्र बसलो होतो मी त्यांच्याशी चर्चा केली, व स्पष्टपणे मी सांगितले की एक वेळ आपण राजकारण बाजुला सारुन बोलु या. मी कुण्या पक्षाचा आहे, आपण कुण्या पक्षाचे आहात ते दोन मिनिटासाठी बाजुला सारुया, आपण या शहराचे निवडून आलेलो जनप्रतिनिधी आहोत त्या हिशोबाने आपण बोलु या, काय आपण याची साक्ष देवु शकतो काय? की आपण या शहराचे नेते म्हणविण्या लायक आहोत? त्याचे उत्तर असेल नाही, नाही, नाही..... या अगोदर आपण आपल्या भाषणात म्हणत असायचो की, रस्त्यामध्ये ऐवढे खडड् आहेत की, जर एखादी गरोदर महिला रिक्षाने जात असेल तर तिची प्रसुती रिक्षामध्ये होईल असे म्हणत होतो परंतु आपण हे सिध्द करुन दाखविले आहे, आयुक्त साहेब १५ दिवसापूर्वी एक गरोदर महिला रिक्षाने जात होती, तिची रिक्षामध्ये प्रसुति झाली, हा आपला काम करण्याचा प्रकार, आपण विचार करा ज्या ज्या गोष्टी बोलत आहे, सार्वजनिक बाधंकाम विभागाची कामे घ्यायची झाली तर, जसे आमचे बंधु श्री. राजेश वधारिया यांनी सांगितले, अतिशय महत्वाचा मुदद्ा आहे. श्री. शिर्के साहेब असतील तर त्यांनी हा मुदद्ा नोंदवुन घ्यावा. प्रत्येक प्राकलन दहा टक्के जास्त दराने? याचा अर्थ काय? आमच्याकडे असे अभियंते नाहीत काय? की जितकी काम आहेत तितक्या रकमेचे प्राकलन तयार करु शकतील. प्राकलनात १० टक्के वाढ होण्याचे कारण काय? कधी विचार केला आहे आपण? १ लाखाचे प्राकलन असेल तर त्याचे बिल तयार होते १ लाख १० हजार रुपयाचे, आपण एकतरी प्राकलन असे दाखवाल की ज्यामध्ये १० टक्के वाढ झालेली नाही तर आपण जो काही दंड भरण्यास सांगाल तो मी भरण्यास तयार आहे. सर्वच्या सर्व प्राकलने १० टक्के जास्त, हे काय दर्शविते. हेतु काय आहे? आपले अधिकारी काय करतात? ब—याचशा गोष्टी अशा आहेत, त्या आम्ही माईकवर उघडपणे बोलु शकत नाही. व ना बोलु इच्छित आहे. कुण्या व्यक्ती विशेषावर आरोप करणे हा माझा

स्वभाव नाही. परंतु आज महापालिकेची जी परिस्थिती आहे, त्याची कारणे काय आहेत, ती सांगणे अतिशय जरुरीचे आहे. आपणांस पाण्याचे दर, टॅक्सचे दर वाढविण्याची आवश्यकता का पडली? कारण की आपले खर्च वाढत चालले आहेत. खर्च वाढण्याचे कारण काय आहे? आपणांस त्यावर विचार केला पाहिजे. सर्वच्या सर्व निविदा प्राकलनीय रक्कमेपेक्षा जास्त दराच्या, काय कारण आहे? आपले जे कनिष्ठ अभियंते आहेत, त्यांना बोलावुन आपण जरा विचारा काय आपल्या भांडार विभागाने आजपर्यंत एखादी टेप खरेदी केली आहे काय? भांडार विभागाचा कोणी अधिकारी येथे बसला असेल तर त्याने उत्तर दयावे. कारण की टेप मोजमाप घेण्यासाठी कामी येते. भांडार विभागाने टेप खरेदी केली आहे काय? लेखा विभागाकडे तसे बिल आले आहे का की आम्ही १०० रुपयाची टेप खरेदी केली आहे. कारण की आम्हांला मोजमाप करुन बिल बनवायची होती. आपल्याला उत्तर मिळेल नाही, असे मी आधीच सांगत आहे. आणि जे काही बोलत आहे ते मी दाव्याने बोलत आहे. आपण जर सिध्द केले तर जी काही शिक्षा कराल ती मी भोगण्यास तयार आहे. आयुक्त महोदयांनी जी यादी दिली आहे, ज्या ज्या ठेकेदारांची बिले बाकी आहेत, ठेकेदार कामे करतात त्यांना वेळेवर बिले दिली पाहिजेत. नाहीतर कामे पुढे कशी होतील? याच्यात काही चुकीचे नाही. परंतु आयुक्त साहेब, माझी आपणांस वैयक्तीकपणे विनंती आहे की, ज्याप्रकारे आपण कार्यभार हाती घेतला आहे त्या यादीतील २५–५० ठिकाणी आपण भेट दया, मला याबाबत काही बोलण्याची आवश्यकताच पडणार नाही. सत्यता आपल्या समोरच येईल. आपण जा. मी असे नाही म्हणणार की माझ्या साईटवर जा किंवा त्यांच्या साईटवर जा. आपल्या मनात ज्या काही इच्छा असतील, आपण ५० साईटला भेट दया. आपल्या लक्षात येईलच की येथे काय कारभार चालला आहे. ही कुणाची जबाबदारी आहे? मा. महापौरजी, येथे कर वाढविण्याचे, बिल वाढविण्याचे, जकात वाढविण्याचे जे बोलले जात आहे ना, तो पैसा आपला याच गोष्टीवर जात आहे. आपले असे काम आहे की, आपला खर्च व्यर्थ, मी असे म्हणेण की, खर्च न करता सुध्दा बिले तयार केली जातात. त्यास थांबविणे आपली जबाबदारी आहे.

आरोग्य विभागाचा अर्थसंकल्प मी आपणांस सांगु इच्छितो, मागील वर्षी जंतुनाशक खरेदीची जी तरतुद होती, १ कोटी २० लाख रुपये, व यावर्षीची आरोग्य विभागासाठीची एकुण अर्थसंकल्पीय तरतुद आहे १० कोटीची त्यातील फक्त जंतुनाशक औषधे खरेदीबाबत मी बोलत आहे. जंतुनाशकांसाठी जंतुनाशक औषधे खरेदीसाठी तरतुद आहे १ कोटी ३६ लाख रुपये. ही रक्कम आपण ७८ प्रभागांमध्ये वितरीत करा. कमीत कमी सव्वा ते दिड लाख रुपये प्रत्येक प्रभागासाठी जंतुनाशक औषधे खरेदी करण्यासाठी तरतुद प्राप्त होते. येथे सर्व नगरसेवक उपस्थित आहेत, जुने नगरसेवकही उपस्थित आहेत. त्यांना मी विचारु इच्छितो की काय आपल्या प्रभागामध्ये वर्षभरासाठी दिड लाखाची जंतुनाशके खरेदी होतात? या विषयी कुणाचेही उत्तर असेल ना, ना, ना.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>** हरकतीचा मुद्दयान्वये बोलु इच्छितो, महिन्यातुन एकदाही जंतुनाशक औषधांची फवारणी केली जात नाही.

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती मंदा कांबळे, श्रीमती लिलाबाई आशान यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**मी एक एक आकडे सांगतो कृपया आपण ते लिहुन घ्या. राजकारणाव्यतिरिक्त मी बोलत आहे. आपल्या शहरातील परिस्थिती आपल्या समोर ठेवत आहे. दिड लाख रुपये प्रत्येक वर्षी जंतुनाशक औषधासाठी आपणांस मिळतात. याबाबतीत कुणीही उठुन सांगावे की होय मला दिड लाखाची जंतुनाशके मिळतात. आपण अंदाज लावु शकता. शहरातील कच–याबाबत काय आहे? त्याबाबतीत तर बोलण्याची आवश्यकताच नाही. आमच्या एका भगिनीनीने लक्षवेधी दिलेली आहे की त्यांच्या प्रभाागामध्ये कचरा आहे, डेंग्युची रोगराई आहे. आजच्या सभेतच त्यांची लक्षवेधी आहे. मॅकेनिकल स्विपींगची गाडी, आयुक्त साहेब याबाबीकडे आपण जरा लक्ष दया. कदाचित याबाबीकडे आपले लक्ष गेले नसेल. मॅकेनिकल स्विपींगची गाडी दररोज २५ किलोमिटर चालते. ३४,३७५/–चे रोजचे त्यांचे बिल तयार होते. गाडी तर आपल्या शहरातच चालत असेल ना? येथे शहरातील सर्व नगरसेवक बसले आहेत ना? आपण असे सांगु शकता की रोजच्या रोज २५ ते ३० किलोमिटर मॅकेनिकल स्विपींगची गाडी चालते, सर्व नगरसेवक बसलेले आहेत मी सर्वांना विनंती करतो, मा. महापौरजी, आपण मला याकामी परवानगी दयावी. जी मॅकेनिकल स्विपींगची गाडी रोज २५ ते ३० किलोमिटर चालते आणि तीचे दररोज ३४ हजाराचे बिल आपण देतो. अहो गाडी कोठे चालते? बिल कोठे जाते?

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>**दिड महिन्यापासुन उल्हासनगर –५ मध्ये गाडी येत नाही?

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**हा प्रश्न आपण स्वत:लाच विचारु या. हा प्रश्न आपल्या जनतेचा पैसा आहे. पाण्याचे बिल आणि कर वाढवु इच्छिता हा तो पैसा आहे. कचरा उचलण्यासाठी १ कोटी ५० लाख रुपये आपण दररोज देतो. काही दिवसापुर्वी झालेल्या बैठकीमध्ये मा. महापौरांनी मान्य केले होते की आपल्या शहरामध्ये बराचसा कचरा पडलेला आहे तो उचलला गेला पाहिजे. कच–याची समस्या आहे हे ठिक आहे. कचरा आहे ते आपण मान्य केले आणि तो हटविण्याचे आपण प्रयत्नही करत आहात. परंतु मा. महापौरजी प्रशासन याकामी अपयशी आहे. जी सत्यता आहे ती मान्य करा. जो जो विभाग आपण घेवु तो विभाग आपल्या कामामध्ये अपयशी आहे असे आपल्याला दिसुन येईल. आता आमच्या भगिनीने सांगितले की, सफाई कामगारांना झाडु नाहीत. अश्या छोटया छोटया गोष्टी तर ब–याच आहेत.

कर विभाग, आता आमचे बंधु स्थायी समिती सभापती श्री. रमेश चव्हाण यांनी अर्थसंकल्प सादर केला, व अतिशय चांगला अर्थसंकल्प आहे असे त्यांनी सांगितले आम्ही ज्याप्रमाणे मिळकत करामध्ये सुट दिली आहे, त्यामुळे वसुली वाढेल. मा. आयुक्त साहेब, कर विभागाचा कोणी संबंधीत अधिकारी असेल तर त्याने लक्ष दयावे. मी आपणांस सांगु इच्छितो की, आपण मिळकत करामध्ये जी ५ टक्याची सुट दिली आहे, ती सुट कधी पर्यंत आहे? याची आपणांस माहिती देवु इच्छितो कदाचित आपणांसही माहित असेलच, ३० जुन पर्यंत जर कुणी बिल भरत असेल तर त्यास सुट मिळेल. श्री. प्रदिप रामचंदानीजी आपणच हा मुद्दा उपस्थित केला होता. जे ३० जुनपर्यंत मालमत्ता कर भरतील त्यांनाच पाच टक्के सुट मिळेल. बरोबर आहे? आपण मान्य करता? आता मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो की, ३० जुनपर्यंत आपली बिले वितरीत झाली आहेत का? अहो, जी बिले अदयाप वितरीत झाली नाहीत त्या मालमत्ता कराबाबत आपण सुट देत आहात? काय आहे हे? फक्त लोकांना मुर्ख बनवायचे आहे? आपण म्हणता की आम्ही पाच टक्के सुट देत आहोत. कुणी सांगावे मला अदयापपर्यंत आपली १०० टक्के बिले वितरीत झाली आहेत काय? मा. महापौरजी, मी आपणांस विनंती करतो की, असे जर मुद्दे उपस्थित केले तर खुपच मुद्दे होतील. बरेचसे मुद्दे आपल्या बंधु–भंगिनींनी उचलले आहेत. एक मुद्दा मी आवश्यक समजतो की, जकातीचे दर वाढविणे. काही दिवसांपुर्वी व्यापारी बंधुबरोबर आमची सभा झाली होती. सर्व पक्षांचे नगरसेवक तेथे बसले होते. सर्व पक्षांच्या नगरसेकांनी सर्वानुमते ठरविले की, व्यापा–यांच्या हिताची गोष्ट असेल तर आम्ही सर्वसंमतीने प्रस्ताव पारीत करु की, ना आम्हांला स्थानिक कर हवा, ना जकात कर. सर्वांनी याबाबत सहमती सुध्दा दिली होती. मी आपणांस आठवण करु देवु इच्छितो की, तेथे आपण सर्वसंमती दर्शविली होती. व येथे आपण जकातीचे दर वाढविता? बाहेर एक आणि आतमध्ये दुसरीच गोष्ट? हे काय आहे? जर मी चुकीचे बोलत असेल तर मला बोला. आपण लोकांनी सहमती दर्शविलेली होती. आपण आपली भुमिका स्पष्ट ठेवा ना? नाहीतर मोकळया मनाने सांगा की, नाही, जकात नसेल तर आपला कारभार चालु शकणार नाही. तेथे आपण सांगता की आम्ही स्थानिक करही लागु करणार नाही, जकातही लागु करणार नाही याप्रकारचा प्रस्ताव पारीत करु. व येथे आपण १० बाबींवर जकात कराचा दर वाढवित आहात. समजा जर पुन्हा आपल्या उल्हासनगरमध्ये जकात कर लागु झाला तर व्यापा–यांवर त्याचे ओझे वाढेल. अखेर आपली इच्छा काय आहे? श्री. जमनुजी आपण स्वत:लाच धोका देत आहोत. मी आपणांस विनंती करेल की, आपण ही जी दरवाढ केलेली आहे, ती आपण मागे घ्या. बरेचसे असे काही मुद्दे आहेत, त्याबाबतीत सविस्तर बोललो तर कदाचित आपण त्रस्त व्हाल. जसे आमचे श्री. बोडारे साहेब म्हणतात की, श्री. राजुभाई हे तर आपण बोललात, परंतु आपली सूचना काय आहे? महानगरपालिकेच्या कमतरता आपल्या डोळयासमोर आहेत. होवु शकते त्यामध्ये काही कमी जास्तही होवु शकतात. परंतु ज्या कमतरता आपणांस सांगितल्या, ज्या आयुक्त साहेबांनी लिहुन घेतल्या त्या मी आपणांस दाखवित आहे. आता थोडक्यात मी आपणांस काही उपाय सांगु इच्छितो, जर आपण करांचे दर वाढविले नाही तर याबाबतीत आपले उपाय काय असतील?

**वसुली वाढविणे,** जसे आमचे बंधु श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, आम्ही मानतो की, आमचे आयुक्त साहेब खुपच सक्षम आहेत. आम्हीही मानतो. जर त्यांनी ७६ चे ८० कोटी वसुली केली तर, परंतु मी त्यांना सांगु इच्छितो की, श्री. प्रदिपजी, मागील वेळे पासुन जी वसुली चालत येते ना, ३५ ते ४० कोटी हे लोक तेवढीच करतात व यावेळेसही आपल्या आयुक्तांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे ना त्यात त्यांनी ३० ते ४० कोटी वसुली करु असे दर्शविले आहे. आपण लोक केवळ त्यांना अर्थसंकल्प तयार करुन देतो. कार्यवाही करणारे ते लोक आहेत. ते लोक म्हणतात आम्ही ४० कोटी वसुली करु आपण म्हणतो नाही, नाही तुम्ही ८० कोटी वसुली करा. असे नाही होत श्री. प्रदिपजी......

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>**माझे म्हणणे असे होते की, आपण जी १० टक्याची सुट दिली आहे, त्यामुळे जी वसुली होईल, ती सर्व मिळुन ८० कोटी होईल.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. राजेश वानखेडे, श्री. सुनिल सुर्वे हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>**मी आपणांस सांगु इच्छितो, कार्यवाही करणारे ते लोक आहेत. आपण लोक कर वसुलीस जात नाहीत. अधिकारी लोक म्हणतात की आम्ही ४० कोटीची वसुली करु. आपण अर्थसंकल्पात लिहितो की, ८० कोटीची वसुली करु. त्या हिशोबाने खर्च करा. हे काय झाले? आपल्या समोर जे लोक बसले आहेत, आपण त्यांना खोटे ठरविता? व आपण म्हणता की आयुक्त साहेब सक्षम आहेत. सक्षम आहेत तर त्यांचे म्हणणे माना. करु नका दरवाढ, काय करु शकता आपण, त्याबाबतीत बाकी उपाय दया. याव्यतिरिक्त आणखी मी एक सांगु इच्छितो, कर वसुली बाबत मी जे आता सांगितले, आपणांस अशी एक प्रणाली विकसित करावयास पाहिजे. आपल्या शहरामध्ये ॲसेसमेंट न झालेल्या ज्या मिळकती आहेत, ॲसेसमेंट झालेल्या मिळकतींची संख्या १ लाख ६० हजार इतकी आहे.व माझी अशी समज आहे की आपल्या शहरामध्ये ॲसेसमेंट न झालेल्या ब—याचशा मिळकती असतील वसुली वाढविण्यासाठी कधी कधी एखादया संस्थेला नाागरीकांना आपल्याकडे खेचण्यासाठी त्यांना लालच दयावी लागते. जर आपण एखादा प्रस्ताव पारीत केला की, अमुक तारखेपासुन अमुक तारखेपर्यंत जर कुणाच्या मिळकतीची ॲसेसमेंट होत असेल तर त्यांना अशाप्रकारचा फायदा दिला जाईल. त्यांना कर कमी लावला जाईल. अशा वेळी लोक धावत आपणाकडे येतील, व ते लोक नेहमीसाठी आपले ग्राहक बनतील. हे जे प्रस्ताव आहेत ते जरा लिहुन घ्या. हे प्रस्ताव विचार करण्यासारखे आहेत. असा प्रस्ताव आपण आणु शकतो. साहेब, ब—याचशा गोष्टी आहेत, आपल्या शहरामध्ये ब—याचशा मिळकती आहेत, ज्या भाडयाने दिलेल्या आहेत, व त्या हिशोबाने त्यांचा आपणाकडे टॅक्स येत नाही. जास्त खोलात गेले तर ब—याचशा गोष्टी सांगाव्या लागतील. परंतु मी जे बोलु इच्छितो ते कर विभागाचे अधिका—यांना समजले आहे. मी अधिक उघड बोलु इच्छित नाही. कारण त्या लोकांना समजले आहे. काय चालते ते त्यांना माहित आहे.

**नळ जोडणी,** नळ जोडण्या किती आहेत, त्याचा आपण शोध घेतला पाहिजे. जेवढया अधिक नळ जोडण्या आहेत, त्यांच्याकडुन आपण वसुली वाढवु शकतो. ॲसेसमेंट न झालेल्या मिळकती, नळ जोडण्या व सर्वात महत्वाची गोष्ट मला वाटते आपल्या कुठल्यातरी एक बंधुने मला सांगितले, अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याचा मुद्दा ज्या बाबत दोन चार दिवसांपुर्वीच आमचे आमदार साहेब एक दिवस उपोषणास सुध्दा बसले होते. आपल्या शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्यासंदर्भात जो अध्यादेश निघाला आहे, त्या विषयीचा अधिनियम पुढे का सरकत नाही? महाराष्ट्र शासनाने अधिनियम तयार केला की,यानुसार आपण आपल्या शहरातील जी काही अनाधिकृत बांधकामे आहेत, ती नियमाधिन करा व त्यांच्याकडुन आपण वसुली करा. व ती वसुली आपल्या शहराच्या विकासासाठी कामी येणार आहे. जर आपले नगररचनाकार श्री. होगेपाटील येथे उपस्थित असतील व ते जर ऐकत असतील तर त्यांनी कृपया हा मुद्दा लिहुन घ्यावा व माझे बोलणे झाल्यानंतर त्यांनी याबाबत स्पष्टीकरण करावे. बांधकामे नियमाधिन करण्याचे काम जर जोराने सुरु झाले तर याकामी होणारी आपली वसुली कुठल्या कुठे जाईल. हा मुद्दा आपण लिहून घ्यावा व याबाबतीत मी आपणाकडुन जाणुन घेईल. साहेब, यामध्ये दोन मुद्दे आहेत, की आमच्या शहरातील लोक सुरक्षित होतील, त्यांना जे वाटते की आपले घर बेकायदेशीर आहे, व याबाबतीत आपणांस जर आत्मियता वाटत असेल तर आपण एक कॅम्प आयोजित करावा की अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्यासाठी या तारखेपासुन या तारखेपर्यंत आम्ही एक कॅम्प आयोजित केला आहे, त्यासाठी अधिका—यांचा एक संघ तयार करावा. आपली वेगवेगळी प्रभाग समिती कार्यालये आहेत, त्या व्यतिरिक्त इतरही काही ठिकाणे आहेत,तेथे आपण जा. परंतु याविषयी लोक त्रस्त का होतात? तर तेथे बसलेले अधिकारी नागरीकांना बरोबर प्रतिसाद देत नाहीत. त्याचे कारण काहीही असेल, परंतु आपणांस ती कारणे हटविली पाहिजेत. जर ती कारणे हटत असतील तर आपल्या शहरातील इमारती कायदेशीर होतील, व शहर विकासासाठी निधी उपलब्ध होईल. तर हा अतिशय प्रमुख मुद्दा होता, दुसरी गोष्ट जसे मी पहिलेच सांगितले की, अनावश्यक खर्च कमी करावेत. ज्या खर्चांची आपणांस जरुरत नाही, जसे आमच्या भगिनी श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सांगितले की, महाराष्ट्रात असे आपले पहिलेच शहर असेल की, येथे जेथे जावे तेथे प्रवेशद्वार दिसेल. याची आवश्यकता काय आहे? त्यादिवशी आम्ही काही लोक बसलो होतो त्यावेळेस याबाबत बोलणे झाले होते. आता माहित नाही आपला प्रस्ताव काय आहे? आपण असा प्रस्ताव आणु शकतो की, जी प्रवेशद्वारे वगैरे आहेत किंवा पेव्हर ब्लॉक आहेत, त्यांची कामे आपण करणार नाहीत. ही कामे नेहमीसाठी बंद करावीत. असे त्यादिवशी बोलणे झाले होते. तर त्याबाबतीत अशी सूचना आहे की, याकामांमध्ये आपले पैसे व्यर्थ जातात. आपल्या प्रवेशद्वारावर लिहिलेले असते, उल्हासनगरमध्ये आपले स्वागत आहे. वर पाहिले तर रिक्षा खाली खड्डयात जाते. आणि बिचारा पडुन जातो. अशी स्थिती प्रत्येक प्रवेशद्वाराची आहे. याचाच अर्थ जो निरुपयोगी खर्च आहे तो आपण कमी केला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—</u>**श्री. राजुजी, या अगोदर जी प्रवेशद्वारे मंजुर झाली आहेत, त्यांचे काम झाले पाहिजे.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. सुनिल सुर्वे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**नाही, तोडण्याची गोष्ट मी करणार नाही.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—**नाही, नाही, या अगोदर जी मंजुर झाली आहेत, जी अपुर्ण आहेत, ती पुर्ण झाली पाहिजेत की नाही?

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**बिल्कुल झाली पाहिजेत, बिल्कुल. दुसरी प्रमुख गोष्ट आहे, **नगररचना,** ज्याबाबत आमच्या भगिनी श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, नगररचना विभाग आहे, ज्या विभागाकडुन आपण अधिकाधिक वसुली करु शकतो. त्यांचे जे काही दर आहेत ते आपण वाढवु शकतो. आर्किटेक्टची फी वाढवा. प्लंबरची लायसन्स फी वाढवा, टाऊन प्लॅनिंगचे चार्जेस वाढवा. असे जे स्त्रोत आहेत, त्यांमध्ये दरवाढ करा. व ते वाढवा. तर श्री. जमनुजी शेवटी मी आपणांस निवेदन करेल की, जसे आमच्या भगिनी श्रीमती पंचशिला पवार यांनी सांगितले की, आपण जे पाणी बिल वाढवत आहात, घरपट्टी वाढवत आहात किंवा जकातीचे काही बाबींवर दर वाढवत आहात, त्यामुळे शहरातील प्रत्येक वर्गावर या अर्थसंकल्पाचा परिणाम होत आहे. आज सकाळी डॉ. राजा रिजवानी यांच्याशी माझे बोलणे झाले. आपणांस सांगु इच्छितो की, मार्च महिन्यापासुन ते आजपर्यंत आपल्या शहरातील नर्सींग होमचे लायसन्स नुतनीकरण होत नाही याची आपणांस माहिती आहे? आहे कुणास माहिती? आपले कर्तव्य आहे की आपण नागरीकांना वैद्यकीय सेवा पुरवाव्यात ते न करता, शहरातील जे नर्सींग होम आहेत, त्यांच्या लायसन्सचे नुतनीकरण होत नाही. मार्चपासुन आतापर्यंत ते लोक धक्के खात आहेत. कारण काय तर म्हणे अग्निशमन विभागवाले ना हरकत दाखला देत नाहीत. नर्सींग होम आपल्या शहरासाठी वैद्यकीय सुविधा देत आहेत. ते लोक धक्के खात आहेत,व आपण येथे बसुन मोठ मोठया गोष्टी करत आहोत. कुठले आपण नेते आहोत? कुठले आपण नगरसेवक आहोत? कुणाची जबाबदारी आहे ही? या गोष्टींवर काही विचार होत नाही. याबाबतची बरीच मोठी यादी आहे. त्यामुळे मी जास्त वेळ घेत नाही. मी आपणांस विनंती करेल की, अशा प्रकाराने ....................

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, ..........

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**मला बोलु दिले जावे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आपण बोला बोला.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**काही लोकांना त्रास होत आहे, ते नाराज होत आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**श्री. राजुजी, आपण खुप चांगले बोलता. बोलत रहा. व आपण सुध्दा त्याची अंमलबजावणी करा.

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती अनिता तरे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—**या अर्थसंकल्पामध्ये जर आपण कोणतीही करवाढ करणार नसाल तर आमचे आपणांस पुर्णपणे समर्थन आहे. परंतु जर आपण एक रुपयादेखील कर वाढविणार असाल तर आमचा या अर्थसंकल्पास विरोध आहे. धन्यवाद।

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**आमच्या श्री. राजु जग्यासी यांचे बोलणे मी आणखी थोडे पुढे नेते, वेळ अतिशय कमी आहे व आपले आयुक्त साहेब नविन आहेत, एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणुन देते, कर वसुलीवर चर्चा चालु आहे की, कर वसुली वाढविली जावी. त्याबाबतीत एक उदाहरण मी आपणांस देते, माहिती अधिकारान्वये मी महापालिकेला एक पत्र दिले होते की अमुक अमुक ही जी जागा आहे, तिची मला सविस्तर माहिती पाहिजे. तिच्या विषयीच्या संचिकेमध्ये काय काय आहे? त्याबाबत मला उत्तर देण्यात आले की दोन माळयांचे बाधंकामास मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात ती पाच माळयांची इमारत आहे. व ते त्यावेळी येथे आपले सन्मा. नगरसेवकच होते ज्यांची ती इमारत होती. त्या उत्तरांत लिहिण्यात आले होते, दोन माळयाचे बाधंकाम मंजुर आहे, प्रत्यक्षात ती पाच माळयांची इमारत होती. त्यानंतर माहिती अधिकारात मी पुन्हा एकदा पत्र लिहिले की, ही पाच माळयाची इमारत आहे, व दोन माळयाची असल्याचे आपण सांगत आहात.

त्यावर त्यांनी सांगितले की, याविषयीची जी फाईल आहे त्यामध्ये फक्त दोन माळे दर्शविण्यात आलेले आहेत. नंतर टॅक्स विभागामध्ये चौकशी केली असता सर्वसाधारण बॅरेकच्या खोलीचे जे टॅक्स बिल पाठविले जाते त्याप्रमाणे त्यांच्याकडे १२३ रुपयाचे टॅक्सचे बिल पाठविले जात होते. त्या पाच माळयाच्या इमारतीस आता सुध्दा १२३ रुपयाचे टॅक्सचे बिल जाते.

यावेळी सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. मनोज सयानी हे शेम शेम अश्या घोषणा देत होते.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—** तर अशी आपल्या महापालिकेची भुमिका आहे. टॅक्सचे घोटाळे कोर्टापर्यंत गेल्याचे आपणांस माहित आहेच. अशा गोष्टी थांबिवल्या तर टॅक्स वाढविण्याची गरज पडणार नाही, गरिबांवर कराचे ओझे वाढविण्याची गरज पडणार नाही. विरोधी पक्षाने आपले आभार व्यक्त केले आहेत. धन्यवाद. आपण २०९ कोटीची तुट दाखविली आहे त्याबदद्ल मी अतिशय खुष आहे. व सत्य माहिती आपण दिली आहे, मी असे सांगु इच्छिते की, आमचे सन्मा. श्री. रामनाथजी सोनावणे यापूर्वी आयुक्त होते त्यांनी आपले मागील पाच वर्षाचे अभिलेख पाहिले. १२७ कोटीचे पेव्हरब्लॉक आपल्या शहरामध्ये लागले आहेत तर त्यांनी अतिशय दुःख व्यक्त करुन असे निवेदन केले की १२७ कोटी मध्ये संपुर्ण शहरातील रस्ते सिमेंट कॉक्रिटचे झाले असते. तर आयुक्त साहेब आमच्या शहराची स्थिती ही अशी आहे, यावर अतिशय गंभीरतेने विचार करण्याची जरुरत आहे. ३३ करोड रुपये पाणी टॅकरवर खर्च केले जातात, लोक पाण्याचे बिल भरतात मग टॅकरच्या माध्यमातुन हे ३३ करोड रुपये कोणाचे जातात ते गरिब जनतेचे जातात, जनतेने हे काय भोगायचे? जनतेवर व्याज वगैरे काय आकारायचे? त्यासाठी आम्ही यास विरोध करतच आहोत. त्याचबरोबर मी आपणांस निवेदन करीन की ही जी २०९ की २१० कोटीची बिले आहेत त्याबाबत मी दाव्यानिशी सांगते की, त्यामध्ये २० टक्क्यांची सुध्दा मुळ देयके नसतील. आपण याची कसोशीने चौकशी करा, आम्ही पुन्हा एकदा आपले मोकळया मनाने अभिनंदन करतो. व जसे ''न भुतो न भविष्यती'' असे म्हणतात भुतकाळामध्ये तर होते आता आपण प्रथा सुरु केली आहे, याबाबत मी अपेक्षा व्यक्त करते की यापुढे येणारे आयुक्त ही प्रथा चालु ठेवतील या कामांची आपण खोलवर तपासणी केली तर यामध्ये २० टक्के सुध्दा मुळ कामे मिळणार नाहीत. अशी बरीच उदाहरणे आहेत. राष्ट्रवादी कॉग्रेसच्या अध्यक्षांना काही वार्षिक निधी मिळाला होता ४० लाख रुपयांचे माझे येथील काम मंजुर आले होते ते काम कसे गायब झाले ते कळले नाही, नंतर जेव्हा चौकशी केली तेव्हा असे दिसुन आले की, ते काम दुसऱ्या कॉन्टीजेन्सीमध्ये फिरविण्यात आले होते. व जी कामे अद्याप झालेली नाहीत त्याची बिल तयार होवुन पडली आहेत. तर अश्या काही गोष्टी आहेत.

आरोग्य विभागाची स्थिती आपणांस माहित आहे की, किती किटकनाशके येतात, या सर्वांची आपण सखोल चौकशी करावी असे केले तर आपणांस कोणतीही करवाढ करावी लागणार नाही, व गरीब जनतेवर आर्थिक ओझे लादण्याची बिल्कुल गरज नाही. यासाठी आंम्ही यासर्व गोष्टीबाबत विरोध करत आहोत.

**सदस्या श्रीमती जया साधवानी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब यापूर्वी बोलता बोलता मी एक मुदद्दा विसरुन गेले होते, अनाधिकृत बाधंकामे नियमाधिन करण्याचा जो मुदद्दा मी उपस्थित केला होता, याविषयी मागील कार्यकालावधीत सन्मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी एक मोठा मुदद्दा उपस्थित केला होते व तो शासनाकडे सुध्दा प्रलंबित आहे. डी फार्म वर आपल्या येथे आठ बाधंकाम परवानग्या मंजुर झालेल्या आहेत. तर आपल्या माहितीमध्ये ते आहे किंवा नाही? तर मला असे वाटते की, आयुक्त साहेब डी फार्मवाल्या ज्या बाधंकाम परवानग्या आहेत ती बाधंकामे होता कामा नये. व त्यांवर आपण काय कारवाई करणार? व त्यांच्यावर दंड काय आहे? त्याबाबतीत शासनाकडुन आपण काय निर्देश घेवु इच्छिता, ही गोष्ट मी आपणांस निर्देशनास आणु देवु इच्छित होते यासाठी मला दुसऱ्यांदा बोलवे लागले, धन्यवाद.

यावेळी सदस्य श्री. गुरुनो वलेचा, श्री. सतरामदास जेसवानी, श्री. पृथ्वी वलेचा हे सभागृहातुन बाहेर गेले.

**श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—** मा. महापौर, आयुक्त साहेब, सन्मा. नगरसेवक श्री. अकुंशजी म्हस्के याचा जो भिंती संदर्भातील प्रश्न होता त्यासाठी आपण महापालिका इमारतींची दुरुस्ती या लेखा शिर्षात २५ लाख रुपयांची तरतुद केलेली आहे. दुसरा प्रश्न, जिजामाता उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीबाबत सन्मा. नगरसेवक श्री. सुनिल सुर्वे यांचा होता, तर अर्थसंकल्पाची प्रत आपणाकडे असेलच, पान नंबर १६, वर सी—३ यामध्ये उद्यानांचे देखभाल या लेखाशिर्षाखाली ७५ लाख रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. तिसरा प्रश्न श्री. राजेशजी वधारिया यांचा होता त्यांना सुध्दा तेच उत्तर आहे, उद्यान देखभाल या लेखाशिर्षा खाली ७५ लाखाची तरतुद करण्यात आली आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>** त्यामध्ये नाना नानी पार्कचा उल्लेख नाही. मी सुध्दा ऐवढेच म्हटले होते की त्यामध्ये त्याचा समावेश केला जावा.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>** साहेब माझा प्रश्न केवळ जिजामाता उद्यानाचा नव्हता, सार्वजनिक बाधंकाम विभागाकडुन पत्र दिल गेल होत. त्यानुसार त्याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये आला नव्हता, ते पत्र अर्थसंकल्पात तरतुद करावी म्हणुन होत. तुमच्या नावाने आलेल ते पत्र होत, आणि त्याबाबत माझ म्हणण होत. माझ म्हणंण एका विशेष उद्यानापुरते नव्हते.

यावेळी सदस्या श्रीमती जयश्री पाटील, श्रीमती अनिता तरे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी:—</u>** सन्मा. सदस्यजी आपल्या पत्राचा विचार मा. महापौरांशी विचार विनिमय करुन केला जाईल.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u>** मा. महापौरजी, बॅरेक नंबर २१२३ मध्ये मागील वर्षी भिंत कोसळली होती. आपत्कालीन नियंत्रणकक्षाने याची माहिती महापालिकेस दिली होती. अद्यापपर्यंत ती भिंत बाधंण्यात आली नाही, ती भिंत न बाधंल्यामुळे क्रित्येक घेर पडतील, पडणाऱ्या घरांमुळे व जिवितहानी झाल्यामुळे आपणांस त्यांना पैसेही दयावे लागतील व घरही बाध ुन दयावे लागेल. तर कृपया या गोष्टीकडे लक्ष दिले जावे.

**<u>श्री. प्रल्हाद होंगेपाटील, नगररचनाकार:—</u>** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती श्री. रमेश चव्हाण साहेब, सन्मा. पदाधिकारी, सर्व नगरसेवक, बऱ्याच दिवसांपासून आपणांस ज्या विषयावर चर्चा करायची होती तो विषय इथे सगळयांच्या मनात असुन त्यावर कुणी बोलले नाही पण आता आपणांस तो एक विषय मिळाला आहे. श्री. राजेश वधारियांनी दोन चांगले मुददे् येथे उपस्थित केले आहेत. त्यामध्ये श्री. मनोज सयानीजी श्री. राजु जग्यासी, श्री. राजेश वधारिया, मागच्या वेळेस श्री. मोहन साधवानीजी आणि श्री. बोडारे साहेबांबरोबर बऱ्याच वेळा चर्चा झाली आहे. यामध्ये खरी अडचण जनजागृतीची आहे, अनाधिकृत बाधंकामे नियमाधीन करण्याचा जो प्रश्न आहे त्याबाबत एक जनहितयाचिका दाखल झाली आहे.

**<u>सदस्या श्रीमती जया साधवानी:—</u>** होगेंपाटीलजी आपण जरा हिंदीमध्ये बोलण्याचे कष्ट घ्यावे.

**<u>श्री. प्रल्हाद होंगेपाटील, नगररचनाकार:—</u>** याबाबत उच्च न्यायालयातएक जनहित याचिका (१०५/२००३) होती त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय पारित केला होता. त्यानुसार उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये जी काही अनाधिकृत बाधंकामे आहेत त्यांना नियमाधिन करण्याचा प्रस्ताव होता. त्याबाबत काही कागदपत्र सादर करायची होती ती एवढी काही क्लिष्ट नव्हती, जसे सनद आहे तर ठिक आहे नाहीतर रेशनकार्ड, टॅक्स पावती, प्रॉपर्टी कार्ड यातील काही कागदपत्रे नसली तरी २००५ पूर्वी टॅक्स भरला असेल तर त्याची पावती. बांधकाम नियमाधीन करण्यासाठी आपणाकडुन १ लाख ५० हजार नोटीसा वितरीत करण्यात आल्या होत्या.याबाबत मध्यंतरी ज्या काही लोकांनी अर्ज केले होते, (२२ हजार लोकांनी अर्ज केले होते) त्यातील १५ हजार अर्ज झोपडपटट्यामधील असल्यामुळे ती बाधंकामे नियमाधिन झाली नाहीत कारण की २००५ पूर्वी नियमाधिन होवु शकत होती. हा प्रस्ताव सादर केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्यांखालील समितीकडुन फक्त १०० लोकांना डि फॉर्म प्रस्तुत करण्यात आला होता, त्या १०० प्रकरणातुन आपल्या महानगरपालिकेला निधी या लेखा शिर्षात ७ कोटी ६७ लाख रुपये मुलभुत सेवा निधी जमा झाला होता व तो निधी उल्हासनगरच्या मुलभुत सेंवासाठी वापरला जातो. याबाबतची जी कार्यवाही आहे ती अतिशय संथ आहे. यातील कोणत्याही गोष्टी बाबत अशी कोणती मोठी जोखीम नाही. फक्त आपली मनोबलता पाहिजे, आपण त्यामध्ये सहभागी झाले पाहिजे, उल्हासनगरमध्ये मी असे पाहिले की जर आपणांस एखादया नव्या इमारतीमध्ये प्लॅट घ्यायचा असेल तर कमीत कमी ४ हजार ते ५ हजार रुपये प्रति चौरस फुट याप्रमाणे दर लागतो. परंतु अनाधिकृत बाधंकाम नियमाधिन प्रस्तावात जागेसह बाधंकाम ३७० प्रति चौरस फुट या दराने नियमाधिन होते. आता श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, जो डी फॉर्म वितरीत केला जातो त्याबाबत शासन निर्णयात असे कुठेही लिहिले नाही की डी फॉर्म वितरित झाल्यानंतर आपणांस परवानगी दयायची आहे किंवा नाही. मी जी दोन चार प्रकरणे पाहिली त्यात असे आहे की शासनाकडुन परवानगी मिळाल्यानंतरच त्यांचा प्लॅन मंजुर केला आहे. आता काही लोकांनी अनाधिकृत बाधंकामावर आणखी अनाधिकृत बांधकामे केली, प्लॅन तयार केला त्याबाबत आपण शासनाकडुन मार्गदर्शक सूचना मागविल्या आहेत व <u>जर प्लॅन मंजुर केला असेल तर मागील तारखेपासुन मंजुरी घेवु शकतो,</u> तसे शासनाचे धोरण आहे, व दुसरे असे की, अनाधिकृत बाधंकामे नियमाधिन करण्याच्या बाबतीत माझे ऐवढेच म्हणणे

आहे की, कागदपत्रांची जी यादी आहे. त्याबाबत आता काही लोक म्हणतात की, जिल्हाधिकारी साहेब सहया करत नाहीत, ते सहया करत नाहीत. उपविभागीय अधिका—यांकडे संचिका प्रलंबित आहे. उपविभागीय अधिका—यांकडे जेव्हा फाईल पाठविली जाते तेव्हा ते फक्त मालकी हक्क कुणाचा आहे ते पाहतात. व ते मा. जिल्हाधिका—यांचे प्रतिनिधी आहेत. जिल्हाधिकारी साहेबांना एकतर वेळ मिळत नाही, मोठया प्रमाणावरील आपले प्रस्ताव असतील तर आपण त्यांना जावुन बोलु शकतो की एवढे प्रस्ताव प्रलंबित आहेत तेवढे आपण करा. कधी दोन जातात, चार जातात, परंतु त्यासाठीही त्यांना वेळ नाही मिळत, पाच सहा लोकांना बोलवावे लागते. यासाठी असे प्रस्ताव जर जास्त असतील तर आम्ही स्वत: जाणार. त्यास दुसरा असा काही पर्याय आहे की, महापौरांकडुन आम्ही मागील वेळेस पत्र घेतले होते की, त्यात प्रस्ताव असा लिहीला आहे, जिल्हाधिका—यास जर वेळ नसेल तर उप सचिव पदाचा कुठलाही अधिकारी असेल त्यांना अधिकार असतो. जर आपण मुख्य सचिव यांना पत्र दिले. आपल्या आयुक्त साहेबांचे हे सुध्दा म्हणणे आहे की, असे केले तर ज्यांना वेळ मिळेल, उप पदभार असलेला कोणीही असो त्यांच्याकडुन आपण जर पुर्णवेळ काम करुन घेतले तरी चालते. बांधकामे नियमाधिन करण्याचा मुद्दा आपल्यावर अवलंबुन आहे. श्री. मनोज सयानी यांनी सांगितले की, आमचे चॅनल आहे, आपण जनजागृती करणार, ही फार मोठी गोष्ट आहे. पायाभुत सोयी या माध्यमातुन जेवढा पैसा महापालिकेस मिळेल, तेवढा कुठेही मिळणार नाही, कधीच मिळणार नाही. जर १०० मधुन आपणांस ७ किंवा साडेसात कोटी मिळतात तर आपणाकडे ६५२६ प्रकरणे प्रलंबित आहेत, जर प्रत्येक नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातुन जनजागृतीच्या माध्यमातुन प्रयत्न केले व, जर ६००० प्रकरण झाले तरी एका बांधकामासाठी महापालिकेस ३ लाख कमीत कमी मिळु शकतात. १००० गुणीले ३ लाख करा किती मिळतात, ती आपण आकडेमोड करा, मग बोला की महापालिकेत पैसा नाही म्हणुन. आता दुसरे असे की अनाधिकृत बांधकामे नियमाधीन प्रकरणी एवढेच बोलतो. त्यानंतर दुसरे असे की, टीडीआरच्या बाबतीत टीडीआर आजुबाजुच्या पालिकांमध्ये जसे की कल्याण महानगरपालिकेत आहे, ठाणे महापालिकेत आहे, अंबरनाथ—बदलापुर येथे आहे, आपले जे नियोजन चालु आहे जो विकास आराखडा आहे, त्याचे काम आता चालु आहे, नविन बांधकाम नियंत्रण नियमावलीमध्ये आपण तो सादर करणार व नविन विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भाव करुन शासनास पाठवुन देवु. नाहीतर त्याअगोदर एक प्रस्ताव महासभेपुढे आणुन शासनास पाठवुन देवु. नगररचना विभागाच्या हिशोबाने शासनाकडे बरेचसे प्रस्ताव प्रलंबित आहेत, इमारतीच्या उंचीबाबतचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, जेथे आपण ९१ मिटर कोडीयम किंवा सिप्टींग ऑपरेझेशन, सिप्टींग ऑपरेझेशन म्हणजे रस्त्याच्या कडेला जर कुणाचा प्लॉट आहे, डेप्थ मध्ये जास्त आहे, समोर आरक्षण आहे तर ते आपल्याकडे असणार. बाकी सर्वबाबतीत महानगरपालिकेकडे तरतुद आहे, त्यासाठी आपण शासनास प्रस्ताव पाठविला आहे. व उत्पन्नाचे दुसरे एक साधन आहे की, २५ टक्के विकसित बांधकाम मिळते, याबाबत सभापती महोदयांना माहिती आहे की, आपणांस जे काही अकोमोडेशन रिझर्वेशनमध्ये २५ टक्के मिळते, त्या जागासुध्दा आपण आयुक्त साहेबांशी चर्चा करुन त्या माध्यमातुन पैसा उभारु शकतो. तर एवढे माझे म्हणणे आहे, आणखी काही असेल तर सांगा.

यावेळी सदस्य श्री. गुरुनो वलेचा, श्री. सतरामदास जेसवानी, श्री. पृथ्वी वलेचा यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**नगररचनाकार साहेब, मी आपणांसही विचारले होते की, डी फॉर्मवर हे जे सात किंवा आठ प्लॅन मंजुर झाले आहेत, तेथे तर कोणते बांधकाम याअगोदर नव्हतेच तर त्याठिकाणी आपण प्लॅन मंजुर केला आहे. गरीबांबरोबर ही बांधकामे नियमाधिन करण्यासाठी गेली पाहिजेत. नियमाधिन झाली पाहिजेत. त्यातुन उत्पन्नही आले पाहिजे. असे माझे मानने आहे. परंतु त्याच्या आड जर आपण असे डी फॉर्मवर प्लॅन मंजुर करुन देत आहात. त्याची चौकशी चालु आहे. त्याची सध्यस्थिती काय आहे?

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**त्याबाबत आता शासनास .............

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**करणारे आपण आहात. आपणच तर शासनास सांगणार ना?

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**त्यावेळेस डी फॉर्मच्या आधारावर परवानग्या दिल्या आहेत की काय ते माहित नाही. तेथे बांधकाम होते किंवा नाही तेही माहित नाही.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :—**खाली जमिनीबाबत बोलत आहे मी. तीन वेळा मी आपणांस सांगितले आहे.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—**डी फॉर्म वितरीत करणारे जिल्हाधिकारीच आहेत.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**देणारे तर आपणच आहात. पैसे वसुल करणारे आपणच आहात. माझे हे म्हणणे आहे की, त्याची योग्य ती माहिती असली पाहिजे. दुसरे असे की, जी काही बांधकामे आज आपण नियमाधिन करणार आहात, त्यामध्ये असे होवु नये की, डी फॉर्मच्या आड आणखी काही बांधकामाची रांग लागावी जशी सात आठ बांधकामे झाली आहेत. तर चला मी मानते की आपण खुप प्रामाणिक आहात, चांगले व्यक्ती आहात. परंतु या अगोदर ज्या आठ बांधकाम परवानग्या मंजुर झाल्या आहेत त्यांचे काय? ती तर आमच्या शहरातील करोडो रुपयांची जमिन आहे.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:–** त्याबाबतीत कारवाई करण्यासाठी आपण शासनाला पत्र लिहिले आहे. शासनाकडुन त्याबाबतीत जसे निर्देश प्राप्त होतील त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**तोपर्यंत आपण आयुक्त साहेबांशी सल्लामसलत करुन बांधकामास स्थगिती तर दया. स्थगिती आदेशाबाबत तुम्ही आयुक्तांना कळविले आहे काय? स्थगिती संदर्भात आपण आयुक्तांकडुन लेखी आदेश मागितला आहे काय? नाही, मला तरी नाही वाटत.

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. गणपत एडके, श्री. विजय तायडे, डॉ. महेश गावडे हे सभागृहातुन बाहेर गेले.

**आयुक्त, श्री. बालाजी खतगावकर:–**हे पहा सदस्या महोदया, एमआरटीपी ॲक्टनुसार जर एखादा प्लॉन मंजुर होतो त्याबाबत अपीलीय प्राधिकरण शासन आहे. प्लॉन मंजुर झाल्यानंतर त्याबद्दल कुणाला काही हरकत असेल तर त्याने शासनाशी संपर्क साधुन अपील सादर करावे. अशी एमआरटीपी ॲक्टमध्ये तरतुद आहे.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**याबाबत आपण आम्हांला मार्गदर्शन करा.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:–**शासनास आपण पत्र लिहिले आहे की, या ज्या परवानग्या दिल्या आहेत त्या दोन तीन वर्षापुर्वी दिल्या आहेत, त्यामध्ये शासनाचे असे कोणतेही पत्र नाही की, याबाबतीत परवानगी आहे. म्हणुन परंतु जो शासन निर्णय आहे.....................

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**आपले नियम काय म्हणतात? आपले शासन निर्णय काय म्हणतात?

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. गणपत एडके, श्री. विजय तायडे, डॉ. महेश गावडे, श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:–**डी फॉर्म वितरीत झाल्यानंतर परवानगी दयायची आहे की नाही त्याबाबत शासन निर्णयामध्ये काहीही उल्लेख नाही. परंतु एक प्रकरण असे आहे की, शासनाकडुन परवानगी घेतल्यानंतरच परवानगी दिली आहे.

यावेळी सदस्या श्रीमती नेहा भोईर, श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती जयश्री चौधरी, श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती आशा बिराडे, श्रीमती अर्चना करणकाळे, श्रीमती ज्योती गायकवाड हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**अशी आठ प्रकरणे आहेत.

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:–**ती वेगळी आहेत.

**सदस्या श्रीमती जया साधवानी :–**मी आपणांस सुचीत करु इच्छित होते की, गोर गरीब जनेतेचे अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करण्याचे काम ते लवकरात लवकर व्हावे, ज्या पहिल्या आठ बांधकाम परवानग्या दिल्या आहेत, त्यांची आपण चांगल्याप्रकारे चौकशी करत आहात? आपले हे सभागृहास उत्तर आहे?

**श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:–**ती प्रकरणे आयुक्त साहेबा समोर ठेवतो.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारीया:—</u>**टीडीआरबाबत माझा प्रश्न होता की दोन प्रकारचे टीडीआर आहेत. एक टीडीआर आहे जे आरक्षित भुखंड आहेत, ते विकसित करण्यासाठी आपण स्वत: घेवु शकतो. दुसरे आहे जे सिमेंट कॉक्रिटचे रस्ते विकसित करुन बिल्डरर्स किंवा डेव्हलोपर्स आपणांस देतात, त्याच्या बदल्यात टीडीआर दिला पाहिजे. असे नियम अंबरनाथ व बदलापुरमध्ये कार्यान्वीत झाले आहेत.

 यावेळी सदस्या श्रीमती वसुधा बोडारे, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती अर्चना करणकाळे, श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती पंचशिला पवार, श्रीमती आशा बिराडे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**महापौर महोदय, श्री. राजुजी, अर्थसंकल्पाबाबतीत जो विषय होता त्याबाबतीत बोला. टीडीआर बाबत वेगळया समितीमध्ये आपण बोलु या. आपली जी चर्चा आहे ती वसुली कशी होईल याबाबत बोलले पाहिजे.


यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**उत्पन्न वाढविण्याबाबतीतच मी हे बोलत आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या याचा अर्थसंकल्पावर परिणाम होतोच. तर आमचे म्हणणे असे आहे की आपण त्यास विकास आराखडयाशी न जोडता एमआरटीपीच्या कलम ३७ (१) नुसार महासभेपुढे आणले असते तर लवकर झाले असते.

**<u>श्री. प्रल्हाद होगेपाटील, नगररचनाकार:—</u>**चालेल, ठिक आहे. आभारी आहे.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती ज्योती कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**महापौर साहेब, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सचिव आणि सर्व सभागृह, ब—याच दिवसापासुन मी वाट बघत होतो की, अर्थसंकल्प केव्हा येईल? श्री. राजु जग्यासीजी, अर्थसंकल्पाचे दुसरे नाव अंदाजपत्रक आहे. वार्षिक अंदाजपत्रक याला म्हणतात, याचे आपण जसे अर्थ काढु तसे अर्थ निघतील. आपण म्हटले की, अंदाजपत्रक म्हणजे आपला घराचा खर्च कसा चालतो, मी म्हणतो की, आमची ही प्राजेक्टेड कॉस्ट आहे. अंदाजपत्रक आहे, आमचा अंदाज इतका आहे, तो बरोबरही असेल, चुकीचाही असेल. वर्षानुवर्षे तो याप्रमाणे येत आहे. अर्थसंकल्पास आपण बजेट असे संबोधले तर मी यास अंदाजपत्रक म्हणतो. संपुर्ण वर्षासाठी आमचे अंदाज कसे असतील? वसुली किती होईल व खर्च किती होईल? यासाठी कार्यपध्दती आहे की, आयुक्त आपले अंदाज तयार करतात, नंतर तो प्रस्ताव स्थायी समितीपुढे जातो, आपला हा अर्थसंकल्प गेल्या दिड महिन्यापासुन प्रलंबित आहे. मागच्या महिन्याच्या २९/५/२०१२ तारखेला स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्पीय सभा लावली होती, आज ९ जुलै या दिडमहिन्यामध्ये आपण संशोधन करावयास पाहिजे होते, आपली कल्पना काय आहे? आपले प्रस्ताव काय आहेत? आज महासभा लावल्यानंतर विरोध करणार, ही जी मानसिकता आहे ती बरोबर नाही. आपण शहराचे हित पाहतो, आपण मोठ मोठया गोष्टी करणार, परंतु आपण काही कार्यवाही करणार नाही. आपल्याजवळ दिड महिना होता, आयुक्तांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे, त्याबाबतीत आपले जे संशोधन आहे ते बरोबर नाही. स्थायी समिती सभा होते, त्यात सर्व स्थायी समिती सदस्य असतात, त्यांनी आपापले प्रस्ताव दिले पाहिजेत, कोणी काहीही सांगेल, आम्हांस शांघाय तयार करायचे आहे, पॅरीस तयार करायचे आहे, युएसए बनवायचे आहे आम्हांला युके बनवायचे आहे परंतु त्याचा प्रस्ताव कोणीही दिला नाही, तेथे सुध्दा विरोध केला आहे, त्यानंतर एक प्रथा म्हणुन व या शहराच्या हितासाठी आम्ही सर्व पक्षांचे पदाधिकारी राजकिय जे नेते होते त्यांची, त्याचबरोबर प्रत्येक पक्षाचे अध्यक्ष व या सभागृहात बसलेले प्रत्येक पक्षाचे जे गटनेते आहेत, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता यांना बोलावुन विचारले की, आपले काय प्रस्ताव आहेत ते आपण दया. ते आम्ही यामध्ये समाविष्ट करतो. परंतु आजपर्यंत कुणीही प्रस्ताव दिला नाही. व आज येथे चर्चा झाली ठिक आहे, चांगली गोष्ट आहे. ''देर सही, लेकिन दुरुस्त''.

 यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. अंकुश म्हस्के यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** १६ वर्षात महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत आज सर्वात जास्त वेळ म्हणजे तीन तास चर्चा झाली.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**चर्चा सुध्दा चांगली झाली. व असे झाले पाहिजे. अर्थसंकल्पीय चर्चेमध्ये ब–याचशा सन्माननिय सदस्यांनी भाग घेतला, श्री. अंकुश म्हस्के यांनी त्यांच्या प्रभागातील जी समस्या होती ती मांडली. भलेही त्यांचा गैरसमज राहिला असेल परंतु अर्थसंकल्पाबाबत त्यांची भावना होती. दायित्वाचे ओझे जरा लक्षात ठेवा. श्री. राजेश वदारिया यांनी काही मुद्दे मांडले. पीपीपी प्रोजेक्टस्बाबत प्रत्येकाची वेगवेगळी कल्पना असते. कुणाचा कश्यात रस असतो, कुणाचा कश्यात रस असतो. आमचे श्री. वदारियाजी त्यामध्ये तरबेज आहेत. त्यांना त्यातील माहिती आहे. आयुक्त साहेब, श्री. राजेश वदारिया यांनी पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप ही योजना दिलेली आहे. आतापर्यंत आपण राबविलेली नाही. त्यांचा एक आग्रह आहे की आपण एक विचार करावा. प्रत्येक माणुस कुठल्या ना कुठल्या बाबतीत तरबेज असतो. प्रत्येक बाबीतीत जे तरबेज असतील त्यांचे सल्ले घ्या. त्यांची अंमलबजावणी केली तर शहराला फायदा होईल. त्यानंतर त्यांनी मुद्दाम उल्लेख केलेला आहे की रखडलेल्या रस्त्यांची कामे, मागच्या पाच वर्षामध्ये यापुर्वी कधीही झाली नव्हती एवढी कामे आम्ही मंजुर केली. १२ आणि ८ जवळ जवळ २० रस्त्यांची कामे आम्ही मागच्या ५ वर्षामध्ये मंजुर केली. त्यातील काही कामे प्रगतीपथावर आहेत. पण एका ठराविक कंपनीच्या दुर्लक्षपणामुळे एका ठेकेदाराला ते काम दिल्यामुळे तो ठेकेदार ते काम पुर्ण करु शकला नाही. आम्ही चांगल्यातला चांगला ठेकेदार आणण्याचा प्रयत्न केला. ठेकेदाराच्या ना कर्तेपणामुळे पुर्ण शहराला भोगावे लागते. त्या ठेकेदारावर कारवाई काय करायची प्रस्तावित ती आम्ही या महासभेपुढे प्रस्तावित करतो. ठेकेदारावर कारवाई करा. का झाले नाही? आम्ही अर्थसंकल्पामध्ये तरतुद केली. त्याची पात्रता, क्षमता पाहिली. क्षमता बघितलेला ठेकेदार आणला तरी त्यांनी ते काम पुर्ण केले नाही, त्याच्यावर कारवाई करा. हे श्री. राजेश वदारिया यांचे म्हणणे आहे की, त्या ठिकाणी काम का झाले नाही? वर्षानुवर्षे रखडलेली कामे म्हणजे पाणी पुरवठयाची योजना. ती योजना आम्ही मागच्या पाच वर्षामध्ये जेएनएनयुआरएमच्या माध्यमातुन याठिकाणी आणली. पण ती रखडली. संथगतीने काम चालु आहे होते आता प्रगतीपथावर आहे, ४० टक्के काम झालेले आहे. त्याला सुध्दा गती देण्यासाठी, ठेकेदार कोण आहे, आणि काम वेगाने होण्यासाठी सूचना दयाव्या लागतील. कारण मागच्या डिसेंबरमध्ये काम पुर्ण करायचे होते. पुढच्या डिसेंबरपर्यंत तरी पुर्ण होईल आणि या शहरातील सर्वांची जी बोंबाबोंब चालु आहे की, पाणी पाणी पाणी आणि पाणी, या समस्येपासुन कसे मुक्त करता येईल? याचा विचार करा आणि त्या ठेकेदारावर कशी कारवाई करायची हे ठरवा. त्यानुसार कारवाई करा किंवा त्याच्याकडुन काम करुन घ्या. श्री. राजेश वदारियाजी, बरोबर आहे ना? हेच आपणांस पाहिजे ना? ठेकेदार काम करत नसेल तर त्याला काळया यादीमध्ये टाका. बरोबर आहे ना?

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–**काम नाही केले तर त्याला काळया यादीमध्ये टाका.

यावेळी सदस्य श्री. राजु कंडारे, श्री. राजेश वानखेडे, श्री. सुभाष मनसुलकर हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आपली इच्छा हीच होती. त्यानंतर बांधकामे नियमाधिन करण्याच्या मुद्दयावर आमचे नगररचनाकार श्री. होगेपाटील यांनी स्पष्टीकरण केलेले आहे. या महानगरपालिकेतील शासनाने प्रक्रिया थांबविली नाही. मला वाटते शासन चांगले आहे याबाबतीत. २००५ साली या शहरातील लोकांनी आंदोलन केले. त्यानंतर अध्यादेश मंजुर झाला. परंतु काही चुकीचे निर्णय झाले त्यामुळे जिल्हाधिका–यांनी हे काम थांबविले परंतु मला वाटते, आपल्याकडे नंतर आलेल्या अधिका–याने त्यांच्या कानावर टाकल्यानंतर ती प्रक्रिया चालु झाली आहे, फक्त लोकांमध्ये जनजागृती नाही. ती लवकरात लवकर करण्याची व्यवस्था करावी. त्यासाठी आमच्या आमदारांनी सुध्दा उपोषण केले होते की, हे काम लवकरात लवकर व्हावे म्हणुन. सर्व पक्षांच्या नेत्यांना वाटते की, बांधकामे नियमाधिनतेचा या शहराला फायदा व्हावा व त्याच्यातुन उत्पन्न होईलच. पण जर नाही झाले तर शहराचा विकास थांबवायचा का? श्री. मनोज लासी यांनी कच–याबाबतीत याठिकाणी उल्लेख केला. या शहरामध्ये दुर्गंधीचे साम्राज्य होते आणि आहे. २००३ साली या शहरावर आम्ही भष्मासुर बसविला. ॲन्थानी नावाचा ठेकेदार, त्याच्यावर कारवाई करण्यासाठी वारंवार प्रशासनाच्या मागे लागलो की त्याच्यावर कारवाई करा. तो काम करत नाही वारंवार फक्त भुलथापा देतो. कारवाई करा. २००३ साली १०

वर्षासाठी ठेका दिला होता. तो ठेका कसा आला? कोठुन आला हे माहित नाही. आता त्याला हाकला बस झाल. ही सर्व सभागृहाची मागणी आहे. तो काम करु शकत नाही. एकतर त्याला काळया यादीत टाका. आणि नविन एखादा कुणी क्षमताधारक असेल त्याला आणा. श्री. राजु जग्यासी यांनी याठिकाणी उल्लेख केला की, स्विपींग मशिनचे काम होत नाही, बरोबर आहे. अनाठायी खर्च आहे. तो रद्द झालाच पाहिजे आणि स्थानिक संस्था कराबाबत व्यापा–यांनी एक बैठक आयोजित केली, त्याबाबत आमचे सुध्दा मत आहे. सर्व पक्षांचे मत आहे. की जर स्थानिक संस्था करामुळे व्यापा–यांना त्रास होत असेल तर असा स्थानिक संस्था कर लागु देणार नाही. कारण आम्ही सर्वजण या शहरासाठी भांडतो आहे, झगडतो आहे, आजही ती ठाम भुमिका आहे. पण नाही लागल, शक्य नाही झाले तर स्थानिक संस्था कराची तयारी ठेवा हे आम्ही सांगितले होते. त्यामुळे जर नाही झाले तर प्रथम शहर असेल तर आम्ही सर्वजण आहोत. शहर असेल तर पक्ष असेल आणि पक्ष असेल तर नंतर पुढचा येतो. पण शहरच जर व्यवस्थीत नसेल, तर आम्हीही कुणीही चालणार नाही. पक्ष आणि पक्षाचे राजकारण होणारच नाही. ही भुमिका त्यावेळेस सुध्दा होती व आजही तीच आहे. आणि त्याठिकाणी हाही मुद्दा उपस्थित केला होता आपण. आपण म्हणालात की, आपण विसरलात जकात करामध्ये वाढ केली. परंतु त्यावेळेस अस्रे सांगण्यात आले होते की जर होत नसेल तर,............ व आपले शासन आहे, आपल्या शासनाने सांगितले आहे की, जकातीच्या बदल्यात स्थानिक संस्था कर आहे म्हणजेच जेवढी जकातीपोटी उत्पन्न होत होते तेवढेच उत्पन्न स्थानिक संस्था करातुन होईल अशी त्यांची धारणा आहे. आयुक्त साहेब, बरोबर आहे का? त्यावेळी आम्ही म्हटले होते की, काहीही केले तरी राजकिय स्थितीचा फरक पडतो. आपण मुख्यमंत्री महोदयांना भेटण्याची पुर्व परवानगी घ्या. आपण उदया म्हणजे दुस–या दिवशी आठ वाजता त्यांच्याकडे जावु या. आजपर्यंत आपण त्यांना भेटण्याची पुर्व परवानगी घेतली नाहीत. उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी, ............ ...... श्रीमती ज्योती भाभी यांनी ब–याच दिवसानंतर या सभागृहात उपस्थित राहुन कल्पना दिली. खरोखरच आयुक्त साहेब त्यांनी कल्पना दिली आहे की, टॅक्स वाढवा. त्यांनी सूचना दिलेली आहे. माहिती मिळाली. पाच माळयाची इमारत असतांना, दोन माळयाची दर्शवुन त्याप्रमाणे कर आकारणी केली त्या कर निरिक्षकावर कारवाई करा. कर वसुली कशी वाढेल? पण केवळ कर वसुलीमुळे आमचे शहर चालणार नाही. मराठीत म्हण आहे की, ''दात पोखरुन पोट भरत नाही.'' कर वसुली आम्ही कितीही वाढविली तरी उल्हासनगरचा विकास होवु शकणार नाही. त्यासाठी उत्पन्नात वाढ केलीच पाहिजे आणि मग ती करण्यासाठी आणि आता आम्ही काय काय केलेले आहे. आताच आमचे श्री. भुल्लर महाराज आवेशात आले होते त्यांनी सांगितले की, सिंधु भवनबनवा, छत्रपती शिवाजी भवन बनवाा. आमच्या श्री. मनोज सयानी यांनी विरोध केलेला आहे परंतु त्यांनी काही मागण्याही ठेवल्या आहेत की, व्यापा–यांसाठी मार्केट भवन झाले पाहिजेत. मार्केटमध्ये काही सोयी सुविधा मिळाल्या पाहिजे. सिंधु भवन झाले पाहिजे, त्यासाठी पैसा आला. मागच्या पाच वर्षामध्ये आम्ही काहीच केले नाही असे म्हणता येणार नाही. आणि अर्थसंकल्प म्हटला की, मी म्हटल्याप्रमाणे अंदाजपत्रक आले. मागच्या दहा वर्षाचा जर आपण इतिहास पाहिला, तर २००१– २००२ मध्ये अंदाज होता. १७३ कोटीचा, प्रत्यक्षात झाला ८३ कोटी. म्हणजेच जवळपास ५२ टक्के आपण मायनसमध्ये होतो. २००२–२००३ मध्ये अपेक्षित होते १५८ कोटी, झाले १०० कोटी. त्यावेळेस सुध्दा जवळपास ४७ टक्के आपण मायनसमध्ये होतो. त्यानंतर मिळकत करामध्ये २००१–२००२ मध्ये अपेक्षीत होते ४० कोटी. प्रत्यक्षात झाले १८ कोटी. म्हणजे जवळपास ६२ टक्के, ६३ टक्के मायनसमध्ये. हा जो प्रकार आहे तो केव्हापासुन चालत आलेला आहे? आता जेएनएनयुआरएममुळे अर्थसंकल्पाचा आकडा वाढतो आहे. देणे आणि तिकडुन येणेपण वाढत आहे. त्यामुळे आकडे जरी मोठे दिसत असले तरी फरक तेवढाच आहे. त्यामुळे मी पहिले म्हटल्याप्रमाणे अंदाजपत्रक म्हणजे अंदाज आहे. त्यावेळेस प्रशासनाचे अंदाज होते, त्यांनी त्यांचे अदांज ठेवले होते, त्यावर महासभेने आपले अंदाज व्यक्त केले होते. त्यानुसार आता सुध्दा चाललेले आहे. काहीही फरक नाही. पण एक अपेक्षा आहे की, प्रशासनाने जास्तीत जास्त साध्य गाठले पहिजे, जर आम्ही तुमच्या म्हणण्यानुसार चाललो, आयुक्तांच्या म्हणण्यानुसार चाललो की, आता काही नाही २०९ कोटी कर्ज आहे. यापुढे खर्च काहीही नाही. २०९ कोटीचा खर्च मिटवा, संपवा आणि चला. असे केले तर आपण काहीच करु शकणार नाही. ती आपली आपत्तकालीन व्यवस्था जरी असली तीही चालु शकणार नाही. श्री. अंकुश म्हस्के यांच्या प्रभागात भिंत पडली आहे, तो २ लाखाचा खर्च असला तरी ते काम होवु शकणार नाही कारण की २०९ कोटी कर्ज आहे. आणि आपला जो आवश्यक खर्च आहे, एमआयडीसीचे देयक आणि इतर देयके बघितले तर............ फक्त आपण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकासकामांन्वये १९ टक्के खर्च करतो. पगार भत्ते आणि पेन्शन यावर खर्च होतो २९ टक्के. यातील पगारावर २२ टक्के आहे. पेन्शन व फंड यावर ५ टक्के आहे. बाकी नगरसेवकांचे भत्ते, सभापतींसाठींचे भत्ते यांवर १ टक्का अन्य प्रशासकीय खर्च १ टक्का व एमआयडीसीचे देणे १२ टक्के. आता जी चर्चा चालु आहे ती फक्त १९ टक्क्यावर. जर २०९ कोटीचे कर्जामुळे जर आपण चर्चा करत शकत नसु तर हे सुध्दा देवु शकणार नाही. मागील पाच वर्षामध्ये आपली उपलब्धी ही आहे की, पाणी पुरवठा योजना येथे लागु केली, परंतु प्रशासनाने त्या ठेकेदाराकडे दुर्लक्ष केले. हे काम डिसेंबर २०११ मध्ये पुर्ण व्हावयास पाहिजे होते. ते अदयापपर्यत पुर्ण झाले नाही ते लवकरात लवकर पुर्ण केले पाहिजे.

ई—गव्हर्नसची आपली योजना होती ती जवळ जवळ पुर्ण झाली आहे. ७५ टक्के संगणकीकरण झाले आहे. व बीएसयुपी योजना लागु केली आहे. त्यामध्ये ठेकेदाराची काही चुक आहे, प्रशासनाची चुक आहे. श्रीमती जया साधवानी यांनी बीएसयुपीचा मुद्दा उपस्थित केला आहे. जेथे काम होवु शकते तेथे प्रशासनाच्या बेजबाबदारवृत्तीमुळे दुर्लक्षामुळे किंवा त्या ठेकेदाराच्या अन्य काही सारस्यामुळे ते काम होवु शकले नाही यामध्ये काही ना काही तरी आहे. परंतु या सत्ताधारी पक्षाने तेथे काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि जवळ जवळ ५० टक्के साध्य झालेले आहे. त्यानंतर सिमेंट ब्लाक्स बाबत सांगण्यात आले. १९ रस्ते झाले, प्रवेशद्वारे झाली. व्यक्ती तितक्या प्रवृती, कुणाला काय वाटते, कुणाला काय वाटते? त्यादिवशी आमची चर्चा झाली की उल्हासनगरच्या हितासाठी काही कामे झाली पाहिजेत. त्यामध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला की, प्रवेशद्वार व पेवरब्लॉकची कामे होता कामा नयेत. परंतु काही लोकांचे म्हणणे होते की, नाही, नाही प्रवेशद्वारे असली पाहिजेत. आमच्या प्रभागात तर पाहिजेच, असे त्यांचे म्हणणे होते. माझ्या प्रभागात जर अगोदरपासुनच प्रवेशद्वार तयार केलेले असेल तर आता याबाबतच्या नविन कामास माझा विरोधच राहिल. मला आता या कामाची जरुरत नाही, माझे पोट भरले आहे. परंतु ज्याचे पोट खाली आहे त्याबाबतीत विचार करणे जरुरीचे नाही. असे जर होत असेल तर म्हणुनच काही लोक म्हणत आहेत की आमच्या प्रभागामध्ये प्रवेशद्वार पाहिजे, समाजमंदिर पाहिजे तर तेथे चर्चा झाली. परंतु त्यास अंतिम स्वरुप आले नाही. दोन्ही बाजुने चर्चा झाली की आम्हांस प्रवेशद्वार पाहिजे. परंतु त्याठिकाणी माझा वैयक्तीकपणे विरोध होता व आजसुध्दा आहे. परंतु माझे मत म्हणजे संपुर्ण पक्षाचे मत किंवा सभागृहाचे मत असे नाही. हें सभागृह बहुमताने चालते, जे बहुमताने अपेक्षित असेल तेच होईल. या सभेमध्ये तेच झाले. कारण बरेचसे लोक म्हणत होते की, यात्री निवास व प्रवेशद्वाराचे काम झाले पाहिजे. झोपडपट्टयांमध्ये झाले पाहिजे. जेथे झाले आहे तेथे आवश्यकता नाही. जेथे जरुरीचे नाही तेथे होता कामा नये. ते प्रशासनावर आहे. प्रवेशद्वार, कारंजे, महिला बाल विकासाच्या आधारावर बरेचसे कार्यक्रम झाले. उदयाने— लाललोई उदयान, जिजामाता उदयान ही मागील पाच वर्षांची आमची कामगिरी आहे. एमआयडीसीचे देयक नियमितपणे दिले गेले आहे. या अगोदर ते अदा करण्यामध्ये आपणांस काही अडचणी यायच्या आणि त्यामुळे शहरामध्ये १० टक्के, १५ टक्के, २५ टक्के पाणी कपात व्हायची. परंतु आता कधीही तसे होत नाही. पहिला हप्ता एमआयडीसीला दिला जातो, २ कोटी ४० लाखाचा. कारण की, आपल्या शहरातील वितरण व्यवस्थेमध्ये काही अडचणी असल्यामुळे आपणांस जास्तीत जास्त पाणी एमआयडीसीकडुन मिळाले पाहिजे. कपात तर होताच कामा नये परंतु आहे त्या कोटयापेक्षा जास्त पाणी मिळाले पाहिजे कारण आम्ही त्यांना वेळेवर देयक रक्कम अदा करतो आहे, त्यामुळे हक्काने त्यांच्याकडुन मागु शकतो. त्यामुळे मागील पाच वर्षामध्ये देयकाबाबत एमआयडीसीची एक सुध्दा हरकत नाही. २.४० कोटी अधिक नियमित देयक रक्कम, व मागील रक्कम ती सुध्दा आम्ही त्यांना देतो. आणि अशा प्रकारे देयक अदा करण्याची व्यवस्था केलेली आहे.

या उल्हासनगर शहरामधील लोकांना परिवहन सेवा उपलब्ध नव्हती. ती अत्यंत आवश्यकता होती. मध्यंतरी पंधरा—वीस दिवस परिवहन ठेकेदाराने परिवहन सेवा बंद केली होती. त्यावर नागरीकांकडुन फार मोठया प्रमाणावर मागणी होती की, परिवहन सेवा त्वरीत चालु करा आम्हांस खुप खुप त्रासाचे होत आहे. तर अशा नविन योजना या शहरात आणल्या. आम्ही काहीच कामे केली नाही असे नाही. बरीच काही कामे करण्याचा प्रयत्न केला. परंतु निधीची कमतरता असल्याकारणाने आम्ही काही करु शकलो नाहीत. मध्यंतरी रस्त्यांच्या कामाबाबत काही ठेकेदाराने संप केला होता. त्यांचे म्हणणे होते की, आम्हांला देयक रक्कम अदा केली जात नाही. आपण सर्व काही करु शकतो परंतु पैश्याचे नाटक करु शकत नाही. परंतु तरीही या उल्हासनगरमधील जनतेला संगणकीकरणाची सुविधा आम्ही दिली. लोकांनी महानगरपालिकेकडे येण्या ऐवजी जवळ जवळ १५ ठिकाणी अशी व्यवस्था केली आहे की, महापालिका लोकांकडे जात आहे. नागरी सुविधा केंद्र आम्ही चालु केली. जेणेकरुन लोकांच्या खर्चात बचत व्हावी. कुर्ला कॅम्प किंवा कॅम्प नं. ५ मधुन लोकांना येथे येण्याची गरज नाही. मग भलेही त्यांचे जन्म दाखल्याचे काम असो किंवा मिळकत कर भरायचा असो, लोकांच्या घरापर्यंत जाण्याचा महापालिकेने पहिल्यांदाच प्रयत्न केला आहे. आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांनी उल्लेख केला की, आमच्या विदयुत विभागाचे काम अतिशय चांगल्याप्रकारे चालु आहे. श्री. मुकेश आयलानी यांच्या पर्यवेक्षणाखाली आमचा विदयुत विभाग अतिशय चांगले काम करत आहे. गोल मैदान, सपना गार्डन, जिजामाता गार्डन आमचे सदस्य श्री. नरेंद्रकुमारी ठाकुर यांनी मागील काही दिवसांपुर्वी खास करुन सपना गार्डनवर लक्ष केंद्रीत केले आहे. तर प्रत्येक नगरसेवकाने आपापल्या प्रभागामध्ये असे एक एक उदयान विकसित केले आहे, त्याबद्दल त्यांची प्रशंसा केली पाहिजे. रोटरी गार्डन आहे, कर्मा पॅलेस, एकता कॉलनी, राजीव इंजिनिअरींग वर्कस, सुप्रभात गार्डन, धनराज निचलानी गार्डन, तसेच या महानगरपालिका मुख्यालयाची जी इमारत आहे ती क्रित्येक वर्षापासून जशीच्या तशीच होती. नगरपालिकेचे महानगरपालिकेचे रुपांतर झाले परंतु मुख्यालयाची इमारत जशीच्या तशीच होती. या इमारतीमध्ये काही बदल केलेले नव्हते. अधिकारी बरेच आहेत, पदाधिकारी बरेच आहेत त्यांना बसण्यास जागा नाही, दालनावरुन समिती सदस्यांची आपसामध्ये भांडणे व्हायची, पदाधिकाऱ्यांची भांडणे व्हायची, श्री. बागेश्वर साहेब येथे आले तर त्यांना बसण्यास जागा नव्हती. अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त असे जे अधिकारी आले त्यांना बसण्यास जागा नव्हती. त्याना इकडेतिकडे भटकावे लागत

होते. याचे दालन तो पटकावत होता तर त्याचे दालन तो पटकावत होते याचा विचार करुन या महापालिका इमारतीचे दोन्ही बाजुने विस्तारीकरण करण्यात आले. विद्युत विभागास अद्यावत करण्यासाठी त्यांना त्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली ती उल्हासनगरमध्ये जनतेला दिवाबत्तीची चांगली सुविधा देण्यासाठी प्रत्येक विभागासाठी स्वतंत्रपणे व्यवस्था करण्याचा संकल्प केला. ग्रीन बिल्डींगचा कन्सेंप्ट होता तो अपुरा आहे, आयुक्त साहेब आपण तो लवकरात लवकर पुर्ण करावा, ग्रीन बिल्डींग नको आहे पण चांगल्यात चांगली इमारत व्हावी, ग्रीन बिल्डींग काय आहे ते आम्हाला माहित नाही, त्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने आणला होता व त्याची इतकी तातडीने काय निकड होती हे माहित नाही, ते काम थाबंले परंतु आपले जे सभागृह आहे ज्याला आपण नाव दिले आहे स्वर्गवासी प्रकाश परांजपे सभागृह ते लवकरात लवकर पूर्ण करा ते काम सद्या प्रलंबित आहे, व्ही.टी.सी. सारखे मैदान आहे तेथे आपण चांगले स्टेडीअम करु शकतो, ते या प्रस्तावामध्ये आहे ते देण्याचा आम्ही या प्रस्तावामध्ये संकल्प करतो. मला वाटते बऱ्यासशा सदस्यांनी आपले मत व्यक्त केले होते, आपल्या सूचना मांडल्या होत्या, श्री. सुर्वे साहेबांनी काही सूचना केल्या होत्या, श्री. भुल्लर महाराजांनी काही सूचना केल्या होत्या. त्यासर्व बरोबर आहेत असेही नाही, परंतु चुकीच्यो आहेत असेही नाही. कर वाढविण्यामध्ये स्थायी समिती सदस्यांना प्रसन्नता वाटत नाही. परंतु ना ईलाज असतो जर शहर चालवायचे आहे, महापालिका चालवायची आहे, तर सर्वच्या सर्व सूचना नाकारुही शकत नाही. काहीना अर्थसंकल्पास केवल विरोध करायचा होता, विदयुत मंडळाचे जेथे ३०० रुपये देयक येत होते तेथे १५०० रुपये येत आहे, त्याबाबत कोणी काही करत नाही. डिझेलचा खर्च किती होत आहे, पाच वर्षापूर्वी किती होता आता किती आहे, त्या विरोधात आपण मोहीम राबविणार का? पेट्रोलच्या दरामध्ये वारंवार वाढ होत आहे. त्यासाठी आपण सर्वांनी मिळुन आवाज उठविला पाहिजे, परंतु ती आपली संस्था आहे, राज्यशासन आपणांस अनुदान देत नाही. आपण असे प्रयत्न करुयात राज्यशासनाने आपणांस जास्तीत जास्त अनुदान दयावे. १५५ कोटीच्या ठिकाणी २५० कोटी अनुदान दयावे. मग लोकांना सर्वकाही सोयीसुविधा फुकटात देवु. त्यामध्ये पाहिजेत तर लाईटचे बिलही भरु. शासन म्हणते की आपण आपले उत्पन्न वाढवा, जर शासन विनाकारण लाईट बिल वाढवत आहे, त्याविरोधात आपण सर्वजण आदोंलन करु या. शिक्षण उपकर व इतर खर्च जो वाढलेला आहे काय ८ टक्के आहे ना साहेब, म्हणजे ज्या ठिकाणी १५० रुपये टॅक्स येत असेल तेथे फक्त १२ रुपये वाढतील. १०० रुपये असेल तर ८ रुपये वाढतील. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न जास्त वाढणार नाही, महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढविले पाहिजे ते वाढविले नाही ते तेवढेच ठेवलेले आहे त्यामुळे त्याला विरोध न करता या उल्हासनगरच्या भल्यासाठी आणि ...... श्री. मनोज सयानी यांनी सांगितले की, आयुक्त साहेब तुमच्यावर जबाबदारी टाकलेली आहे. १५५ कोटी उत्पन्न होईल का? आमची संमती आहे की, कायदेशीर पध्दतीने वसुली करा, आम्ही कुणीही हस्तक्षेप करणार नाही, पण १५५ कोटी पेक्षा कमी वसुली होता कामा नये. शासनाची अपेक्षा आहे की, तुमचे जकातीचे लक्ष जर १५५ कोटीचे असेल तर स्थानिक संस्था करातुन तेवढेच उत्पन्न झाले पाहिजे ही त्या मागची भावना आहे, ते लक्ष गाठण्यासाठी आम्ही सर्वजण तुमच्या बरोबर आहोत, आमच्या विरोधी पक्षानी सांगितले आहे आणि आम्हीही सांगतो तुम्ही तुमचे सर्व कायदेशीर मार्ग अंवलबा, आम्ही त्यामध्ये हस्तक्षेप करणार नाही. पण त्यामध्ये त्याचा एक आक्षेप होता की, गैर मार्गाने लोकांना वेठीस धरु नका. मग ते १५५ कोटी असेल किंवा २५५ कोटी असेल. पण जास्तीत जास्त वसुली करा तिथे कुठे तुम्ही कमी पडु नका, तर पुढल्या वर्षीचा अर्थसंकल्प कुठलीही वाढ न करता उल्हासनगर शहराला एक सुसज्य शहर देवु, ज्या लोकांनी तुमच्या पुढे सूचना मांडलेल्या आहेत मग त्या ठेकेदारांवर कारवाई करण्याच्या संदर्भातील असो की त्याच्याकडुन काम करुन घेणे. अधिकाऱ्यांकडुन, कर्मचाऱ्यांकडुन काम करुन घ्यायचे आहे ते कसे करुन घ्यायचे ते तुमचे काम आहे. जास्तीत जास्त टॅक्स वसुली कशी होईल. सार्वजनिक बाधंकाम विभागाकडून होणारी कामे त्याबाबतीत आरोप झालेले आहेत. मध्ये मी एक प्रकरण काढले होते की एका ठिकाणी रस्त्याचे काम करतांना डांबराचे प्रमाण कमी होते ते तुमच्या निदर्शनास आलेच असेल. त्या ठेकेदाराने कामच बंद केले. म्हणजे चांगले काम करायचे नसेल तर काम बंद करायचे हा एक उपाय त्या ठेकेदाराला आहे. तर अशा ठेकेदारावर कारवाई करा. आणि जर ठेकेदारावर कारवाई होत नसेल तर संबंधीत अधिका—यांवर, कर्मचा—यांवर कारवाई करा. गेल्या पाच वर्षामध्ये सत्ताधारी पक्ष म्हणुन आम्ही केलेली कामे पुर्वीची परंपरा, पुर्वी होत असलेली कामे, पुर्वीच्या प्रथा या संपुर्ण सभागृहामध्ये ठेवलेल्या आहेत, स्थायी समितीने जो प्रस्ताव पारीत केलेला होता, त्यामध्ये काही सुधारणा करुन याठिकाणी मी प्रस्ताव पारीत करतोय मी संपुर्ण सभागृहाला विंनती करतोय की आपण याचा विचार करा.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५, ९६,९७,९८,९९,१००,१०४,१२६,१५० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक ०४ दिनांक २९/५/२०१२ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २०१२—१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास, सन २०११—१२ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबीकरिता पुढील प्रमाणे अंतिम मंजुरी देत आहे .

मालमत्ता कर : (कर योग्य मुल्य पध्दत) एक भांडवली पध्दत तुम्ही नमुद केलेली आहे. दुसरी करयोग्य मूल्य पध्दत, स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रचलित करांचे दरात महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ

करण्यास मान्यता देत आहे असा मी येथे प्रस्ताव ठेवतो. स्थायी समितीमध्ये जो प्रस्ताव ठेवलेला आहे त्याची प्रत्येकाला प्रत मिळालेली आहे आणि मागच्या दिड महिन्यापासून ती आपणांकडे आहे. स्थायी समितीची सभा २९ तारखेला झालेली आहे आणि आज ९ तारीख आहे. त्याच्यामध्ये जी सुधारणा आहे ती मी याठिकाणी प्रस्तावित करतो.

मालमत्ता कर : भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

पाणी पट्टी दर : स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रचलीत दरात पुढील प्रमाणे फेरफाराच्या अधिन राहून महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ करण्यास मान्यता देत आहे. मात्र त्यामध्ये लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे बांधकाम असलेल्या मिळकतींसाठी म्हणजे झोपडपट्ट्यासाठी रुपये १२०/– प्रतिमहा पाणीपट्टी केली होती, ती आता आम्ही १००/– प्रतिमहा प्रस्तावित करतो. झोपडपट्टीतील लोक १२० रुपये एवढी पाणीपट्टी भरु शकत नाहीत. मी भरु शकतो आमचे श्री. भगवान भालेराव भरु शकतात परंतु झोपडपट्टीतील गरीब माणुस भरु शकत नाही, त्यामुळे पाणीपट्टीमध्ये कपात केली आहे ती १०० रुपये ठेवली आहे.

पाणी टॅकर भाडे : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात येत आहे. पाणी टॅकरवर कुठलाही दर आकारला जाणार नाही.

अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे शहरातील इमारतीकरिता अग्निशमन फी वसुल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नागरिकांना पुरविण्यात येणा–या सेवा : स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रचलीत दरात महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वर्ष २०११–१२ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय्य कायम ठेवण्यास मंजुरी देण्यात येत आहे . तसेच साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय जकात किंवा स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर हे दोन्ही उत्पन्नाच्या बाबीमंध्ये वर्ग करण्यात यावे.

वर्ष २०१०–११ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, इतर अंदाजपत्रक, माहिती व अभिप्रायाची नोंद घेण्यात येत आहे.

मा. आयुक्तांचे अभिप्राय लक्षात घेता, प्रशासनाने वसुलीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत अशा सूचना देण्यात येत आहेत म्हणजे यापूर्वी मी जे बोललो तेच. श्रीमती ज्योती भाभी यांनी जी सूचना मांडली आहे की मिळकत कर व इतर कर यांची जास्तीत जास्त वसुली करावी जेणेकरुन आम्हांस ही वाढ करा ही वाढ करा अशी सूचना करावी लागणार नाही.

नगरसेवक व इतर पदाधिका–यांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्यात स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे वित्तीय वर्ष २०१२–१३ पासून वाढ करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

जकात : राज्य शासनाने दिनांक १/४/२०१२ पासून जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केले होते. तद्नंतर १७/४/२०१२ पासून पुन्हा जकात लागू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत पुन्हा जकात सुरु राहिल्यास , स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे जकात सुरु झाल्याच्या दिनांकापासून दर वाढ मंजुर करण्यात येत आहे. जर स्थानिक संस्था कर असेल तर प्रश्नच नाही.

**आयुक्त, श्री. बालाजी खतगावकर:–** स्थानिक संस्था कर कायम चालु राहिला तर हा प्रस्तावित जकात वाढ स्थानिक संस्था कराला लागु राहणार आहे की नाही हे ही स्पष्ट करा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** होय स्थानिक संस्था कराला लागु असेल.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:–** जकातीचे जे दर आपण वाढविले आहेत, जकात जर चालु होत नसेल तर........

यावेळी सदस्य श्री. राजेश कंडारे, श्री. सुभाष मनसुलकर, श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** ४५५ कोटी ७८ लाख ०७ हजार, आणि प्राथमिक शिक्षण याचा खर्च ५० लाख असे एकुण खर्च ४५५ कोटी ६४ लाख ३८ हजार, अखेरची शिल्लक १३ लाख ६९ हजार,

प्रवेशव्दार, यात्री निवास, समाज मंदिर , स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा या लेखा शीर्षातर्गंत रक्कम रुपये २.७५ कोटी या रक्कमेतून प्रत्येकी ५ लाख प्रमाणे कामे हाती घेण्यासाठी नमूद एकूण ५५ प्रभागात समाविष्ट प्रभाग २४ अ ऐवजी प्रभाग १९ ब असे वाचण्यात यावे.

मागील कालावधीतील निवडून आलेल्या सदस्यांना लॅपटॉप देण्यात आले होते . सध्याच्या आधुनिकीकरणामूळे आयपॅड हे नविन साधन बाजारात उपलब्ध झाले असून निवडून आलेल्या नवीन सदस्यांनी आयपॅड ची मागणी केलेली आहे. सबब ज्या सदस्यांना आयपॅड पाहिजे त्यांना लॅपटॉप ऐवजी आयपॅड देण्यात यावे. ज्यांना नसेल आवश्यकता त्यांनी घेवु नयेत कारण हे ऐच्छिक आहे, मागच्या वेळेस नगरसेवकांना त्याचा उपयोग झालाच नाही, असे श्रीमती मिना सोंडे यांनी याठिकाणी सांगितले आहे. बऱ्यासशा लोकांनी ईमेल आयडी दिलेलाच नाही. त्यासाठी त्यांना कृपया आपण देवु नये असा माझा ठराव प्रस्तावित आहे. ज्याना वापर करता येईल त्यांनाच दया. ईमेल आयडी आतापर्यंत ज्या कुणाचा आला नसेल त्याचा प्रस्ताव आला तरी प्रशासनाने तो स्विकारु नये.

| अनु. क्र | नगरसेवकाचे नाव | कामाचे तपशील |
|---|---|---|
| १ | | डॉ. बाबासाहेब आबेंडकर चौक ते बजरंग, आईस फॅक्टरी रस्ता डांबरीकरण करणे |
| २ | | रुहानी सत्संग ते तुळशी निवास रस्ता डांबरीकरण करणे |
| ३ | श्री. राजेश वदारिया | केवलराम चौक जवळ, नाना नानी उद्यान विकसित करणे |
| ४ | | प्रभाग क्र. ७ मधील दोन उद्यान विकसित करणे |
| ५ | श्री. सुनिल सुर्वे | गजाननगर पासून सितारामनगर मार्गे मद्रासीपाडयापर्यंत मोठा नाला बाधंणे |
| ६ | श्री. सुनिल सुर्वे | सितारामनगर येथे कोलगे हाउस जवळ १० शिटचे शौचालय बांधणे |
| ७ | श्रीमती ज्योती गायकवाड | बाल शिवाजी उद्यान दुरुस्ती व नुतनीकरण |
| ८ | श्री. | समाज मदिंर हॉल, बॅरेक नं. १६४—१६८, उल्हासनगर—१ |
| ९ | | सरकारी शौचालय, बॅरेक नं. १०४, उल्हासनगर—१ |
| १० | | देव समाज ते मोनिष अपार्टमेन्ट व्हाया शिवनेरी हॉस्पीटल, उल्हासनगर—४.सिमेंट रोड |
| ११ | | १ नंबर बस स्टॉप ते शिवसेना शाखा, उल्हासनगर—१ पर्यंत, एम ३५० रोड ही सर्व काम समाविष्ट करावीत. |
| १२ | श्री. राजेश वानखेडे | आंबेडकर उद्यान व लाललोही उद्यान दुरुस्ती व नुतनीकरण करणे |
| | | व्ही.टी.सी. मैदान येथे मिनी स्टेडियमची बऱ्याच वर्षापासून लोकांनी स्वप्न बघितली आहे, त्यावर जो खर्च असेल एखात कोटी तो खर्च करायला हरकत नाही. |
| १८ | श्री. नरेंद्र कुमार ठाकुर | ''सिंधु सभा हॉल'' राजु गांधी लॉन, उल्हासनगर—३ |
| १९ | | टेलीफोन इक्सचेंज समोरील राहूलनगर पासून इंदीरा गांधीनगर मार्गे दुनिचंद कालानी कॉलेज समोर राजीव गांधीनगर इएमटी कंपनी येथे मोठे नाले बाधंणे |

वरील सर्व बाबींच्या तरतूदीच्या प्रयोजनासाठी वरील अंदाजपत्रक छापून प्रत्येक सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल.

मी सर्व सभागृहाला विनंती करतो की, स्थायी समितीने प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रक किंवा अर्थसंकल्पामध्ये महासभेने प्रस्तावित केलेल्या या ज्या सुधारणा आहे त्या समाविष्ट करुन मंजुर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि मा. महापौरांना विनंती करतो की आपण हा विषय मंजुरीस टाका.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मतदान घ्या.

यावेळी सदस्य श्री. गोदुमल क्रिशनानी, सदस्या श्रीमती कमला क्रिशनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>**मा. महापौरजी, एका मुद्दयाबाबत मी आपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो की, जकातीचे जे आपण दर वाढविले आहेत काय ते दर स्थानिक संस्था करावर सुध्दा लागु होतील का? ही गोष्ट स्पष्ट करा. दुसरे असे की, आपण पाणी पट्टीचा जो दर कमी केला तो कोणकोणत्या बांधकामांवर कमी केला हे दोन मुद्दे जरा स्पष्ट केले जावेत.

**<u>आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर:—</u>**मा. महापौर महोदय, जकातीचें दर वाढविण्याचा येथे जो मुद्दा आहे, सभागृहाने याबाबत अनुरोध केला होता की, हा दर स्थानिक संस्था करास लागु होईल काय? तो स्थानिक संस्था कराला लागु होत नाही.

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**श्री. राजु जग्यासीजी, याबाबत काय आहे मी आपणांस स्पष्टीकरण देवु इच्छितो, जकात चालु झाली तर हे दर असतील, स्थानिक संस्था कर लागु राहिला तर त्याबाबतचे दर शासनाकडुन निश्चित करुन येतील.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**आपल्या स्तरावर स्थानिक संस्था कर व जकात हे वेगवेगळे कर आहेत.

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**झोपडपट्टीधारकांना १२० रुपये पाणी पट्टी प्रस्तावित केली होती. ती कमी करुन १०० रुपये केली आहे.

यावेळी सदस्य श्री. गोदुमल क्रिशनानी, सदस्या श्रीमती कमला क्रिशनानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**फ्लॅटधारकांना पाणी पट्टी किती आहे?

**<u>उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>**बाकी सर्वांना स्थायी समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे पाणी पट्टी लागु राहिल.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**मा. महापौरजी, वाढत्या करांच्या दरास आमचा विरोध आहे. आमची जी मागणी आहे, त्याप्रमाणे तिच्याबद्दल विरोध करत असाल तर आमचे समर्थन आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**माझी आपणांस विनंती आहे की, अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत केला जावा. श्री. राजु जग्यासीजी आपण खुपच चांगल्याप्रकारे बोललात यासाठी अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत केला जावा.

यावेळी सदस्या श्रीमती भागिबाई लबाना, श्रीमती लिलाबाई आशान, कु. जयश्री जग्यासी, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती जयश्री पाटील हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**श्री. सुर्वेजी आमचे निवेदन आहे की, जनतेवर हे जे करांचे ओझे लादले आहे, ते कमी केले जावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>**आपण ज्या दोन करांचा उल्लेख केलेला आहे, त्याबद्दल मनाई केलेली आहे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**कर व पाणी पट्टीचे दर वाढवु नयेत, आमचे समर्थन असेल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**अर्थसंकल्प सर्वसंमतीने पारीत करा.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी:—</u>**दर वाढवु नका आम्ही सर्वसंमतीने अर्थसंकल्प पारीत करु.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**या दरवाढीस आपला विरोध आहे तर पेट्रोल व डिझेलचे दर वाढले तेव्हा आपण कोठे होतात? गॅसचे दर वाढले तेव्हा कोठे गेला होतात? तेव्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसवाले कोठे गेले होते?

यावेळी सदस्या श्रीमती भागिबाई लबाना, श्रीमती लिलाबाई आशान, कु. जयश्री जग्यासी, कु. शकुंतला जग्यासी, श्रीमती जयश्री पाटील यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**मा. महापौरजी, आमची मागणी आहे की, बॅरेकच्या रुमसाठी सुध्दा टॅक्सचे दर कमी केले जावेत.

**<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>**मा. महापौरजी, बॅरेकच्या खोल्यांवरील मालमत्ता कर व पाण्याचा दर कमी केला आहे की नाही? मा. महापौरजी, आमचे ऐकुन घ्या. मी काय म्हणतो बॅरकच्या खोल्यांवरील मालमत्ता कर कमी केला जावा. पाणी दर कमी केला जावा. नाहीतर अर्थसंकल्पास आमचा विरोध आहे.

यावेळी सदस्य श्री. जाफरअली चौधरी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मा. महापौरजी, अर्थसंकल्प सर्वसंमतीने मंजुर झाला आहे? श्री. राजु जग्यासी यांचे आवाहन आहे.

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—</u>**मा. महापौरजी, आमची एक विनंती आहे की, बॅरेकच्या खोल्या आहेत त्यांचा मालमत्ता कर कमी केला जावा त्यांमध्ये सुध्दा बरेच गरीब लोक राहतात.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>**पाणी पट्टी व मालमत्ता कर कमी केला तर हा अर्थसंकल्प आम्ही सर्वसंमतीने पारीत करण्यास तयार आहोत. श्री. जमनुजी आपण पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ असतांना असा निर्णय सर्वसंमतीने झाला तर तो एक इतिहास रचल्यासारखे होईल.

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी :—</u>**बॅरेकच्या खोल्यांवरील मालमत्ता कर कमी केला जावा.

**<u>महापालिका सचिव:—</u>**सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे साहेबांनी जो लेखी प्रस्ताव वाचुन दाखविला, व त्याचबरोबर त्यांनी काही विकास कामे वाचुन दाखविली. व त्याचबरोबर ही सर्व पत्र माझ्याकडे उपलब्ध आहेत. ज्यांवर मा. पीठासीन अधिका—यांनी सही करुन दिलेली आहे, त्यात दर्शविलेली कामे अर्थसंकल्पात समाविष्ट केली जातील. या विषयी कुणाला काही हरकत असेल तर सांगा नाहीतर यानंतर काही होणार नाही.

यावेळी सदस्य श्री. जाफरअली चौधरी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथिल रस्त्यांबाबत काय केले ते जरा स्पष्ट करा. कोणत्या रस्त्यांची कामे समाविष्ट केली आहेत, कोणत्या रस्त्यांची कामे समाविष्ट केली नाहीत? बहुतांश रस्त्याची स्थिती अतिशय खराब आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**मा. महापौरजी, मी सांगितलेल्या रस्त्याचे काम समाविष्ट केले जावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**विरोध करणा—यांची कोणतीही कामे समाविष्ट करायची नाहीत अशी सभागृहास माझी विनंती आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>** सन्माननिय महापौरजी, अर्थसंकल्पाबाबतीत जे मतदान घ्यावयास लावतात त्यांचे कोणतेही काम अर्थसंकल्पात समाविष्ट केले जावु नये. आमचा त्यांच्या कामास विरोध असेल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मा.महापौरजी त्यांची कोणतीही कामे समाविष्ट करुन घेवु नका. त्यांना काम करण्याची इच्छा नाही.

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>**उल्हासनगरमधील सर्व रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. एकही रस्ता चांगला नाही.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मा. पीठासीन अधिका—यांचा आदेश आहे की, अर्थसंकल्पावर मतदान घेतले जावे. अर्थसंकल्पा विषयीच्या विरोधी पक्षीयांच्या सूचना रद्द करुन श्री. रमेश चव्हाण यांनी प्रस्तावित

केले आहे त्यात श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या सुधारणांसह मंजुर करण्याच्या बाजुने जे आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**आमचा विरोध आहे, विरोध.

**प्रस्तावाच्या बाजुने ४५ मते**

१ श्रीमती नेहा (बेबी) नंदकूमार भोईर

२ श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड

३ श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग

४ श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर

५ श्री. विजय खंडु सुपाळे

६ श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी

७ श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण

८ श्रीमती बोडारे वसुधा धनंजय

९ श्री बोडारे धनंजय बाबूराव

१० श्री सुभाष मलन्ना मनसुलकर

११ श्रीमती जयश्री गजानन कांबळी

१२ श्रीमती मंदा सागर सोनकांबळे

१३ श्री सुरेश मधुकर जाधव

१४ श्रीमती अनिता सचिन भानुशाली

१५ श्री रमेश महादेव चव्हाण

१६ श्री. जयेंद्र चंद्रकात मोरे

१७ श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे

१८ श्री. प्रधान धर्मा पाटील

१९ श्रीमती अपेक्षा विकास पाटील

२० श्री. राम (चार्ली) पारवाणी

२१ श्रीमती अर्चना गोकूळ करणकाळे

२२ श्रीमती मीना कौर अजित सिंग लबाना

२३ श्री. जमनादास खुबचंद पुरसवाणी

२४ डॉ. नीना प्रकाश नाथानी

२५ श्रीमती मीना कुमार आयलानी

२६ श्री. हरेश परमानंद जग्यासी

२७ श्रीमती जया प्रकाश माखीजा

२८ श्रीमती शकुंतला जग्यासी

२९ श्रीमती माया हरेश चावला

३० श्रीमती जयश्री जग्यासी

३१ श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील

३२ डॉ. महेश गजानन गावडे

३३ श्रीमती अनिता संतोष तरे

३४ श्री दिपक लछमनदास सिरवानी

३५ श्रीमती शैला पांडुरंग सोनताटे

३६ श्री विजय रामभाऊ तायडे

३७ श्रीमती इंदिरा जमनादास उदासी

३८ श्रीमती आशा नाना बिराडे

३९ श्रीमती पुष्पा मिलींद (नाना) बागुल

४० श्री भगवान शंकर भालेराव

४१ श्रीमती पंचशीला नाना पवार

४२ श्री सुनिल मुकुंद सुर्वे

४३ श्री. राजेश देवेंद्र वानखेडे

४४ श्री. विजय चाहु पाटील

४५ श्री सुजीतकुमार के. चक्रवर्ती

**महापालिका सचिव :—**विरोधी पक्षीयांच्या सूचनांच्या प्रस्तावला समर्थन देवुन श्री. रमेश चव्हाण यांनी प्रस्तावित केले व त्यात श्री. धनंजय बोडारे यांनी सुचविलेल्या फेरफारासह अर्थसंकल्प मंजुर करण्याच्या विरोधात जे आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**सदस्य श्री. मनोज सयानी :—**वाढत्या करांना आमचा विरोध आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी, कॉंग्रेस पार्टी त्याचबरोबर बाहेर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जे पदाधिकारी व कार्यकर्ते उपोषणास बसले आहेत, त्यांचेही आम्ही मनापासुन आभार मानतो की शहरातील मालमत्तांवर वाढत्या करांबाबत त्यांनी आपला विरोध प्रकट केला आहे.



**प्रस्तावाच्या विरोधात २५ मते**

१ श्री. राजु रामसिंग कंडारे

२ श्री. जाफर अली चौधरी

३ श्रीमती भागीबाई हारीसींग लबाना

४ श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा

५ श्रीमती ज्योती सुरेश कालानी

६ श्री गणपत गोविंद एडके

७ श्रीमती शशिकला शिवाजी आवारे

८ श्रीमती लक्ष्मी सुरेश सिंग

९ श्रीमती आशा प्रभुनाथ गुप्ता

१०  श्रीमती इसरद सऊद खान

११  श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल

१२  श्रीमती वनिता बब्बू भतिजा

१३  श्री राजू किशीनचंद जग्यासी

१४  श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर

१५  श्रीमती सोनिया राजू जग्यासी

१६  श्री. गुरुनो भिकोमल वलेच्छा

१७  श्रीमती कमला गोदुमल क्रिशनानी

१८  श्री. सतराम फतनदास जेसवानी

१९  श्री. राजेश नानिकराम वधरिया

२०  श्री. गोदुमल नारायणदास क्रिशनानी

२१  श्रीमती पिंकी मुरलीधर उदासी

२२  श्रीमती दीप्ती नवीन दुधानी

२३  श्रीमती जया मोहन साधवानी

२४  श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे

२५  श्रीमती मीना दिपक सोनेजी (सोंड)

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :– स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २०१२–१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०११–१२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे**

**<u>प्रस्तावना</u>**

सन २०११–१२ या अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रुपये ४५०.४१ कोटी अपेक्षित होते आणि खर्च रुपये ४४९.९६ कोटी अपेक्षित होता. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षाकरिता आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाजात येणेप्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती .

| | | | |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** | : | **२८८.१२** | **कोटी** |
| **खर्च** | : | **२८७.९८** | **कोटी** |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे आयुक्तांनी सन २०१२–१३ करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले होते .

| | | | |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** | : | **३६८.८९** | **कोटी** |
| **खर्च** | : | **४१३.७९** | **कोटी** |

वित्तीय वर्ष २०१२–१३ चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रुपये ४४.८९ कोटी जकात, मालमत्ता कर, पाणी पट्टी, टॅकर भाडे व इतर कर व दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला होता.

**<u>शिक्षण मंडळाचे सन २०११ – १२ चे सुधारित अंदाज</u>** :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०११— १२ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता , शिक्षण मंडळाचे वर्ष २०११ —२०१२ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते .

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : | **२०,४६,९४,८३६/—** |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : | **२०,२९,७४,२५४/—** |
| **अखेरची शिल्लक रुपये** | : | **१७,२०,५८२/—** |

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ११,७६,०३,५८१/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यात आले होते .

**<u>शिक्षण मंडळाचे सन २०१२—१३ चे मूळ अंदाज</u>** :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे वर्ष २०१२—२०१३ साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते .

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये** | : | **२४,८१,३९,०००/—** |
| **अंदाजपत्रकीय खर्च रुपये** | : | **२४,८१,३९,०००/—** |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ९,३१,६३,०००/— शासकीय अनुदान व रक्कम रु. १५,३७,६१,०००/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून तरतूद करण्यात आली होती .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८ मधील तरतूदीच्या अधिन राहून परिवहन समिती ठराव क्रमांक : १६ दिनांक १४/३/२०१२ अन्वये वर्ष २०११—२०१२ चे सुधारित व वर्ष २०१२—१३ साठी परिवहन उपक्रमाचे पुढील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते .

**<u>परिवहन उपक्रमाचे वर्ष २०१२—२०१३ चे मूळ अंदाजपत्रक :</u>**

**(आकडे हजारात)**

| | | | |
|---|---|---|---|
| **"ब" अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | **६६२** |
| **"ब" अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | **१९३६** |
| **परिवहनसेवा खर्च** | : | **रुपये.** | **५००** |
| **सभासदाना मानधन व इतर भत्ते** | : | **रुपये** | **१४३६** |

उत्पन्न व खर्चाचे अंदाज लक्षात घेता, राहणारी तुट 'अ' अंदाजपत्रकातून वर्ग करण्यास मंजुरी देण्यात आली .

**<u>परिवहन उपक्रमाचे वर्ष २०११—२०१२ चे सुधारित अंदाजपत्रक :</u>**

**(आकडे हजारात)**

| | | | |
|---|---|---|---|
| **"ब" अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | **५९८** |
| **"ब" अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | **१८७** |
| **परिवहनसेवा खर्च** | : | **रुपये.** | **——** |
| **सभासदाना मानधन व इतर भत्ते** | : | **रुपये** | **१८७** |

शिक्षण मंडळाचे सन २०११—१२ चे सुधारीत , सन २०१२—१३ चे मूळ अंदाजपत्रक, परिवहन उपक्रमाचे सन २०११—१२ चे सुधारित , सन २०१२—१३ चे मूळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी सन २०११—१२ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१२—१३ चे जमा व खर्चाचे अंदाज, कर व दरवाढीचे प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समिती मार्फत ठराव क्रमांक :०४ दिनांक २९/५/२०१२ अन्वये पुढील प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले होते .

**<u>महापालिकेचे सन २०११—१२ चे सुधारीत अंदाजपत्रक</u>**

आयुक्तांनी वर्ष २०११—१२ करिता उत्पन्न व खर्चाचे सादर करण्यात आलेले सुधारीत अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन अंतिम करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

| अ.क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे . | ज्या लेखा शीर्षातून वर्ग करावयाची आहे . | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कुत्र्याच्या दंशावर औषधोपचार खर्च | हिवताप व डेंगु प्रतिबंधक खर्च | ५०० |
| २ | इतर खर्च (अ.अंदाज,भाग—१ मधील इ—संकीर्ण—अ.क्र.—२२) | नगरसवेकांना मानधन , सभा व इतर भत्ते | ३०० |
| ३ | शोध विकास व अपारंपारिक वीज व उर्जा | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३०० |
| ४ | पुर परिस्थिती निवारण अनुदानातून विकास कार्य | नवीन रस्ते बनविणे | ४२०० |
| ५ | रोजगार हमी कर परतावा | शिक्षण कर | १०० |
| ६ | इतर आकस्मिक खर्च (अ—अंदाज, भाग—३ मधील अ.क्र.८) | ग्रुप इन्शुरन्सपोटी मिळणारी रक्कम | २० |
| ७ | वाहन व मशिनरी खरेदी | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | १६०० |

(आकडे हजारात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | २१४६५९१ | |
| **ब अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ५९८ | |
| **क अंदाजपत्रकीय उत्पन्न** | : | **रुपये.** | ७३४०३७ | २८८१२२६ |
| **अ अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | १८२३३९९ | |
| **ब अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये** | १८७ | |
| **क अंदाजपत्रकीय खर्च** | : | **रुपये.** | १०५६२५८ | २८७९८४४ |

**महापालिकेचे सन २०१२—१३ चे मूळ अदाज :**

आयुक्तांनी वर्ष २०१२—१३ करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करुन करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ३६८८९२३ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ४१३७८८८ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व साधारण कर | +११९६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१) | +९९०० | १८ |
| १ | महापालिका शिक्षण कर | +२३४०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —१)(दुर्बल घटक) | +११००० | १८ |
| १ | वृक्ष कर | +२६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२) | +११००० | १८ |
| १ | पथ कर | +२८६०० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —२)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| २ | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +९०००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३) | +११००० | १९ |
| ४ | शिक्षण कर रिबेट | +७८० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —३)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| ५ | रोजगार हमी करावरील सुट | +१०४ | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४) | +१३२०० | १९ |
| ८ | शिक्षण कर | +३९००० | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग —४)(दुर्बल घटक) | +९९०० | १९ |
| ८ | रोजगार हमी कर | +५२०० | उदयाने बनविणे | +६००० | २३ |
| ३२ | पाणी बीले वसुली (कर) | +१५०००० | बागेतील खेळणी खरेदी | +१००० | २३ |
| ३२ | पाणी बीले वसुली (पा.पु.) | +१८०००० | नवीन कारंजे बसविणे | +१५०० | २३ |
| ३२ | पाणी पुरवठा लाभ कर | +१३००० | महापौर निधी | +१०००० | २४ |
| ३२ | मल प्रवाह सुविधा लाभ कर | +५२०० | उप महापौर निधी | +५००० | २४ |
| ३२ | मल प्रवाह कर | +२३४०० | स्थायी समिती सभापती निधी | +५००० | २४ |
| ४ | नोंदणी शुल्क अनुदान | +२७५०० | नगरसेवक निधी | +२१६०० | २४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | फोरेस्ट नाका ते १७ सेक्शन पर्यंत पाईपलाईन साठी अनुदान | +८५००० | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | +१५६०० | २५ |
| ०५ | महापालिका मालमत्ता विनियोग | +८०००० | शिक्षण कर परतावा | +३९००० | २८ |
| ०५ | प्रतिनियुक्तीवरील कर्मचा—यांचे पगार | — १०००० | रोजगार हमी कर परतावा | +५२०० | २८ |
| | | | जंतुनाशक खरेदी | +४००० | १५ |
| | | | औषध खरेदी | +१००० | १५ |
| | | | कुत्रयाच्या दंशावर औषधोपचार खर्च | +१५०० | १५ |
| | | | श्वान निर्बीजीकरण खर्च | +१५०० | १६ |
| | | | अंत्यविधी स्थाने दुरुस्ती व निगा | +३५०० | १८ |
| | | | नगरसेवकांना मानधन व इतर भत्ते | +६००० | २० |
| | | | महापालिका मालमत्ता सुरक्षितता | +२५०० | २२ |
| | | | नाला व गटार सफाई खर्च | +१०००० | ३९ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग —१) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र—१)(दुर्बल घटक) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग —२) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र—२)(दुर्बल घटक) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग —३) | +१००० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र—३)(दुर्बल घटक) | +९०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्रभाग —४) | +१२०० | ४० |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु. व मलनिस:रण सेवा (प्र—४)(दुर्बल घटक) | +९०० | ४१ |
| | | | फारेस्ट नाका ते सेक्शन १७ पर्यंत नवीन जलवाहिनी | +८५००० | ४२ |
| | | | पाणी पुरवठा साहित्य खरेदी (दुरुस्ती) | +२५०० | ३७ |
| | | | पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण | +१००० | १७ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता—या दुरुस्ती | +१५०० | ३९ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता—या दुरुस्ती (दुर्बल घटक) | +१५०० | ३९ |
| | | | शौचालय व मुता—या निष्कासीत केलेल्या जागेवर सी.सी. पॅसेज बांधणे | +३५०० | ३९ |
| | | | सार्वजनिक नाला व गटार बांधणे | +१५००० | ४३ |
| | | | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन, प्रशासकीय व अन्य इमारती ) | +४५०० | ४२ |
| | | | शौचालय विदयुत देयके | +३५०० | ३९ |
| | | | सांस्कृतिक कार्यक्रम | +१००० | १७ |
| | | | उदयाने दुरुस्ती व निगा | +२५०० | १६ |
| | | | श्री. गणेश देव विर्सजन घाट | +४००० | २४ |
| | | | आरोग्य केंद्र | +१००० | २६ |
| | | | प्रवेश्व्दार , यात्री निवास, | +२६५०० | २४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | समाज मंदिर, स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा | | |
| | | | महिती व तंत्रज्ञान साहित्य | +२५५० | २१ |
| | | | रस्ते दुरुस्ती | +२०००० | १७ |
| | | | सपना,दशहरा, गोल मैदान, रोटरी , नेताजी व मनपा मुख्यालय उदयान इ. दुरुस्ती व निगा | +३००० | १६ |
| | | | ३९ प्रभागात रस्ते व इतर विकास कार्य | +१००० | २४ |
| | **एकूण** | ४५५२३०७ | **एकूण** | ५५०९३८ | |
| | | | **अखेरची शिल्लक** | १३६९ | |

**उत्पन्न : ४५५२३०७**
**खर्च : ४५५०९३८**
**अखेरची शिल्लक : १३६९**

**<u>शिक्षण मंडळाचे सन २०११ — १२ चे सुधारित अंदाज</u>** :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०११— १२ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता , शिक्षण मंडळाचे वर्ष २०११ —२०१२ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : २०,४६,९४,८३६/—**
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये : २०,२९,७४,२५४/—**
**अखेरची शिल्लक रुपये : १७,२०,५८२/—**

**उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ११,७६,०३,५८१/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यात आले आहे .**

**<u>शिक्षण मंडळाचे सन २०१२ — १३ चे मूळ अंदाज</u>** :

आयुक्तांनी २०१२—१३ करिता शिक्षण मंडळाचे सादर केलेले अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

**अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : २२,७५,३९,७८२/—**
**अंदाजपत्रकीय खर्च रुपये : २२,४६,०४,२००/—**
**अखेरची शिल्लक रुपये : २९,३५,५८२/—**

उपरोक्त खर्चापैकी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये १२,८५,५८,७००/— अनुदान मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे .
अर्थसंकल्पीय अंदाजात मंजूर केलेला खर्च पुरेसा होणेकरिता वर्षाच्या उर्वरित कालावधीसाठी पुढील प्रमाणे कर व दरवाढ प्रस्तावीत करण्यात आली आहे.
१) मालमत्ता कर : (कर योग्य मुल्य पध्दत) प्रचलिम करांचे दरात दिनांक १/७/२०१२ पासून पुढील प्रमाणे वाढ करण्यास शिफारस करण्यात आली होती .

| **अ.क्र.** | **कराचे नाव** | **प्रचलीत दर** | **प्रशासनाने प्रस्तावीत केलेले दर** | **स्थायी समितीने मान्य केलेले दर** |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | २६ | २८ | २८ |
| २ | मलप्रवाह सुविधा लाभ कर | २ | ३ | ३ |
| ३ | पाणी पुरवठा लाभ कर | ४ | ५ | ५ |
| ४ | मल प्रवाह कर | ६ | ७ | ७ |
| ५ | पथ कर | ७ | ८ | ८ |
| ६ | अग्निशमन कर (कर योग्य मुल्य पध्दत) | — | २ | २ |
| ७ | पाणी पट्टी (फक्त अनिवासी/वाणिज्य मिळकतीसाठी ज्यांना नळजोडणी नाही ) | — | १० | .. |

२) मालमत्ता कर : भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी प्रस्ताव अमान्य करण्यात आले.

३) पाणी पट्टी दर : प्रचलीत दरात दिनांक १/७/२०१२ पासून पुढील प्रमाणे वाढ करण्यास शिफारस करण्यात आली होती .

| अ. क्र. | कराचे नाव | प्रचलीत दर | प्रशासनाने मान्य केलेले दर | स्थायी समितीने मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | आरसीसी व टिअर गर्डर बांधकाम | १५०/— प्रतिमहा | रु. ५०० प्रतिमहा | रु. ३०० प्रतिमहा |
| २ | पाण्याचे छत व विट बांधकाम | ७५/— प्रतिमहा | रु. ३०० प्रतिमहा | रु. १५० प्रतिमहा |
| ३ | लफाटा किंवा पाण्याचे किंवा मातीचे बांधकाम | ६०/— प्रतिमहा | रु. २०० प्रतिमहा | रु. १२० प्रतिमहा |
| ४ | मीटरप्रमाणे निवासी वापर | रु.१२ प्रति हजार लि. | रु. १६ प्रति हजार लि. | रु.१४ प्रति हजार लि. |
| ५ | मीटर प्रमाणे वाणिज्य वापर | रु.२६ प्रति हजार लि. | रु.३९ प्रति हजार लि. | रु.३९ प्रति हजार लि. |
| ६ | मीटर प्रमाणे औदयोगिक वापर | रु.२६ प्रति हजार लि. | रु.३९ प्रति हजार लि. | रु.३९ प्रति हजार लि. |
| ७ | मीटरप्रमाणे सार्वजनिक /धर्मदाय संस्था वापरासाठी | रु.१५ प्रति हजार लि. | रु.२७ प्रति हजार लि. | रु.२२ प्रति हजार लि. |

**अ) मिटर चालू स्थितीत प्रति महा किमान आकारणी पुढील प्रमाणे मान्य करण्यात आली आहे.**

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| १ | १५ | ४६८ | ७०२ | १६२ | १९० | २०३ | २९८ |
| २ | २० | ८६१ | १२९२ | ३०० | ३५१ | ३७५ | ५५१ |
| ३ | २५ | १२४८ | १८७२ | ४३२ | ५०५ | ५४० | ७९४ |
| ४ | ३२ | १८७२ | २८०८ | ६४८ | ७५८ | ८१० | ११९१ |
| ५ | ४० | ३२७६ | ४९१४ | ११४० | १३३४ | १४२५ | २०९५ |
| ६ | ५० | ४१७३ | ६२६० | १४४० | १६८५ | १८०० | २६४६ |
| ७ | ६५ | ५०७३ | ७६१० | १८०० | २१०६ | २१९० | ३२१९ |

**ब) मिटर नादुरूस्त स्थितीत किमान आकारणी पुढील प्रमाणे मान्य करण्यात आली आहे .**

| | | वाणिज्य | | घरगुती | | विशेष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | व्यास (मी.मी.) | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| १ | १५ | ७०२ | १०५३ | २१६ | २५३ | ३१५ | ४६३ |
| २ | २० | १३०० | १९५० | ३६० | ४२१ | ५७८ | ८५० |
| ३ | २५ | १८७२ | २८०८ | ५७६ | ६७४ | ८४० | १२३५ |
| ४ | ३२ | ३३८० | ५०७० | १०४४ | १२२१ | १५३० | २२४३ |
| ५ | ४० | ४९४० | ७४१० | १५१२ | १७६९ | २२४० | ३२९३ |
| ६ | ५० | ६०५८ | ९०८७ | २१६० | २५२७ | २४७५ | ३६३८ |
| ७ | ६५ | ६७६० | १०१४७ | २३४० | २७३८ | ३०४५ | ४४७६ |

४) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात आली .

५) अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे शहरातील इमारतीकरिता अग्निशमन फी वसुल करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

६) नागरिक सुविधा केंद्रामार्फत नागरिकांना पुरविण्यात येणा—या सेवा : प्रचलीत दरात दिनांक १/७/२०१२ पासून पुढील प्रमाणे वाढ करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | २०११–१२ करिता प्रचलित सेवा शुल्क रुपये | २०१२–१३करिता प्रशासनामार्फत प्रस्तावित सेवा शुल्क रुपये. | २०१२–१३करिता स्थायी समितीने मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|
| | जन्म मृत्यू नोंदणी विभाग | | | |
| | **Birth & Death Registration** | | | |
| १ | जन्म दाखला | प्रथम १ प्रत विनामुल्य नंतर प्रतिप्रत २०/– | प्रथम १ प्रत विनामुल्य नंतर प्रतिप्रत २०/– | प्रथम १ प्रत विनामुल्य नंतर प्रतिप्रत २०/– |
| | **Issue of Birth Certificate** | | | |
| २ | मृत्यू दाखला<br>**Issue of Death Certificate (First 4 Copies free)** | प्रथम ४ प्रती विनामुल्य नंतर प्रतिप्रत १०/– | प्रथम ४ प्रती विनामुल्य नंतर प्रतिप्रत १०/– | प्रथम ४ प्रती विनामुल्य नंतर प्रतिप्रत १०/– |
| ३ | जन्म नोंदणीच्या माहितीत बदल करणे | २० | ३० | ३० |
| | **Correction in Birth Certificate** | | | |
| ४ | मृत्यु नोंदणीच्या माहितीत बदल करणे | २० | ३० | ३० |
| | **Correction in Death Certificate** | | | |
| ५ | अंत्यविधी दाखला | २० | ३० | ३० |
| | **Issue of Cremation Certificate** | | | |
| ६ | जन्म नोंद अनुपलब्धतेचा दाखला | २० | ३० | ३० |
| | **Non Availability Certificate for Birth Registration** | | | |
| ७ | मृत्यू नोंद अनुपलब्धतेचा दाखला | २० | ३० | ३० |
| | **Non Availability Certificate for Death Registration** | | | |
| ८ | दवाखाना/डिस्पेंसरी नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत | ५०० | १००० | १००० |
| | **Registration of nursing home / dispensary / clinic** | | | |
| ९ | दवाखाना/डिस्पेंसरी नोंदणी प्रमाणपत्र नूतनीकरण करणेबाबत. | २५० | ५०० | ५०० |
| | **Renewal of Registration of nursing home / dispensary / clinic** | | | |
| | पाणीपुरवठा विभाग | | | |
| | **Water Supply Department** | | | |
| १ | थकबाकी नसल्याचा दाखला मिळणेबाबत | २० | २० | २० |
| | **No dues certificate of Water Tax** | | | |
| २ | ड्रेनेज कनेक्शन परवानगी मिळणेबाबत | ५०० | १००० | १००० |
| | **Permission for Drainage Connection** | | | |
| ३ | पाणीकराचे डुप्लीकेट बिल देणे. | १० | १० | १० |
| | **Duplicate copy of Water bill** | | | |
| | नगररचना विभाग | | | |
| | **Town Planning Department** | | | |
| १ | जोता पुर्णत्वाचा दाखला | ५०० | १००० | ५००० |
| | **Plinth Completion Certificate** | | | |
| २ | इमारत बांधकाम पुर्णत्वाचा/वापर परवाना | ५०० | १००० | ५००० |
| | **Issue of Construction Completion Certificate / Use Permission** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | हस्तांतरणीय विकास हक्क वर्ग करणे<br>**Transfer / Allocation / Handing over of "TDR"** | ५०० | १००० | ५००० |
| ४ | रस्ता रुंदीकरणाने बाधीत झालेल्या जागेचे दाखले<br>**Certificate of area-affected in the road widening** | ५०० | १००० | ५००० |
| ५ | विकास योजनेचा भाग नकाशा<br>**Issue of part map of development plan** | ५०० | १००० | १००० |
| ६ | बांधकाम मंजूरी व पुर्णतेच्या दाखल्यांच्या सत्यप्रती | २५० | ५०० | १००० |
| | **Issue of true copies of Construction Permission / Completion Certificate** | | | |
| ७ | विशिष्ट भूखंडाबाबत विकासयोजना तरतूदीचा अभिप्राय | ५०० | १००० | १००० |
| | **Issue of Development Plan provisions and remarks (For specific piece of land)** | | | |
| ८ | अंतराचा दाखला | ५०० | १००० | १००० |
| | **Issue of Distance Certificate** | | | |
| ९ | विजेच्या पुरवठयासाठी ना हरकत दाखला | ३००० | ५००० | ५००० |
| | **NOC for obtaining Electric Supply** | | | |
| १० | अभियंता / पर्यवेक्षक परवाना<br>**License for Engineer/ Supervisor** | ५००० | ५००० | १०००० |
| ११ | अभियंता / पर्यवेक्षक परवाना नुतनीकरण<br>**Renewal Of Engineer / Supervisor License** | २५०० | २५०० | १०००० |
| १२ | प्रस्तवित ठिकाणी व्यवसाय अनुज्ञेय असल्याबाबत दाखला<br>**Certificate regarding - "Business permissible at proposed location"** | २५० | ५०० | १००० |
| १३ | वापर बदल किंवा विशिष्ट वापरासाठी नाहरकत दाखला<br>**NOC for specific use or change in use** | ३००० | ३००० | ५००० |
| १४ | तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडुन जमीन मोजणीकरीता नाहरकत दाखला<br>**NOC for measurement of land from TILR** | २५० | २५० | २५०० |
| १५ | इमारत दुरूस्त परवाना मिळणेबाबत | १००० | १००० | १००० |
| | **Permission For Repair / Renovation Of Building / Property** | | | |
| | मालमत्ता कर विभाग | | | |
| | **Property Tax Department** | | | |
| १ | वारसा हक्काने मिळकती हस्तांतरण करणे. | किमान रू.२०० | किमान रू.५०० | किमान रू.५०० |
| | **Change of Name (with heredity) for the purpose of primary liability to property tax** | कमाल**2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** |
| २ | वारसाहक्का व्यतिरीक्त मिळकती हस्तांतरण करण्यास परवानगी मिळणेबाबत | किमान रू.२०० | किमान रू.५०० | किमान रू.५०० |
| | **Change of Name for the purpose of primary liability to property tax** | कमाल**2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** | कमाल **2% of R.V.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | थकबाकी नसल्याचा दाखला | २० | २० | २० |
| | **No dues certificate of Property Tax** | | | |
| ४ | मिळकतीचा उतारा मिळणेबाबत<br>**Extract of Property** | २० | ५० | ५० |
| ५ | मिळकत कराचे डुप्लीकेट बिल देणे. | १० | १० | १० |
| | **Duplicate copy of Property Tax bill** | | | |
| ६ | मिळकत पत्रक.<br>**Property Card** | ५० | १०० | १०० |
| | बाजार परवाना विभाग | | | |
| | **Market License Department** | | | |
| १ | ट्रेड / व्यवसाय / साठा / परवाना (लायसन्स) मिळणेबाबत. | ५०० | १००० | १५०० |
| | **License for Trade / Business / Storage** | | | |
| २ | परवाना रद्द करणे<br>**Cancellation of License** | १०० | १०० | १०० |
| ३ | नामनिर्देशनानुसार परवाना हस्तांतरीत करणे | २५० | ५०० | ५०० |
| | **Transfer Of License by Nomination** | | | |
| ४ | विक्रीने, भागीदारीने किंवा इतर मार्गाने परवाना हस्तांतरण | २५० | ५०० | ५०० |
| | **Transfer Of License by Selling / Partnership Deed / Other than Nomination** | | | |
| ५ | सर्व प्रकारचे परवाने/ परवानग्या नूतनीकरण (१वर्षांनी) करणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधित)<br>**Renewal Of All Type of Licenses (After Every 1 Year - Related to Market Department)** | २५० | ५०० | ५०० |
| ६ | व्यवसायाच्या जागेचे क्षेत्रफळात /वजनांत/परीमाणांत मध्ये वाढ/घट करणे. | २५० | ५०० | ५०० |
| | **Increase or Decrease in Area of business premises / Weight / Quantities / Etc.** | | | |
| ७ | दिलेल्या परवान्यात भागीदार समाविष्ट करणे किंवा भागीदार कमी करणे | २५० | ५०० | ५०० |
| | **Add or Remove the partners in the issued license** | | | |
| ८ | लायसेन्सची डुप्लीकेट प्रत.<br>**Issue Of Duplicate Copy Of Market License** | ५०० | ५०० | ५०० |
| ९ | विविध ना हरकत दाखले व परवानग्या मिळणेबाबत (मार्केट विभागाशी संबंधीत)<br>**Various NOC & Permissions from Market Department** | ५०० | ५०० | ५०० |
| १० | सार्वजनिक जागेत /रस्त्यावर हस्तव्यवसायातील कौशल्याच्या उपयोगासाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत.<br>**License for handicrafts/handiworks at public place / road side** | १०० | १०० | १०० |
| ११ | फेरीने माल विकणेसाठी परवाना (लायसन्स) मिळणेबाबत. | १०० | १०० | १०० |
| | **License for hawkers/street vendors** | | | |
| | मालमत्ता विभाग | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **Estate Department** | | | |
| १ | रस्त्यावरील मंडपाबाबत नाहरकत दाखला<br>**Issue of No Objection Certificate for Installing / Erecting Pendals on road** | २५० | ५०० | ५०० |
| | अग्निशमन विभाग | | | |
| | **Fire Brigade Department** | | | |
| १ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला | १५० | ५०० | १००० |
| | **NOC for various businesses** | | | |
| २ | विविध व्यवसायांकरिता अग्निशमन दलाच्या ना हरकत दाखल्यांचे नूतनीकरण करणेबाबत<br>**Renewal of NOC for various businesses** | १०० | २५० | ५०० |
| ३ | विविध प्रकारच्या इमारती करिता अग्निशमन विभागातर्फे ना नाहरकत दाखला मिळणेबाबत अग्निशमन सेवेच्या स्वरुपात फी. | ५००० | ५००० | महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतूदी नुसार |
| | **NOC for construction of different class of buildings** | | | |
| ४ | जळीताचा दाखला<br>**Fire Occurrence Certificate** | १५० | १५० | १५० |
| | उद्यान व वृक्ष संवर्धन | | | |
| | **Garden & Tree Development** | | | |
| १ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम, १९७५ अन्वये झाड तोडणे अथवा छाटणे करीता परवानगी मिळणेबाबत.<br>**Permission for cutting & trimming trees** | २५० | २५० | २५० |
| | सार्वजनिक आरोग्य विभाग | | | |
| | **Public Health Department** | | | |
| १ | सेप्टीक टॅंक क्लिनिंग. | २० | **Rs.100 per Barrock/ House/shop & Rs. 500 for Multi storey Apt.** | **Rs.100 per Barrock /House/ shop & Rs. 500 for Multi storey Apt.** |
| | **Septic Tank Cleaning** | | | |
| २ | अन्ननिर्मिती संबंधी ना हरकत दाखला | ५०० | ५०० | ५०० |
| | **NOC for various businesses related to food** | | | |

७) वर्ष २०११–१२ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यास शिफारस करण्यात आली आहे . साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय जकात /स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर या दोन्ही उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

८) वर्ष २०१०–११ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, इतर अंदाजपत्रक, माहिती व अभिप्रायाची नोंद घेण्यात आली.

९) जकात : राज्य शासनाने दिनांक १/४/२०१२ पासून जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केले होते. तद्नंतर १७/४/२०१२ पासून पुन्हा जकात लागू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत दिनांक १/७/२०१२ पासून पुन्हा जकात सुरु राहिल्यास , पुढील प्रमाणे जकात दरात वाढ मान्य करण्यात आली.

| वस्तु गट क्र | वस्तूचे नाव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलित दर (%) | प्रशासनामार्फत प्रस्तावीत केलेले दर (%) | स्थायी समितीने मान्य केलेले दर (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० ब | सर्व प्रकारची रसायनेए सायझिंग सॉल्टएलोखंडाचे सल्फेट तांब्याचे सल्फेट व इतर. | ०.५० | ४.०० | ३.७२ | ४.०० | ४.०० |
| ४० अे | खाद्य म्हणून उपयोगात न येणारी सर्व प्रकारची अखाद्य चरबीएटेलोएडुकराची पातळ चरबी इ.. | ०.५० | ४.०० | १.७५ | ४.०० | ४.०० |
| ३३ अे | सर्व प्रकारचे साबण | ०.५० | ४.०० | २.०० | ४.०० | ४.०० |
| ३४ | पोटॅशएरिठा.सोडा.तूरटी. लवण पदार्थ शिकेकाई.व इ | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | ४.०० |
| ५३ ब | कात्री.वस्तरे.सेफ्टी रेझर्स ब्लेडस.चाकू.सूरे.व इ..... | ०.५० | ४.०० | २.७५ | ४.०० | ४.०० |
| ५३ क | नक्षी पटटया.(लेसेस). लाकडाच्या व धातूच्या रिंगा.भरतकामाच्या वस्तू. प्लास्टीकची भुकटी इ. | ०.५० | ४.०० | ३.०३ | ४.०० | ४.०० |
| ६५अे | सूत | ०.५० | ४.०० | २.०० | ४.०० | ४.०० |
| ७१ | कच्चे लोखंड.प्राथमीक टप्यातील शुध्द लोखंड. लगडी आणि लाद्या. कडया.बल्ब.किंवा हलके लोहमार्ग लोहमार्गाकरीता सांधपटया व इतर. | ०.५० | ४.०० | ३.६२ | ४.०० | ४.०० |
| ७७ | टलोह धातु म्हणजेच पितळ तांबे.टीन ॲल्युमिनियम.शिसे जस्त. मिन सिल्व्हर स्टेनलेस स्टिल इतर..... | ०.५० | ४.०० | २.०२ | ४.०० | ४.०० |
| ७८ | रंग द्रव्य टॅन्स.नीळ मुद्रणाची शाई धरून रंगविषयक सर्व वस्तु..... | ०.५० | ४.०० | २.५० | ४.०० | ४.०० |

१०) नगरसेवक व इतर पदाधिका—यांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते : स्थानिक स्वराज्य संस्थेत नगरसेवक व पदाधिका—यांना निवडून आलेल्या प्रभागात दैनंदिन तत्वावर उपस्थित होणा—या मुलभूत सेवांसंबंधी प्रश्नांचा निपटारा करणेसाठी प्रभाग क्षेत्रातील रहिवाश्यांशी संपर्क साधावा लागतो, प्रभागात प्रत्यक्ष भेटी दयाव्या लागतात व नगरसेवकांना प्रभागात कार्यालयाचीही व्यवस्था करावी लागते . या सर्व बाबींच्या व्यवस्थापनासाठी नगरसेवकांना विविध प्रकारचे भत्ते देण्यात येतात . यापूर्वी कोणत्याही एक नगरसेवकाला एक प्रभागक्षेत्र सिमीत होते . परंतु आता राज्य शासनाचा निर्णयाप्रमाणे अ आणि ब अशा दोन जागा करुन प्रभागाच्या क्षेत्रात वाढ करण्यात आली आहे. त्यामूळे मतदारांची /रहिवाशांची संख्या वाढली आहे . सबब दैनंदिन तत्वावर होणा—या खर्चातील पेट्रोल , डिझेल व इतर वाढ लक्षात घेता, सर्व भत्यांमध्ये वित्तीय वर्ष २०१२—१३ पासून वाढ करण्यासाठी पुढील प्रमाणे शिफारस करण्यात आली आहे.

| अ.क्र. | मानधन व भत्याचे नाव | पात्र पदाधिकारी | प्रचलीत मानधन / भत्ते | प्रस्तावीत मानधन व भत्ते | शेरा |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन भत्ता (Vehicle Allowance) | महापौर<br><br>उप महापौर व स्थायी समिती सभापती<br>सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता<br>विषय समिती ,प्रभाग समिती व परिवहन समिती सभापती | २१०००<br><br>२००००<br><br>१५००० | ३५०००<br><br>३००००<br><br>२५००० | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी )<br>वाहन पती किंवा पत्नी यापैकी कोणाचेही नावावर असणे आवश्यक आहे . |
| २ | खाजगी स्वीय सहायक (PA) | महापौर,उप महापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता | १००० | ५००० | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी ) |
| ३ | अतिथी भत्ता | महापौर<br>उप महापौर आणि स्थायी समिती सभापती<br>सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता<br>सभापती विषय समिती ,प्रभाग समिती, परिवहन समिती . | ७५००<br>३७५०<br><br>१५००<br><br>४५० | १२०००<br>७५००<br><br>४०००<br><br>३००० | |
| ४ | बैठक भत्ता (Meeting Allowance) | सर्व नगरसेवक | १०० | २०० (कमाल मर्यादा ८००/—) | (सुधारित रक्कमेसाठी शासनाची मंजुरी घेण्यात यावी ) |

वर्ष २०११—१२ करिता उत्पन्न व खर्चाचे सादर करण्यात आलेले सुधारीत अंदाज पुढील प्रमाणे फेरफार करुन अंतिम करण्यात आले.

(आकडे हजारात)

| अ.क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे . | ज्या लेखा शीर्षातून वर्ग करावयाची आहे . | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कुत्रयाच्या दंशावर औषधोपचार खर्च | हिवताप व डेंगु प्रतिबंधक खर्च | ५०० |
| २ | इतर खर्च (अ.अंदाज,भाग—१ मधील इ—संकीर्ण—अ.क्र.—२२) | नगरसवेकांना मानधन , सभा व इतर भत्ते | ३०० |
| ३ | शोध विकास व अपारंपारिक वीज व उर्जा | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३०० |
| ४ | पुर परिस्थिती निवारण अनुदानातून विकास कार्य | नवीन रस्ते बनविणे | ४२०० |
| ५ | रोजगार हमी कर परतावा | शिक्षण कर | १०० |
| ६ | इतर आकस्मिक खर्च (अ—अंदाज, भाग—३ मधील अ.क्र.८) | ग्रुप इन्शुरन्सपोटी मिळणारी रक्कम | २० |
| ७ | वाहन व मशिनरी खरेदी | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे | १६०० |

प्रवेशव्दार , यात्री निवास, समाज मंदिर, स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा या लेखा शीर्षातर्गत रक्कम रुपये २.७५ कोटी प्रभाग क्रमांक —१ अ , ३ब , ५ब, ६ब, ९अ, ९ब , २५अ, २५ब, २६ब, २७ब , २८अ, २९अ, २९ब, ३१अ, ३१ब, ३८अ, ३८ब, ३९अ, ३९ब, २ब, ३अ, ४अ, ४ब, १२अ, १२ब, १४अ, १४ब, २६अ, २७अ, ३७ब, २ब, ७ब, ८अ, ८ब, ११अ, ११ब, २२ब, ५अ, ७अ, १७अ, २३अ, ३०अ, ३०ब, ३४अ, १०ब, २०ब, २२अ, २८ब, ३५ब, ३७अ, १५ब, २०अ, २४अ, १ब, व २१अ मध्ये प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे कामे हाती घेण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे .

मागील कालावधीतील निवडून आलेल्या सदस्यांना लॅपटॉप देण्यात आले होते . सध्याच्या आधुनिकीकरणामूळे आयपॅड हे नविन साधन बाजारात उपलब्ध झाले असून निवडून आलेल्या नवीन सदस्यांनी आयपॅड ची मागणी केलेली आहे सबब ज्या सदस्यांना आयपॅड पाहिजे त्यांना लॅपटॉप ऐवजी आयपॅड देण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व अनुषंगीक बाबी विचारात घेवून वरील प्रमाणे सन २०१२–१३ साठी रुपये १३.६९ लाख शिलकीचा अर्थसंकल्प स्थायी समिती ठराव क्रमांक ०४ दिनांक २९/५/२०१२ अन्वये तयार करण्यात आला आहे.

**महासभा ठराव क्रमांक : २६** **दिनांक :९/७/२०१२**

सुचकाचे नाव : श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५, ९६,९७,९८,९९,१००,१०४,१२६,१५० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक ०४ दिनांक २९/५/२०१२ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २०१२–१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास, सन २०११–१२ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबीकरिता पुढील प्रमाणे अंतिम मंजुरी देत आहे .

१) मालमत्ता कर : (कर योग्य मुल्य पध्दत) स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रचलित करांचे दरात महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ करण्यास मान्यता देत आहे.

२) मालमत्ता कर : भांडवली मुल्यावर आधारित कर आकारणी प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

३) पाणी पट्टी दर : स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रचलीत दरात पुढील प्रमाणे फेरफाराच्या अधिन राहून महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ करण्यास मान्यता देत आहे. मात्र लफाटा किंवा पत्र्याचे किंवा मातीचे बांधकाम असलेल्या मिळकतींसाठी रुपये १२०/– प्रतिमहा ऐवजी १००/– प्रतिमहा मंजुर करण्यात येत आहे .

४) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी अमान्य करण्यात येत आहे.

५) अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे शहरातील इमारतीकरिता अग्निशमन फी वसुल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) नागरिकांना पुरविण्यात येणा–या सेवा : स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रचलीत दरात महासभा ठरावाच्या दिनांकापासून वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) वर्ष २०११–१२ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय्य कायम ठेवण्यास मंजुरी देण्यात येत आहे . तसेच साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय जकात /स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर हे दोन्ही उत्पन्नाच्या बाबीमंध्ये वर्ग करण्यात यावे.

८) वर्ष २०१०–११ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, इतर अंदाजपत्रक, माहिती व अभिप्रायाची नोंद घेण्यात येत आहे.

९) आयुक्तांचे अभिप्राय लक्षात घेता, प्रशासनाने वसुलीसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावेत अशा सूचना देण्यात येत आहेत.

१०) नगरसेवक व इतर पदाधिका–यांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्यात स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे वित्तीय वर्ष २०१२–१३ पासून वाढ करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

११) जकात : राज्य शासनाने दिनांक १/४/२०१२ पासून जकात ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केले होते. तद्नंतर १७/४/२०१२ पासून पुन्हा जकात लागू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत पुन्हा जकात सुरु राहिल्यास , स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे जकात सुरु झाल्याच्या दिनांकापासून दर वाढ मंजुर करण्यात येत आहे.

१२) महापालिका परिवहन उपक्रमाचे सन २०११–२०१२ चे सुधारित व सन २०१२–२०१३ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

१३) महापालिका शिक्षण मंडळाचे सन २०११–२०१२ चे सुधारित अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे .

१४) महापालिका शिक्षण मंडळाचे सन २०१२–२०१३ चे मूळ अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे खालील फेरफाराच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे

| | | | |
|---|---|---|---|
| स्थायी समितीचे अंदाज | २२७५३९ | स्थायी समितीचे अंदाज | २२४६०४ |
| महापालिका अनुदान | .५००० | शाळांसाठी शिपाई व पहारेकरी ठेवणे | .५००० |
| एकूण | २३२५३९ | एकूण | २२९६०४ |
| | | अखेरची शिल्लक | २९३५ |

१५) स्थायी समितीच्या शिफारसीप्रमाणे महापालिकेच्या सन २०१२–१३ करिता उत्पन्न रुपये ४५५.२३ कोटी व खर्च रुपये ४५५.०९ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास पुढील प्रमाणे फेरफाराच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे .

(आकडे हजारात)

| **पान क्रमांक** | **स्थायी समितीचे अंदाज** | ४५५२३०७ | **स्थायी समितीचे अंदाज** | ४५५०९३८ | **पान क्रमांक** |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | पाणी बीले वसुली (पा. पु) | +५५०० | प्राथमिक शिक्षण | +५००० | १६ |
| | | | सपना,दशहरा,गोल मैदान,रोटरी, नेताजी, मनपा, जिजामाता उदयान संवर्धन . | +५०० | **१६** |
| | **एकूण** | ४५५७८०७ | **एकूण** | ४५५६४३८ | |
| | | | **अखेरची शिल्लक** | **१३६९** | |

प्रवेंशव्दार, यात्री निवास, समाज मंदिर , स्पोटर्स, स्टेज व इतर दुरुस्ती व निगा या लेखा शीर्षातर्गत रक्कम रुपये २.७५ कोटी या रक्कमेतून प्रत्येकी ५ लाख प्रमाणे कामे हाती घेणेसाठी नमूद एकूण ५५ प्रभागात समाविष्ट प्रभाग २४ अ ऐवजी प्रभाग १९ ब असे वाचण्यात यावे. या व्यतिरिक्त पुढील विकास कामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत.

| **अनु. क्र** | **कामाचे तपशील** | **रक्कम (लाखामध्ये)** |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आबेंडकर चौक ते बजरंग, आईस फॅक्टरी रस्ता डांबरीकरण करणे | १५ |
| २ | रुहानी सत्संग ते तुळशी निवास रस्ता डांबरीकरण करणे | २५ |
| ३ | कवलराम चौक जवळ, नाना नानी उद्यान विकसित करणे | १० |
| ४ | प्रभाग क्र. ७ मधील दोन उद्यान विकसित करणे | १० |
| ५ | गजाननगर पासून सितारामनगर मार्गे मद्रासीपाडयापर्यंत मोठा नाला बाधंणे | २० |
| ६ | सितारामनगर येथे कोलगे हाउस जवळ १० शिटचे शौचालय बांधणे | १० |
| ७ | बाल शिवाजी उद्यान दुरुस्ती व नुतनीकरण | १० |
| ८ | समाज मदिंर हॉल, बॅरेक नं. १६४–१६८, उल्हासनगर–१ | २० |

| | | |
|---|---|---|
| ९ | सरकारी शौचालय, बॅरेक नं. १०४, उल्हासनगर—१ | १० |
| १० | देव समाज ते मोनिष अपार्टमेन्ट व्हाया शिवनेरी हॉस्पीटल, उल्हासनगर—४.सिमेंट रोड | ५० |
| ११ | १ नंबर बस स्टॉप ते शिवसेना शाखा, उल्हासनगर—१ पर्यंत, एम ३५० रोड | २५ |
| १२ | आंबेडकर उद्यान व लाललोही उद्यान दुरुस्ती व नुतनीकरण करणे | २० |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, सम्राट अशोकनगर ब्रॅड कंपनीजवळ | ५० |
| १४ | वस्ती स्वच्छतागृह सार्वजनिक शौचालय शंकर परमार यांचे घरासमोर | २० |
| १५ | वस्ती स्वच्छतागृह सार्वजनिक शौचालय सम्राट अशोकनगर वसीटा यांचे घरासमोर | २० |
| १६ | बॅरेक नं.१९१७ जवळ, सेक्शन ३९, उल्हासनगर—५ उद्यानाचे सुशोभिकरण करणे | ३ |
| १७ | रविद्रनगर, कुर्ला कॅम्प, श्रीमती मिना सोंडे याच्या कार्यालयापासून नाथिया धुरव हाउस पर्यंत पेवर ब्लॉक बनविणे | ५ |
| १८ | ‘‘सिंधु सभा हॉल’’ राजु गांधी लॉन, उल्हासनगर—३ | २५ |
| १९ | टेलीफोन इक्सचेंज समोरील राहूलनगर पासून इंदीरा गांधीनगर मार्गे दुनिचंद कालानी कॉलेज समोर राजीव गांधीनगर इएमटी कंपनी येथे मोठे नाले बाधंणे | १५० |
| २० | शहाड रेल्वे उडड्राण पुल पासून गुलशननगर शहाड रेल्वे स्थानक वाहन तळ शिव मंदीर पर्यंत मोठे नाले बाधंणे | ३० |
| २१ | खुनी खडड्रा, वाल्मिकनगर, महात्मा फुले चौक ते मोरया सुपारी वाल्यापर्यंत मोठे नाले बाधंणे | ३० |
| २२ | मच्छी मार्केट वाल्मिकनगर पासून अपना इंडस्ट्री, प्लायवूड कंपनी पर्यंत मोठे नाले बाधंणे | ३० |
| २३ | व्ही.टी.सी. मैदान येथे स्टेडीअम विकसीत करणे | १०० |
| २४ | वाको रेडीओ ते गावदेवी मंदिर रोड, एम ३५० रोड | ४० |
| २५ | रामभाऊ म्हाळगी चौक ते लास्सी बिल्डींग रस्ता, रोड २५० | ५ |
| २६ | राजीव गांधी चौक ते सावंत बंगला, आर.सी.सी.व्हिनस चौक ते लाल चक्की चौक, उल्हासनगर—४ | ५ |
| २७ | वार्ड नं. ३, शिवाजी उद्यान | १० |
| २८ | उल्हासनगर—१ मधील मच्छी मार्केट ते सोनारा हॉल या ठिकाणी नाल्याचे बांधकाम करणे | २० |
| २९ | गोसावी बंगला ते कल्याण अंबरनाथ रोड येथे नाला बनविणे | १० |
| ३० | दाभाडे चौक ते कल्याण अंबरनाथ रोड येथे नाला बनविणे | १० |
| ३१ | सोनामहल ते अपार्टमेंट ते स्मशानभुमीपर्यंत नाला व फुटपाथ बनविणे | १० |
| ३२ | महेश अपार्टमेंट ते सोना महल येथे नाला व फुटपाथ बनविणे | १० |
| ३३ | कुमार अपार्टमेंट ते कल्याण अंबरनाथ रोड येथे अंडरग्राउंड ड्रेनेज बनविणे | १५ |
| ३४ | गिरीश ऑटो मोबाईल ते रामनंदन आर्शिवाद स्पिकरवालापर्यंत रस्ता बनविणे | १० |
| ३५ | रमाबाई नगर येथे १० सीटचे शौचालय दुरुस्त करणे | १५ |
| ३६ | ब्राम्हणपाडा येथिल १० सीटचे शौचालय दुरुस्त करणे | १५ |
| ३७ | बौध्द विहार पासून ते गुरुद्वारापर्यंत रस्ता बनविणे | १० |
| ३८ | गवळी पाडा येथे नाला बनविणे | १० |
| ३९ | सचदेव नगर ते डॉल्फीन क्लब येथिल चेंबर बनविणे | १० |

| | | |
|---|---|---|
| ४० | हरबन तबेला येथिल शौचालय बनविणे | १५ |
| ४१ | खरात यांच्या घरासमोर असलेले जुने शौचालय तोडुन नव्याने बांधणे | १० |
| ४२ | बौध्द विहार चोपडा कोर्ट येथे सी सी पॅसेज बनविणे | १० |
| ४३ | गुरुगुलराज चौक ते ओ.टी. चौक व्हाया पिंटुपार्क हॉटेल पर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४४ | चांदीबाई कॉलेज ते उल्हासनगर—४ व ५ येथिल रस्त्यापर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४५ | नैनुमल सोसायटी ते ब्लु स्टार रबर फॅक्ट्रीपर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४६ | मोहटा देवी मंदिर ते महापालिकेपर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४७ | मोहटा देवी मंदिर कौशल्यानगर स्मशानभूमी, उल्हासनगर—३ पर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४८ | सोनेसर अपार्टमेंट ते अमन टॉकीजपर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ४९ | नवजीवन बॅक ते न्यु टेलिफोन एक्सेजपर्यंत सिमेंट रोड बनविणे | १५ |
| ५० | अे—ब्लॉक, ३८८ ते अे—ब्लॉक, ३९६ पर्यंत मागील बाजुस नाली गटार दुरुस्ती करणे | १० |
| ५१ | अे—ब्लॉक, ४०४ ते ४१२ पर्यंत मागील बाजुस नाली गटार दुरुस्ती करणे | १० |
| ५२ | अे—ब्लॉक, ४१३ ते ४१९ पर्यंत मागील बाजुस नाली गटार दुरुस्ती करणे | १० |
| ५३ | वाघमारे गल्ली ते बुध्द विहार (रामजी आंबेडकर नगर) नाली गटार दुरुस्ती करणे | १० |
| ५४ | अशोक म्हस्के यांच्या घरासमोर व आर.ए. राऊत यांच्या घरासमोरील बाजूस नाली गटार दुरुस्ती करणे | १० |
| ५५ | मारुती जाधव यांच्या घरापासुन ते तक्षशिला शाळेपर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड व साईडला नाली बनविणे | १५ |
| ५६ | भिमशक्ती ते रायभोले कॉम्पलेक्स पर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड व साईडला नाली बनविणे | १५ |
| ५७ | खेमजी दुखांते दहा चाळ नालंदा पर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड व साईडला नाली बनविणे | १५ |
| ५८ | कमला नेहरु नगर धोबीघाट, उल्हासनगर—१ मुरबाड रोड मुख्य चौक व आदर्शनगर या ठिकाणी प्रवेशद्वार बनविणे | १५ |
| ५९ | गुरुदत्तनगर किर्तीपथ, आदर्शनगर व सतिश चहाळ चाळ याठिकाणी नाल्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे | २५ |
| ६० | पेहलुमल कंपाऊड उल्हासनगर ३ येथे अंबेमाता मंदिर समोरील रस्ता व चौक एम २५० ने बनविणे | १० |
| ६१ | न्यु नेहरुनगर टेकडी रायगड मित्रमंडळ उल्हासनगर ५ येथे १० बैठकीचे शौचालय बनविणे | १० |
| ६२ | एस.टी कॉलनी ते रायगड मित्रमंडळ, उल्हासनगर ५ येथे भुयारी गटार बनविणे | १० |
| ६३ | रोमा गार्डन व शारदा कॅसल इमारती उल्हासनगर ४ येथे गार्डन विकसित करणे | १० |
| ६४ | साईबाबा मंदिर पेट्रोल पंपासमोर उल्हासनगर ४ येथे समाज मंदिर बांधणे | १० |
| ६५ | वाल्मिकनगर उल्हासनगर ४ व्ही.टी.सी. समोर समाज मंदिर बांधणे | १० |
| ६६ | न्यु सिंध ते पेन्सील फॅक्टरी चौक उल्हासनगर ४ येथे फुटपाथ बनविणे | १५ |
| ६७ | स्वामी शांती प्रकाश आश्रम पासून गौ शाळेपर्यंत मोठा नाला बांधणे | १० |
| ६८ | कॅनरा बॅकचे मागील मोठा नाला बांधणे | १० |

| | | |
|---|---|---|
| ६९ | बॅरेक नं. १९४० ते बॅरेक नं. १९५२ पर्यंतचा मोठा नाला बांधणे. | १० |
| ७० | शांतीनगर, उल्हासनगर—५ येथील मोठा नाला बांधणे | १० |
| ७१ | बॅरेक नं. ११३ ते शिवसेना शाखा पर्यंत अंडरग्राऊड ड्रेनेज लाईन टाकणे | १५ |

मागील कालावधीतील निवडून आलेल्या सदस्यांना लॅपटॉप देण्यात आले होते . सध्याच्या आधुनिकीकरणामूळे आयपॅड हे नविन साधन बाजारात उपलब्ध झाले असून निवडून आलेल्या नवीन सदस्यांनी आयपॅड ची मागणी केलेली आहे सबब ज्या सदस्यांना आयपॅड पाहिजे त्यांना लॅपटॉप ऐवजी आयपॅड देण्यात यावे.

वरील सर्व बाबींच्या तरतूदीच्या प्रयोजनासाठी वरील अंदाजपत्रक छापून प्रत्येक सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

उपमहापौर/पिठासन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सायंकाळी ७.०५ वाजता सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३०/११/२०१२

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३०/११/२०१२ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—३

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३०/११/२०१२ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी हे आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २६ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ३ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २७ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २९ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३० | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३१ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३३ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १० | श्री. जाफरअली चौधरी | ३४ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३५ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १२ | श्रीम. अनिता संतोष तरे | ३६ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३७ | श्रीम. पिंकी मुरलीधर उदासी |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३८ | श्रीम. दिप्ती नवीन दुधानी |
| १५ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ३९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १६ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४० | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १७ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४१ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४२ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| १९ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४३ | श्री. विजय चाहु पाटील |
| २० | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ४४ | श्रीम. माया हरेश चावला |
| २१ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४५ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २२ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४६ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २३ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ४७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २४ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ४८ | श्री.बी.बी. मोरे |
| २५ | श्रीम. पंचशीला नाना पवार | | |

तर,

१. श्रीमती आशा जीवन इदनानी —— महापौर

तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ४. डॉ. महेश गजानन गावडे, ५. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ६. श्री. विजय खंडु सुपाळे, ७. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्रीम. मीना कुमार आयलानी, ९. श्रीम. भागीबाई हारीसींग लबाना, १०. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ११. श्री. हरेश परमानंद जग्यासी, १२. श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा, १३. श्री. गणपत गोविंद एडके, १४. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, १५. श्री सुरेश पप्पू बूधरमल कालानी, १६. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १७. श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर, १८. श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती, १९. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, २०. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, २१. श्रीम. खान इसरद सऊद, २२. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, २३. श्रीम.

शकुंतला जग्यासी, २४. श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी, २५. श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, २६. श्री. सुरेश मधुकर जाधव, २७. श्रीम. कांचन अमर लुंड, २८. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २९. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, ३०. श्री. गुरूनो भिकोमल वलेचा, ३१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील, ३२. श्री. प्रधान धर्मा पाटील, ३३. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३४. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, ३५. श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२०.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
२१.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त
२२.श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
२३.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा परिक्षक
२४.श्रीमती विजया कंठे, कर निर्धारक व संकलक
२५.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२६.श्री. एस.बी. गायकवाड, प्रभाग अधिकारी
२७.श्री. भरत बठिजा, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
२८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२९.श्री. रमेश रणदिवे, वरिष्ठ सुरक्षा रक्षक
३०.श्री. श्याम शिवनानी, लघुलेखक, सचिव कार्यालय
३१.श्री. तानाजी पतंगराव, लिपिक, सचिव कार्यालय
३२.श्री. यशवंत सगळे, लिपिक, जनसंपर्क विभाग

तसेच शिक्षण विभागातील खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. कडव, शिक्षण उपनिरिक्षक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई
२. श्री. सुनिल कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी, जिल्हापरिषद, पुणे
३. श्री.बी.डी. पुरी, शिक्षण उपनिरीक्षक, दक्षिण विभाग, मुंबई

शिक्षण मंडळातील खालील शिक्षक/शिक्षिका उपस्थित होते/ होत्या.

१. श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी
२. श्रीमती अमिता सुभाष कदम, (शाळा क्र. १२)
३. श्रीमती मेधा ए पहुजा, (शाळा क्र. १६)
४. श्रीमती वर्षा के. खत्री, (शाळा क्र. २७)
५. श्रीमत कोमल आय जेसानी, (शाळा क्र. २६)
६. श्रीमती विदया वि. आचार्य, (शाळा क्र. २६)
७. श्रीमती माणिक चं. थोरात, (शाळा क्र. २४)
८. श्रीमती मोनिका श. लव्हंगडे, (शाळा क्र. १९)
९. श्रीमती मिनाक्षी राऊत
१०.श्रीमती राजश्री पाटील
११.श्री. गोरख कृष्णा सुर्यवंशी, (शाळा क्र. २०)
१२.श्री. परशुराम जी. चौधरी, (शाळा क्र. १७)
१३.श्री. साहेबराव गो. वाडिले, (शाळा क्र. २९)
१४.श्री. जगन्नाथ बाबू नेमाडे, (शाळा क्र. १४)
१५.श्री. आसाराम दौलतराव दोडके
१६.श्री. सन्मान अरुण थुल
१७.कु. अमोल वामन साबळे
१८.श्रीमती माधवी जाधव, (शाळा क्र. २४)
१९.श्री. योगेश मराठे
२०.श्रीमती संगिता काळे
२१.श्री. महेंद्र पाठारे
२२.श्री. विनोद सुर्यवंशी
२३.श्री. असलम शेख
२४.श्री. संतोष उबाळे
२५.श्री. गोरखनाथ लोणकर

२६.श्री. देवानंद, फोटोग्राफर
२७.श्री. राजकुमार शर्मा
२८.श्री. दिनेश गुप्ता
२९.श्रीमती संगिता लहान
३०.श्री. आसाराम
३१.श्री. राजश्री पाटील

श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**मा. महापौरजी, आता अशी बातमी आली आहे की, आपले माजी पंतप्रधान श्री. आय.के. गुजराल यांचे निधन झाले आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती मिनाताई सोनेजी

## शोक प्रस्ताव

माजी पंतप्रधान श्री. आय.के. गुजराल यांचे आज दिनांक ३०/११/२०१२ रोजी नुकतेच निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४६ इ** **दिनांक:–३०/११/२०१२**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. आय. के. गुजराल यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी:–**त्यांना श्रध्दांजली दिली आहेच ना आता?

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**या सभेचे कामकाज स्थगित केले जावे. संसदेचे कामकाज स्थगित करण्यात आले आहे. आपली सभा स्थगित झाली पाहिजे किंवा नाही याबाबत जरा मार्गदर्शन करा.

**उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सन्माननिय सदस्य श्री. सुभाष मनसुलकर यांनी जो मुद्दा येथे मांडला आहे त्याबद्दल सांगु इच्छितो की, आज शिक्षणाचा अधिकार या विषयीचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम आहे. त्यासाठी काही अधिकारी बाहेरुन येथे आलेले आहेत. मा. माजी पंतप्रधान श्री. आय.के. गुजराल यांना श्रध्दांजली देवुन पुढील कार्यक्रमाची सुरुवात करु या.

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**नमस्कार सर्वप्रथम उपस्थितांचे मनापासुन स्वागत. सुस्वागतम, सुस्वागतम, सुस्वागतम..... आज शुक्रवार दिनांक ३० नोव्हेंबर, २०१२ कार्तिक कृष्ण द्वितिया शके १९३४, नक्षत्र मृगशिर्ष या शुभ दिनी उल्हासनगर महानगरपालिका यांचे अंतर्गत सर्व शिक्षा अभियानाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची माहिती देण्यासाठी जनजागृती मोहिम तसेच विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेत उपस्थित असलेले उल्हासनगर महानगरपालिकेचे उप–आयुक्त मा. श्री. देहेरकर साहेब, उप–महापौर श्री. पुरस्वानी साहेब, मनपा शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी श्री. बिडवे साहेब, राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक मा. श्री.बी.डी. पुरी, शिक्षण उपनिरिक्षक दक्षिण विभाग, मुंबई मा. श्री. सुनिल कु–हाडे साहेब, उप–शिक्षण अधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद पुणे मा श्री. कडव साहेब, शिक्षण उपनिरिक्षक शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील उपस्थित सर्व नगरसेवक व अधिकारी वर्ग या सर्वांचे उल्हासनगर महानगरपालिकेच्यावतीने मी हार्दिक स्वागत करते. सर्वप्रथम मी मा. प्रशासन अधिकारी श्री. बिडवे साहेब यांना विनंती करते की, त्यांनी आजच्या सभेचे अध्यक्ष उल्हासनगर महापालिकेचे उप–महापौर मा. श्री. पुरस्वानी साहेब यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत करावे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. पुरस्वानी यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, यानंतर उल्हासनगर महानगरपालिकेचे मा. उप–आयुक्त श्री. देहेरकर साहेब यांचेही पुष्पगृच्छ देवुन स्वागत करण्यात येत आहे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी उप–आयुक्त श्री. देहेरकर यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, उल्हासनगर महापालिकेचे महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा साहेब यांचेही स्वागत करण्यात येत आहे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–** धन्यवाद साहेब, तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. बी.डी.पुरी, शिक्षण उपनिरिक्षक दक्षिण विभाग यांचेही पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात येत आहे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी तज्ञ मार्गदर्शक श्री.बी.डी. पुरी यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. सुनिल कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, पुणे यांचेही स्वागत करण्यात येत आहे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी तज्ञ मार्गदर्शक श्री. सुनिल कु–हाडे यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. कडव, शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई यांचेही स्वागत करण्यात येत आहे.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. कडव यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, विरोधी पक्ष नेते श्री. राजु जग्यासी साहेब यांचेही आमचे प्रशासन अधिकारी श्री. बिडवे साहेब पुष्पगुच्छ देवुन स्वागत करतील.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी विरोधी पक्ष नेता श्री. राजु जग्यासी यांना पुष्पगुच्छ देवुन त्यांचे स्वागत केले.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:–**धन्यवाद साहेब, मा. श्री. धनंजय बोडारे साहेब हे आताच याठिकाणी उपस्थित झाले आहेत. त्यांचे आमचे प्रशासन अधिकारी श्री. बिडवे साहेब हे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करतील.

**यावेळी श्री. बिडवे, प्रशासन अधिकारी यांनी सभागृह नेता श्री. धनंजय बोडारे यांना पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:—आता उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर आता आपण पुढील कार्यक्रमाची सुरुवात करु या. सर्वप्रथम मा. उप—आयुक्त श्री. देहेकर साहेब यांना मी सदर कार्यक्रमाचे प्रास्तविक सादर करण्यास विनंती करते.

श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—मा. महापौर, उपस्थित मा सर्व सदस्य केंद्र शासनाने बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ पारीत केलेला आहे. आणि या अधिनियमाची अंमलबजावणी १ एप्रिल २०१० पासुन संपुर्ण देशात सुरु झालेली आहे. या अधिनियामान्वये ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याची तरतुद करण्यात आली आहे. आणि या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी दिनांक ३१ मार्च २०१३ पर्यंत करणे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक केलेले आहे. या अधिनियमातील महत्वाच्या तरतुदीची माहिती सर्व महानगरपालिका सदस्यांना व पदाधिकारी यांना होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी आज ही विशेष सभा बोलविण्यात आलेली आहे. शिक्षण विभागातील /मंडळातील अधिकारी आज मार्गदर्शनासाठी येथे आले आहेत ते आपल्याला मार्गदर्शन करत आहेत, धन्यवाद।

श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:—मा. अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. ज.स. सहारिया.............

महापालिका सचिव :—व्यासपीठावर उपस्थित असलेल्यांनी खाली आसनावर येवुन बसावे जेणेकरुन हे प्रझेंन्टेशन पाहता येईल.

**यावेळी सभागृहातील उपस्थित सर्व सदस्यांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ बाबत मा. श्री. ज.स. सहारिया यांचे सादरीकरण दाखविण्यात आले.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य श्री. जयंत कुमार भाटिया यांचा संदेश दाखवितण्यात येत आहे.

**यावेळी सभागृहातील उपस्थित सर्व सदस्यांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ बाबत मा. श्री. जयंत कुमार भाटिया यांचे सादरीकरण दाखविण्यात आले.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:— प्रा. फौजिया खान, मा. राज्य मंत्री, शालेय शिक्षण यांचा संदेश आपण आता ऐकणार आहोत.

**यावेळी सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ बाबत प्रा. फौजिया खान, मा. राज्य मंत्री, शालेय शिक्षण यांचे सादरीकरण दाखविण्यात आले.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—६ ते १४ वयोगटातील बालके हे कृतिशिल असतात त्यांना गाणी, गोष्टी यामध्ये जास्त रस असतो हेच आता आपण खेलो इंडिया खेलो या ध्वनीचित्रफितात दाखवित आहोत.

**यावेळी खेलो इंडिया खेलो याबाबतची क्लिप ध्वनीचित्रफितात दाखविण्यात आली.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:—६ ते १४ वयोगटातील बालक शाळेत दाखल होतात परंतु काही कारणास्तव त्यांच्याकडे काही समस्या असल्यामुळे ते शाळेत उपस्थित राहु शकत नाहीत तर अशी ही बालके जातात तरी कोठे हे आपण पाहु या रोल कॉलद्वारे.

**यावेळी सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांना ६ ते १४ वयोगटातील बालक शाळेत दाखल होतात परंतु काही कारणास्तव शाळेत जावु शकत नाहीत याबाबत रोल कॉलद्वारे सादरीकरण दाखविण्यात आले.**

श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:—शिक्षण हक्क कायदा २००९ काय आहे, या कायदयामध्ये कोणकोणत्या बाबी येतात याबाबतचे सादरीकरण राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक मा. श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे हे करतील अशी मी त्यांना विनंती करते.

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**आजच्या या विशेष महासभेचे अध्यक्ष तथा उप—महापौर श्री. जमनादास पुरस्वानी, आजच्या या सभेत उपस्थित असलेले उप—आयुक्त श्री. देहेरकर साहेब, सर्व गटनेता, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सर्व सदस्यगण, तसेच आमचे सोबती श्री. पुरी, श्री. कडव, श्री. बिडवे साहेब व सर्व अन्य उपस्थित मंडळी आपणासर्वांना मी विनम्र अभिवादन करतो. तसेच या सभेतील विषय शिक्षण हक्क कायदा २००९ केंद्र शासनाने आपल्या संविधानात ८६ वी दुरुस्ती करुन जो २१ ए कलमातील अधिकाराची जी ओळख करुन दिली आहे ती मी आपणासमोर वाचुन दाखवितो. या हक्कामध्ये १४ वर्षापर्यंतच्या बालकाला शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे व या सर्वांना सक्तीचे शिक्षण देणे ही शासनाची व आपली जबाबदारी झाली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये शिक्षणाचे ज्यांनी कार्य केले आहे, त्यांना आम्ही विसरणार नाही जसे की महात्मा ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा पुणे येथे उघडली होती. १८४८ मध्ये राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, भारतरत्न श्री. महर्षी कर्वे यासर्वांनी महाराष्ट्रामध्ये शैक्षणीक कार्य केले आहे त्यांना मी अभिवादन करुन याबाबत महाराष्ट्र कोणत्या स्तरावर आहे त्याबत मी सांगतो, महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक शाळा जास्त आहेत. आणि खाजगी संस्थासुध्दा यात आपले योगदान देते. महापालिकेच्या जेवढया काही शाळा आहेत त्यामध्ये पीटीआर म्हणजे विदयार्थी शिक्षकप्रमाणे राखण्याची जबाबदारी जो पीपल टीचर रेसो असतो तो मेंटेन करायचा असतो तर महापालिकेचा या रेसोचा स्तर आहे ३३, शासकिय शाळेत आहेत २९, खाजगी शाळेत ४० व खाजगी विना अनुदानीत शाळेत ३८. तसेच शिक्षण घेणारी जी मुले आहेत, राखीव व अनुसूचीत जाती व जमाती व मुस्लीम मुलांची संख्या सांगितली आहे या मुलांसाठी शैक्षणीक बाबींवर जो खर्च होत आहे तो ३० हजार कोटी होत आहे. त्यात पगारावर २७ हजार कोटी खर्च होत आहे. योजनावर ३ हजार कोटी खर्च होत आहे. यामध्ये सर्व योजनामध्ये सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आहे, माहिती, मिडडेमीलची योजना सुध्दा यामध्ये समाविष्ट आहे. यासाठी जे शासनाकडुन अनुदान मिळते ते १०० टक्के तर राज्य शासनाकडुन कधी ८० तर कधी ५० टक्के मिळते. लिटरसी दर जो आहे तो ८२.०९ आहे त्यामध्ये देशाचे ७४.०४ आहे तर महाराष्ट्र ८२.०९ आहे, देशामध्ये महाराष्ट्र चौथ्या स्थानावर आहे. सुविधांमध्ये ज्या पायाभुत सुविधा आहेत त्यात आपण १९ व्या क्रमांकावर आहोत. पटपडताळणी मोहिम पुर्णपणे राबवायची असून आतापर्यंत ३५०० शाळांची पटपडताळणी मोहिम पुर्ण केली आहे. दुसरी समस्या अशी की, २२३ लाख शाळेतील मुले असून शहरात शाळेला जागा मिळत नाही. शहरी भागात काही शाळा बंद पडत आहेत ही एक समस्या आहे. आता आपल्या राज्यात १० पेक्षा कमी विदार्थी संख्यावाल्या शाळा ११६ आहेत. ही एक हजारपेक्षा जास्त ७७६ आहेत. उल्हासनगर महापालिकेच्या शाळेत सुध्दा हीच स्थिती दाखविली आहे. दिवसेंदिवस महापालिका शाळेंमधील विदयार्थ्यांची संख्या कमी होत चालली आहे. शाळेमध्ये ज्या गोष्टी असल्यापाहिजेत जसे शाळेचे मैदान आहे, कंपाउंड वॉल, किचन शेड, प्रत्येक टिचरसाठी क्लास रुम असणे आवश्यक आहे, त्यासाठी जो प्लान बनवायचा आहे त्यामध्ये ब—याच अडचणी आहेत त्या आपल्यासमोर ठेवल्या आहेत. आपल्या येथे जसे महापालिकेच्या शाळेतील मुले खाजगी शाळेत जातात, १० टक्के मुले इंग्लिश मडियममध्ये ॲडमिशन घेणे पसंत करतात. आता संपुर्ण देशात पाहिले तर ४० टक्के मुले मराठी माध्यमातुन शिकतात, असे १५ लाख विदयार्थी आहेत. इंग्रजी माध्यमातुन शिकणारी मुले १२.२६ लाख आहेत. तसेच उर्दु माध्यमातुन शिकणारी मुले ७.३७ लाख आहेत. हिंदी माध्यमातुन ३३.३४ लाख आहेत. आता मी आपल्या बाबतीत सांगेन की, १९७० मध्ये पहिल्याच वेळेस ही बाब ना. गोपाळकृष्ण गोखले यांनी आपल्या संसदेत ठेवली होती, त्यानंतर २००२ मध्ये या कायदयात दुरुस्ती करण्याचा सुधारणा केली होती त्यामध्ये बालकांना मुलभुत अधिकार देण्याचा प्रस्ताव होता. व आता एप्रिल २०१० पासून महाराष्ट्राने या कायदयास स्विकृती दिली आहे. हा कायदा स्विकारण्यापुर्वी केंद्र सरकारने २००९ मध्ये प्रस्तृत केला होता परंतु यास काही लोकांनी कोर्टात आव्हान सुध्दा दिले होते. परंतु १२ एप्रिल २०१२ मध्ये या कादयास सुप्रिम कोर्टाने मान्यता दिली व या कायदयाचे अंमल करणे सक्तीचे झाले. महाराष्ट्रात २०१० मध्ये आपण याचा अंमल सुरु केला. याचा अंमल ३ वर्षात करणे आवश्यक झाले. त्यासाठी १ एप्रिल २०१० पासून तीन वर्ष म्हणजे ३१ मार्च २०१३ मध्ये आपणांस या कायदयाची पुर्णपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या कायदयामध्ये ३८ कलमे आहेत, आपणांस याबाबतचे एक पुस्तक सुध्दा देण्यात आले आहे, त्यात मराठी व इंग्रजीमध्ये त्याचे भाषांतर सुध्दा आहे. तरी सुध्दा थोडक्यात आपणासमोर एक एक कलम वाचुन मी पुढे जाईन. कलम नं. २ मध्ये प्राथमिक शिक्षण इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी. स्थानिक प्राधिकरण—जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, कटक मंडळे या स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी असते की, त्यांनी प्राथमिक शिक्षण दयायचे आहे. कलम ३ अंतर्गत कोणते विदयार्थी येतील जी मुले ६ ते १४ वयोगटात आलेली आहेत, त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे आता हा त्यांचा हक्क झाला आहे. जे विदयार्थी अपंग आहेत त्यांच्यासाठी वयोमर्यादा तीन वर्षांनी वाढविण्यात आलेली आहे. ६ ते १४ वयोगटातील कुणी एखादा मुलगा शाळेत गेला नसेल सहा वर्षानंतर तर तो पहिल्या इयत्तेत जाईल. जर तो मुलगा वयाच्या ८ व्या वर्षापर्यंत शाळेत गेला नसेल तर जसे ६ व्या वर्षी पहिलीत गेला असता, ७ व्या वर्षात दुसरीत तर ८ व्या वर्षी तो तिसरीत असता त्यानुसार तो तिसरीत जाईल. व त्यास तिसरीमध्ये प्रवेश देणे कायदयानुसार सक्तीचे झाले आहे. कलम ४ अंतर्गत वयानुरुप समकक्ष वर्गात नि:शुल्क प्रवेश झाल्यानंतर कलम ५ अंतर्गत प्राथमिक शिक्षण

पूर्ण करण्यासाठी इतर कोणत्याही शाळेत दाखला हस्तांतरित करुन मागण्याचा हक्क आहे. कलम ६ अंतर्गत नविन शाळेची स्थापना कशी केली जाईल हे दिले आहे. जसे प्राथमिक शाळा एक कि.मी. अंतरावर व ६ ते ११ वर्षे वयोगटातील २० बालके असतील, उच्च प्राथमिक शाळा—तीन कि.मी. अंतरावर व इयत्ता ५ वीच्या वर्गात २० बालके असतील. या कायदयात अशीही तरतुद आहे की लिंग जात व धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही. कलम ८ व ९ अंतर्गत प्राथमिक शाळेत २० विदयार्थ्यामागे १ शिक्षक, उच्च प्राथमिक शाळेत ३५ विदयार्थ्यामागे एक शिक्षक, प्राथमिक शाळेसाठी किमान दोन प्रशिक्षित शिक्षक, उच्च प्राथमिक शाळेत किमान तीन विषयनिहाय पदवीधर प्रशिक्षीत शिक्षक त्यामध्ये एक बीएड शिक्षक असायचे परंतु आता तीन बीएड शिक्षक म्हणजे गणित, विज्ञान व सामाजशास्त्रसाठी एक शिक्षक असेल, कलम ८ व ९ नुसार शाळांमध्ये शासन व स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये दिली असून त्यामध्ये भौतिक सुविधा आवश्यक झाल्या आहेत. त्यात प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्गखोली, मुला—मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, शुध्द पिण्याच्या पाण्याची सुविधा, रॅम्प उतार असणे आवश्यक आहे, संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे, मध्यान्ह भोजनासाठी स्वयंपाकगृह असणे आवश्यक आहे, ग्रंथालय व खेळाचे मैदान असणे आवश्यक आहे. कलम १० अंतर्गत माता, पिता व पालक यांचे कर्तव्य दिले आहे. त्यामध्ये पाल्यास नजिकच्या प्राथमिक शाळेत दाखल करणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी शिक्षेची काही तरतुद नाही. तरीही त्यांचे कर्तव्य ठरते की, या वयोगटामधील जी काही मुले आहेत त्यांना घरी ठेवायचे नाही, त्यांना शाळेत पाठवायचेच आहे. आता या अधिनियमामध्ये एक नविन सुधारणा सुचविण्यात आली आहे ज्याबाबत आजपर्यंत आपण काही कार्यवाही करत नव्हतो. कलम ११ अंतर्गत फक्त ६ वर्षापर्यंतच्या मुलांच्या पुर्व प्राथमिक शिक्षण देणे याची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने या अगोदर घेतलेली नव्हती. परंतु या कादयात ही जबाबदारी शासनावर ठेवलेली आहे. त्यासाठी याचा सुध्दा अभ्यासक्रम तयार करणे व या वयोगटातील मुलांना शिक्षण देणे हे आवश्यक झालेले आहे. कलम १२ अंतर्गत मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी शाळांची जबाबदारी काय आहे तर १) शासकिय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणे देणे. २) शासकिय अथवा शासनाने नियंत्रित केलेल्या शाळा वगळता राज्यातील इतर प्राथमिक शाळेत (मदरसा, वैदिक पाठशाळा, धार्मिक शिक्षण देणा—या संस्था वगळुन) वंचित गट व दुर्बल घटकातील बालकांना शाळेच्या पहिल्याच्या वर्गाच्या एकूण विदयार्थी संख्येपैकी २५ टक्क्यापर्यंतच्या जागा राखीव ठेवणे ही नविन तरतुद आता कायदयात आली आहे. कलम १३ अंतर्गत प्रवेशासाठी कॅपिटेशन फी, चाळणी पध्दतीस प्रतिबंध उल्लंघन केल्यास द्रवदंड रुपये २५,०००/— आहे. कलम १४ अंतर्गत प्रवेशासाठी वयाच्या पुराव्या अभावी प्रवेश नाकारण्यास प्रतिबंध, कलम १५ अंतर्गत प्रवेशास नकार देता येणार नाही शैक्षणीक वर्षात कधीही प्रवेश देता येईल. पुराव्यादाखल कागदपत्र देण्याची आवश्यकता नाही. जर पालकांनी सत्यप्रतिज्ञापत्रावर तसे लिहून दिले की हा मुलगा अमुक इतक्या वयाचा आहे तर त्यास वयोमानानुसार त्या वर्गात प्रवेश दिला जाईल. व प्रवेशास कुणी नकार देणार नाही वर्षात कधीही प्रवेश देता येईल. कलम १६ अंतर्गत मागे ठेवण्यास निष्कासनास व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढुन टाकण्यास प्रतिबंध आहे. कलम १७ अंतर्गत शारीरीक शिक्षा व मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध आहे. शिक्षकांवर आता जबाबदारी वाढली आहे. मुलांना शिक्षा करता येणार नाही आणि जर केली तर त्यासाठी शिक्षेची तरतुद त्यामध्ये ठेवण्यात आलेली आहे. कलम १८ अंतर्गत मान्यता प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणतीही शाळा स्थापन न करणे याचा उल्लेख आहे. जिल्हा शिक्षणाधिका—याचे मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा स्थापन— सुरु करण्यास मज्जाव. बेकायदेशीर शाळा चालविल्या जाणार नाही, जर चालतील तर त्यासाठी १,००,०००/— दंडाची तरतुद आहे. यापूढेही भंग चालू राहिल्यास दर दिवशी रु. १०,०००/— दंडांची तरतुद आहे. शाळेने कलम १९ खालील मानके व निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. प्रत्येक शाळेने घोषणापत्र देणे आवश्यक आहे. या सर्व बाबी आम्ही पुर्ण करत आहोत. त्यानंतर शिक्षण अधिकारी प्राथमिक शिक्षण हे त्याची तपासणी करतील. व त्यास मान्यता प्रदान करतील. प्रत्येक तीन वर्षानंतर या मान्यतेचे नुतनीकरण करायचे आहे. शाळांसाठी जी आवश्यक मानके ठेवण्यात आली आहेत जशी की प्रत्येक शिक्षकामागे एक वर्गखोली, मुख्यध्यापकांसाठी एक खोली, शाळेमध्ये स्वच्छतागृह असावे. पिण्याच्या पाण्याची सोय असावी, खेळाचे मैदान असावे, कंपाउंड वॉल असावे, स्वंयपाकघर असले पाहिजे. ग्रंथालय व अध्ययन अध्यापन साहित्याचा त्यामध्ये उपयोग असला पाहिजे. ही मानके दिलेली आहेत. आता कलम २१ अंतर्गत एक नविन तरतुद ठेवण्यात आलेली आहे, प्रत्येक शाळेत शालेय कार्यक्रम अंमलबजावणी व सनियंत्रणाासाठी शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे आवश्यक आहे, यामध्ये मुलांचे आई—वडिल व २ विदयार्थी त्याचे सभासद असतील, त्यांना निवडणूकीमध्ये मतदानाचा अधिकार नसतो, त्यामध्ये ७५ टक्के आई—वडिल व २५ टक्यामध्ये शाळेबाहेरील शिक्षण तज्ञ व स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी त्यामध्ये असू शकतील या सर्वांची मिळुन समिती गठन करायची आहे. कलम २२ अंतर्गत शाळा व्यवस्थापन समितीद्वारा शाळा विकास आराखडा तयार करणे. व या शिक्षण व्यवस्थापन समितीस कलम २४ मध्ये शिक्षकांची कर्तव्ये देण्यात आलेली आहे. त्यातील सविस्तर माहिती आपणांस मिळेलच. जसे की सर्व मुले शाळेत येत आहेत, त्यांना दुपारचे जेवण मिळत आहे, शाळेचा एक विकास आराखडा तयार करायचा आहे, वार्षिक व त्रैमासिक व ३ वर्षासाठी अहवाल तयार करायचा आहे. ती करण्याची जबाबदारी आता शाळा व्यवस्थापन समितीवर आलेली आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण व सक्षमीकरण जे आहे त्यांची जबाबदारी यामध्ये दिलेली

आहे. जसे शाळेमध्ये आज सर्व गोष्टी आहेत, ग्रंथालय व अध्ययन अध्यापन साहित्याचा उपयोग, विदयार्थ्यांची संपादणूक पातळी, शाळा विकास आराखडा तयार करणे, आवश्यक बांधकाम करणे, गणवेश वाटप करणे, मध्यान्ह भोजन देणे, सर्व बांलक व पालकांपर्यंत कायदयाची माहिती पोहचविणे, प्रसार, प्रचार, वातारवण निर्मीती, जनजागृती इत्यादी, शासकिय व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांमध्ये त्यांचेद्वारा कामकाज तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये सल्लागार विषयक कार्य यांचा समावेश आहे. कलम २४ मध्ये शिक्षकांची कर्तव्ये देण्यात आलेली आहेत. त्यामध्ये नियमित आणि वेळेवर उपस्थिती असली पाहिजे, अभ्यासक्रम नियोजित वेळेत पुर्ण केले पाहिजे, आता आपल्या सर्वांच्या मनामध्ये असेल की, आता परिक्षा नाही व कुणाला नापास करायचे नाही, असे काही नाही, परिक्षा सुध्दा आहे, त्यांना शिकवायचेही आहे, दर्जेदार शिक्षणही दयायचे आहे. परंतु हे बालकांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मुल्यमापन यासोबत. यासाठी सर्वांच्या परिक्षा घेवुन त्यांना प्राथमिक शिक्षण दयायचे आहे, त्यांचे मुल्यांकन करायचे आहे. जोपर्यंत येत नाही तोपर्यंत शिकवायचे आहे. यामध्ये शिक्षकांना बालकांच्या प्रगतीचा आढावा व पालक भेटी घ्यायच्या आहेत. याकामामध्ये कर्तव्यात कसूर करणा–या शिक्षकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. कलम २५ अंतर्गत पीटीआर बाबत जसे की ३० विदयार्थ्यांमागे एक शिक्षक व उच्च प्राथमिक शाळेसाठी ३५ विदयार्थ्यांमागे एक शिक्षक ठेवणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे कर्तव्य ठरले आहे. कलम २७ अंतर्गत शिक्षकांचा अशैक्षणिक कामासाठी वापर करण्यास प्रतिबंध (निवडणूक, जनगणना व आपत्ती व्यवस्थापन वगळून ), कलम २८ अंतर्गत शिक्षकास खाजगी शिकवणीस प्रतिबंध करण्यात आला आहे. विदयार्थ्यांसाठी ब–याचशा परिक्षा घेतल्या जातात कलम ३० अंतर्गत परिक्षा व पूर्तता प्रमाणपत्र, बालकास मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होण्याची गरज नाही. प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. ही शाळेची जबाबदारी आहे. समजा शाळेमध्ये छळवणूक होत असेल, मानसिक व शारीरीक छळवणूक होत असेल तर त्यासाठी एक आयोगाचे गठन केले आहे. त्यामध्ये बालकांच्या हक्कांचे संरक्षण, शिक्षणाच्या हक्कांचे संरक्षण, राज्य बालहक्क संरक्षण अयोग गठन केले आहे. यामध्ये मुले अपिल करु शकतील. कलम १८ व १९ नुसार सर्व शाळांना मान्यता व दर तीन वर्षांनी नुतनीकरण करणे आवश्यक आहे. आता आपली काय जबाबदारी आहे महानगरपालिकेचे सदस्य या नात्याने आपल्या विभागामध्ये जेवढे काही विदयार्थी आहेत ६ ते १४ वयोगटातील विदयार्थांना दर्जेदार शिक्षण देणे ही आपली जबाबदारी आहे. तसेच जे विदयार्थी शिकत नाहीत त्यांना शाळेत दाखल करणे ही आपली जबाबदारी आहे. कठिण आर्थिक परिस्थितीतील बालकांच्या शिक्षणासाठी विशेष लक्ष, त्यामध्ये विशेष गरजाधिष्ठित, अनाथ, बेघर, स्थलांतरीत, बालकामगार, बाल सुधारगृहातील, रस्त्यावरील, रेल्वे प्लॅटफॉर्म, वेश्या व्यवसाय करणा–या महिलांची, एड्स बाधित इत्यादी बालके यावर लक्ष दिले पाहिजे. त्यांना प्राथमिक शिक्षण देणे आपली जबाबदारी आहे. हे कुठपर्यंत करायचे आहे तर आपणांस ३१ डिसेंबर २०१२ पर्यंतची मर्यादा आहे. तोपर्यंत या सर्व सुविधा पुर्ण करायच्या आहेत. यासाठी जनजागृती करुन जे लाभार्थी असतील त्यांना जागृत करणे, जी शाळा लाभ देईल त्यांची सभा घेवुन त्यांना या तरतुदींची माहिती देणे ही आपली जबाबदारी बनते. आता महाराष्ट्र शासनाने विशेष पडताळणी मोहिम घेतली, यामध्ये दिनांक २ मे, २०१२ चा शासन निर्णव व मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्वरित कार्यवाही करणे, सर्व प्रकारच्या नियोजनासाठी फक्त डायस माहितीचा वापर करणे, सन २०१२–१३ पासून डायस व सेमिस यांचे एकत्रिकरण करुन युडायस या प्रणालित दिनांक १/१०/२०१२ पासून सर्व शाळांची अचूक माहिती संकलित करणे आवश्यक आहे. केंद्र पुरस्कुत योजनांचे नियोजन, आरटीआय प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी वेळोवेळी आढावा घेणे, क्रिडा विभागाच्या योजनांचा शाळेशी जास्तीत जास्त समन्वय, क्रिडा संकुले व क्रिडांगण विकास योजना करणे, सर्व विदयार्थींना जी स्कॉलरशिप दिली जाते त्यासाठी विदयार्थ्यांना २०१३–१४ पर्यंत आधारकार्ड देणे आवश्यक आहे. यावर्षी आपण सर्व शिक्षक व विदयार्थ्यांचे आधारकार्ड बनविणे गरजेचे केले आहे. डिसेंबर अखेर हे काम सुरु होईल. शिक्षकांना महिन्याच्या १ तारखेला ईसीएस पध्दतीने वेतन देणे आवश्यक आहे. ही योजना ईसीएस पध्दतीने करुन सर्व शिक्षकांना त्याद्वारे वेतन दिले जाईल. हे माझे थोडक्यात सादरीकरण होते. तर माझे हे सादरीकरण मी हिंदीमध्ये आपल्यासमोर मांडले, माझ्या या तोडक्या मोडक्या हिंदीत बोलतांना काही चुकी झाली असेल तर मला माफ करा. जर आपल्या मनामध्ये याबाबत काही शंका असतील तर आपण मला सांगावे मी त्यासाठी उभा आहे, आपणांस उत्तर दिले जाईल.

<u>**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–**</u>साहेब, या कायदयाच्या कलम १४ मधील जी तरतुद आपण सांगितली की, त्यांच्याकडे जन्म तारखेचा पुरावा नाही. जशी माझ्याकडे एक महिला काम करत आहे, तिच्या पतीने तिला घरातुन बाहेर काढले आहे आणि तिच्या मुलाचा जन्म दाखला आता मिळत नाही तर त्यामुळे त्या मुलाला शाळेत प्रवेश दिला जात नाही.

<u>**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**</u>महोदया, आता हा नविन कायदा आला आहे, आता त्यांना प्रवेश दयावाच लागेल.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**हा कायदा फक्त महानगरपालिकेच्या शाळांना लागु राहिल की खाजगी शाळांनाही लागु राहिल?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**सर्वांसाठी आहे. या कायदयाच्या अंमलाखाली सर्व शाळा येतात. जसे की महापालिकेच्या शाळा असोत, खाजगी असोत, राज्य महामंडळाच्या असोत, सीबीएससी असोत, आयसीएससी असोत, आयबीओ असोत, कोणत्याही मंडळाच्या मान्यताप्राप्त शाळा असोत, सर्व शाळा या कायदयाच्या अंमलाखाली आल्या आहेत.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**त्यांना फक्त सत्यप्रतिज्ञापत्र दयायचे आहे की आणखी काही कागदपत्र दयावयास पाहिजे काय?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**सत्यप्रतिज्ञापत्राची काही आवश्यकता नाही. त्यांच्याकडे असेल तर बघा. सरपंचाचा सुध्दा दाखला चालतो.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**नगरसेवकांनी लिहून दिले तर?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**होय, होय चालेल.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**त्यानंतर जसे आपण सांगितले की, ६ ते १४ वयोगटांतील विदयार्थ्यांसाठी मोफत शिक्षण उपलब्ध आहे, ते खाजगी शाळांसाठी सुध्दा आहे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**होय. हे पहा, आताच मी आपणांस सांगितले होते की, खाजगी शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिक दुर्बल व अनुसूचित जाती, जमातीच्या विदयार्थ्यांसाठी राखीव आहेत.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**व फीच्या बाबत?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**फीच्या बाबतीत जर ती खाजगी विना अनुदानीत शाळा असेल तर तेथे जी काही शाळेची फी असेल ती तर भरावी लागेल.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**ठिक आहे, आभारी आहे.

**<u>सदस्या श्रीमती ज्योती कालानी :—</u>**६ ते १४ वयोगटातील ज्या मुलांची शाळा सुटलेली असते, ही जी मुले असतात, व त्यातील एखादा मुलगा ६ वी नंतर शाळेतुन बाहेर पडला व त्यानंतर आज तो १०—१२ वर्षाचा आहे, त्यासाठी या कायदयामध्ये काही तरतुद आहे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**महोदया कायदयात तरतुद आहे. जर तो दुस—या इयत्तेपर्यंत शिकला असेल त्यानंतर तो जर शाळेतुन बाहेर पडला असेल, परंतु त्यानंतर आता आपणांस माहिती पडले की तो आता ११ वर्षाचा आहे व आपणांस त्यास शाळेत दाखल करायचा आहे, तर तो ११ वर्षाचा मुलगा त्याच्या वयोमानानुसार ६ वीमध्ये दाखल होवु शकतो. त्या वर्गात त्याला दाखल करुन घ्यायचे आहे. व त्याने जो अभ्यासक्रम पुर्ण केला नाही तो त्याच्याकडुन करुन घेण्याची आम्ही तयारी केली आहे. तर त्याच्या वयोमानानुसार त्यास त्या वर्गामध्ये दाखल करुन घ्यायचे आहे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—</u>**साहेब, ही तरतुद कोणत्या कलमात आहे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**कलम ४ जे आहे त्यामध्ये वयोमानानुसारच्या वर्गामध्ये त्यास प्रवेश दयायचा आहे.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**साहेब, आपण म्हटले की, आजच्या तारखेला कोणत्याही मुलाची कोणतीही परिक्षा घेतली जाणार नाही किंवा पालकांचीही कोणतीही परिक्षा घेतली जाणार नाही. व खाजगी शाळा मोठ मोठया रक्कमेच्या ज्या देणग्या घेतात त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**कायदा तर आधीपासुनच आहे परंतु यापुर्वीच मी सांगितल्यानुसार फी घेतली जाणार नाही. कोणतीही स्क्रीनींग टेस्ट होणार नाही. तसेच काय काय करायचे नाही त्याचाही यामध्ये उल्लेख केलेला आहे. आणि जर त्यांनी ते काही केले तर त्यावर दंडात्मक कारवाईची सुध्दा तरतुद आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–**प्रवेशासाठी काही फी भरायची आहे काय?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**नाही, नाही, प्रवेशासाठी कुठलीही फी दयायची नाही.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**साहेब, काही मुद्दयांवर माहिती पाहिजे. कल्याण व उल्हासनगरमधील काही खाजगी शाळांमध्ये असे पाहिले गेले आहे की, कल्याणमधील शाळेमध्ये असे सांगितले जाते की आपण कल्याणमधील रहिवासी असाल तरच प्रवेश दिला जाईल, उल्हासनगरमधील असाल तर प्रवेश दिला जाणार नाही त्याबाबतीत काय तरतुद आहे.

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**याबाबत तरतुद आहे. प्रवेशासाठी एक किलोमिटरचा परिसर निश्चित करुन देण्यात आलेला आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**समजा, उल्हासनगरमधील एखादा मुलगा अंबरनाथ किंवा कल्याणमध्ये शिकु इच्छित आहे, तर त्या शाळेवाले त्यास सांगु शकतात काय की आपला राहण्याचा पत्ता कल्याणचाच असला पाहिजे.

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**बिल्कुल.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:–**असे बोलु शकतात का?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**होय असे बोलु शकतात. आता अशी तरतुद झालेली आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**म्हणजे ते सक्तीने बोलु शकतात. व जशी आमची महाविदयालय आहेत, त्यांमध्ये हा कायदा लागु नाही?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**फक्त प्राथमिक शाळेंसाठी आहे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–**आणखी एक मुद्दा आहे, कुणाला जर शाळा बदलायची असेल तर त्याबाबतही हरकत घेतली जाते, त्यांना ना हरकत दाखला दिला जात नाही.

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**या कायदयामध्ये अशी तरतुद आहे की, त्याचा शाळा सोडल्याचा दाखला रोखुन धरणेस मनाई आहे.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–**आभारी आहे साहेब.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–**साहेब, आता तुम्ही स्पष्ट केले की एखादया मुलाकडे काहीही कागदपत्र नसली तरी त्यास शाळेमध्ये दाखल करुन घ्यावेच लागणार आहे, बरोबर आहे?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–** होय.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–**काहीही कागदपत्र नसतांना?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**नाही, तो मुलगा समोर आल्यानंतर त्याच्या आईने वडिलांनी प्रतिज्ञापत्र दिले की हा मुलगा या वयाचा आहे. तर त्यास शाळेत प्रवेश दयायचा आहे.

**सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–**आई वडिलांकडे पुरावे पाहिजेत?

**श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–**नाही.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–</u>**तेही नाही? मला एक शंका आहे, जसे बाहेरगावाहुन नागरीकांचे लोंढे येथे येतात. बांग्लादेशी लोक येथे येतात. त्यांच्या मुलांनाही आपण या कायदयाच्या माध्यमाने शाळेत प्रवेश देवु शकतो?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**हे पहा, तो या देशाचा नागरीक असायला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>**हेच मला म्हणायचे होते.

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**तो या देशाचा नागरीक आहे किंवा नाही हे तपासण्याचे काम या विभागाचे नाही. बरोबर? ते योग्य तो विभाग पाहिल. आपण असे म्हणु शकतो की, या देशातील ६ ते १४ वयोगटाच्या मुलाला आपणांस प्रवेश दयायचा आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–</u>**नागरीक आहे की नाही हे कोण ठरविणार?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**हे योग्य विभाग पाहिल त्याबाबतीत शिक्षण खाते खात्री नाही करु शकणार.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>**योग्य विभाग म्हणजे कुठला विभाग? हे जरा स्पष्ट करा ना?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**यामध्ये, नागरीकत्व हे पोलिस विभाग पाहतो.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–</u>**म्हणजेच प्रवेश घ्यायला येणा–या विदयार्थ्याला पोलिस स्टेशनमध्ये..............

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**एक मिनिट, त्याची तशी गरज नाही. आपण त्या भानगडीत न पडता आमचे खाते काय करेल, पालकाचे प्रतिज्ञापत्र घेवुन मुलगा समोर आलेला आहे, ............

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>**पुढे ते लोक भारतीय नागरीकत्व सिध्द करतील की आम्ही या शाळेत शिकलो आहे म्हणुन?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**हे पहा, ही गोष्ट सिध्द झाल्यानंतर त्यास कायदयातील तरतुदीनुसार शिक्षा आपोआपच होईल. परंतु त्या कारणासाठी हे सिध्द होण्यासाठी आज जर एखादा मुलगा प्रवेशासाठी आला तर त्यास आपल्याला रोखता येणार नाही.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:–</u>**हे सिध्द झाल्यानंतर त्यास शाळेतुन काढणार असे?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**येणा–या प्रत्येक विदयार्थ्याची राष्ट्रीयता सिध्द करत बसण्याची ही वेळ नाही. बरोबर? आपल्यावर प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी आहे. ती सिध्द करण्याची जबाबदारी त्यांचे ते करतील.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**साहेब, आमचा प्रश्न तुम्हांला कदाचित समजलेला नाही. त्यांना मुलांना शिक्षण देण्याबाबत म्हणायचे नाही तर त्यांना हे म्हणायचे आहे की, जो मुलगा शाळेत आणला आहे आईवडिलांनी, त्याच्या बाबतीत सत्यप्रतिज्ञापत्र लिहून दिले पण ते आईवडिलच येथिल नागरीक नसतील, आपल्या देशातील नागरीक नसतील तर त्याची कोणी पडताळणी करायची हा विषय आहे. बांग्लादेशी नागरीक आपल्याकडे जास्त आहेत.

**<u>सदस्या श्रीमती पंचशिला पवार :–</u>**ब–याचशा शाळामध्ये पाण्याच्या टाक्या असतात त्या ब–याचवेळा साफ केल्या जात नाहीत. चार चार महिने पाण्याच्या टाक्या साफ केल्या जात नाहीत त्यामुळे मुलांना त्रास होतो. बरीच मुले घरातुन पाणी घेवुन जातात, परंतु बरीचशी मुले शाळेतील त्या टाकीचे पाणी पितात तर त्यासाठी आपण काय करायला पाहिजे. समजा आपल्याला लक्षात आले की अशी एखादी शाळा आहे ती शाळा अस्वच्छता ठेवते तर.

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**ती जी १० मानके आहेत त्यामध्ये शाळेत पिण्याचे स्वच्छ पाणी असले पाहिजे हे एक मानक आहे. त्या १० बाबींपैकी एखादी जरी बाब नसली तर खाजगी शाळेच्या बाबतीत मान्यता

काढुन घेण्याची तरतूद आहे. ती जर महापालिकेची शाळा असेल तर मग आपली जबाबदारी आहे. मग तेथे पिण्याचे स्वच्छ पाणी आपल्याला पुरविलेच पाहिजे.

**सदस्या श्रीमती पंचशिला पवार :—**त्याबाबतीत कुणाकडे आपण दाद मागितली पाहिजे?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**महानगरपालिकेची शाळा असेल तर प्रशासन अधिकारी आणि महानगरपालिका म्हणुन आपलीही जबाबदारी आहे, आपली जबाबदारी आहे भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची. खाजगी शाळा असेल तर खाजगी शाळेचे व्यवस्थापन त्यांचे मुख्याध्यापकांनी व्यवस्थापनाकडून या बाबीची पुर्तता करुन घ्यायची आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**विषय निघाला तर एका गोष्टीची मी आपणांस माहिती देवु इच्छितो की आताच आमच्या श्रीमती पंचशिला पवार यांनी सांगितले की पाण्याच्या टाकीची साफसफाई होत नाही, उल्हासनगर महानगरपालिकेची शाळा नं. १० ही एक मराठी शाळा आहे, आमचे प्रशासन अधिकारी सूध्दा येथे बसले आहेत, आज तीन महिन्यापासून शाळेमध्ये लाईट नाही. मुले तशीच शिकत आहेत, ही कुणाची जबाबदारी बनते?

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:—**शिपायांची जबाबदारी आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**शिपायाची जबाबदारी हा एक दुय्यम मुद्दा आहे त्या शाळेमध्ये लाईट नाही. आपले प्रशासन अधिकारी ज्या दालनात बसतात तेथे वातानुकुलीत यंत्रणा चालु असते. ती एक दिवस जरी बंद झाली तर दुस—या दिवशी चालु होते. तीन महिन्यापासुन शाळेमध्ये लाईट नाही, ती जबाबदारी कुणाची ठरते.

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**साहेब, ही जबाबदारी आपल्या सभागृहाची पण आहे.

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**मला हे बोलण्यास बरे नाही वाटत, बोलले नाही पाहिजे परंतु मजबुरीने बोलावे लागत आहे. अंधारात मुले शिकत आहेत त्यामुळे आपण वस्तुस्थितीचाही विचार केला पाहिजे. फक्त येथे मोठमोठी भाषणे दयायची, यासाठी माझी आपणांस विनंती होती की, आपण थोडा वेळ काढुन उल्हासनगर महापालिकेच्या शाळांची आपण पाहणी करावी, त्यामुळे कनिष्ठ अधिका—यांना वाटेल की आपणावर कुंणीतरी पर्यवेक्षण करत आहे, कृपया या बाबीकडे जरा लक्ष दिले जावे.

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**ठिक आहे साहेब.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**साहेब आपण काय सांगितले की ३१ मार्च २०१३ पर्यंत आपल्याला सर्व पायाभुत सुविधाची पुर्तता करायची आहे. त्यासाठी आपले काय नियोजन आहे? त्यासाठी पायाभुत सुविधा कोण उभ्या करणार आहे? त्यासाठी निधीची तरतुद आपण कोठुन करणार/ आणणार आहात? निधीची आपण काही व्यवस्था केली आहे का?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**या पुढच्या सादरीकरणामध्ये आपल्याला आपल्या महानगरपालिका शाळांची स्थिती दिसेल. आणि या तरतुदींच्याबाबत मी स्पष्ट करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थेचीच असते. ज्या सुविधा नाहीत त्या आपल्याला स्वत:हुन निधी उपलब्ध करुन कराव्या लागतील. तसेच ज्या योजना महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाकडुन अनुदान घेवून चालविल्या जातात त्यासाठी आपणांस अनुदान दिले जाते त्याचा जास्तीत जास्त लाभ उचलुन त्याचा ३१ मार्चपुर्वी आपणांस लाभ घ्यायचा आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**शिक्षकांच्या संदर्भात तुम्ही सांगितले की, शिक्षकांवर कारवाई केली जाईल. स्थानिक संस्थांच्या शाळा असतील त्यातील शिक्षकांवर कारवाई स्थानिक संस्था करेल, बरोबर आहे?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**बरोबर.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**खाजगी शाळा असतील तर त्यातील शिक्षकांवर कारवाई कोण करणार?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**खाजगी संस्थांच्या बाबतीत संस्था ही त्यांची नियुक्ती प्राधिकारी असते आणि संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीने त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**आणि व्यवस्थापनाने कारवाई नाही केली तर?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**त्याच्यासाठी विभागाकडुन पुढील प्रक्रिया सुरु केली जाईल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**कोण करेल?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**शिक्षण विभाग सुरु करेल.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—**साहेब आपले उत्तर असे आहे की, महापालिका शाळांमध्ये पायाभुत सुविधांची जी व्यवस्था करायची आहे ती महानगरपालिकेने करायची आहे. त्यासाठी शासनाचा कुठलाही निधी किंवा अनुदान नाही?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**काही योजनांसाठी जसे की यापुर्वी स्वच्छतागृहांसाठी एसएस अंतर्गत अनुदान दिलेले होते. रॅमसाठी अनुदान दिलेले आहे. आयओडी योजना आहे अपंगांसाठी त्यासाठी अनुदान दिलेले आहे. ज्या ज्या योजना केंद्र शासनाकडुन आलेल्या आहेत, त्यांच्याबाबतीत अनुदान मिळालेले आहे आणि ब—याचशा सुविधा आपल्याकडे आहेत. आता ज्या थोडयाफार राहिलेल्या आहेत त्या पुर्ण करुन घ्याव्या लागतील.

**सदस्या श्रीमती ज्योती कालानी:—**उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळाच्या शाळांमधील शिक्षकांना जर आपण विचारले तर आपणांस दिसून येईल की त्यांना मागील कितीतरी महिन्याचा पगार मिळालेला नाही. असे ठरविण्यात आलेले होते की, शिक्षणमंडळाच्या शाळांमधील शिक्षकांचा पगार एक तारखेला त्यांच्या बॅक खात्यावर जमा झाला पाहिजे, परंतु उल्हासनगरची स्थिती अशी आहे की, तीन—तीन, चार—चार महिने त्यांना पगार मिळत नाही. त्याचबरोबर शिक्षकेतर जे कर्मचारी आहेत त्यांनाही वेळेवर पगार मिळत नाही. त्यासाठी काय तरतुद आहे?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**ही तर स्थानिक स्तरावरील अडचण आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**६ ते १४ वयोगटातील जे शाळाबाहय विदयार्थी आहेत, त्यांची जनगणना कोण करणार आहे?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**६ ते १४ वयोगटातील मुलांचा सर्व्हे हा दरवर्षी मे महिन्यात केला जातो. त्यांची रजिस्टरमध्ये व्यवस्थित नोंद घेतली जाते. आणि त्या सर्व्हेनंतर दखलपात्र जी मुले आहेत त्यांना शाळेत दाखल करुन घेण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. पहिले पंधरा दिवस हे गटनोंदणी पंधरवडा म्हणुन दरवर्षी साजरा केला जातो. आपले प्रशिक्षण याच हेतुसाठी आहे की आपण ज्या विभागाचे प्रतिनिधी आहात त्या विभागातील शाळाबाहय मुले शाळेत दाखल झाली आहेत ना? याकडे सुध्दा आपण लक्ष दयायचे आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**दुसरा विषय असा आहे की, उल्हासनगर हे औदयोगिक शहर आहे. येथे मोठया प्रमाणावर कारखानदारी आहे. येथे बाहेरुन येणा—या लोकांचा लोंढा जास्त आहे. शाळा सुरु झाल्यानंतर मध्यला कालावधीमध्ये त्याच्या एक वर्षाच्या शिक्षणाचे काय?

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**स्थलांतर म्हणजे मध्येच सोडुन जाणे किंवा येणे..........

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**येथे येणारे....

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—**येथे येणा—या लोकांचे आहे. आता आमच्या येथे ऊस कामगांराची मुले बाहेर जातात, त्यांच्यासाठी साखर शाळा काढतो. येथे येणा—या मुलांसाठी मात्र हा सगळयात मोठा समस्येचा एक भाग आहे की स्थलांतरीत मुलांचे शिक्षण पुर्ण करुन घेणे. ते आल्याबरोबर आपणांस त्यांच्यासाठी खास करुन उपशाळात्मक अभ्यासक्रम तो ब्रीज कोर्स राबवुन त्यांचा बुडालेला अभ्यास भरुन काढुन त्यांचे प्राथमिक शिक्षण पुर्ण करुन घ्यावे लागेल.

**<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>**साहेब, एक माहिती पाहिजे, आपण सांगितले की उल्हासनगर महानगरपालिकेच्या ज्या शाळा आहेत, त्यांमध्ये विदयार्थ्यांची संख्या कमी आहे, ती का कमी होत आहे? व त्या शाळांमध्ये कोणकोणत्या सुविधा दिल्या पाहिजेत? त्याची सुध्दा माहिती दिली तर महानगरपालिकेकडुन सुविधा पुरविण्यामध्ये जी कमतरता होत आहे त्या सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्न करु. यासाठी पुन्हा एकदा आपण हिंदीत सांगितले तर बरे होईल.

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**या विषयाबाबतचे सादरीकरण अदयाप बाकी आहे. ते पाहिल्यानंतर आपणांस सांगु.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>** साहेब जसं तुम्ही सांगितलं कि प्राथमिक विभागामध्ये ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक आणि माध्यमिक विभागामध्ये ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक. समजा शिक्षकांची संख्या कमी असेल तर भरती करण्यासाठी मुभा आहे.

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**भरतीच्या बाबतीमध्ये सांगतो मी, हे निकष जरी मी आता सांगितले असले तरीया संदर्भात काही अडचणी आहेत. कारण आपल्याकडे प्राथमिक शिक्षण हे पहिले ते चौथी आणि पाचवी ते सातवी असा जुना पॅटर्न चालु आहे. यामध्ये पहिली ते चौथी यास प्राथमिक शिक्षण म्हटले आहे. आणि पाचवी ते आठवीला उच्च प्राथमिक म्हटले जाते. महाराष्ट्र शासनाला राज्यामध्ये हा आकृतिबंध स्विकारायला काही तांत्रिक अडचणी आहेत कारण आठवीचे सर्व वर्ग माध्यमिक शाळेला जोडलेले आहेत.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**आता तुम्ही जसे सांगितले की २०१२ मध्ये या कायदयांच्या तरतुदींची पुर्तता पुर्ण करायच्या आहेत बरोबर आहे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**होय, बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**२०१२ अखेर पुर्ण करायचे आहे. जर तुमचे निकष पूर्ण झाले नसतील तर पुढे काय करायचे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**त्याबाबत शासन निर्णय लवकरच येत आहे. मंत्रालयातुन डिसेंबर महिन्यात याबाबत शासन निर्णय येत आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**दुसरी एक गोष्ट अशी की मी या अगोदर तुम्हांला जे प्रश्न विचारले त्याबाबत समाधानकारक उत्तर मिळाले नाही अजुनपर्यंत.

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**होय, तुमचा प्रश्न मला कळला की पालक जर बांग्लादेशी असेल तर त्यांच्या मुलाच्या प्रवेशाचे काय करायचे? बरोबर ना?

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर:—</u>**साहेब, जर एखादे आई—वडिल मुलाला घेवुन शाळेत येतात व म्हणतात की हा माझा मुलगा आहे त्याला शाळेमध्ये प्रवेश दया, तुमच्या म्हणण्याप्रमाणे शिक्षकांना त्या मुलास प्रवेश दयायचा आहे, बरोबर आहे?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**त्यांच्याकडे काहीही पुरावे नसतांनादेखील त्या मुलास प्रवेश दयायचा आहे, बरोबर आहे? समजा ते बांग्लादेशी असतील तर मग काय? दुस—या देशातील लोक येथे येतील, आता असा खुप प्रकार चालला आहे बांग्लादेशी येथे येत आहेत, त्या मुलाचे आधारे ते येथिल नागरीकत्व सिध्द करुन दाखवतील?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**सामान्य बाबी ज्या आहेत त्या तर पाहिल्याच जातील, पालकांकडे त्याबाबत रेशनकार्ड असते, स्थलांतर होवुन कोठुन आला आहे, गावावरुन आला असेल तर त्याच्या गावाची माहिती असते. या ज्या सामान्य बाबी आहेत त्या विचारल्याच जातील. समजा त्यांच्याकडे काहीच नाही ते गावावरुन आलेले आहेत आणि दाखला त्यांनी आणला नाही तर कुठल्या गावचा आहे एवढे तरी आपल्याला माहिती असेल? मग ती यंत्रणा त्या गावाला पत्र पाठवेल. त्याच्याकडुन काही माहिती मिळते का तर ती घेतली जाईल. मात्र असे काही

नाही होणार की त्याच्याकडे काही नाही म्हणुन त्यास शाळेत प्रवेशच मिळणार नाही. आपण त्यास प्रवेश देवु. आणि बाकीच्या ज्या गोष्टी आहेत त्या चौकशीचा मुद्दा म्हणुन राहतील. कुठले ना कुठले कागदपत्र प्रत्येकाकडे नक्कीच असतात

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>**शिक्षक भरती करण्यास मुभा आहे ना?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**शिक्षक भरती बाबत शासन निर्णय निघणार आहे. ३० आणि ३५ विदयार्थ्यांच्याप्रमाणानुसार सध्या यावर्षाची निश्चिती ३० सप्टेंबरची जुन्या निकषानुसार केलेली आहे. आणि ५ वीचा आणि ८ वीचा वर्ग जोडुन घेण्याबाबत शासन निर्णय झाल्यानंतर कोणते ३० आणि ३५ विदयार्थ्यांनुसारचे निकष येवु घातले आहेत.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>**पालकांना तुम्ही माहिती देणार?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**हो देणार.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :–</u>**वंचित गट व दुर्बल गट यांना २५ टक्के जागा आपण आरक्षित ठेवल्या आहेत. या २५ टक्क्यामध्ये वंचित घटकांना किती आणि दुर्बल घटकांना किती याचे काही प्रमाण आहे का?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**नाही तसे काही नाही आहे. एकुण आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**तसं नाही? ते प्रमाण कमी जास्त असु शकते.

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**लॉटरी पध्दतीमध्ये, लॉटरी काढल्यानंतर कुठल्याही गटातील विदयार्थी त्यामध्ये येवु शकतो. त्यामुळे तेथे वेगवेगळे प्रमाण नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :–</u>** वंचित गटाला, जो दुर्बल घटक आहे, त्याच्या १ लाख रुपयापर्यंतची उत्पन्नाची तुम्ही जी मर्यादा सांगितली तर त्या १ लाख रुपये उत्पन्नाचा दाखला कोणी दयायचा?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**तहसिलदाराने दयायचा.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**तहसिलदारांचा दाखला?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**होय, होय. ते कायदयात स्पष्ट केले आहे.

**<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>**साहेब, यामध्ये अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आहे की अल्पसंख्यांक सुध्दा आहेत?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**नाही, फक्त अनुसूचीत जाती व जमाती.

**<u>सदस्य श्री. जाफरअली चौधरी:–</u>**साहेब, जसे महापालिकेच्या ब–याचशा शाळांमध्ये चोरी होते, वॉचमन नसतात त्यास जबाबदार कोण?

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:–</u>**मी काय म्हणतो, तुम्ही आता दर्जेदार शिक्षणाबद्दल म्हणलात परंतु मुळात महापालिकेच्या शाळेत दर्जेदार शिक्षण नाही आहे. त्यामुळे येथिल विदयार्थी बाहेर जाण्याचे प्रमाण जास्त आहे. तुम्ही आता जे म्हटले की बाहेरुन येणारा लोंढा त्यामुळे जी लोकसंख्या वाढली, किंवा शिक्षणात उपलब्धी वाढली तर शिक्षकात उपलब्धी कोण करणार आहे? नविन शिक्षक नेमणार का? आणि उल्हासनगर शहर असे आहे की येथे सर्व भाषिक लोक आहेत, त्यामुळे प्रत्येक भाषेच्या शाळा तुम्ही नविन खोलणार काय?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**आपल्याला शाळा मातृभाषेतच उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आणि शिक्षकही उपलब्ध करुन दयायचे आहेत.

**<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–</u>**साहेब, माझा प्रश्न असा आहे, जसे तुम्ही आता म्हणालात की, सर्व मुलांना शिक्षणाचा अधिकार आहे. म्हणजे सुरुवातीला शाळेत प्रवेश घेतांना काहीही कागदपत्र नसतील तर आपण शाळेत ॲफिडेव्हिड देवुन त्या मुलाचे प्रवेश घेणार, परंतु जर प्रवेश घेतांना त्यामध्ये जात आणि धर्माचा फॉर्ममध्ये जो रकाना आहे तो तुम्ही ॲफिडेव्हिडद्वारे भरणार काय? किंवा एखादयाची जात तो खुल्या वर्गातील असतांना सुध्दा एससी किंवा एसटी किंवा मागासवर्गीयांमधील भरली, मग शाळेस जे अनुदान मिळते, सुविधा मिळतात ते शासन त्यास देणार काय? काहीही पुरावा नसतांना?प्रवेश तुम्ही कोणत्या निकषावर देणार?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**आता पुरावा एकाच मुद्दयाबाबतचा होता की, त्याच्या जन्मतारखेबाबत त्याच्याकडे पुरावा नाही, म्हणुन त्याला प्रवेशापासुन वंचित ठेवु नये एवढेच. बाकीचे जे लाभ आहेत त्यासाठी ती कागदपत्र दयायची आहेत ती दयावीच लागणार आहेत.

**<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे:–</u>**जन्मतारखेच्या बाबतीत प्रवेश देतांना नेहमीच पालकांना विचारले जाते. नविन नियमानुसार जन्म दाखल्यावर धर्माची नोंद केली जाते, म्हणुन मी हा प्रश्न विचारला.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**साहेब, हा अधिनियम जो आहे तो २००९ चा आहे.

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**हो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** २००९ च्या अधिनियमाची अंमलबजावणी आता २०१३ मध्ये करायची आहे?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**नाही, सुरु झालेली आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**पण ती प्रभावीपणे सुरु झालेली नाही?

**<u>श्री. कु–हाडे, उपशिक्षण अधिकारी:–</u>**होय बरोबर.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**कारण अजुनही सरकार तळयात मळयात आहे. ३० विदयार्थ्यांच्या मागे एक शिक्षक त्यास तुम्ही मंजुरी देणार काय? म्हणजे २०१२ संपले २०१३ सुरु झाले, मार्च साधारणत: सव्वा वर्ष आहे. मागच्या चार वर्षामध्ये आपण काहीही करु शकलो नाही. मला एक सांगा की पुर्वीचा जो नियम होता, अधिनियम होता आणि आताचा नियम यामध्ये ठळक फरक काय आहे? शिक्षकांनी खाजगी टयुशन घेवु नये हे पहिले होतेच, जसे सरकारी दवाखान्यात काम करणारे डॉक्टरांनी खाजगी रुग्णालयात काम करु नये तसे शिक्षकांनी खाजगी टयुशन घेवु नये हे पुर्वीपासुनच आहे. तसे तर बरेचसे नियम तेच आहेत. तर यामध्ये विशेष असे काय आहे, तुम्ही सांगितले की, नविन शाळा ३१ मार्च २०१३ पर्यंत शेजार शाळा उपलब्ध करुन देणे हे शासनावर बंधनकारक आहे. आता हे शासन देणार आहे का? आतापर्यत का नाही दिले हा माझा पहिला प्रश्न. त्यानंतर श्री. सुभाष मनसुलकर यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत ते कधीपर्यंत पुर्ण होईल? मागील चार वर्षापासुन अजुनही शासनाची गोंधळलेलीच परिस्थिती आहे का? तुकडयांवर शिक्षक आता जास्त आहेत. किंवा ज्या ठिकाणी जास्त शिक्षक असतील तर त्याठिकाणी काय करणार? म्हणजे आमच्या एका शाळेमध्ये १९ शिक्षक असतील तर ५ विदयार्थी आहेत आणि ५ शिक्षक आहेत, खेडेगावात चार चार वर्ग एक शिक्षक चालवितो तेथे १०० विदयार्थी आहेत, दिडशे विदयार्थ्यांना एक शिक्षक आहे, शासनाने, लोकप्रतिनीधींनी किंवा तेथिल स्थानिक अधिका–यांनी पाठपुरावा करुन देखील शासन शिक्षक पाठवत नाही. तर मग २००९–२०१३ या धोरणाची अंमलबजावणीला वेळ का लागला? बांग्लादेशी मुलांना आपण येथे शिक्षण देणार मग पडताळणी करणार की ते बांग्लादेशी आहेत किंवा नाही? ध्येय धोरण चांगले आहे परंतु त्याची अंमलबजावणी करतांना चुका होत आहेत. आता तुम्ही जसे सांगितले की महापालिकेने पहावे परंतु महापालिकेजवळ निधी आहे का? पैश्याचे आम्ही नाटक करु शकत नाही. अर्थकारण आता आमच्या राज्य शासनाने ढवळल्याने आमचा उत्पन्नाचा एकमेव स्त्रोत होता तो जकातीचा, तो काढला आणि स्थानिक संस्था कर दिला, त्या करामध्ये आमचे उत्पन्न होते कि नाही होत. बरं, शासकिय मंडळाला पगार दिला, शिक्षकांचा पगार आहे तो ५० टक्के दिला, तर मग शासनाचे उत्तरदायित्व संपले मग महापालिकेने काय करायचे ते करायचे? मग आमचे शिक्षण अधिकारी येथे येतील, आयुक्तांना भेटतील, आयुक्त पैसे देवु शकणार नाहीत, महापालिकेत नाही, विहिरीत नाही तर पोह–यात येईल कोठुन? म्हणजेच शासन जेवायला पण देत नाही भिकपण मागु देत नाही. अशी अवस्था शासनाने केली आहे. नुसती धोरणे अंवलंबुन चालणार नाही. शासनाची अशी परिस्थिती आहे की, १० वीची सुध्दा परिक्षा बघतांना नविन नविन धोरणे काढणार आणि त्याचे विपरित परिणाम लोकांवर, विदयार्थ्यांवर होत आहे. यामध्ये सुध्दा तशीच अवस्था आहे. यामध्ये आउटपुट असे काहीच नाही. २००९ पासुन २०१२ हा काळ अधिनियम समजून घेण्यात गेलेला आहे. त्याची अंमलबजावणी लांबच.

शाळा व्यवस्थापन समिती, फक्त सरक्युलर पाठविले. त्याच्यानंतर पुढे काय झाले? प्रत्येक शाळेने ती शाळा व्यवस्थापन समिती स्थापन केली काय? त्या शाळेच्या अडचणी काय आहेत? त्यांना तशा पुरेश्या सुविधा आहेत का? ते करु शकतात काय? खास करुन शहरी भागांमध्ये. शैक्षणिक जो कायदा होता त्यानुसार विदयार्थ्यांना ज्या शैक्षणिक सुविधा पुरविल्या पाहिजेत. खेळाचे मैदान असले पाहिजे, अमुक अमुक विदयार्थ्यामागे एक शिक्षक हे पहिल्यापासुन आहे पण ती धोरणे राबविली नाहीत. आता या अधिनियमाच्या माध्यमातुन तरी सर्वांनी, त्याचबरोबर त्यांच्या अडचणीही समजुन घेतल्या पाहिजेत. नुसता बडगा दाखवुन चालणार नाही. त्या शाळेला मैदान आपण देवु शकतो काय? आणि आपल्या महानगरपालिकेच्या शाळांच्याबाबतीत आणि आपल्या महापालिकेच्या बाबतीत शासनाने धोरण ठरवावे की पगार दिला ५० टक्के कि त्यांची जबाबदारी संपली कर्तव्य संपले असे नाही. तशा प्रकारची सरकारची नितीमत्ता झालेली आहे. बाकी सर्व महापालिकेने बघावे. पण महापालिकेचा आणि शिक्षण मंडळाचा तसा संबध. शिक्षण मंडळ ही स्वायत्त संस्था झाली. मग आम्ही सुध्दा सोडुन दयायचे काय? परंतु या महापालिका क्षेत्रातील विदयार्थी असल्यामुळे आम्ही काही करु शकत नाही का? पण शासन अजिबात काय करत नाही बरोबर का? प्रशासन अधिकारी आहेत येथे. त्यांना समस्या भेडसावतात. मग विदयार्थ्यांसाठी शिक्षण मंडळाने खर्च केला तर शिक्षकांचा पगार थांबला जातो. शिक्षकांचा पगार आज दिला तर शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना पगार मिळत नाही. म्हणजे अशा कैचीमध्ये महापालिकेला ठेवायचे आणि मग आम्ही उन्नती / विकास करु शकत नाही. कागदावर आणि प्रोजेक्टवर दाखविण्यापुरताच शिक्षणाचा अधिकार असेल. त्यासाठी काय करता येईल अशा आमच्या भावना आहेत. महापालिका शाळा आणि खाजगी शाळा, आता खाजगी शाळा बाबत तुम्ही किती धोरणे राबविली तरी, खाजगी शाळांमध्ये दोन दोन वर्षअगोदर प्रवेश घेतले जातात. आणि ८०—८० हजार, ९०—९० हजार डोनेशन घेतले जाते. ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी नुसती चर्चा करु नये, प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी तळमळ पाहिजे. ती तळमळ तुम्हा सर्व अधिका—यांना वाटली तर ठेवा. आम्हांला तळमळ असणारच आहे. वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. महापालिका शाळांची अवस्था काय आहे? जसे आमच्या सदस्याने सांगितले की तुम्ही फिरा आमच्याबरोबर. महापालिकांच्या शाळांची आम्ही नाही करु शकत दुरुस्ती कारण निधी नाही आणि आमचा निधी कोणी घेतला तर शासनाने, जे आमच्या आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत होते ते बंद केले आहे. यासाठी एकतर तुम्ही अनुदान दया. शाळांच्या दुरुस्तीसाठी दया आणि ३१ मार्च २०१३ पर्यंत शेजार शाळा उपलब्ध करुन देणे शासनावर बंधनकारक आहे. एवढे जरी केले तर आजच्या या सभेचा फायदा होईल.

**श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारीः—** अभ्यास करुन चांगल्या सूचना केल्या आहेत. केंद्र शासनाने २००९ रोजी हा कायदा केला असला तरी महाराष्ट्र शासनाने तो १ एप्रिल २०१० रोजी स्विकारला आहे त्यामुळे एक वर्ष यामध्ये निघुन गेले आहे. त्याच्या अंमलबजावणीमध्ये मधल्या कालावधीमध्ये महाराष्ट्र शासन जे अनेक उपक्रम स्वतःहून राबवत होते ते आपलेच होते. जे नव्याने या कायदयामध्ये आलेले आहेत. त्यामुळे नविन काही आले नाही असे वाटते त्याचे कारण आपण अग्रेसर आहोत असे मला म्हणायचे आहे. जे आपण आधी करतच होतो ते या अधिनियमामध्ये पुन्हा एकदा आले आहे आणि ते केंद्राने सर्व राज्यांसाठी लागु केले आहे. जे आपण अगोदर करत होतो. दुसरी गोष्ट भौतिक सुविधांच्या बाबतीमध्ये आज तुम्ही बोलल्यामुळे आमचा हेतु साध्य झाला असे मला वाटते कारण तुम्हांला त्याची जाणिव झाली. हेच आमचे काम होते की, आपल्या शाळांमध्ये आज आपल्याला काय करायचे आहे, याचा शोध आपण घेवुन त्याचा एसएनसीमार्फत जे म्हणत होतो की, स्कुल एज्युकेशन प्लान १ वर्ष आणि ३ वर्ष करुन ज्या गरजा आज आपल्याकडे आहेत, पुर्ण करणे आवश्यक आहे त्या पूर्ण झाल्या असतील यात प्रश्न नाही. पूढील सादरीकरण आपणांस पाहायचे आहे. १० बाबींमध्ये सर्व शाळांमध्ये किमान एक गोष्ट करता येवू शकते की पिण्याच्या पाण्याची सुविधा, मुला—मुलींसाठी स्वतंत्र शौचालय यासाठी फार खर्च लागणार नाही. खुप मोठया इमारतीं उभारायच्या असतील तर त्याच्यासाठी अनुदानाची जी आपली अडचण आहे त्यासाठी सर्व शिक्षा अभियानामार्फत अनुदान उपलब्ध, मागील तीन वर्षापुर्वी केंद्र शासनाकडुन आलेले, जिल्हा परिषदेमार्फत आम्हां लोकांना महानगरपालिकांना दिलेलेच आहे. आपल्या येथे काही षटकोनी खोल्या झालेल्या दिसत असतील. अजुनही आपली या संदर्भातील जी अडचण आहे की आम्ही निधी उपलब्ध करु शकत नाही. ज्या ज्या बाबी आम्हांला करायच्या आहेत, या सर्वांचा हेतुच तो होता की, आपली आपल्याला जाणीव व्हावी, आपल्याला काय करावे लागेल? आपण काय करतोय, आणि आपण जर काही करु शकत नाही तर राज्य शासनाकडुन किंवा केंद्र शासनाकडुन अनुदान मागण्याची गरज आहे आपण त्याची तयारी ठेवायलाच पाहिजे. हा हेतुच या सभेचा होता. एसएनसीमध्ये जरी आपण ७५ टक्के पालक घेतले असले तरी २५ टक्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनाही स्थान ठेवलेले आहे. आपले लक्ष तेथे असावे. आपली जबाबदारी ही एक नैतिक जबाबदारी आहे, शहरामध्ये किमान आपण म्हणतो तसं एक किलोमिटरच्या आत शाळेची सुविधा उपलब्ध व्हायलाच पाहिजे. ग्रामिण भागामध्ये हे चित्र खुप वेगळे आहे. पंधरा पंधरा किलोमिटरपर्यंत मुलांना जावे लागते. दोन मुलांसाठी शाळा काढणे शक्य नाही त्यासाठी २ मुले असली तरी सुध्दा त्यांना वाहतुकीची सुविधा करावी लागणार आहे. तिथे शाळा नाही काढु शकत परंतु त्या दोन मुलांना वाहतुक भत्ता देवुन त्यांना शाळेत आणायचेच आहे. आता येथे शिक्षकांच्या उपलब्धतेचा जो प्रश्न आहे, सकाळी आल्याबरोबरच मी विचारले काही जागा रिकाम्या आहेत परंतु त्या हिंदी माध्यमाच्या आहेत, काही उर्दुच्या आहेत. पदे मंजुर असतील तर आमची महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद जी शिक्षक भरती करते त्यांच्या मार्फत शिक्षकांची मागणी नोंदवा. अन्यथा त्यांना सकाळी असे सांगितले की, ती मागणी येईल तेव्हा येईल. सध्या अतिरीक्त शिक्षक होत आहेत. मी पुणे जिल्हा परिषदेमध्ये आहे. आमच्याकडे १०० अतिरिक्त शिक्षक आहेत. मराठी माध्यमाचे शिक्षक राज्यस्तरावर इकडे तिकडे समायोजन करण्याची प्रक्रिया चालु आहे. दुसरा हा ३० आणि ३५ विदयार्थ्यांच्या प्रमाणाचा जो निकष आहे, तो लागु करण्यामध्ये एक मोठी अडचण अशी की आठवीचा वर्ग प्रायमरीला जोडतांना तेथे भौतिक सुविधा उपलब्ध असायला पाहिजेत. आणि आठवीचे अतिरिक्त झालेले शिक्षक यांचे समायोजन खाजगी शाळांमध्ये करावे लागणार आहे. ही एक मोठी तांत्रिक अडचण येत असल्यामुळे तो शासन निर्णय लगेच पारीत

होवु शकला नाही. परंतु डिसेंबरमध्ये या संदर्भात शासन निर्णय होवून शिक्षण निश्चितीबाबत शासन निर्णय होईल आणि तो सर्वांना कळविण्यात येईल. आता युडायस ही जी संकल्पना पुढे आली आहे ही एक अशी गोष्ट आहे की याच्यामार्फत आपल्या प्रत्येक शाळेची माहिती केंद्र शासनापर्यंत जाते आणि ज्या ज्या बाबींसाठी आपल्याला अनुदान लागते ते युडायस च्या माध्यमातुन आपल्याला दिले जाते. त्यामध्ये आपण लिहिले की आपलयाकडे पिण्याच्या पाण्याची सोय आहे, रॅम आहे, संरक्षण भिंत आहे. तर त्याला ते अनुदान देत नाहीत. आणि अशा काही गोष्टी पुर्वी घडल्यामुळे आपल्याकडे ते नसतांनाही ते नोंदविले गेले म्हणुन आपल्याला अनुदान मिळाले नाही. यावर्षी अनुदान मिळाले असणार पुढील सादरीकरणात ते सांगितले जाईल आणि त्या अनुदानात काय काय केले ते कळेल. ते पाहिल्यानंतर आपण चर्चा केली असती तर आपल्या ब—याच शंकाचे निवारण झाले असते. ठिक आहे.

**<u>सदस्य श्री. विजय तायडे :—</u>**माझा असा प्रश्न आहे की, ज्या खाजगी शाळा आहेत आणि ज्यांना अनुदान मिळते तर त्या शाळांना खेळाचे मैदान असणे सक्तीचे आहे का?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**या कायदयाप्रमाणे आहे.

**<u>सदस्य श्री. विजय तायडे :—</u>**ज्यांच्याकडे खेळाचे मैदान नाही त्यांचे काय?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**आता या अधिनियमामध्ये, मान्यतेच्या प्रक्रियेमध्ये त्यांना नोटिसा जातील आणि पुर्तता केली नाही तर शाळेची मान्यता जावु शकते.

**<u>सदस्य श्री. विजय तायडे :—</u>**तीन—चार शाळा माझ्या नजरेत आहेत, त्यांच्याकडे खेळाचे मैदान नाही, रहिवाशी क्षेत्रामध्ये शाळा आहेत आणि त्यांच्याबाबतीत ब—याच लोकांची हरकत आहे. त्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**त्या कारवाईमध्ये पहिला टप्पा असा आहे की, त्यांनी मान्यतेसाठी स्वत: घोषणापत्र शिक्षण अधिका—यांकडे भरुन दयायचे आहे. त्याची तपासणी होईल त्या तपासणीप्रमाणे १० मानकांप्रमाणे गोष्टी त्यामध्ये नसतील तर त्याच्याबाबत त्यांना नोटिसा देवुन मान्यता काढण्याची प्रक्रिया सुरु करुन पुढे कारवाई होणार आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आणि त्या शाळेमध्ये दोन हजार विदयार्थी आहेत तर त्यांच्याबाबतीत काय?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**त्यांचे समायोजन नाईलाजास्तव अन्य शाळांमध्ये करावे लागेल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**एक मिनिट, आता चार नंबरची शाळा आहे आणि ४ नंबरमध्ये सर्व शाळांमध्ये जर तिच अवस्था असेल आणि पाच शाळांची मान्यता तुम्ही रद्द केली आणि १० हजार विदयार्थी बाधित झाले तर तुम्ही त्यांना १ नंबरच्या शाळेमध्ये समाविष्ट करणार काय? ............... आणि हे तुम्ही करु शकत नाहीत.

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**तुम्ही हे जे सादरीकरण केले आहे ते एवढे काही प्रभावी नाही आहे. ते केवळ करायचे म्हणुन केले आहे. याचे तुम्ही काही समाधानकारक उत्तर देवु शकत नाही.

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**कुठल्या प्रश्नाचे उत्तर राहिले आहे?

**<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>**आता साहेबांनी सांगितले की त्या शाळेला क्रिडांगण नाही, तुम्ही ते कसे उपलब्ध करुन देणार?

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**ज्या भौतिक सुविधा आहेत त्यातील एखादी सुविधा नसेल तर ती त्यांनी उपलब्ध करुन दयायला पाहिजे. इथपर्यंत ठिक आहे, परंतु शहरामध्ये अशी स्थिती नाही की, परिसरातील एखादी इमारत तोडुन तेथे क्रिडांगण तयार करायचे हे प्रत्यक्षात होवु शकत नाही. परंतु ज्या ठिकाणी ही सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. पण तरीही करत नसतील तर त्यांच्यावर आपणाला हा बडगा उभारावा लागणार आहे. त्याच्यासाठी आहे ते.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**साहेब, एक मिनिट, या सभेत मी थोडा उशिरा आल्याने तुमची ओळख माहित नाही पडली. मला फक्त एक विचारायचे आहे. तुम्ही शिक्षण क्षेत्रातुनच आलेले असणार? बरोबर आहे? काही मुख्याध्यापक तक्रारी घेवुन शिक्षण अधिका—याकडे जातात, त्यात त्यांच्या चपला घासल्या जातात, परंतु शिक्षण अधिका—यांच्या कार्यालयातुन त्यांना आवश्यक असलेली परवानगी मिळत नाही. शिक्षण अधिका—यांच्या कार्यालयातील अधिकारी त्यांना नको नकोस करुन टाकतात.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>**आणि त्याकरीता वजन ठेवायचे बाकी काही नाही.

**<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>**शिक्षकाना अक्षरश: स्वत:चे क्लास बुडवुन तेथे जावे लागते. शाळेतील विदयार्थ्यांना अभ्यास सोडुन त्यांना तेथे जावे लागते. त्यासाठी याविषयी तुमच्यातील कोणी संबंधीत असेल तर मेहरबानी करुन त्या लोकांना ही सजा देवु नका.

**<u>श्री. कु—हाडे, उपशिक्षण अधिकारी:—</u>**ठिक आहे. आपल्या भावनांची दखल घेवुन आमचे जे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांच्यापर्यंत आपल्या या भावना नक्की पोहचवु आणि भविष्यात असे काही कृत्य त्यांच्याकडुन होणार नाही याची आपण खात्री घेवु या. धन्यवाद।

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ चे सादरीकरण ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातुन अतिशय सुंदर असे केलेले आहे. सर्व स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने जे नगरसेवक आलेले आहेत, त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यांना आमच्या राज्यस्तरीय मार्गदर्शकांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. आता पुढील कार्यक्रम म्हणजे मा. मंत्री महोदय, शालेय शिक्षण विभाग, श्री. राजेंद्र दर्डा यांचा संदेश आम्ही चित्रफितीद्वारे सादर करु.

**सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—**प्रशासन अधिका—यांची जबाबदारी काय आहे ते जरा सांगा.

**यावेळी मा. नामदार श्री. राजेंद्र दर्डा, मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे मनोगत सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आले.**

**राजेंद्र दर्डा**
**मंत्री**
**शालेय शिक्षण**

आपण निवडून आलेले आपल्या शहरातील लोकप्रतिनिधी आहात, जनतेची नाडी आपल्याला चांगल्याप्रकारे कळते. या शिक्षण हक्क कायदयाच्या माध्यमातुन कोणताही बालक आज शिक्षणापासुन वंचित राहणार नाही. प्रत्येक बालकाला शाळेमध्ये प्रवेश मिळेल त्याला त्याठिकाणी कमीत कमी आठवीपर्यंत त्याला दर्जेदार व गुणवत्तापुर्वक शिक्षण देणे हे या शिक्षण हक्क कायदयाच्या माध्यमातुन अभिप्रेत आहे. आपल्याला कल्पनाच आहे की, महाराष्ट्र राज्य हे शिक्षणाच्याबाबतीत एक प्रगत राज्य आहे. आज शाळा बाहय विदयार्थी महाराष्ट्रात कमी आहेत. राज्यातही जे विदयार्थी या शिक्षणापासुन दुर आहेत, त्यांना आपल्याला या शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. आपल्याला कल्पना आहे की, ज्याला प्राथमिक शिक्षण म्हणतो ही प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी विशेषत: जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि नगरपालिका यांच्यावर आहे. आपल्या एकुण शाळांपैकी ६८ टक्के शाळा या प्रकारामध्ये मोडतात. आणि त्यामुळे या शाळांमध्ये स्वच्छतागृह असतील त्याठिकाणी शाळेला संरक्षण भिंत हवी. त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था करण्यासाठी आपल्या सर्वांना अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. मला हे सांगताना अत्यंत आनंद होत आहे की, आपला प्राथमिक शिक्षणाचा जो अभ्यासक्रम आहे तो आता राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या बरोबर आपण आणलेला आहे. प्रत्येक बालकांनी शाळेत जायला पाहिजे, या दृष्टीकोनातुन शिक्षण हक्क कायदयात अनेक गोष्टींचा समावेश झालेला आहे. प्राथमिक शिक्षण प्रवेश हे काम आता सोपे झालेले आहे. कोणत्याही बालकाची किंवा त्याच्या पालकांची प्रवेश देत असतांना मुलाखत घेता येणार नाही. त्याठिकाणी जो विदयार्थी आहे, जो बालक आहे, त्या बालकाजवळ जन्माचा दाखला नाही म्हणुन त्याला तुम्हांला थांबवुन ठेवता येणार नाही. पण या सगळयात जे कायदे आहेत त्याची माहिती आपल्या सर्वांना होणे आवश्यक आहे. आणि त्या दृष्टीकोनातुनच आज आपल्याला माहिती देण्यात येईल, मला खात्री आहे की आपण समाजाला चांगल्याप्रकारे ओळखता त्या समाजापर्यंत जावुन जी वंचित बालक आहेत त्यांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्याचे कार्य निश्चितपणे कराल. नुकतेच महाराष्ट्र शासनाने पहिले ते पाचवीपर्यंत शिक्षण १ किलोमिटर अंतराच्या आत आणि साहवी ते आठवीचे शिक्षण ३ किलोमिटरचे आत करण्याचे जाहिर केलेले आहे. आणि त्या दृष्टीकोनातुन आपले प्रयत्नही चालु आहेत. पण एखादया वाडीमध्ये किंवा पाडयावर १० विदयार्थी सुध्दा नाहीत अशा ठिकाणी शेकडो शाळा आज महाराष्ट्रात निश्चितपणे सुरु आहेत. आज बालकांना शाळेत येत असतांना आपण मध्यान्ह भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्यांच्या गणवेशाची व्यवस्था केलेली आहे. त्यांना मोफत पाटी पुस्तकांची व्यवस्था केलेली आहे. शालेय शैक्षणिक साहित्य आपण त्यांना पुरवितो. उद्देश एकच आहे की विदयार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळावे. या कायदयाबाबत बोलत असतांना मला एका गोष्टीचा उल्लेख करणे अतिशय आवश्यक वाटते की समाजामध्ये गैरसमज झालेला आहे १ ते ८ वी पर्यंत परिक्षा आहे, सर्वकष सातत्यपुर्ण मुल्यांकन आपण त्याला म्हणतो. एकच आहे. आता विदयार्थ्यालाही अभ्यास करावा लागेल तर परिक्षा जी होईल ती शिक्षकाची सुध्दा होणार आहे. आपल्या वर्गातील विदयार्थ्यांना या शिक्षकांनी कशा प्रकारे शिकविणे, त्याचे मुल्यमापन त्याने कशा प्रकारे केले हे आता समोर येणार आहे. त्यामुळे ख—या अर्थाने विदयार्थ्यांची परिक्षा डब्बल होणार आहे. ८ वीमध्ये त्या विदयार्थ्याला आपल्याला मागे ठेवता येणार नाही. मला शेवटी एकच सांगितले पाहिजे की, शिक्षणाचा जगन्नाथाचा रथ त्याची सुत्रे आज आपल्या हातात देण्यात आलेली आहेत. आणि मला खात्री आहे आपल्या संपुर्ण सहकार्याने शिक्षण हक्क कायदा हा अत्यंत प्रभावीपणे आपल्या भागात राबविला जाईल. आपल्या प्रत्येक शाळेमध्ये जी शालेय व्यवस्थापन समिती आहे त्याकडे आपण लक्ष ठेवाल. जे विदयार्थी शाळेत दररोज येत नाहीत, किंवा ज्यांनी प्रवेश घेतला आहे परंतु ते येत नाहीत अशा विदयार्थ्यांकडे आपण लक्ष ठेवाल आणि आपल्या या प्रयत्नातुनच आपण या देशाला सुजाण नागरीक देवु शकु. फक्त पुस्तक वाचणारे विदयार्थी आपल्याला निर्माण करायचे नाहीत तर परिसराचा अभ्यास, आकलन करणारे विदयार्थी आपल्याला निर्माण करायचे आहेत, आणि ज्यावेळेला हे विदयार्थी समाजात जातील, शाळेतुन बाहेर पडतील, त्यावेळेला मला खात्री आहे. जीवनामध्ये जी आव्हाने समोर येतील, त्या आव्हानांना पेलण्याची क्षमता आपण त्यांच्यामध्ये निर्माण करु या. त्यामुळे परत एकदा सर्व प्रतिनीधिंना मी शासनातर्फे नम्र विनंती करतो की त्यांनी शिक्षण हक्क कायदा अधिक चांगल्याप्रकारे समजुन घ्यावा, आणि तो समाजापर्यंत पोहोचवावा. आपल्याशिवाय हे करणे शक्य होणार नाही. धन्यवाद।

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षीका:—**मा. नामदार श्री. जयंत पाटील, ग्रामविकास मंत्री यांचे मनोगत सादरीकरणाद्वारे दाखविण्यात येत आहे.

**यावेळी मा. नामदार श्री. जयंत पाटील, मंत्री, ग्रामविकास यांचे मनोगत सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आले.**

**जयंत पाटील**
**मंत्री**
**ग्रामविकास**

ज्या देशामधील जनता जास्त शिकेलेली आहे, शिक्षितपणा वाढलेला आहे, साक्षरता वाढलेली आहे, ते देश जगात पुढे निघुन गेलेले आहेत, त्या सर्वांचा विचार करुन त्या देशात हा नवा कायदा मान्य झाला आणि या कायदयामध्ये अनेक चांगल्या गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. आणि याची काळजी घेतलेली आहे की, या देशातील गरीबातील गरीब माणसाला

अशिक्षीत माणसाच्या मुलाला देखील शिक्षण मिळेल. म्हणुन या कायदयाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायदा असे म्हटलेले आहे. एक किलोमिटरवर प्राथमिक शाळा, तीन किलोमिटरवर उच्च प्राथमिक शाळा. असे शाळा / शिक्षण लोकांच्या जवळ नेमण्याची महत्वाची घटनेत तरतुद या निमित्ताने झालेली आहे. त्याचबरोबर आपल्या देशामध्ये गरीबातला गरीब माणुस वंचित राहु नये म्हणुन ही श्रीमंताची शाळा असली तरी २५ टक्के दुर्बल घटकातील लोक त्या शाळेत जावु शकतील आणि म्हणुन फार मोठ म्हणतो, या देशात सर्वासमावेशक व सर्वव्यापक कायदा केल्यामुळे या कायदयाला महत्व असे मला वाटते आज आपल्या देशामध्ये शालेय शिक्षण आणि ग्रामविकास या दोघांनी एकत्र येवुन महाराष्ट्रात या कायदयांची अंमलबजावणी कशी होते हे बघण्याची जबाबदारी आपणा सर्वांच्यावर आहे. शासन बालकांच्या कल्याणासाठी वेगवेगळया योजना करते, गणवेश वाटप करते, शालेय साहित्य दिले जाते, या सर्वांच्यासाठी आपण लोकांचे प्रतिनिधी म्हणुन जागृत किती आहोत शाळेतील शिक्षणाचा दर्जा कसा आहे, आपली जागृती किती आहे? त्याचबरोबर आपल्या मतदार संघामध्ये आपली शाळा किती चांगली आहे, शाळेतील सुविधा किती उत्तम आहे, याकडे लोकांचे प्रतिनिधी म्हणुन आपण सर्वांनी ख—या अर्थाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे, शासन, शाळा शिक्षक, लोकप्रतिनीधी त्यांच्या जागृक सहका—यावर या कायदयाच्या अंमलबजावणीचे यश अवलंबुन आहे असे मला वाटते आणि म्हणुन राज्यातील पंचायत समिती, जिल्हापरिषद, नगरपालिका, महानगरपालिका इथे स्थानिक स्वराज्य संस्थामधील लोकांचे प्रतिनधी निवडून दिलेले आहेत म्हणजे आपण. यांनी जागृतता दाखवुन या कायदयाची अजुन चांगल्याप्रकारे अंमलबजावणी केली तर महाराष्ट्र या देशाचे सर्वात अग्रेसर राज्य होण्यास आणखी हातभार आपण लावणार असा त्याचा अर्थ होईल. मला खात्री आहे या कायदयाचा विशेष अभ्यास करुन आपल्या गावातील, आपल्या मतदार संघातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्हयातील शाळा व मुलांना कसं संरक्षण या कायदयातुन मिळु शकते. याची जागृतता आपण दाखवावी. आणि या कायदयाची सखोल अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आपल्या भागात करावा अशी अपेक्षा मी करतो. आणि या कायदयाच्या अंमलबजावणीस मी हार्दिक शुभेच्छा देतो.

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचा संदेश.

**यावेळी मा. मुख्यमंत्री महोदय श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे मनोगत सादरीकरणाद्वारे दाखविण्यात आले.**

**पृथ्वीराज चव्हाण**
**मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र**

बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा कायदा आपण ८६ व्या घटना दुरुस्तीमध्ये बदल करुन अंमलात आणलेला आहे. हा कायदा १ एप्रिल २०१० पासुन सर्व देशभर लागु झालेला आहे, आपल्या राज्यातही लागु झालेला आहे. त्याला आव्हान देण्यात आलेले होते, सर्वोच्च न्यायालयाने १२ एप्रिल २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे. आणि तो कायदा अंमलात आणण्याची आपल्या सर्वांवर जबाबदारी आहे. आज राज्यातील जवळ जवळ ६८ टक्के शाळा या सार्वजनिक क्षेत्रात आहेत. त्यामध्ये ४३ टक्के विदयार्थी आणि ५० टक्के शिक्षक आहेत. या सर्वांची गुणवत्ता वाढविली पाहिजे. ६ ते १४ वयोगटातील विदयार्थी हा शाळेबाहेर राहु नये, त्याला शिक्षणाचा जो घटनेने दिलेला अधिकार आहे तो त्याला मिळावाच याकरीता आपण सगळयांनी कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. ५ वी पर्यंतची शाळा १ किलोमिटरच्या आत व ८ वी पर्यंतची शाळा ३ किलोमिटरच्या आत असावी असा आपण निर्बंध टाकलेला आहे. तशा प्रकारच्या पायाभुत सोयी आपण निर्माण केलेल्या आहेत. परंतु त्यामध्ये लोकप्रतिनीधींची जबाबदारी फार मोठी आहे. ६८ टक्के शाळा या सार्वजनिक शाळा आहेत. यामध्ये जिल्हापरिषद क्षेत्रामध्ये, नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये, महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये असलेल्या शाळा त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्यांमधील गळतीचे प्रमाण कमी करणे यासाठी आपणा सर्वांना प्रयत्न करायचे आहेत. आणि याकरीता येत्या २९ आणि ३० तारखेला महानगरपालिकांच्या आणि जिल्हा परिषदांच्या सर्वसाधारण सभा आपण आयोजित केलेल्या आहेत. त्या सभांमध्ये तंज्ञ आपल्याला मार्गदर्शन करतील. आणि त्यामध्ये येणा—या अडचणी या कायदयामध्ये सुलभता येण्यासाठी आपणांस काय करावे लागेल? याची चर्चा होणे अभिप्रत आहे. आपण सर्वांनी या केंद्र सरकारच्या कायदयामध्ये बदल केल्यामुळे फायदयाचे झाले आहे. ते फायदे सर्वांना पोहचले पाहिजेत त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शाळेची गुणवत्ता वाढविण्याकरीता त्यांचे सार्वत्रिकरण करण्याकरीता, गळतीचे प्रमाण रोखण्याकरीता आपण प्रयत्न केले पाहिजेत. या सक्तीच्या मोफत कायदयाची अंमलबजावणीकरीता आपण ही योजना केलेली आहे त्यामुळे कुठल्याही शाळेमध्ये २५ टक्के विद्यार्थी फुकट शिकवले पाहिजेत, जे दारीद्रयरेषेखालचे असावेत, मुली असाव्यात अशाप्रकारचे नियमामध्ये आपण बदल केलेले आहेत. पण तुमच्या सहकार्याशिवाय हे शक्य होणार नाही. शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण देण्याची त्यांची गुणवत्ता टिकविण्याची जबाबदारी हि जिल्हापरिषदांवर व महापालिकांवर आहे. मुले शाळेत जावीत, गळतीचे प्रमाण कमी व्हावं याकरीता शासनाच्या माध्यमातुन मोफत गणवेश, शाळेचे साहित्य, मध्यान्ह भोजन या अनेक सुविधा आपण दिलेल्या आहेत. या सर्व सुविधा व्यवस्थितपणे शेवटच्या मुलामुलींपर्यंत पोहचतात कि नाही हेही आपल्याला पाहावयाचे आहे. मला खात्री आहे तुम्ही सर्वजण या चळवळीकडे एक जनआंदोलन म्हणुन पाहाल आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ करण्याकरीता हातभार लावाल.तरच ख—या अर्थाने महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा दर्जा वाढण्यास व शिक्षणाचे सार्वत्रिकरण आपणांस शक्य होणार, धन्यवाद.

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—** यानंतर स्लाईट माहितीवर आधारीत उल्हासनगर महानगरपालिकेचे सादरीकरण आमचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, मा. श्री. योगेश मराठे, हे सादर करतील.

**यावेळी स्लाईट माहितीवर आधारीत मा. श्री. योगेश मराठे, सहा. कार्यक्रम अधिकारी यांचे सादरीकरण दाखविण्यात आले. (स्लाईट माहितीवर आधारीत सादरीकरण पृष्ठ क्र. २० ए ते २० व्ही सोबत जोडले आहे)**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**यानंतर अपंग समावेशक शिक्षण यावर आधारीत ध्वनीचित्रफीत दाखविण्यात येणार आहे. बालकांना मोफत शिक्षण कसे मिळेल याबाबत ध्वनीचित्रफीत दाखविण्यात येईल.

**यावेळी अपंग समावेशक शिक्षण यावर आधारीत ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**डिसअॅबीलीटी अपंग मुलांनाही शिक्षणाचा हक्क आहे, सर्वसामान्य मुलांसारखे त्यांनाही शिक्षण मिळाले पाहिजे यावर आधारीत ध्वनीचित्रफीत दाखविण्यात येत आहे.

**यावेळी अपंग मुलांनाही शिक्षणाचा हक्क आहे यावर आधारीत ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**शैक्षणिक क्षेत्रात समाजाचाही सहभाग अपेक्षित आहे यावर आधारीत चित्रफीत दाखविण्यात येत आहे.

**यावेळी शैक्षणिक क्षेत्रात सामाजाचाही सहभाग अपेक्षित आहे यावर आधारीत ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**यापुढे शाळेपर्यंत येण्यासाठी वाहनांची काही सुविधा आहे याविषयी वाहनाविषयीची ध्वनीचित्रफीत दाखविण्यात येत आहे.

**यावेळी शाळेपर्यंत येण्यासाठी वाहनांची सुविधांवर यावर आधारीत ध्वनीचित्रफित दाखविण्यात आली.**

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—**आतापर्यंत आपण अनेक ध्वनीचित्रफीतातुन आणि तज्ञ मार्गदर्शक यांनी दिलेल्या मार्गदर्शनाद्वारे प्रशिक्षण पुर्ण केले. आता आपल्या सभेचे अध्यक्ष मा. उप—महापौर यांचे मार्गदर्शनपर भाषण होईल.

**उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**शिक्षणाचा अधिकार २००९ या विषयाच्या आजच्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेले प्रशासन अधिकारी, श्री. बिडवे साहेब, येथे उपस्थित असलेले सर्व पाहुणे, मार्गदर्शक श्री. पुरीजी, श्री. सुनिलजी, श्री. कडव साहेब, व उपस्थित शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी व येथे उपस्थित असलेले महापालिकेचे सर्व पदाधिकारी, सर्व सन्माननिय नगरसेवक, शिक्षणाचा अधिकार २००९ हा जो अधिनियम आहे, जो ३१ मार्च २०१३ पासुन पुर्णपणे लागु करायचा आहे. त्याची अंमलबजावणी करायची आहे. याठिकाणी या विषयावर हे जे प्रशिक्षण ठेवण्यात आले, त्यासाठी आलेले सर्वांचे मी अभिनंदन करतो व सरकारच्यावतीने हा जो अधिनियमाची अंमलबजावणी केली जात आहे, त्यामध्ये ६ ते १४ वयोगटातील जी मुले आहेत, त्यांना शिक्षणाचा जो अधिकार मिळेल, तो प्रशंसनिय आहे. बरीचशी मुले शिक्षणापासुन वंचित राहतात. ज्याप्रकारे येथे सांगण्यात आले, या अधिनियमाअंतर्गत कोणत्याही मुलास, कोणत्याही शाळेत, मग भलेही ती महानगरपालिकेची शाळा असो किंवा अनुदानीत शाळा असो, खाजगी शाळा असो, त्यामध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांना तेथे २५ टक्के जागांमध्ये आरक्षण असेल. त्यांना प्रवेश दिला जावु शकेल. या अधिनियमांमुळे नगरसेवकांच्या कर्तव्यात वाढ होत आहे कोणत्याप्रकारे आपण या मुलांना शाळेमध्ये प्रवेश देवु शकु. व त्यासाठी एक जी पध्दत असेल त्याबाबतीत मी सांगु इच्छितो की, ज्याप्रकारे प्रवेश दिला जातो त्यानंतर तेथे फलक लावला जातो की या शाळेत प्रवेश देण्याचे बंद आहे. परंतु आता २५ टक्के जे आरक्षण राहिल त्यासाठी स्वतंत्रपणे फॉर्म भरले जातील. १ किलोमिटरच्या आत ज्या काही शाळा असतील त्या शाळामध्ये त्या परिसरात राहणा—या मुलांचे प्रवेशासाठी फॉर्म भरले जातील व सर्वसाधारण संवर्गातुन त्यांच्या प्रवेशासाठी जेवढया काही आरक्षित जागा असतील त्या भरल्या जातील, जर जास्त मुले येत असतील तर लॉटरी पध्दतीने प्रवेश दिला पाहिजे. जेणेकरुन शिक्षणापासुन कोणी वंचित राहु नये. लॉटरी पध्दतीने सर्व मुलांना प्रवेश दिला जाईल त्यांच्या कुटुंबियांकडुन जे कोणी आले असतील तसेच आपले शिक्षण अधिकारी, लोकप्रतिनिधी या सर्वांसमोर लॉटरी काढुन त्यांना प्रवेश दिला जाईल. व गरीब कुटुंबातील मुलांना कोणतीही फी भरायची नाही. त्यांची फी शासनाच्यावतीने त्या शाळेस अदा केली जाईल. अमुक एका शाळेमध्ये डोनेशन घेतले जाते असे जे येथे सांगण्यात आले ते या अधिनियमानंतर बंद होईल. कोणताही अधिनियम जेव्हा तयार होतो तर काही काळापर्यंत त्याच्या अंमलबजावणीत अडचणी असतात. ज्याप्रकारे माहितीचा अधिकार चालु झाला. त्याचे फायदे मिळणे सुरु झाले. त्याचप्रकारे शिक्षणाचा अधिकार या कायदयाचे फायदेही पुढे मिळत राहतील. हा अधिनियम अंमलात येईल. आणि एक दोन वर्षामध्ये त्याचे फायदे मिळुन जातील. शासनाने डोळे उघडले आहेत. आपणा सर्वांनाही आता डोळे उघडायचे आहेत. व आपल्या विभागातील जी काही गरीब मुले आहेत जी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांच्यासाठी आपण प्रयत्न करु. तर जरुर ते ध्येयापर्यंत पोहचतील त्यासाठी येथे आलेल्या सर्व लोकप्रतिनिधींना मी पुन्हा एकदा धन्यवाद देतो. खुपच चांगल्याप्रकारे येथे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. व आपल्या उल्हासनगर महापालिकेचे जे अधिकारी आहेत त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे येथे मार्गदर्शन आयोजित केले की कोणकोणत्या गोष्टींची कमतरता आहे तर आपण सर्वांनी मिळुन त्या कमतरता दुर करण्याचा प्रयत्न केला तर निधीची उपलब्धताही आपोआप होईल. निधी कोठुन ना कोठुन जरुर येईल. मग तो उल्हासनगर महापालिकेचा असो, महाराष्ट्र शासनाचा असो किंवा केंद्र शासनाचा असो, जर आपण सर्वांनी पाठपुरावा केला तर आपण ते साध्य करु. व सर्वांनी एकदा लक्ष दयावे, हा जो २००९ चा अधिनियम आहे तो ३१ मार्च २०१३ पासून लागु करण्यामागे आपण लागु. ज्यामुळे एक दोन

वर्षामध्ये उल्हासनगरमध्ये सर्व मुले आपापल्या शाळांमध्ये असतील व शिकुन पुढे येतील, धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र।

**श्रीमती माधवी जाधव, शिक्षिका:—** धन्यवाद। आभाराचा भार स्विकारणार नाहीत आपण हे कळतय आम्हांला, पण तुमच्या आमच्या ऋणानुबंधात भाग पडतय आपलें आभार मानायला, आपले हार्दिक आभार.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे? कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.१५ वाजता उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका